सी-
३८०

३५३

३/८६

# [illegible]

शि० ल० करंदीकर

ऊ/८६

# पाकिस्तानचें संकट

लेखक

शिवराम लक्ष्मण करंदीकर,

एम्.ए., एल्एल्.बी., एम्.एल्.ए.

प्रस्तावना-लेखक

लक्ष्मण बळवंत भोपटकर

एम्.ए., एल्एल्.बी.,

प्राध्यापक, लॉ कॉलेज, पुणें

डिसेंबर १९४१

किंमत २ रुपये

PRINTED BY V. G. KETKAR, AT THE LOKSANGRAHA PRESS, 624 SADASHIV,
POONA CITY
AND
PUBLISHED BY SHIVRAM LAXMAN KARANDIKAR, DAMLE'S BUNGALOW,
399 SADASHIV, POONA CITY

★

स्वर्गाहूनहि श्रेष्ठ असणाऱ्या

मातृदेवतेला व मातृभूमिदेवतेला

**सविनय, सादर समर्पण**

★

पाकिस्तान चळवळीचें पुरस्कर्ते मि. रहमत अली
यांनीं ऑगस्ट १९४१ मध्यें केंब्रिजहून प्रसिद्धिलेलें

# 'पाकिस्तानचें विक्राळ स्वरूप'




रेखांकित भाग - इस्लामी वर्चस्वाचा सूचक.
उरलेला भाग    हिंदू वर्चस्वाचा सूचक.

दे० भ० धर्मवीर भोपटकर यांनीं लिहिलेले

# दोन प्रास्ताविक शब्द

**माझे मित्र श्री० शि० ल० करंदीकर** यांनीं लिहिलेल्या **"पाकिस्तानचें संकट"** या ग्रंथाचीं हस्तलिखितें मीं समग्र लक्षपूर्वक वाचिलेलीं आहेत; व त्यावरून मला लिहिण्यास मोठा आनंद वाटतो कीं, या ग्रंथानें खरोखरच महाराष्ट्रीय राजकीय साहित्यांत उत्तम भर टाकलेली आहे!

आजकाल पाकिस्तान हा राजकीय क्षेत्रांतील एक वादग्रस्त विषयच होऊन बसलेला आहे. मुसलमान समाजानें आपली अशी समजूत करून घेतलेली दिसते कीं, हिंदुस्थानांत जर पाकिस्तान स्थापन करण्यांत आलें, तर त्या समाजाचा उत्कर्ष झाल्याविना खचित राहणार नाहीं.

इतर पुष्कळांची अशी समजूत कीं, पाकिस्तानचें खूळ मुख्यतः मुस्लीम लीगनें, व त्यांतल्या त्यांत जनाब जीनांनीं अलीकडेच निर्माण केलेलें आहे.

हे वरील दोन्ही समज कसे चुकीचे आहेत, हें करंदीकरांनीं या ग्रंथांत अभ्यासपूर्वक आंकड्यानिशीं व ऐतिहासिक दाखले देऊन सप्रमाण सिद्ध केलेलें आहे. यासंबंधाचीं प्रकरणें तीन, चार व पांच वाचकांनीं लक्षपूर्वक वाचल्यास त्यांना कळून येईल कीं, पाकिस्तानची कल्पना वाटते तशी नवोदित नसून, सन १८५७ सालापासून तिचें बीजारोपण होऊन, ती आतां फक्त स्पष्ट स्वरूपांत जगापुढें मांडण्यांत आलेली आहे, इतकेंच काय तें!

या विषयावर डॉ० आंबेडकर यांनीं लिहिलेल्या ग्रंथानें बरीच खळबळ उडवून दिली आहे, यांत शंका नाहीं. डॉ० आंबेडकर यांची ख्याति

त्यांची बुद्धिमता, विद्वत्ता व अभ्यासु वृत्ति यांबद्दल आहे! व याची साक्ष त्यांच्या ग्रंथांतून जागजागीं अनुभवास येतेहि! डॉ० आंबेडकर यांचीं भिन्न भिन्न प्रमेयें व सिद्धांत यांचा सूक्ष्म विचार करून श्री० करंदीकरांनीं तीं कशीं भ्रामक आहेत याचा विचार या ग्रंथाच्या आठव्या, नवव्या, व दहाव्या प्रकरणांमध्यें मार्मिकपणानें केलेला आहे.

" हिंदुसंघटनेचा महामंत्र " हें शेवटलें तेरावें प्रकरण तर फारच सरस उतरलें आहे, असें म्हटल्यावाचून राहवत नाहीं! त्यांत हिंदुसंघटनेचा महामंत्र म्हणून जो देण्यांत आला आहे, तो प्रत्येक हिंदुमहासभावाद्या-नेंच नव्हे, तर प्रत्येक हिंदूनेंहि स्वतःचे ठायीं बाणून घेऊन तो अंमलांत आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न केल्यास पाकिस्तानच्या संकटास यशस्वी-पणानें तोंड देण्याइतका हिंदुसमाज समर्थ व प्रभावी निःसंशय बनेल!

पाकिस्तान हा शब्द व त्यांत गर्भित असलेली कल्पना, त्या कल्पनेचें असत्यत्व व तिचें खंडण, हिंदुस्थानच्या प्रांतांची अडाणी मांडणी, मुसल-मानांनीं मांडलेल्या अनेकविध पाकिस्तानच्या योजना व मुसलमानांच्या हृदयपालटाची आवश्यकता, यासंबंधानें पहिल्या, दुसऱ्या, सातव्या व अकराव्या प्रकरणांत ऊहापोह केलेला आहे. आणि बाराव्या प्रकरणांत आतां वास्तविकपणें काँग्रेसच्या राजकारणाची इतिश्री झालेली असून, काँग्रेसचे पुढारी हिंदी राजकारणाचा कसा विनाकारण खेळखंडोबा करीत आहेत, याबद्दल विवेचन केलेलें आहे!

एकंदरींत, '**पाकिस्तान**' या विषयावरील हा ग्रंथ हिंदी राजकार-णाच्या अभ्यासूला संग्राह्य असा झाला आहे. असा हा सुंदर ग्रंथ निर्माण केल्याबद्दल श्री० करंदीकरांचें हार्दिक अभिनंदन करून हे दोन शब्द पुरे करतों.

पुणें,
दिनांक २३।१२।१९४१

**ल० ब० भोपटकर**

# वाचकांना विनंति

**वेळापत्रकाचा वाघोबा** मागें लागल्यावर पुस्तक लिहिणें व तें छापून प्रसिद्ध करणें हीं कामें फार तापदायक ठरतात. '**पाकिस्तानचें संकट**' या पुस्तकाचें काम तरी अशा रीतीनें तापदायक भासूं नये, अशी तीव्र इच्छा मनांत होती; पण, ती इच्छा सफल होऊं शकली नाहीं, हा योगायोगच होय! पुस्तकाचीं केवळ मुद्रितें पाहून, तयार पुस्तक हातीं येण्याआधींच, मला पुण्याबाहेर जावें लागत आहे. तथापि, ठरल्या दिवशीं पुस्तकाच्या प्रती वाचकांना मिळतील, असा विश्वास मला वाटत आहे. घाईंत काम पुरें करावें लागलें असल्यामुळें, मुद्रणाचे दोष टाळण्याच्या बाबतींत अवश्य तो कांटेकोरपणा मला दाखवितां आला नाहीं, हें मी कबूल करतों; पण, सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन जें करणें शक्य होतें तें मी मनोभावें केलें आहे, असेंहि समाधान मला वाटत आहे.

डॉ० आंबेडकर यांचा ग्रंथ मीं गेल्या मार्च महिन्यांत वाचला. या विषयावर आपल्यालाहि कांहीं म्हणतां येईल, असें मला तेव्हां वाटलें. तें म्हणण्याचा योग गेल्या श्रीगणेशोत्सवाच्या निमित्तानें आला. मुंबई, बडोदें, अहमदाबाद वगैरे ठिकाणीं मी जीं व्याख्यानें या विषयावर दिलीं तीं लोकांना आवडलीं, असें दिसलें. तथापि, अनेक कारणांमुळें, विचार पुस्तकरूपानें मांडण्याची मनाची तयारी होईना. शेवटीं, नोव्हेंबर १०–१२ च्या सुमारास मनानें असें ठरविलें कीं, एकदां हें पुस्तक लिहून पुरें करावयाचेंच! तो संकल्प परमेश्वरकृपेनें आज पुरा होत असल्यामुळें, मला स्वाभाविकपणेंच संतोष वाटत आहे. माझ्या वृत्तपत्रीय लेखनाचा आपलेपणानें स्वीकार करून महाराष्ट्रानें मजवर उपकार केले आहेत. या पुस्तकाचाहि महाराष्ट्र आपलेपणानें स्वीकार करील, असा भरंवसा मला वाटत आहे.

पुस्तक लिहिण्याचें काम सुरू असतांना मला अनेकांची मदत झाली. केसरी-मराठा संस्थेच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापक श्री० दि० वि०काळे यांनीं

शक्य ते ग्रंथ देऊन मला मदत केली. स०प०कॉलेजच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापक श्री०वि०म०कोल्हटकर व सदर कॉलेजच्या प्राध्यापक वर्गांत मान्यता पावलेले माझे मित्र प्रा०रा०वि० ओतुरकर यांचीहि बहुमोल मदत मला झाली आहे. माझे तरुण मित्र देशभक्त वासुदेव बळवंत गोगटे वकील यांनीं पुष्कळशा प्रकरणांचीं हस्तलिखितें वाचून मला कांहीं महत्त्वाच्या सूचनाहि केल्या. माझे दुसरे स्नेही श्री. मो. रा. ढमढेरे वकील यांनींहि एका प्रकरणाचें हस्तलिखित वाचून कांहीं सूचना केल्या. सर्व हस्तलिखित वाचून, त्याची कायद्याच्या दृष्टीनें तपासणी करून, तें मंजूर करण्याचें त्रासदायक काम महाराष्ट्राचे प्रसिद्ध पुढारी दे०भ० धर्मवीर अण्णासाहेब भोपटकर यांनीं आनंदानें अंगावर घेतलें ! या सर्व सज्जनांच्या सौजन्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. श्री० भोपटकर यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहून दिले, त्यामुळें तर मला फार धन्यता वाटत आहे.

'पाकिस्तान' या विषयावर एखादें तरी चांगलें पुस्तक प्रत्येक हिंदी नागरिकानें वाचलें पाहिजे असें डॉ० आंबेडकर यांनीं आपल्या विद्वन्मान्य ग्रंथांत एके ठिकाणीं म्हटलें आहे, तें अगदीं खरें आहे. इंग्रजी न जाणणाऱ्या महाराष्ट्रीय लोकांची या दृष्टीनें कांहीं तरी सोय व्हावी या हेतूनें मी हें पुस्तक लिहिलें आहे. त्यामुळें, पुस्तकांत जीं इंग्रजी अवतरणें दिलीं आहेत त्यांचा विस्तृत मराठी गोषवारा बहुतेक सर्व ठिकाणीं दिला आहे. 'पाकिस्तान' या विषयाची कल्पना सामान्य महाराष्ट्रीय वाचकाला या पुस्तकामुळें करतां आली तर माझा हेतु साध्य झाला, असें मी समजेन. यापलीकडे कसलेंहि 'चांगलेंपण' या पुस्तकांत असेल, असें मी मानीत नाहीं.

'लोकसंग्रह' मुद्रणालयांतल्या सर्व कार्यकर्त्यांनीं पुस्तक तांतडीनें मुद्रित करण्याच्या कामीं श्रम घेतले असल्यामुळें, त्या सर्वांचेहि मी मनोभावें आभार मानतों.

या पुस्तकांत जी कांहीं माहिती आढळेल ती लोकांकडून—म्हणजेच इतर ग्रंथकारांकडून—मिळविलेली आहे. त्या माहितीचें श्रेय मला घेतां येणार नाहीं. **फोडिलें भांडार । धन्याचा तो माल । मी तंव हमाल । भारवाही ।।** अशीच या माहितीच्या बाबतींत माझी स्थिति आहे. यापलीकडे फारसें कांहीं ग्रंथांत नाहीं असें कोणीं म्हटलें तरी मला त्याचा राग येणार नाहीं ! ग्रंथकार म्हणून

समाजापुढें यावें ही भूमिकाच या लेखनांत नाहीं ! एका विषयाचें एका विशिष्ट दृष्टीनें विवेचन करावें इतकीच मर्यादित इच्छा या लेखनाला कारणीभूत झालेली आहे ! वाचकांनीं अशा मर्यादित अपेक्षेनेंच पुस्तकाकडे पाहावें; म्हणजे, मी त्यांची निराशा केली असें त्यांना वाटणार नाहीं !

हिंदूंनीं राज्यघटनेचीं कोणतीं तत्त्वें मान्य करावीं हें एक प्रकरण पुस्तकांत घालावें असें मनांत होतें; पण, पुस्तकाचीं पानें संकल्पाहून पुष्कळच वाढल्यामुळें व पुस्तक पुरें करून पुण्याबाहेर निघण्याची निकड लागल्यामुळें, तो विषय वगळावा लागला. एकाद्या स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें मांडण्याच्या योग्यतेचा 'हिंदुसंघटन' हा विषय फार थोड्या मर्यादेंत कोंबावा लागला, हेंहि माझ्या ध्यानांत आलें आहे; पण, प्राप्त परिस्थितींत अधिक विस्तारानें लिहिणें शक्य नव्हतें. इतकेंच तूर्त सांगून वाचकांची रजा घेतों.

पुणें,
दिनांक २३।१२।१९४१

शि० ल० करंदीकर

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचें नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | पाकिस्तान : शब्द व कल्पना | १–९ |
| २ | खोटी कल्पना व तिचें खंडण | १०–२२ |
| ३ | मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास (टप्पा १ला) | २३–३४ |
| ४ | मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास (टप्पा २ रा) | ३४–६१ |
| ५ | मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास (टप्पा ३ रा) | ६२–८७ |
| ६ | प्रांतांची अडाणी मांडणी | ८८–१२१ |
| ७ | मुसलमानांनीं मांडलेल्या पाकिस्तानच्या योजना | १२२–१३२ |
| ८ | द्विराष्ट्रवादाचें खंडन | १३३–१५३ |
| ९ | डॉक्टर आंबेडकरांना कांहीं सवाल | १५४–१६८ |
| १० | राष्ट्ररक्षण व शांततारक्षण | १६९–१८४ |
| ११ | मुसलमानांच्या हृदयपालटाची जरुरी | १८५–१९५ |
| १२ | कॉंग्रेसच्या राजकारणाची इतिश्री | १९६–२१४ |
| १३ | हिंदुसंघटनेचा महामंत्र | २१५–२४० |

# पाकिस्तानचें संकट

## प्रकरण १ लें

## पाकिस्तान : शब्द व कल्पना

**पाकिस्तान** (पाक + इ + स्तान) हा शब्द गेल्या दोनतीन वर्षांत सर्वांच्या परिचयाचा झालेला आहे. मुस्लीमलीगचे बॅ० जीनाप्रभृति पुढारी या शब्दाचा उच्चार उघडउघड करूं लागल्यामुळें व पाकिस्तानची मागणी मान्य झाल्याविना भारतीय मुसलमान स्वस्थ राहाणार नाहींत असें बजावून सांगण्याला त्यांनीं प्रारंभ केल्यामुळें या शब्दाला भरपूर प्रसिद्धि मिळाली व त्याची प्रतिष्ठाहि मनस्वी वाढली. मुसलमानांच्या मनांत पाकिस्तानचीं शेखमहंमदी सुखस्वप्नें खेळत व घोळत आहेत हें ज्यांना आज बरींच वर्षें अवगत होतें त्यांनीं लोकमत जागृत करण्याचे कितीहि प्रयत्न केले असले तरी, या शब्दाच्या प्रचाराचें कार्य अत्यल्प प्रमाणांतच झालें होतें. कारण, सार्वजनिक संकट आगाऊ ओळखण्याची व त्याचा प्रतिकार करण्याला वेळींच सिद्ध होण्याची संवय सुटल्यामुळें, दूरस्थ संकटाचा इषारा देणारा जागृत इसम हिंदुसमाजाला उपद्व्यापी व तापदायक वाटतो. मुस्लीमलीग व बॅ० जीना यांनीं या शब्दाचा उच्चैर्घोष सुरू केल्यामुळें व त्या घोषामुळें ब्रिटिश मुत्सद्दी, कॉंग्रेसधुरीण वगैरे 'मी' 'मी' म्हणणारे लोक प्रायः दिङ्मूढ झाल्यामुळें मात्र, पाकिस्तान हा एक भला मोठा बागुलबोवा आहे, त्यामुळें भारतीय राष्ट्राला व राष्ट्रीयत्वाला मोठा धोका उत्पन्न होणार आहे इत्यादि कल्पना मोघमपणानें पुष्कळांच्या मनांत उद्‌भवूं लागल्या आहेत. या कल्पना स्पष्ट स्वरूपांत सर्वांच्या मनांत बिंबणें व या घातकी कल्पनांच्या प्रतिकारासाठीं सर्वांनीं सिद्ध होणें हें प्रस्तुतच्या परिस्थितींत भारतांतील सर्वांचें—निदान भारतांतील कोट्यवधि हिंदूंचें—पहिलें व पवित्र कर्तव्य होय.

पाकिस्तान हा शब्द वाटतो तितका नवा नाहीं. १९४० च्या मार्च महिन्यांत बॅ०जीनांनीं व मुस्लीमलीगनें लाहोर येथील लीगच्या अधिवेशनांत या शब्दाचा

अधिकृत रीतीनें उच्चार केला. त्यापूर्वी अनेक वर्षे तो शब्द उच्चारिला व प्रचारिला जात होता. डॉ० राजेन्द्र प्रसाद यांनीं 'पाकिस्तान' या आपल्या छोटया पुस्तकांत पाकिस्तानच्या म्हणजे भरतखंडाच्या विच्छेदाच्या— चार भिन्न भिन्न योजनांचा निर्देश केला आहे व त्या योजनांचा त्यांनीं तांत्रिक परामर्शहि घेतला आहे. भिन्न भिन्न तपशिलाच्या व भिन्न भिन्न व्यक्तींकडून मांडल्या गेलेल्या या योजना कित्येक वर्षांच्या विचाराविना व प्रचाराविना प्रसिद्ध झाल्या नाहींत, हें उघडच आहे. १९३० सालच्या लखनौच्या मुस्लीमलीग अधिवेशनाचे अध्यक्ष सर महंमद इक्बल यांनीं या कल्पनेचा उच्चार केला होता. गोलमेज परिषदेच्या वेळीं मि० रहमतअल्ली नांवाच्या एका मुसलमान गृहस्थानें भारत विच्छेदनाची एक योजना प्रतिनिधींमध्यें प्रसृत केली होती; पण, ती अधिकृतरीत्या पुढें मात्र मांडली गेली नाहीं. या योजनेवर ब्रिटिश सरकारच्या मान्यतेचा शिक्का मारून घेण्याचा प्रयत्न झाला; पण, मुसलमानांची ही योजना म्हणजे पूर्वीच्या मुस्लीम साम्राज्याच्या पुनरुज्जीवनाचाच प्रयत्न होय असें ब्रिटिश मुत्सद्यांना वाटल्यामुळें, त्यांनीं सदर योजनेचा विचार करण्याला नकार दिला, अशा आशयाची माहिती डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनीं आपल्या Thoughts on Pakistan या पुस्तकाच्या पृ. १७–१८ वर Inside India या ग्रंथाच्या आधारें दिली आहे. याचाच अर्थ असा कीं, भारताचें अखंडत्व धुळीला मिळवून देण्याचीं व भारतांत मुसलमानांचा स्वतंत्र सुभा उभा करण्याचीं कारस्थानें धूर्त मुसलमान पुढारी आज कित्येक वर्षे करीत आले आहेत. 'थोडे दिन मे गांधीराज' वगैरे वायफळ घोषणांचे साबणी फुगे हवेंत उडविणाऱ्या व त्या फुग्यांत दिसणाऱ्या रं चमत्कृतीवर स्वतः खूष होऊन दुसऱ्यांना झुलविणाऱ्या लोकांनीं या कारस्थानांकडे कानाडोळा केला, इतकेंच !

> पाकिस्तान हा शब्दच तीस कोटी हिंदूंचा उपमर्द करणारा आहे. लोकसंख्येमुळें वा राजसत्तेमुळें भारताचा जो जो विभाग मुसलमानी वर्चस्वाखालीं नांदत आहे अगर नांदण्याजोगा आहे तो तो विभाग पाक म्हणजे पवित्र लोकांचा देश असून, भरतखंडाचा उरलेला तुकडा अपवित्र हिंदूंसाठीं सोडून दिलेला आहे, अशी कुत्सा या शब्दांत भरलेली आहे.

आपल्या या प्रिय, पूज्य व प्राचीन मायदेशाचीं खांडोळीं करणें हा त्या शब्दामागील उद्देश आहे. असा हा दुष्ट उद्देश गर्भांत धारण करणाऱ्या 'पाकिस्तान' शब्दामुळें हिंदूंचीं मनें अस्वस्थ व्हावीं हें स्वाभाविकच आहे. विद्यमान स्थितीचा विचार केला तर,

> जगांतल्या मानव समाजांत नुसत्या हिंदुसमाजाचें प्रमाण जवळ जवळ एकषष्ठांश इतकें आहे. या सर्व समाजाचें संगोपन व्हावयाचें, जगांतील पराक्रमी व प्रगमनशील मानव समाजाबरोबर या अफाट समाजांतल्या मागसलेल्यांना व दलितांनाहि आणावयाचें आणि ईश्वरानें मानव समाजावर सोंपविलेल्या उदात्त कर्तव्यांचें पालन व्हावें या हेतूनें या सुमारें तीस कोटी लोकांचा योगक्षेम चालावयाचा तर आजचा सर्व हिंदुस्थानदेखील त्या कार्याला पुरणार नाहीं.

जगांतल्या एकषष्ठांश मानव समाजाला पृथ्वीवरील $\frac{१}{२९}$ भूभागावर आपला निर्वाह स्वाभिमानानें व समाधानानें करतांच येणार नाहीं.* वास्तविक पहातां हिंदूंच्या सर्वांगीण योगक्षेमासाठीं सध्यांच्या हिंदुस्थानच्या पांचपटीइतका तरी भूभाग मोकळा राहिला पाहिजे. तें दूरच राहून, सध्यांच्या हिंदुस्थानचाच एक तुकडा लांबविला जाण्याची कल्पना बोलली जात आहे! हिंदूंना ही कल्पना असह्य वाटावी यांत आश्चर्य कांहींच नाहीं. असह्य वाटणारी ही कल्पना अशक्य ठरावी म्हणून हिंदूंनीं एक गोष्ट सतत स्मरणांत धरली पाहिजे.

> मुसलमानांची पाकिस्तानची मागणी ही त्या जमातींत जो कल्पनाविषयक उद्धटपणा परंपरेनें चालत आलेला आहे त्या उद्धटपणाच्या पोटीं जन्मलेली आहे, हें हिंदूंनीं विसरूं नये.

जगाची वांटणी-विभागणी करतांना मुसलमान जो विचार करतात तोच

---

*डॉ० केतकर : ज्ञानकोश, प्रस्तावना खंड : हिंदुस्थान आणि जग : पृ०४२. आधुनिक जगाच्या सध्यांपर्यंत परिचित झालेल्या भूपृष्ठाचें क्षेत्रफळ पांच कोटी, वीस लक्ष चौरस मैल आहे......हिंदुस्थानचें क्षेत्रफळ सुमारें अठरा लक्ष चौरस मैल (१८,०८,६७९ चौरस मैल : Federation *vs.* Freedom, डॉ० आंबेडकर) म्हणजे जगाचा एकोणतिसावा हिस्सा आहे.

मुळीं लोकविलक्षण स्वरूपाचा असतो. 'इस्लामी जग' (दार-उल्-इस्लाम) व 'तद् बाह्य जग' (दार-उल्-हरब) असे जगाचे दोनच विभाग कल्पून, इस्लामी जगाबाहेर असलेल्या जगाविषयींचीं आपलीं कर्तव्यें मुसलमान समाज ठरवीत असतो. 'कृण्वतो विश्वमार्यम्' या उदात्त ध्येयानें प्रेरित झालेल्या आर्यांनीं सहिष्णुतेनें वागून आपल्या विचारांचा प्रचार केला. इस्लामचे अभिमानी अशा सहिष्णुतेनें वागून जगभर आपला पंथप्रचार करीत नाहींत. फार प्राचीन काळीं इस्लाममध्यें ही सहिष्णुवृत्ति नांदत होती असें भाई मानवेन्द्र नाथ रॉय यांचें म्हणणें आहे. तें मान्य केलें तरी, इस्लामच्या धडका भारताला बसूं लागल्या त्या वेळीं ही सहिष्णुता नष्ट झाली होती हें सत्य असून, इस्लामची वकिली करणाऱ्या भाई रॉय यांनाहि तें मान्य करावें लागलें आहे.

Islam came to India after it had played out its progressive role and its leadership had been wrested from the learned and cultured Arabs.*

(इस्लामची प्रागतिक प्रवृत्ति संपुष्टांत आल्यानंतर आणि विद्वान् व सुसंस्कृत अरबांकडे असलेलें इस्लामचें नेतृत्व त्यांच्याकडून हिसकून घेतलें गेल्यानंतर, इस्लाम भरतखंडांत आला.), ही भाई रॉय यांचीच कबुली आहे. भारतांतील मुसलमानांची हिंदूंकडे पाहण्याची दृष्टि किती असहिष्णुपणाची आहे हें स्पष्टपणें पटवून देणारा एक प्रसंग डॉ० आंबेडकर यांनीं आपल्या पुस्तकांत हुतात्मा स्वामी श्रद्धानंदजींच्या उद्‌गारांच्या आधारें वर्णिला आहे. मोपल्यांनीं मलबारमधील हिंदूंवर जे अनन्वित अत्याचार केले त्यांचा निषेध करण्याचा प्रश्न कॉंग्रेसच्या विषय नियामक समितींत निघाला असतां, 'राष्ट्रीय' वृत्तीचे मौलाना हजरत मोहानी यांनीं मोपल्यांच्या रक्तपिपासु वृत्तीचें समर्थन केलें व असें चक्क सांगितलें कीं, मलबार हा इस्लामी जगाचा भाग असूनहि, तेथील हिंदूंनीं ब्रिटिशांशीं संगनमत केल्यामुळें 'हिंदुधर्म सोडून इस्लाम स्वीकारा; नाहीं तर आमच्या तलवारींना बळी पडा' असें हिंदूंना सांगण्यांत मोपल्यांनीं गैर असें कांहीं केलें नाहीं.† हिंदुस्थान हा इस्लामी जगाचा एक भाग आहे हे उद्‌गार लीगवाले मुसलमान वारंवार

*The Historical Role of Islam, p. 95.

†Thoughts on Pakistan, pp. 155–156.

काढीतच असतात. आणि सर महंमद इक्बल यांच्या 'हिंदोस्तान हमारा' या पद्याचा अर्थ जाणणारे लोक असेंच म्हणतात कीं, हिंदुस्थान हा इस्लामी जगाचा भाग असल्याचेंच या कविमहाशयांनीं या गीतांत म्हटलें आहे. मुसलमानांनीं अन्यधर्मीयांच्या सत्तेखालीं नांदूं नये—मूर्तिपूजक हिंदूंच्या सत्तेखालीं तर नांदूंच नये—तसा प्रसंग आला तर सत्ताक्रांति करून मुसलमानी सत्ता स्थापावी; नाहीं तर स्थानांतर करावें, अशी शिकवण मुसलमानांना परंपरेनें मिळत आलेली आहे. ही शिकवण आणि तिच्या मागील वृत्ति या गोष्टी किती जुन्या असतील हें सुलतान अल्लाउद्दीनला त्याच्या समकालीन अशा एका काझीनें दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट होण्यासारखें आहे :

To keep the Hindus in abasement is especially a religious duty, because they are the most inveterate enemies of the Prophet and because the Prophet has commanded us to slay them, plunder them and make them captive.*

(हिंदु हे पैगंबर महंमदाचे अत्यंत कट्टे शत्रु असल्यामुळें त्यांना अवमानित अवस्थेंत ठेवणें हें मुसलमानांचें विशेष धार्मिक कर्तव्य होय. हिंदूंना जिवानिशीं मारा, त्यांना लुटा व त्यांना बंदिवान करा असा आदेश पैगंबरानें आम्हांला दिलेला आहे).

अलीकडे तर या आशयाची शिकवण अधिकच बळावली आहे. मुसलमानांच्या मनांत मुरलेल्या या विचारपरंपरेचें स्पष्टीकरण बॅ० सावरकर यांनीं १९३८ सालीं नागपूर येथें झालेल्या अ०भा०हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणांत केलेलें आहे. ते म्हणतात :

Their theology and theocratical politics divide the human world into two groups only : the Moslem-land and the Enemy-land. All lands which are either entirely inhabited by the Moslems or are ruled over by the Moslems are Moslem-lands. All lands which are mostly inhabited by non-Moslems or are ruled over by a Non-Moslem power are enemy-lands; and no faithful Moslem

*Thoughts on Pakistan, p. 57.

is allowed to bear any loyalty to them and is called upon to do everything in his power, by policy or force or fraud, to convert the non-Moslems there to Moslem faith to bring about its political conquest by a Moslem power. *

(मुसलमानांचीं धार्मिक मतें व त्या मतांनीं रंजित झालेलें त्यांचें राजकारण यांचा विचार केला तर त्यांच्या दृष्टीला मानवी जगाचे फक्त दोनच भाग पडलेले दिसतात: इस्लामव्याप्त-भूमि व शत्रु-भूमि ! जेथें सर्वस्वीं मुसलमानांची वस्ती आहे अगर जेथें राजसत्ता मुस्लीम आहे ती इस्लाम-व्याप्त भूमि असून ज्या भू-भागांतील लोकवस्ती प्राय: मुसलमानेतरांची आहे अगर जेथील राजसत्ता मुसलमानेतरांच्या हातीं आहे ती शत्रु-भूमि होय.

> खऱ्या मुसलमानानें अशा भूमींत देशनिष्ठेनें राहणें हें अधर्म्य आहे. कारस्थानें करून, दंडेली करून, लबाडी करून अगर साधेल त्या त्या अन्य उपायांचा अवलंब करून तेथील मुसलमानेतरांना मुसलमान करणें आणि ही शत्रु-भूमि मुसलमानी सत्तेच्या वर्चस्वाखालीं आणणें हा त्यांचा धर्म होय, असा आदेश त्यांना देण्यांत आलेला आहे.)

सीमा-प्रांत, पंजाब, सिंध, बलुचिस्थान, बंगाल या प्रांतांत मुसलमान हे लोकसंख्येनें अधिक असल्यामुळें त्या प्रांतांचा स्वतंत्र सुभा करण्यांत यावा; साऱ्या भारताची मध्यवर्ती राजकीय सत्ता एकमुखी असली तर, त्यांत हिंदूंचें संख्याधिक्य टाळतां येण्यासारखें नसल्यामुळें त्या संख्याधिक्याखालीं नांदण्याला आम्ही मुसलमान तयार नाहीं; काश्मीर संस्थानांत प्रजा बहुसंख्य मुसलमान म्हणून तें संस्थान पाकिस्तानमध्यें सामील व्हावें व तेथें लोकसत्ताक म्हणजेच इस्लामी राज्यपद्धति सुरू करावी; भोपाळ, दक्षिण हैद्राबाद या संस्थानांतील प्रजा प्राय: हिंदु असली तरी तेथें मात्र राजसत्ता पूर्णतया बेजबाबदारपणेंच नांदावी—या सकृद्दर्शनीं परस्परविसंगत दिसणाऱ्या मुसलमानांच्या मागण्यांचा अन्वयार्थ नीट लावावयाचा तर त्यांच्या वृत्तींत भिनलेल्या या विचारसरणीपर्यंत जाऊन भिडल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! रोग्याच्या अंगांत रोग

---

*The Presidential Address, p. 33.

दीर्घकाल मुरलेला असेल तेव्हां रोगचिकित्सा करून औषधोपचार करणाऱ्या वैद्याला जास्त दक्षता घ्यावी लागते व खंबिरी दाखवावी लागते. हें ओळखून, मुसलमानांच्या या मागणीच्या मागें लपून बसलेल्या विचारसरणीशीं हिंदूंनीं झगडलें पाहिजे.

मुसलमानांच्या या मागणीचें स्वरूप राजकीय असूनहि तिला धर्मकारणाचा वा धर्मांधतेचा इतका उग्र दर्प कां यावा असा प्रश्न उपस्थित होतो. धर्म असलाच तर तो व्यक्तिव्यवहारापुरताच मर्यादित आहे, राजकारणासारख्या सार्वजनिक व्यवहाराशीं त्याचा काडीचाहि संबंध नाहीं, असें मानावयाला शिकलेल्या अगर सवकलेल्या आधुनिक पढिकांना तर असें वाटतें कीं,राजकीय मागण्यांचें हें धर्मप्रधान स्वरूप नैसर्गिक नसून, मुसलमान समाजांतल्या मूठभर लब्धप्रतिष्ठितांनीं स्वतःची पोळी पिकविण्यासाठीं राजकारणाला हा धर्माभिमानाचा मुलामा दिलेला आहे. पण, जगांतील मानव समाजाची 'इस्लामी जग' व तद्बाह्य असणारें 'शत्रुजग' ही विभागणी सध्यांच्या मूठभर सुशिक्षित मुसलमानांनीं केलेली नसून, या विभागणीमागील विकृत मनोरचनेमुळेंच मुसलमान हिंदुस्थानांत व इतरहि देशांत शतकानुशतकें धुडगूस घालीत आलेले आहेत. मुसलमानांची मशीद ही नुसती प्रार्थनेची जागा नसून, मुसलमान समाजाच्या सगळ्या सामुदायिक जीवनाची कळ तेथून फिरत असते असें मुसलमान लोक अभिमानानें सांगतात.* त्यांतलें इंगितच हें कीं, बाकीच्या जगानें धर्मकारण व राजकारण यांच्यामध्यें चिनी भिंत खुशाल उभारली तरी तशी भिंत उभारण्याला मुसलमान तयार होणार नाहींत.

आक्रमक वृत्तीनें जगभर नांदावें व साऱ्या जगांत इस्लामी क्रांति घडवून आणावी अशा 'उमद्या' महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झालेले

---

*Religion and Politics are inseparably associated in the minds and thoughts of all Muslims....Their religion includes their politics and their politics are a part of their religion. The mosque not only constitutes the place of worship but also the Assembly hall....It forms a centre of all aspects of their public life—religious, social, economic and political.

—Confederacy of India by *A Punjabi*, pp. 88–89.

> मुसलमान हिंदूंच्या पुढें व जगापुढें पाकिस्तानची मागणी तावा-तावानें मांडीत आहेत.

वेळींच बऱ्या बोलानें आमची ही मागणी मान्य न होईल तर आज भारताच्या तृतीयांश तुकड्यावर संतुष्ट होऊं पाहणारे आम्ही मुसलमान उद्यां निम्मा हिंदुस्थान मागूं व,वामनाच्या व्यापक पावलांचें अनुकरण करून,परवां कदाचित् सगळाच हिंदुस्थान आत्मसात् करूं अशी दटावणीची भाषा बॅ०जीनांनीं मद्रास येथील लीग-अधिवेशनाचे वेळीं गेल्या एप्रिलमध्यें काढली. या भाषेमुळें भेदरून गेलेले गयाळ वृत्तीचे कांहीं देशभक्त, 'कसेंहि करून अखंड हिंदुस्थान राहिला म्हणजे मिळविली, मग प्रत्यक्ष सत्तेची वांटणी कशीहि झाली तरी हरकत नाहीं,' अशा असहाय मनोवृत्तीच्या आहारीं जाऊं लागले आहेत. अशा वेळीं या पाकिस्तानच्या पैगंबरांना हिंदुसमाजानें शब्दानें व कृतीनें कोणतें उत्तर द्यावयाचें हा आजचा प्रश्न आहे. पंजाबसारख्या मुसलमान बहुसंख्य प्रांतांतले मुसलमान देखील शें० ८५ या प्रमाणांत मूळचे भारतीय आहेत, असें खानेसुमारीचें काम करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं नमूद करून ठेविलें आहे. इतर प्रांतांतल्या मुसलमानांबद्दलहि असेंच विधान करतां येण्यासारखें आहे.

> भारतीय संतति म्हणून हिंदूंनीं या लोकांना या भूमींत गेलीं कांहीं शतकें सहिष्णुवृत्तीनें नांदूं दिलें. मोगली साम्राज्याच्या उत्कर्ष-काळांत मोगली सत्तेखालीं गेलेले मुलूख शीख, मराठेप्रभृति पराक्रमी हिंदूंनीं फिरून हिंदुसत्तेखालीं आणिले होते. पण सीमाप्रांत, पंजाब, सिंध, बंगाल, काश्मीर वगैरे भागांतल्या सध्यांच्या मुसलमानांच्या पूर्वजांना त्यांनीं खेंचून हिंदुधर्मांत परत आणलें नाहीं !

सिंधमधील ठठ्ठा (देवलबंदर) येथें देवलऋषि होऊन गेला व त्यानें काळवेळ पाहून, दूरवरची दृष्टि ठेवून, मुसलमान झालेल्या पूर्व-हिंदूंना परत हिंदुसमाजांत घेण्याचा स्तुत्य उपक्रम केला. अशा रीतीनें आठव्या शतकांत सिंधमध्यें पुष्कळ मुसलमान फिरून हिंदु झाले असें अल्‌बिलादुरी या मुसलमान इतिहासकारानें लिहून ठेविलें आहे.* मुसलमानांच्या हिंदूकरणाचा हा

---

*Modern Review, August 1941 ; The Linguistic Problem of Sind by *Swami Jagadeeshwaranand*.

उद्योग पुढें अव्याहत चालला नाहीं याचें एक कारण असें दिसतें कीं, परधर्मस्वीकारामुळें ही भारती संतति* पुढेंमागें भारतमातेच्या शरीराचेच तुकडे करण्याला प्रवृत्त होईल ही अमानुष कल्पना त्या काळांतल्या सत्ताधारी हिंदूंच्या मनाला शिवलीच नसावी. पण आज ती कल्पना दररोज बोलली जाऊं लागली आहे.

" कारटीं, करंटीं जिथे
मातृशोणितें
स्वतांला लाली, आणाया धावलीं "

हे विनायक कवींचे उद्‌गार वेगळ्या निमित्तानें काढलेले आहेत. भारती संतति म्हणून आपण आजवर ज्यांच्याकडे आपलेपणानें पाहात आलों त्यांच्या बाबतींत असे उद्‌गार काढण्याचा दुर्दैवी प्रसंग ओढवेल अशी कल्पनाहि आजवर कोणाला नव्हती. पाकिस्तान ही भेसूर कल्पना भारतीय हिंदूप्रमाणेंच ख्रिश्चन, पार्शी, ज्यू वगैरे अन्य समाजांपुढेंहि आज भुतासारखी नाचूं लागली आहे. त्यामुळें भारती संतति म्हणून स्वतःचा मोठ्या गौरवानें उल्लेख करणाऱ्या या सर्वांनाच आज गंभीरपणानें एकत्र विचार करण्याचा प्रसंग आला आहे. भारतमातेच्या शरीराचा तुकडा वेगळा तोडून मागणाऱ्या व तेथें आपलें अधिराज्य गाजवूं पाहणाऱ्या लोकांच्या वृत्तीचा या सगळ्यांनीं नीट तपास केला पाहिजे. ही मागणी अनैतिहासिक व अस्वाभाविक आहे हें या सर्वांनीं पाकिस्तानवाल्यांना—व कोणी त्यांचा पाठीराखेपणा करतील तर त्यांना—बजावून सांगितलें पाहिजे; कारण, त्यांना समजावून सांगण्याची व समजावून देण्याची वेळ केव्हांच निघून गेली आहे !

---

*आपण भारतभूचे पुत्र आहोंत ही कल्पना भारतमातेचें विच्छेदन करूं पाहणाऱ्या मुसलमानांच्या मनांतहि अद्याप कशी रेंगाळत आहे हें पाहण्यासारखें आहे ! अलीगडच्या दोन प्रोफेसरांनीं भारतविच्छेदनाची कल्पना मांडतांना भारतीय मुसलमानहि हिंदपुत्रच आहेत हें स्पष्टपणें कबूल केलेलें आहे : The foreign element amongst us is quite negligible and we are as much sons of the soil as the Hindus are. हें सदर प्रोफेसरांच्या पुस्तकांतील वाक्य राजेंद्रबाबूंनीं आपल्या 'पाकिस्तान' नांवाच्या पुस्तकाच्या पृष्ठ १५ वर उद्‌धृत केलें आहे.

## प्रकरण २ रें

# खोटी कल्पना व तिचें खंडण

भारतांतल्या सर्व भूभागावर ज्याचें अधिराज्य चालेल अशा एकमुखी व एकसंध केंद्रीय शासनयंत्राला विरोधणें हाच पाकिस्तान कल्पनेंतला बीजमंत्र आहे,

(The essence of Pakistan is the opposition to the establishment of one Central Government having supremacy over the whole of India.)*

हें डॉ० आंबेडकर यांचें म्हणणें बरोबर आहे. अशा शासनयंत्राला विरोधण्याला मुसलमान कां प्रवृत्त होतात या प्रश्नाचें एक उत्तर गेल्या प्रकरणांत दिलें. भारतांत निर्माण होणारी व नांदणारी मध्यवर्ति लोकशाही राज्यपद्धति कशाहि स्वरूपाची असली तरी—त्या लोकशाहीवर गांधी-कॉंग्रेसच्या सर्वभूतहितेरतत्वाचा छाप बसला असला तरी—त्या पद्धतींत मुसलमानी वर्चस्व असूं शकणार नाहीं हें मुसलमानांना स्पष्ट दिसत आहे. मुसलमानेतरांच्या--विशेषतः हिंदूंच्या--वर्चस्वाखालीं नांदणें अधर्म्य आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळें—अगर तशी समजूत करून देण्यांत आली असल्यामुळें—हिंदु वर्चस्वाखालीं नांदणाऱ्या भरतखंडाचा एक सुभा करा व इस्लामी वर्चस्वाखालीं नांदणारा एक सुभा ‘ पाकिस्तान ’ या नांवानें आम्हांला तोडून द्या असें मुसलमान म्हणत आहेत. त्यांच्या मागणीभोंवतीं जें धार्मिक अवगुंठन आहे तें अशा प्रकारचें आहे. तें मान्य करणें कां शक्य नाहीं याचा विचार पुढील कित्येक प्रकरणांतून सविस्तर करावाच लागेल.

पाकिस्तानच्या मागणीचा उगम आणखीहि एका खोटया कल्पनेंतून झालेला आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या धोरणी सूत्रचालकांनीं भरतखंडांतील आपली सत्ता स्थिर राहावी म्हणून ज्या अनेक मसलती केल्या व जे अनेक भाषाप्रयोग रुळविले त्यांत ‘ अल्पसंख्य व त्यांचें संगोपन ’ हा एक सोज्ज्वल

*Thoughts on Pakistan, p. 5.

स्वरूपाचा शब्दप्रयोग आहे. एखाद्या वर्गाला अल्पसंख्य म्हणून गोंजारतांना साम्राज्यवादी मुत्सद्दी कोणती कसोटी लावतात याचें वर्णन *K.B. Krishna* या लेखकानें पुढीलप्रमाणें केलें आहे :

A minority in order to be called such must satisfy certain requirements of Imperialism. It must not be seditious. It must not be a disloyal element. It must be moderate, nay, even reactionary. It must be amenable to flattery. *

(एखाद्या वर्गाला अल्पसंख्य ही पदवी बहाल करण्यापूर्वी साम्राज्यवादी मुत्सद्दी त्याला कांहीं कसोटी लावीत असतात व जो वर्ग त्यांना उतरेल त्यालाच अल्पसंख्यत्वाचे मानमरातब दिले जातात. यांतली पहिली कसोटी अशी कीं, तो वर्ग राजद्रोही असतां कामा नये—त्याची राजनिष्ठा संशयातीत असली पाहिजे. त्या वर्गाची वृत्ति नुसती नेमस्तच नव्हे तर प्रतिगामीहि असणें अवश्य आहे; शिवाय, तो वर्ग स्तुतिपाठांना भाळणाराहि असला पाहिजे.)

या सर्व कसोटींना तंतोतंत उतरणाऱ्या भारतीय मुसलमान समाजाला स्तुतीनें चढवून ठेविला म्हणजे त्या समाजाचा साम्राज्याच्या स्वार्थ-संवर्धनाला नामी उपयोग होईल हें हेरून, ब्रिटिश मुत्सद्दी व लेखक असा आभास निर्माण करीत आले आहेत कीं, दिल्लीच्या सार्वभौम तख्तावर भारतीय राजसत्तेचे उपभोक्ते म्हणून इंग्रज आरूढ झाले ते मोगलांच्या साम्राज्यसत्तेचे वारसदार म्हणून झाले ! 'खुल्क् खुदाका, मुल्क् पादशाहका, अंमल अंग्रेज सरकारका' हा भोंगळ वाक्प्रचार मोगलांची साम्राज्यसत्ता संपुष्टांत आल्यानंतर कैक वर्षेपर्यंत लोकांच्या तोंडीं परंपरेनें टिकून राहिला होता. त्याचाहि उपयोग ही अनैतिहासिक समजूत दृढ होण्याकडे झाला. अन्नाला मोताद झालेला कोणी तरी मुसलमान विधिमंडळांतल्या वा वृत्तपत्रांतल्या चर्चेत एकदम अनाहूतपणें प्रसिद्ध व्हावा, हा मोगल बादशाहांचा वारस असून इंग्रज सरकार त्याला पेन्शन—अर्थात् तैनात—कां देत नाहीं असे जाबसाल व्हावे व अशा रीतीनें, इंग्रजांच्या पूर्वी साम्राज्यसत्ता मोगलांची म्हणजे मुसलमानांची होती या

---

*The Problem of Minorities or Communal Representation in India, p. 21.

गैरसमजावर पुनरुक्तीचीं पुटें चढावीं असे प्रकार अनेकवार घडले आहेत. त्यामुळें मुसलमानांनीं आपली अशी सोइस्कर समजूत करून घेतली आहे कीं, मुसलमानांना तख्तावरून ओढून राजसत्ता आपल्या हातीं घेणाऱ्या इंग्रजांना न्यायाची कांहीं चाड असेल तर, हातची सत्ता सोडतांना, त्यांनीं मुसलमानांना फिरून तख्तावर बसविलें पाहिजे--निदान मुसलमानांना हिंदुसत्तेच्या हवालीं तरी करतांच कामा नये ! अखंड भारताच्या एकछत्री राज्यकार-भाराची आधुनिक पद्धतीची कसलीहि योजना विचारासाठीं पुढें आली तर मुसलमानांना आपलें मुसलमानपण सार्वजनिक व्यवहारापुरतें तरी विसरून, हिंदु, ख्रिस्ती, पार्शी, ज्यू इत्यादिकांशीं 'हिंदी' म्हणून एकरूप तरी झालें पाहिजे अथवा हिंदूंचें संख्याधिक्य निमूटपणें मान्य करून संख्याबलाच्या प्रमाणांत मिळेल तेवढा सत्तेचा अंश यथान्याय-यथाप्रमाण स्वीकारून समाधान तरी मानलें पाहिजे, हें उघड आहे. पण, 'बादशाहाचे बेटे' म्हणून इंग्रजांनीं चढवून ठेवलेले व स्तुतिप्रियतेमुळें स्वतः चढून गेलेले मुसलमान यांतलें कांहींच पतकरण्याला आज राजी दिसत नाहींत. आणि म्हणूनच, पाकिस्तान हा भरतखंडाचा एक तुकडा तोडून घेऊन तेथें आपली स्वतंत्र सत्ता 'मनःपूतं समाचरेत्' या न्यायानें उपभोगण्याचे डोहाळे त्यांना सुचत आहेत.

इंग्रजांना भारतीय साम्राज्याच्या शास्त्यांची पदवी व प्रतिष्ठा लाभली ती मोगल सम्राटांच्या वारसदारीमुळें नव्हे हें ऐतिहासिक सत्य इतकें स्पष्ट आहे कीं, वस्तुतः तें सिद्ध करीत बसण्याचेंहि कारण नाहीं. पण, इंग्रजांच्या प्रेरणेमुळें भारतीय इतिहासलेखनाला अनिष्ट वळण लागल्यामुळें, या सत्याला खग्रास ग्रहण लागलें आहे. शालेय इतिहासापासून इतिहासलेखनाला जो प्रारंभ होतो तोच एका ठरीव तऱ्हेचा असतो. त्यामुळें मुसलमानी वर्चस्वाचा काळ व इंग्रजी वर्चस्वाचा काळ यांच्या माना जिराफाच्या मानेप्रमाणें प्रमाणा-बाहेर लांब झालेल्या दिसतात आणि इंग्रजांचा उत्कर्ष सुरू होण्यापूर्वीं मुसल-मानांची साम्राज्यसत्ता पोखरण्याचे वा उलथून पाडण्याचे जे प्रयत्न हिंदूंनीं अव्याहतपणें केले त्यांची, दोन एडक्यांच्या टकरींत सांपडलेल्या तांब्याच्या पैशाप्रमाणें दामटी वळून जाते !

> वास्तविक पाहातां, भारताचा सगळा इतिहास हा हिंदूंचाच इतिहास आहे. या हिंदु इतिहासाच्या शरीरांतलें रक्त कधीं-

> बधीं बिघडल्यामुळें, त्या शरीरावर एखादें इस्लामी गळूं उमटलें अगर या शरीरांतल्या बुद्धीचे डोळे मंद झाल्यामुळें, किंचित् कालपावेतों त्याला पक्षाघाताचा झटका आला म्हणून तेवढ्यानें कांहीं त्या शरीराचें हिंदुपण नाहींसें होत नाहीं !

इस्लामी गळूं झालें हें लक्षांत येण्याला थोडा विलंब लागला; पण ती गोष्ट लक्षांत येतांच, बाह्योपचार व अंतर्गत उपचार यांचा मारा करून या हिंदु-शरीराला प्राय: रोगमुक्त करण्यांत आलेंच ! ही मुक्तता पुरी होण्यापूर्वीच पक्षाघाताचा झटका आला हा योगायोग ! त्या रोगांतून व या झटक्यांतून एकदमच कसें मुक्त व्हावें या प्रश्नाच्या विवंचनेंत हिंदु समाजाचें शरीर व मन आज गुरफटून गेलें आहे. इंग्रजांची सत्ता हिंदूंनीं निमूटपणें, अविरोध-वृत्तीनें मान्य केली हें म्हणणें जसें खोटें तसेंच मोगली साम्राज्यसत्ता हिंदूंनी मान्य केली व चालू दिली हें म्हणणेंहि मुळांतच खोटें ! इंग्रजांची साम्राज्य-सत्ता मोगली साम्राज्यसत्तेची वारसदार ही कल्पना तर त्याहूनही खोटी ! अशा खोटया कल्पनांवर व प्रमाणांवर आधारलेली पाकिस्तानची कल्पना कोणत्या मनोवृत्तींतून स्रवली असेल, हें सहज समजण्यासारखें आहे.

इंग्रजांपूर्वीं भारताचे शास्ते मोगल म्हणजे मुसलमान होते ही समजूत साफ खोटी असल्याचें डॉ० र० पु० परांजपे यांच्यासारख्या समतोलबुद्धीच्या नेमस्ताग्रणीनें स्पष्ट शब्दांत बजावलें आहे, ही गोष्ट या विवेचनाच्या दृष्टीनें फार उपकारक झाली आहे. निराशाग्रस्त झालेल्या बॅ० जीनांनीं हल्लीं कॉंग्रेसमधल्या हिंदूंना ‘हिंदु’ म्हणून ‘हिणवण्याला’ सुरुवात केली आहे. बॅ० जीना हे डॉ० परांजपे यांच्यासारख्या विद्वानालाहि हिंदु म्हणून हिण-विण्याला कदाचित् चुकणार नाहींत. ‘पुरुष ग बाई पुरुष’ म्हणून बोटें मोड-णाऱ्या आततायी स्त्रियांच्या टीकास्त्रांतून स्त्रीदाक्षिण्याचा मूर्तिमंत पुतळाहि शीरसलामत सुटणें जसें शक्य नसतें त्याप्रमाणेंच, कोणताहि विचारशील हिंदु बॅ० जीनांच्या टीकास्त्रांतून सुटणें सध्यां तरी शक्य नाहीं. बॅ० जीनांनीं सप्रू परिषदेनंतर जीं मुक्ताफळें उधळलीं त्यांमुळें ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. पण, जीना कांहींहि म्हणाले तरी, निर्विकार मनाचा विचार म्हणून डॉ० परांजपे यांचें म्हणणें महत्त्वाचें आहेच आहे. डॉ० आंबेडकर यांच्या पाकि-स्तानविषयक ग्रंथावर टीका म्हणून डॉ० परांजपे यांनीं गेल्या एप्रिल-मे

महिन्यांत मुंबईच्या 'विविधवृत्त' साप्ताहिकांत एक लेखमाला लिहिली होती. या लेखमालेंतल्या तिसऱ्या लेखांत डॉ० परांजपे यांनीं पुढील असंदिग्ध विधानें केलीं आहेत :

(१) हिंदुस्थानच्या राजकारणांत ब्रिटिशांचा शिरकाव होऊं शकला नसता तर, हिंदुपदपातशाहीचाच अंमल साऱ्या हिंदुस्थानांत परत गाजूं लागला असता, यांत संदेह नाहीं. (२) ब्रिटिश अमदानीपूर्वी आम्ही हिंदुस्थानचे राज्यकर्ते होतों; सबब आम्हांला जादा हक्क मिळाले पाहिजेत हें मुसलमानांचें म्हणणें इतिहासाचा सरळ दाखला देऊन खोडून काढतां येईल. ब्रिटिशांनीं हिंदुस्थान जिंकून घेतला तो मुसलमान राज्यकर्त्यांपासून नव्हे तर, मराठे, शीख यांजकडून होय. 'संस्कृति संगम' या विद्वत्ताप्रचुर ग्रंथांत सर्व गोष्टींचें समतोलबुद्धीनें विवेचन करणारे प्राध्यापक द० के० केळकर यांनींहि पृ० २७९ वर अशाच तऱ्हेचा निष्कर्ष काढिलेला आहे* भारताची सार्वभौम सत्ता इंग्रजांच्या हातीं आली ती मोगल बादशाहांच्या हातांतून निखळून आली नाहीं हें १८५३सालांत शेंकडों मैल अंतरावरून हिंदुस्थानाकडे पाहणाऱ्या कार्ल मार्क्सलाहि चांगलें कळलें होतें. २२ जुलै १८५३ रोजीं अमेरिकन वाचकांसाठीं लिहिलेल्या व 'न्यू यॉर्क डेली टाइम्स'च्या ८ ऑगस्ट १८५३ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या The Future Results of British Rule in India या लेखाच्या आरंभींच मार्क्सनें How came it that English supremacy was established on India?

(हिंदुस्थानांत इंग्रजांचें वर्चस्व प्रस्थापित झालें तें कसें?) असा प्रश्न उपस्थित केला असून त्याचें उत्तर पुढील प्रमाणें दिलें आहे.

The Paramount Power of the Great Moghul was broken by the Moghul Viceroys. The power of the Viceroys

---

*रजपुतांनंतर सतराव्याअठराव्या शतकांत मराठ्यांनीं पुनश्च नेटाचा प्रयत्न केला व मुसलमानी अंमल बहुतेक झुगारूनहि दिला. आणि हा लढा मराठे व मोंगल यांमध्येंच राहता तर कदाचित् मराठ्यांचें साम्राज्य अखिल भरतखंडभर पसरलें असतें. पण ही क्रिया अर्धीमुर्धी होते न होते तोंच त्यांची अशा जबरदस्त शत्रूशीं गांठ पडलीं कीं, त्याच्यापुढें मराठे शतक अर्धा शतकहि टिकाव धरूं शकले नाहींत. पौर्णिमेच्या रात्रीं चंद्रबिंब क्षितिजावर सरवूं लागतें न लागतें तोंच त्याचा खग्रास व्हावा, असा प्रकार झाला.

was broken by the Maharattas. The Power of the Maharattas was broken by the Afgans and while all were struggling against all, the Britain rushed in and was enabled to subdue them all.*

(बड्या मोगल बादशाहांची सार्वभौम सत्ता त्यांच्याच सुभेदारांनीं खिळखिळी केली. मराठ्यांनीं या सुभेदारांना नरम केलें आणि अफगाणांनीं मराठ्यांच्या सत्तेवर आघात केला. अशा रीतीनें सर्वच जण इतर सर्वांशीं झगडत असतांना, ब्रिटिश लोक आंत घुसले आणि त्या सर्वांनाच जिकणें त्यांना शक्य झालें.) मार्क्सला १८५३ सालीं कळलेली ही गोष्ट Confederacy of India या पुस्तकाचा लेखक *A Punjabi* याला १९३८ सालींहि कळली नाहीं. कारण आपल्या अद्‌भुत पुस्तकाच्या पृ० १३८ वर त्यानें पुढील तारे तोडून ठेविले आहेत:

As the English had won their Empire from the Muslims, they trusted the Hindus in preference to them!

(इंग्रजांनीं साम्राज्य मिळविलें तें मुसलमानांना जिकून मिळविलें! म्हणून इंग्रज मुसलमानांच्या मानानें हिंदूंवर अधिक विश्वास ठेवूं लागले!)

इंग्रज भरतखंडाच्या साम्राज्यसत्तेचे स्वामी झाले ते कसे इतकाच प्रश्न तूर्त विचारांत घ्यावयाचा असल्यामुळें, सोळाव्या शतकांत व तत्पूर्वी पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज या बुभुक्षितांनीं हिंदुस्थानांत कोणकोणत्या कलागती केल्या या मुद्याकडे वळण्याचें कारण नाहीं. बाबरापासून सुरू झालेल्या मोगल घराण्याच्या अंमलापूर्वी जवळ जवळ तीनचारशें वर्षें मुसलमानांच्या टोळधाडी हिंदुस्थानाला उपद्रव देऊं लागल्या होत्या. हें खरें असलें तरी, हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाची एकमुखी सत्ता मुसलमानांच्या हातांत त्या समयाला तरी गेली नव्हती, हें सुस्पष्ट आहे. चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत काश्मीरांत सेनदेव राजा राज्य करीत होता. सेनदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा मुसलमान प्रधान शहा मीर यानें काश्मीरचें राज्य बळकाविलें हें खरें; पण आपलें मुसलमानपण हिंदुप्रजेला तापदायक होऊं नये याबद्दल त्याला फार दक्षता बाळगावी लागत होती. राजस्थानातील राणा संग, उदयसिंह,

---

**Karl Marx*, Letters on India, p. 55.

प्रतापसिंह इत्यादींनीं इब्राहिम लोदीपासून अकबरापर्यंतच्या काळांत आपला स्वाभिमानी व स्वातंत्र्यप्रेमी बाणा नेटानें व थाटानें कसा कायम टिकविला होता याची साक्ष खुद्द इंग्रज इतिहासकारांनींच दिली आहे. चंदेरीचा राजा मेदिनीराय हाच सोळाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत राणा संगाचा प्रतिनिधि म्हणून माळव्याचा कारभार पाहात असे. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळापर्यंत म्हणजे तेराव्या व चौदाव्या शतकाच्या संधिकालापर्यंत गुजराथमध्यें हिंदुराजसत्ता नांदत होती. चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं मलिक काफूरनें देवगिरी, तैलंगण इत्यादि राज्यें पादाक्रांत करीत द्वारसमुद्र गांठलें हें खरें असलें तरी, या आक्रमणाची पाठ वळतांच दक्षिण भारतांत हिंदुसत्ता फिरून स्थिरस्थावर झाली. विजयानगरचें वैभवशाली हिंदुराज्य १५६५ पर्यंत जोरांत होतें. बंगाल-बिहार-भागांत मुसलमानी सुलतानांची सत्ता पुष्कळच लौकर स्थापित झाली हें खरें; पण या दोन्ही विभागांत हिंदु जमीनदार फार प्रबळ होते व कोणतीहि राज्यसत्ता असली तरी तिच्यावर या हिंदु-सत्तेचें दडपण बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असे, ही गोष्ट विसरण्याजोगी नाहीं.

हिंदुस्थानची साम्राज्यसत्ता मोगल घराण्याच्या हातीं येण्यापूर्वींचा दोन तीनशें वर्षांचा काळ स्थूल मानानें दृष्टीसमोर आणला तर त्या काळांत हिंदुस्थानांत मुसलमानांच्या हातीं फारशी राजसत्ता होती, असें न्यायानें म्हणतां यावयाचें नाहीं. दिल्ली जिंकून बाबरानें मोगली राज्यसत्तेची मुहूर्तमेढ रोंविली हें खरें. पण, त्याच्या अल्पकालीन कारभारानंतर त्याचा मुलगा हुमायून याला राज्याला मुकावें लागलें व जवळ जवळ सारा जन्म त्याला वनवासांत काढावा लागला हें ऐतिहासिक सत्य आहे. इ०स० १५५६ मध्यें पानिपतची लढाई जिंकून अकबर दिल्लीपति झाला, त्या वेळीं व त्यानंतर कांहीं वर्षें त्याची सत्ता दिल्लीभोंवतालच्या फार मर्यादित मुलुखावर चालत असे. अकबरालाहि क्रूरपणाचे झटके येत असत, नाहीं असें नाहीं; पण, राज्यसंपादनाचा व राजवैभव भोगण्याचा आपला उद्योग सफल व्हावयाचा असेल तर, हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत, मुसलमानपण जवळजवळ गुंडाळूनच ठेवून चाललें पाहिजे हें धोरणी शहाणपण शिकून अकबर वागू लागला.

> परक्यांच्या ५ टक्के खऱ्या-खोटचा भलेपणाला उत्तर म्हणून त्यांच्याशीं १०५ टक्के भलेपणानें वागण्यांतला धोका सालस हिंदूंना न कळल्यामुळें, अकबराला हिंदूंचें हार्दिक सहकार्य मिळालें व त्या सहकार्याच्या जोरावर राज्यविस्तार करून आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं भरतखंडाचा पुष्कळसा भाग त्यानें मोगलांच्या एकछत्री साम्राज्याखालीं आणला.

पण सोळाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं त्यानें जी कामगिरी केली ती टिकली किती अल्प काळ? राणा प्रतापसिंहाचा मुलगा अमरसिंह यानें जहांगीरच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच राजस्थानांत हिंदुसत्ता स्थापण्याचा उद्योग आरंभिला आणि १६०९–१० पासून पुढील ३–४ वर्षांत त्यानें जहांगीरच्या सैन्याचा १७ वेळां लढाईंत पराभव केला. दक्षिणेंत मलिकंबर, शहाजी राजे, मुरार जगदेव प्रभृतींनीं आदिलशाही, निजामशाही वगैरे राज्यें मोगली दावणींतून सोडवून तीं हिंदुतंत्र करण्याचा प्रबळ प्रयत्न सुरू केला. उत्तरेस काबूल-कंदाहारपर्यंत पसरलेल्या अकबराच्या राज्याची त्या भागांतहि पीछेहाटच झाली. अकबराच्या मृत्यूला पुरीं पन्नास वर्षेंहि झालीं नाहींत तोंच या भागांतल्या सत्तेला सोडचिठी देण्याचा प्रसंग शहाजहानवर आला. तुटक दिसणाऱ्या या फुटकळ गोष्टी एका सूत्रांत गुंफल्या म्हणजे कोणीहि असाच निष्कर्ष काढील कीं, आपलें मुसलमानपण विसरून व मोठीं खोल धोरणें आंखून अकबरानें मोगली साम्राज्याचा शामियाना उभारला खरा; पण, १६०५ मध्यें अकबर मरण पावल्यानंतर अल्पावधींतच, हिंदूंनीं हिकमतीपणानें व हिंमतीनें वागून या शामियान्याचे तणावे तोडून टाकण्याला चौफेर प्रारंभ केला.

आणि उग्रप्रकृति औरंगजेबानें आपल्या कडव्या इस्लामी कारकीर्दीला सुरुवात केल्यानंतर, हिंदूंच्या स्वत्व-स्थापनेच्या या उद्योगांना उधान भरतीच आली! आग्रा-मथुरा भागांतील हिंदूंच्या प्रतिकार-बुद्धीमुळें औरंगजेबाला चार पांच वर्षें अस्वस्थ बनविलें व गोकुळ जाट यानें केलेल्या त्या वेळच्या बंडांत औरंगजेबाचे सहस्रावधि सैनिक मृत्युमुखीं पडले. पतियाळा संस्थानांत सतनामी लोकांनीं इस्लामी सत्तेविरुद्ध बंड केलें तें मोडतां मोडतां औरंगजेब जेरीस आला. गुरु तेग बहादूरच्या अमानुष वधामुळें खवळलेल्या शिखांनीं

इस्लामी छळाला तोंड देण्यासाठीं पोलादी संघटना सुरू केली. जोधपूरच्या जसवंतसिंगाला कपटानें मारण्यांत आल्यावर त्याचा मुलगा अजितसिंह याला इस्लामी धर्माची दीक्षा देण्याच्या इराद्यानें बादशाहानें त्याला आपल्या दरबारांत नेण्याचा घाट घातला. तेव्हां दुर्गादासासारख्या धूर्त सरदारानें अजितसिंहाला हातोहात पळविलें. पुढें तर या दुर्गादासानें खुद्द राजपुत्र अकबर याला हाताशीं धरून व दक्षिणेंत छत्रपति संभाजी महाराज यांच्याशीं संधान बांधून, औरंगजेबाच्या तोंडचें पाणी पळविलें. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापणाऱ्या शिवाजी राजांनीं दक्षिणेंत शिल्लक राहिलेल्या शाह्यांना शह देऊन आपल्या सूत्रांत गोविलें व कर्नाटकावरून दक्षिणेकडे वळून, त्यांनीं जिंजी-तंजावरापर्यंतचा मुलूख अंकित करून घेतला. छत्रसाल, सुजानसिंह इत्यादि मध्यभारतीय हिंदु प्रमुखांशीं,राजपूत हिंदूंशीं व पंजाबमधील शिखांशीं संधानें बांधून, शिवाजी दिल्लीच्या साम्राज्यसत्तेलाच शह देऊं लागल्यामुळें, कपटी औरंगजेबानें महाराष्ट्राच्या या प्रातःस्मरणीय छत्रपतींना तुरुंगांत कसें अडकवून ठेविलें व तेथून बादशाहाच्या हातावर तुरी देऊन ते निसटून दक्षिणेंत कसे परत आले, हा इतिहास महाराष्ट्रांत तरी आबालवृद्धांस पूर्ण परिचित आहे.

छत्रपति संभाजी महाराजांनीं आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पांच-सहा वर्षांत आपला दरारा कायम ठेविला होता व बापाविरुद्ध उठलेला शहाजादा अकबर हा त्यांचा आश्रयार्थी म्हणून कांहीं दिवस महाराष्ट्रांत मुक्कामहि करून राहिला होता. गाफीलपणामुळें औरंगजेबाच्या हातीं पडल्यावर, या थोर छत्रपतीनें मृत्यूला ज्या धैर्यानें कवटाळिलें तें धैर्यच मोगलांची सत्ता दक्षिणेंतून पार हुसकून लावण्याला कारणीभूत झालें. संभाजीला हाल हाल करून मारलें म्हणजे तरी मराठे हाय खाऊन स्वस्थ बसतील अशी आशा दक्षिणेंत येऊन राहिलेल्या औरंगजेबाला वाटत होती. पण या आशेला कोणतें फळ आलें ? लढाईची आघाडी महाराष्ट्रापासून मद्रास इलाख्यापर्यंत पसरून देऊन आणि गनिमी काव्याचें युद्ध शास्त्र-शुद्ध पद्धतीनें खेळून मराठ्यांनीं त्याला सतावून सोडलें ! मराठ्यांच्या विलक्षण हालचाली व त्यांचे अकल्पित छापे यांनीं भयभीत होऊन बादशाहा त्यांच्या मुलखाला ‘ पिशाच्चभूमि ’ हें नांव देऊं लागला ! या काळांत साहस, स्वामिभक्ति, धोरणीपणा इत्यादि गुणांची ज्यांनीं शर्थ केली ते संताजी

घोरपडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस, रामचंद्रपंत अमात्य हे शिवाजीचीं धोरणें उत्तम जाणणारे मुत्सद्दी व रणझुंजार होते. १७०७ सालीं दक्षिणेंत मृत्यु पावलेल्या औरंगजेबाची मानसिक तगमग पाहून सर्व मराठ्यांना असें खास वाटलें असेल कीं, मोगलांच्या साम्राज्यसत्तेला शह देण्याचें थोरल्या छत्रपतींनीं आरंभिलेलें कार्य पुढें चालवून व संभाजी महाराजांच्या निर्दय वधाचा प्रतिशोध घेऊन आपण महाराष्ट्रीय लोक हिंदु म्हणून कृतकृत्य झालों आहों !

अकबर १६०५ मध्यें मेला व औरंगजेब १७०७ मध्यें मेला. या शंभर वर्षांच्या काळांत रजपूत, मराठे, शीख, जाट, बुंदेले अशा हिंदूंच्या प्रतिकारबुद्धीमुळें मोगलांची साम्राज्यसत्ता बरीच संकुचित झाली.

> ज्या काळांत मोगलांची साम्राज्यसत्ता सगळ्या भारतीय हिंदूंनीं अविरोध वृत्तीनें मान्य केलेली होती असा काळ भारतीय इतिहासांत असलाच तर त्याची व्याप्ती २०-२५ वर्षांपलीकडे निश्चित नाहीं.

औरंगजेबानंतरच्या काळांत तर दिल्लीच्या तख्तावरचीं कळसूत्रीं बाहुलीं हवीं तशीं खेळवून हिंदु सत्तांनीं भारताच्या राजकारणाला लागलेलें मोगली ग्रहण पार नाहींसेंच करून टाकलें !

गरजू सय्यद बंधूंच्या मार्फत दिल्लीच्या पादशाही राजकारणांत बोटशिरकाव करण्याचें श्रेय बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना आहे. मोगली साम्राज्य सत्तेच्या वठलेल्या विषवृक्षाच्या मुळावरच घाव घातला कीं, त्याच्या इस्लामी फांद्या आपोआप कोसळून पडतील अशा विश्वासानें वागण्याचें वळण मराठ्यांच्या बुद्धीला लावण्याचें श्रेय प्रतापशाली पहिल्या बाजीरावसाहेब पेशव्यांना आहे. गुजराथ-काठेवाडांत गायकवाडांची हिंदुसत्ता स्थापून, मध्य-भारतांत शिंदे, होळकर, पवार, भोंसले वगैरे पराक्रमी हिंदुघराण्यांची स्थापना करून व शिवाजी महाराजांचा समकालीन छत्रसाल याचा प्रतिपाळ केल्यानंतर, बुंदेलखंड, माळवा या विभागांत पाय रोंवून, बाजीरावसाहेबांनीं मराठ्यांच्या हिंदुसत्तेचा हिंदुस्थानभर असा वचक बसविला होता कीं, १७३९ सालीं नादिरशहानें दिल्लींत लुटालूट केली तेव्हां नादिरशहाला पायबंद घालूं शकेल

असा शेर एकटा बाजीरावच आहे, असें सर्वांना स्वाभाविकपणेंच वाटलें.* हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीच्या आसपास शीखांनीं आपलें संघटनेचें व सत्तासंपादनाचें कार्य औरंगजेबाच्या वेळेपासूनच सुरू केलें होतें. मध्यवर्ति मोगली सत्तेवर आघात होत आहेत हें पाहून त्यांनींहि त्या भागांतील मोगली सत्ता त्या सुमारास उधळून हुसकून लाविली. उत्तरेकडील इस्लामी सत्ता नष्ट करण्याचें कार्य मराठे, शीख, रजपूत, जाट, बुंदेले यांचेमार्फत झालें तर पूर्व भारतांतली मोगली सुभेदारांची सत्ता नरम करून तिला वांकविण्याचें कार्य नागपूर-वऱ्हाडचे मराठेशाही सुभेदार रघूजी भोंसले व जानोजी भोंसले–त्याचप्रमाणें त्यांचे कारभारी भास्करराव कोल्हटकर व शिवभट साठे-यांच्याकडून अव्याहतपणें होतच होतें. मोगलांची मध्यवर्ति सत्ता लुली-लंगडी होऊं लागतांच, आपली स्वतंत्र मुसलमानी सत्ता दक्षिणेंत स्थिर करण्याचा प्रयत्न निजामानें केला; पण, या सत्तेला ठोकरण्याचें काम १७३७ सालांतल्या भोपाळच्या लढाईपासून तों थेट १७९४ च्या खडर्याच्या लढाईपर्यंत मराठ्यांनीं वारंवार केलें. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत दक्षिण भारतांत हैदर, टिपू यांनीं जी इस्लामी सत्ता स्थापिली तिलाहि मराठ्यांच्या हिंदुसत्तेचा मोठाच वचक वाटत असे. पानिपतच्या अपयशानंतर मराठ्यांची सत्ता फिरून स्थिरावल्यावर, महादजी शिंदे अर्थात् पाटील बावा हे दिल्लीच्या व उत्तर भारताच्या राजकारणांत पुनः प्रभावीपणानें तळपूं लागले आणि दिल्लीच्या नामधारी बादशहाचे कुलमुखत्यार म्हणून ते कैक वर्षें सत्ता गाजवीत होते.

परक्या मुसलमानांच्या पहिल्या धडकांना तोंड देण्याचें काम एकसारखें कित्येक शतकेंपर्यंत निकरानें करावें लागल्यामुळें, अकबराच्या कारकीर्दीनंतर रजपूत हिंदु हे पूर्वींइतके कडवे व प्रभावशाली ठरूं शकले नाहींत. पानि-

---

*स्वतः बाजीरावसाहेबांना या बाबतींत किती आत्मविश्वास वाटत होता हें स्पष्टपणें दर्शविणारे पुढील शब्द स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं 'हिंदुत्व' या आपल्या ग्रंथांत (प्रथमावृत्ति) पृ० ७९–८० वर बाजीराव-ब्रह्मेन्द्र पत्रव्यवहारावरून उद्धृत केलेले आहेत: "आपलीं घरगुती भांडणें बाजूला ठेविलीं पाहिजेत. आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे. मी तर नर्मदा उतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार. मग पाहूं या नादिरशहा कसा खालीं येतो तो."

पतनंतरच्या काळांत ज्या अहिंदु सत्ता भरतखंडभर बोकाळत गेल्या त्या सर्वांना तोंड देण्याचें काम मराठ्यांना प्रायः एकाकीच करावें लागल्यामुळें, या अफाट कामाच्या मानानें ते अपुरे पडले. सत्तासंपादनाच्या व सत्तारक्षणाच्या कामीं जो अनुभव नेहमींच सर्वत्र येतो तो याहि प्रकरणीं आल्यामुळें, शेवटीं मराठे व शीख यांचा मोड झाला व भारतांतल्या साम्राज्यसत्तेपर्यंत इंग्रजांचे हात पोंचले.

> जो जास्त जागरूक, तो जास्त हिकमती, ज्याचें शस्त्र पल्लेदार व ज्याचें शास्त्र अद्ययावत् तो सर्वश्रेष्ठ सत्ताधारी बनावयाचा हा स्वयंसिद्ध नियम आहे.

**चलानामचला भक्ष्याः दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिकाः ।**
**सहस्तानां अहस्ताश्च शूराणां चैव भीरवः ॥**

या जुन्या श्लोकांत ग्रथित केलेल्या अनुभवाचें देशकालानुरूप जें परिणत स्वरूप होणें शक्य होतें तें झाल्यामुळेंच, इंग्रज या देशांत सत्ताधीश बनले. या सर्व गोष्टी वास्तविक अशाच असल्या तरी, 'आमच्यापूर्वी साम्राज्यसत्ता मोगलांची होती' ही इतिहासविरुद्ध कल्पना पिकविण्याचें इंग्रजांना कारण नाहीं; स्वार्थांध राज्यकर्त्यांनीं पिकविलेल्या या कल्पनेवर मुसलमानांनीं भाळून जाण्याचें कारण नाहीं; आणि, असल्या कुत्सित पण सोइस्कर कल्पनांमुळें चढून गेलेले मुसलमान देशाचें अखंडत्व खंडित करूं पाहात असतील तर, त्यांच्या त्या दुराग्रहापुढें इतरांनीं दबून जाण्याचें तर कांहींच कारण नाहीं!

"दीर्घकाळपर्यंत हिंदुस्थानांत साम्राज्यसत्ता उपभोगणारे आम्ही मुसलमान; कांहीं झालें तरी हिंदूंचा पगडा आम्ही मान्य करणार नाहीं; पुढच्या सगळ्या कटकटी टळाव्या असें हिंदूंना व ब्रिटिशांना वाटत असेल तर त्यांनीं बऱ्या बोलानें आम्ही मागत असलेला सवता सुभा मान्य करावा," या मागणीच्या पोटांत दडून बसलेली भावना किती खोटी व इतिहासविसंगत आहे हें बुद्धीला पटण्याच्या दृष्टीनें आतांपर्यंत केलेलें ऐतिहासिक घटनांचें धांवतें परीक्षण पुरेसें आहे. ही मागणी निराधार व अनैतिहासिक असूनहि मुसलमान ती तशीच दामटीत आहेत यालाहि एक कारण आहे. आचरटपणाच्या कांहींहि मागण्या मागत राहिल्यानें वाजवीपेक्षां बऱ्याच अधिक गोष्टी पदरांत

पाडून घेतां येतात हा भारतीय मुसलमानांचा गेल्या पन्नास साठ वर्षांचा अनुभव असल्यानें, त्यांनीं या मागणीचा पुरस्कार हट्टीपणानें चालू ठेविला आहे. सार्वजनिक व सामूहिक हितसाधनाच्या बाबतींतली मुसलमानांची दंडेली व दडपेगिरी आणि अशाच बाबतींतला हिंदूंचा भोंगळपणा व गमावूपणा यांमधील विरोध अत्यंत ढोबळ असा आहे. या दोन समाजांच्या मनोवृत्तींतला हा भेद मूलगामी आहे. वैयक्तिक स्वार्थ, खाजगी नफा-तोटा इत्यादि प्रकरणीं डोळ्यांत तेल घालून वागणारे व अशा स्वार्थसाधनाच्या प्रसंगीं देवधर्म, सत्यासत्य इत्यादि सर्व कल्पना झुगारून देणारे हिंदु, सामाजिक हितसंबंधांचा व न्यायप्रस्थापनेचा प्रश्न निघाला कीं, गाफील व आस्थाशून्य बनतात ! अशा बाबतींत मुसलमान समाज फाजील जागरूक आहे. सार्वजनिक स्वरूपाचे वाजवी हक्कहि हिरीरीनें प्रस्थापित करण्यापूर्वीं, हिंदुमनाला नाना तऱ्हेच्या कुशंका जडतील व गडकऱ्यांनीं वर्णिलेली

**कसें करूं मी ? काय करूं मी ?**
**ध्रुवपद नामी**
**हें तों तुझिया गाण्याचें**
**नांव न संकट जाण्याचें ।।**

अशी भांबावलेली मनःस्थिति त्याला गोंधळांत पाडील. हक्क प्रस्थापित करावयाचा विचार मनांत आला कीं, मुसलमान समाज तो हक्क न्याय्य असलाच पाहिजे अशा आविर्भावानें बोलूंवागूं लागेल. डॉ० आंबेडकर यांनीं या आविर्भावाला व मनोवृत्तीला उद्देशून Gangsters' Methods हा शब्दप्रयोग वापरला आहे व डॉ० परांजपे यांनीं 'रामोशीगिरीचें तंत्र' असें या शब्दप्रयोगाचें भाषांतर केलें आहे. या प्रकारांचा अवलंब करून, भारतीय मुसलमान समाजानें हिंदूंच्या हक्कावर सतत आक्रमण केलें व पन्नास साठ वर्षें हा 'पराक्रम' केल्यावर, भारताचे तुकडे तोडून काढण्याचा व त्यांतला तोडलेला कांहीं भाग स्वतःच्या स्वतंत्र उपभोगासाठीं अलग करून मागण्याचा डाव त्यांनीं आतां रचलेला आहे. पन्नास साठ वर्षांत मुसलमानांच्या 'पराक्रमा'चा क्रमशः विस्तार कसा झाला हें पाहणें आतां ओघानेंच प्राप्त झालें आहे.

# प्रकरण ३ रें

# मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास

## टप्पा पहिला : १८५७ ते १८९२

**The five stages** of the rake's progress, according to John Morley, are : first, you push on your territories where you have no business to be and where you had promised not to go; secondly, your intrusion provokes resentment and resentment means resistance; thirdly, you instantly cry out that the people are rebellious and that their act is rebellion; fourthly, you send a force to stamp out the rebellion; and, fifthly, having spread blood-shed, confusion and anarchy, you declare with hands uplifted to the Heavens that moral reasons forced you to stay; for if you were to leave, this territory would be left in a condition which no civilized power could contemplate with equanimity or with composure. *

(जबरदस्तीनें परमुलुखांत आक्रमण करीत जाणाऱ्या व जगाच्या चावडीवर आपल्याविरुद्ध विशेष बोभाटा होऊं नये असें इच्छिणाऱ्या आक्रमकांचा वर्तनक्रम ठराविक पांच टप्प्यांनीं प्रगल्भ होत जातो, हें जॉन मोर्ले यांनीं मार्मिकपणानें विशद करून सांगितलें आहे. एकाद्या मुलखांत उगीचच घुसावें व तेथें न येण्याबद्दलचीं वचनें पूर्वीं दिलीं असलीं तरी त्यांना हरताळ फांसावा ही या क्रमाची सुरुवात होय. या उपटसुंभपणामुळें लोकांना चेव आला व त्यांनीं प्रतिकार केला, कीं त्या प्रतिकार—प्रवृत्तीवर बंडखोरीचा शिक्का मारणें, व लोकांनीं बंड केल्याचा बोभाटा करणें ह्या सदर क्रमांतील पुढच्या दोन

*Quoted by *C. F. Andrews* in "The Challege of the North West Frontier."

पायऱ्या होत. बंडाचा बीमोड करण्यासाठीं सैन्य रवाना करणें ही या उपक्रमांतली चौथी पायरी होय. अशा रीतीनें रक्तपात झाला, गोंधळ माजला व राज्ययंत्र खिळखिळें झालें कीं, सात्त्विकपणाचें सोंग उभें करणें ही अखेरची पायरी होय. 'आम्हांला न्यायाची चाड फार; म्हणून इथें आम्ही मोठ्या नाखुषीनें राहिलों' असें आकाशांतल्या बापाची आठवण व आळवण करून सांगणें आणि आमचा पाय येथून निघाला तर या ठिकाणीं जी दुरवस्था निर्माण होईल तिच्याकडे स्थितप्रज्ञाच्या शांत वृत्तीनें पाहणें कोणत्याहि सुसंस्कृत सत्ताधाऱ्याला सहन होणार नाहीं अशी बढाई मारणें हीं या सोंगाच्या बतावणीचीं अंगें आहेत. )

व्यापार व राजकारण या दोन हेतूंच्या सिद्धयर्थ साऱ्या जगभर पिंगा घालणाऱ्या ख्रिस्ती राष्ट्रांच्या आक्रमक वृत्तीची परिणति कसकशी होते याचें वर्णन वरील अवतरणांत केलेलें असून, ब्रिटिश लोकांच्या हिंदुस्थानांतल्या राज्यविस्तारालाहि तें लागू पडतें. हिंदु–हिंदूंमधला फुटीरपणा, मुसलमान-मुसलमानांमधला बेबनाव, हिंदु-मुसलमानांमधले हेवेदावे यांचा आपल्या राज्यविस्ताराला प्रसंगीं किती नामी उपयोग होतो याचा अनुभव, राज्यविस्ताराची चटक लागल्यावर, इंग्रजांना लौकरच येऊं लागला होता. बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांचे सुभेदार अलिवर्दीखान व सिराजउद्दौला यांची सत्ता पोखरतांना त्यांना राजा तिलूचंद, रायवल्लभचा मुलगा किसनदास व पंजाबी व्यापारी अमीनचंद (बंगाली उमीचंद नव्हे) यांचा पुष्कळच उपयोग झाला होता.* पूर्वभारत पचविण्याची पहिली पायरी म्हणून क्लाइव्हनें त्या भागांत दुहेरी राज्यव्यवस्था सुरू केली व त्यानें सत्ताधारी नबाबाला नामधारी बनविलें. या कामीं महमद रेझाखान हा क्लाइव्हच्या उपयोगीं पडला होता. रेझाखानला निष्प्रभ करतांना वॉरन हेस्टिंग्जनें नंदकुमाराच्या खटाटोपी स्वभावाचा भरपूर उपयोग करून घेतला व शेवटीं नंदकुमारावरच बालंट रचून त्यानें त्याचा कांटा कायमचा दूर केला. या गोष्टी ब्रिटिश सत्तेच्या उत्कर्षाच्या सुरुवातीलाच घडलेल्या असल्या तरी, 'प्रसादचिन्हानि पुरः फलानि' या न्यायानें त्या सूचक आहेत. वॉरन

*Rise of the Christian Power in the East, Vol. I, pp. 62–75.

हेस्टिंगजच्या या सर्व कारस्थानांना इंग्लंडमधल्या त्याच्या धन्यांची पूर्ण मान्यता होती* हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सातारा, नागपूर, झांशी, संबळपूर, तंजावर, अयोध्या वगैरे संस्थानें खालसा करण्याचा डलहौसीनें धूमधडाका चालविला व ज्या निजामाच्या परधार्जिणेपणामुळें इंग्रजांना हिंदुस्थानांतल्या अनेक राज्यसत्ता धुळीस मिळवितां आल्या त्या निजामाचा वऱ्हाड प्रांतहि डलहौसीनें ताब्यांत घेतला! हें पाहून हिंदु व मुसलमान अशा दोन्ही धर्मांच्या संस्थानिकांनीं हें ओळखलें कीं, एकेका सत्ताधीशाला वेगवेगळा काढून, हिंदुस्थानांत आपल्या सत्तेचा विस्तार करणारे इंग्रज आतां हिंदुस्थानचा सगळाच नकाशा लाल रंगानें भूषविण्याच्या मार्गांत आहेत! इंग्रजांच्या सत्तावाढीमुळें शिरजोर बनलेल्या कांहीं मिशनऱ्यांनीं धर्मप्रसार करतांना अतिरेक चालविला असल्याचाहि बोभाटा होऊं लागला. अशा कारणांनीं समाजांत अनेक ठिकाणीं असंतोष दडून राहिला होता. त्या दारूच्या कोठारांत कसली तरी ठिणगीच पडावयाची राहिली होती. काडतुसांना लावण्यांत आलेल्या चरबीचा बोभाटा झाला आणि हें कोठार भडकूं लागलें. सुडाची भावना कितीहि काळ सुप्तावस्थेंत राहिली तरी ती नष्ट होत नाहीं, (Vengeance sleeps long but never dies.) अशा आशयाची एक म्हण इटॅलियन भाषेंत आहे. ती या प्रसंगीं दोन परस्परविरोधी तऱ्हांनीं प्रत्ययाला आली. दिल्ली-लखनौ-च्या राजघराण्यांचे इस्लामी अभिमानी नाराज झालेले होते. सातारा, झांशी, नागपूर या संस्थानांना झळ लागल्यामुळें व नानासाहेब पेशव्यांसारख्या मानी व पराक्रमी पुरुषाची मानखंडना करण्यांत आल्यामुळें संत्रस्त झालेले हिंदूहि प्रसंगाची वाट पाहात होते. सूडाच्या भावनेनें या सगळ्यांची जबर-दस्त जूट जमून आली. पण, सूडाच्याच भावनेच्या वेगळ्या प्रकारच्या लीलेमुळें शीख व गुरखे या संग्रामांत सामील झाले नाहींत. धर्मच्छलकांचा बदला घेण्यांत बाणेदारपणा दाखविणाऱ्या शिखांच्या मनांत, गुरुगोविंदसिंग व बन्दा यांचे दिल्लीच्या इस्लामी सत्तेकडून झालेले हाल शल्यासारखे रुतून बसले होते. प्रसंग सांपडेल तेव्हां दिल्ली शहर भरदिवसा लुटण्याचीं जागृति-

*Rise of the Christian Power in the East, Vol. III, pp. 8–13.

स्वप्नें शिखांच्या मनांत सदैव घोळत होतीं. या स्वप्नांना सत्य स्वरूप देण्याला शीख या वेळीं प्रवृत्त झाले व म्हणून ते या आंदोलनापासून अलिप्त राहिले. इंग्रजांनीं नेपाळवर चाल केली तेव्हां अयोध्येच्या नबाबानें त्यांना बरीच मदत केली होती, ही गोष्ट गुरख्यांच्या मनांत डांचत होती. त्यामुळें, बंडांत सामील होण्याबद्दलची विनंति गुरख्यांना करण्यांत आली असूनहि ती निरुपयोगी ठरली. शीख व गुरखे या प्रसंगीं जसे वागले त्याहून भिन्न प्रकारानें ते वागले असते तर, हिंदुस्थानचें राजकीय भवितव्य कदाचित् वेगळ्याच वळणावर गेलें असतें.

पण तसें कांहीं न घडतां भाग्यवान इंग्रज या वणव्यांतून निभावून निघाले. 'कुंपणी' सरकारचा अंमल संपून राणी सरकारचें राज्य सुरू झालें. नवीं धोरणें आंखतांना अनुभवांनीं शिकविलेलें शहाणपण जमेला धरण्यांत आलें. हिंदु व मुसलमान यांची एकजूट आपल्या सत्तेच्या स्थैर्याला घातक आहे हा धडा इंग्रज या प्राणसंकटामुळें पक्केपणीं शिकले. 'नमयामास नृपाननुद्धरन्' या वचनांत सुचविल्याप्रमाणें, देशी संस्थानिकांना नष्ट करण्याऐवजीं निष्प्रभ करून टिकविण्यांतच धोरणीपणा आहे, असें इंग्रज मुत्सद्यांना वाटूं लागलें. बंडांत सामील झालेल्या शिपायांचा व सरकारी नोकरांचा कायमचा वृत्तिच्छेद करण्याचें धोरण सुरक्षितपणाचें वाटूं लागल्यामुळें, यापुढें सैन्यांत शीख, पंजाबी, सरहद्दीवरचे पठाण व गुरखे यांना प्रामुख्य देण्याची वृत्ति प्रबळ झाली. आजच्या सैन्यांत पंजाब्यांना जें डोईजड महत्त्व आलें आहे त्याचीं पाळेंमुळें किती खोलवर रुतलेलीं आहेत हें डॉ० आंबेडकर यांनीं आपल्या पुस्तकांत श्री० चौधरी यांच्या Modern Review मधील लेखांच्या आधारें विशद केलें आहे.* सर जॉन लॉरेन्सनें १८५८ सालीं सर फ्रेडरिक करी याला लिहिलेल्या पत्रांतील पुढील उद्गारांवरूनहि तीच गोष्ट सिद्ध होत आहे :

"Under the merey of God, the loyalty and contentment of the people of the Punjab has saved India. Had the Punjab gone, we must have been ruined."†

*Thoughts on Pakistan, pp. 67–69.

†Quoted by *Major Basu* in "Rise of the Christian Power in the East," Vol. V., p. 38.

(ईश्वरी कृपा म्हणून पंजाबमधील लोक राजनिष्ठ व संतुष्ट राहिले. त्यामुळेंच हिंदुस्थानांत आम्ही टिकून राहिलों. पंजाब बिथरला असता तर आमचा पुरा नाशच झाला असता.)

अन्य प्रसंगीं थपडा सहन करणाऱ्या हिंदी संस्थानिकांना भारताच्या राजकीय प्रगतीचा प्रश्न निघतांच जांवईपणाच्या लहरी कां येऊं लागतात आणि स्वराज्य–स्वातंत्र्याचा प्रश्न निघतांच मुसलमानांचा भाव कां वधारतो या प्रश्नांचा, १८५७–५८ सालीं इंग्रज जें शहाणपण शिकले त्याच्याशीं फार जिव्हाळ्याचा संबंध आहे. मुसलमानांच्या महत्त्वाकांक्षांच्या आडमाप उड्या, १९३५ च्या राज्यघटना कायद्यांत संस्थानिकांच्या मागण्यांना देण्यांत आलेलें अवास्तव महत्त्व आणि या कायद्याच्या दुरुस्तीची योजना सुचवितांना पंजाबचे पंतप्रधान सर शिकंदर हयातखान यांनीं सैन्यांतील पंजाब्यांच्या प्रमाणाबद्दल धरलेला आग्रह* या सर्वांची संगती कशी लावावयाची या--बद्दलचें कांहीं एक धोरण चाणाक्ष वाचकांना आतां आंखतां येईल.

इंग्रजांच्या अधिराज्याखालीं नांदणाऱ्या हिंदुस्थानांतल्या लोकांना शिक्षण कोणत्या प्रकारचें द्यावयाचें या प्रश्नाचा निकाल १८५७ च्या प्रसंगाआधींच लागला होता. राणीच्या जाहीरनाम्यांतील उदार तत्त्वें घोषित झालीं व उच्च शिक्षणाचे कारखाने उभारण्यासाठीं व त्यांतून निघणारा माल नंबरी आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाटीं विद्यापीठांची स्थापना हळुहळू होऊं लागली. आपण निर्मिलेल्या सृष्टीच्या पसाऱ्यावर अधिराज्य गाजवावयाचें तर कोणाची तरी मदत पाहिजे म्हणून ईश्वरानें माणूस निर्मिला; तो हुबेहूब आपली प्रतिमा म्हणून निर्मिला असें ख्रिस्ताचे भक्त म्हणतात. हिंदुस्थानांतल्या नवशिक्षितांच्या बाबतींतहि हेंच म्हणतां येईल ! या नवशिक्षितांची संख्या वाढूं लागतांच त्यांच्याकडून कोणता टाहो फोडला जाऊं लागला असेल याची कल्पना १८८५ सालीं स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या पहिल्यापहिल्या अधि-

---

*The composition of the Indian Army as on 1st January 1937 shall not be altered. In case of reduction, the communal proportion shall be maintained ; but this may be reduced in case of war or other emergency.—quoted by Dr. *Rajendra Prasad* in "Pakistan."

वेशनांतून संमत झालेल्या ठरावांवरून करतां येण्यासारखी आहे. उच्च नोकऱ्यांतून शिरकाव व आय०सी०एस०ची परीक्षा हिंदुस्थानांतहि होण्याबद्दलचा आग्रह या दोन विषयांना त्या काळांत फार महत्त्व होतें.

लोकांच्या मनांत काय चालतें याचा कानोसा लागण्याच्या दृष्टीनें कांहीं तरी योजना होणें हें कारभाराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें श्रेयस्कर ठरेल, असें इंग्रज मुत्सद्यांना वाटूं लागलें. १८६१ सालचा कौन्सिलविषयक कायदा म्हणजेच या हेतूनें घडविलेली पहिली योजना होय. या कायद्यामुळें गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलांत सरकारनियुक्त बिनसरकारी माणसें घेण्यांत आलीं. पतियाळाचे महाराज, बनारसचे राजेसाहेब आणि ग्वाल्हेरचे सर दिनकरराव राजवाडे यांची १८६२ सालीं या जागीं नेमणूक झाली. संस्थानिकांचें महत्त्व मान्य करण्याची दृष्टि या नेमणुकांत निश्चित दिसते. प्रतिनिधि ज्या मतदार-संघातर्फे नेमला जातो त्याच्या स्वरूपावर त्याच्या कामाचें स्वरूप अवलंबून असतें असें मानलें तर, या लोकांकडून काम कसें झालें असेल याची कल्पना सहज करतां येईल. कारण, गव्हर्मेंट हाऊस हाच या लोकांचा मतदारसंघ असे! असें असलें तरी, निर्भय वृत्तीचीं निर्भीड माणसें या ठिकाणीं अगदींच जात नसत असें नाहीं. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक हे १८८४ पासून १८८७ पर्यंत या कौन्सिलांत होते. इंग्लिश गिरण्यांच्या कापडावरील आयात जकात रद्द करूं नये असें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादिलें; तरीहि सरकारनें आपलाच हेका चालविला. या अरेरावीचा निषेध म्हणून रावसाहेब मंडलिक हे दुसऱ्या दिवशीं नखशिखांत खादीचे कपडे परिधान करून कौन्सिलांत हजर राहिले होते.* गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलच्या धर्तीचीं कायदेमंडळें प्रमुख प्रांतांतूनहि याच सुमारास प्रस्थापित झालीं. मुंबईचे विख्यात हिंदु पुढारी कै० जगन्नाथ शंकरशेट यांना १८६३ मध्यें मुंबई कौन्सिलचे सभासद म्हणून नेमण्यांत आलें.

हीं नामधारी कायदेमंडळें स्थापन झाल्यावर ३०–३१ वर्षांनीं म्हणजे १८९२ सालीं त्यांच्या स्वरूपांत सुधारणा करण्यांत आली. मध्यंतरींच्या या काळांत लोकमताचा चिमटा सरकारला कोणत्या दिशेनें बसूं लागला असेल याची कल्पना या काळांत झालेल्या प्रमुख कायद्यांमुळें होऊं शकते.

---

**C. Y. Chintamani*, Indian Politics since the Mutiny.

१८७१ मध्यें इंडियन पीनल कोडमध्यें १२४–अ म्हणजे राजद्रोहाचें कलम घुसलें. ग्लॅडस्टननें ज्याला 'सरकारला लाज आणणारा कायदा' असें प्रशंसापत्र दिलें तो देशी भाषेंतल्या मुद्रणाचें नियंत्रण करणारा कायदा व शस्त्रास्त्रांच्या वापरावर जास्त कडक निर्बंध घालणारा Arms Act हे दोन कायदे लिटनच्या कारकीर्दींत (१८७६ ते १८८०) झाले. कै० दादाभाई नौरोजी यांच्या प्रयत्नांना थोडेंसें यश आलें व आय०सी०एस०मध्यें थोडे हिंदी लोक घेण्याची व्यवस्था झाली. रिपनच्या कारकीर्दींत (१८८० ते १८८४) स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाया घातला गेला; व खाजगी शिक्षणसंस्थांना मान्यता मिळाली. न्यायाच्या पवित्र क्षेत्रांत तरी वर्णभेद नसावा म्हणून 'इल्बर्ट बिल' पास करण्याचे प्रयत्न याच कारकीर्दींत झाले; पण गोऱ्या नोकरशाहीच्या संघटित चळवळीमुळें हा हेतु पूर्णतया सफल झाला नाहीं.

१८८५ सालीं इंडियन नॅशनल कॉंग्रेसची पहिली बैठक झाली व १८८८ सालीं सर सय्यद अहमद यांनीं सर ऑक्लंड कॉल्व्हिन यांच्या प्रेरणेनें व सहकार्यानें 'Anglo-Muslim Defence Association' ही संस्था स्थापिली. नव्या युगांत सुरू झालेल्या नव्या शिक्षणाविषयीं मुसलमान समाजानें बेफिकिरी दाखविली होती. पर्शियन भाषा शिकून सरकारांत मानमान्यता मिळण्याचे दिवस संपले असल्यामुळें, मुसलमान समाजाचें महत्त्व हळुहळू घटत चाललें होतें. हें ओळखून, सर सय्यद अहमद यांनीं मुसलमानांच्या शिक्षणविषयक प्रगतीसाठीं प्रयत्न चालविले. अलीगडचें विद्यापीठ हें त्यांच्याच प्रयत्नांचें परिणत फळ आहे. १८५७ च्या उत्थानांत मुसलमानांनीं भाग घेतल्यामुळें त्यांच्यावर सरकारची नाराजी झालेली आहे व सरकारचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय मुसलमानांचें दरबारी महत्त्व वाढणार नाहीं हें ओळखून, या गृहस्थांनीं मुसलमानांना राजनिष्ठ बनविण्याचे प्रयत्न सुरू केले. सरकारला या गोष्टीची वर्दी होतीच. सुशिक्षितांमधील वाढती जागृति व चळवळ यांमुळें हातांतली थोडी फार तरी सत्ता हळुहळू सोडावी लागणार, हें ज्या चाणाक्ष इंग्रज अधिकाऱ्यांना दिसूं लागलें होतें त्यांनीं, सुशिक्षितांच्या हातीं पडलेली सत्ता त्यांच्या अंगीं लागूं नये म्हणून काय करावें याबद्दल विचार सुरू केला. दाव्यानें घट्ट बांधून ठेवलेल्या गाईला

दावें सैल केल्याचें आमिष दाखविणें अपरिहार्य असल्याचें दिसूं लागलें कीं, मालक तिच्या गळ्यांत लोढणें अडकवितो, तसाच प्रकार येथें झाला.

> मुसलमान समाजानें कॉंग्रेसच्या नादीं लागूं नये म्हणून 'अँग्लो मुस्लीम डिफेन्स असोसिएशन' काढण्यांत आली होती. राष्ट्रीय आंदोलनाच्या पहिल्या अवस्थेंत मुसलमानांचा उपयोग लोढण्यासारखा (Counter–poise) झाला.

संस्थानिक, अँग्लो इंडियन, मागसलेले वर्ग वगैरेंचाहि उपयोग यापुढील काळांत याच दृष्टीनें करण्यांत आला. पण, लोढणें बनण्याचा मान मिळविण्यांत मुसलमान हे जसे कालदृष्टया श्रेष्ठ तसेच ते या बाबतींत सर्वच दृष्टींनीं श्रेष्ठ आहेत !

मुसलमानांच्या राजनिष्ठेची खात्री पटून त्यांची उपयुक्तता दिसूं लागतांच लष्करी नोकरीच्या दृष्टीनेंहि त्यांचें महत्त्व वाढूं लागावें हें स्वाभाविक होतें. त्या वेळच्या लष्करी धोरणांच्या दृष्टीनेंहि मुसलमानांना हें महत्त्व मिळणें क्रमप्राप्त होतें. रशिया हिंदुस्थानवर स्वारी करणार या खऱ्याखोटया भीतीनें हिंदुस्थान सरकारचीं लष्करी धोरणें त्या काळांत आंखलीं जात असत, हें प्रसिद्ध आहे.* पण माणूस वाघाला भितो तसा वाघहि माणसाला भितो म्हणतात. रशियाचें गुप्त हेरखातें त्या वेळीं झारला रशियावर होऊं

*या धोरणाची कल्पना येण्याच्या दृष्टीनें पुढील उतारा वाचनीय आहे : १८८५ सालीं रशियन सेनापति कॅमराफ यानें जेव्हां अफगाणिस्थानच्या सरहद्दीवरील पेंजडें गांव घेतलें, तेव्हां रशियाचें व इंग्लंडचें युद्ध होण्याची वेळ आली होती. पण, अमीरानें पेंजडेवरील आपला हक्क सोडून दिल्यामुळें तें प्रकरण सलोख्यानें मिटलें जाऊन तेव्हांच शांतता झाली. तथापि, अफगाणिस्थान व इराण आणि अफगाणिस्थान व रशिया यांच्या दरम्यानची सरहद्द ठरवून देण्याच्या कामीं हिंदुस्थान सरकारनें पुढें बराच खर्च केला. रशियाचे भीतीचें एवढ्यानेंच निराकरण झालें असें नाहीं. तर सरहद्दीवरील किल्ले बळकट करणें आणि तेथें रेल्वे बांधणें या कामीं कोटयवधि रुपयांचा चूर झालेला आहे. बलुचिस्थानास क्वेट्टा प्रांत जो सन १८८७ सालीं जोडला गेला आणि सन १८९५ सालीं चित्रळचें जें प्रकरण उपस्थित झालें त्यांतील बीजहि हेंच होय.

—लो० टिळकांचे केसरींतील लेख, राजकीय खंड २, पृ० ३०८.

घातलेल्या चढाईच्या भयानक बातम्या पुरवीत असे. या बातम्यांच्या स्वरूपाचा उलगडा पुढील उताऱ्यावरून होण्यासारखा आहे:

This alarm concerning Russian invasion and encroachment was not on one side only. Just as British Rulers regarded an advance from the North on India to be imminent, so the Czar's ministers were afraid of an insurrection among the Muslims of central Asia fomented from India. They were told by their secret service agents that Afganistan was to be made the starting point where troops and ammunition would be massed for an advance on Russian territory. The Muslims of Turkestan would be roused to revolt against 'Holy Russia' and the Indian Muslims would be employed for that purpose.*

(रशियाची स्वारी व रशियाकडून होणारें आक्रमण या संबंधांतली भीति केवळ एकतर्फी नव्हती. उत्तरेकडून हिंदुस्थानवर होणाऱ्या स्वारीच्या भीतीमुळें ब्रिटिश राज्यकर्त्यांचा जीव धाकधूक होत असे. त्याप्रमाणेंच, झारच्या प्रधानमंडळालाहि असें भय वाटे कीं, हिंदुस्थानांतून मिळणाऱ्या चिथावणीमुळें मध्य आशियांतील मुसलमान बंड करून उठतील. अफगाणिस्थान हें केन्द्र कल्पून, तेथें सैन्य व दारूगोळा जमा करून, रशियन मुलुखावर चाल करून जाण्याचे बेत सुरू असल्याचें वृत्त या प्रधानांना गुप्त हेरखात्याकडून कळविलें जात होतें. तुर्कस्थानमधील मुसलमानांना 'पवित्र रशिया' विरुद्ध बंड पुकारण्याची चिथावणी मिळणार आणि त्या कामीं हिंदुस्थानांतील मुसलमानांचा उपयोग केला जाणार, असें त्यांना कळत होतें.)

हेरखात्याकडून प्रसृत करण्यांत येणाऱ्या गोष्टी स्वीकारतांना फार काळजी घ्यावी लागते हें खरें; पण रशियाचें हेरखातें रशियन सरकारलाच खोटी माहिती पुरवील हें तरी संभवनीय कसें मानावें? लष्करी धोरणाच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतल्या मुसलमानांना प्राप्त झालेलें हें महत्त्व लक्षांत घेतलें म्हणजे त्यांचे इतरहि बाबतींतले छंद पुरविले जावे हें क्रमप्राप्तच दिसतें. त्यांत त्यांच्या राजनिष्ठेची भर पडली! मग, मुसलमानांचें पारडें प्रत्येक

*The Challenge of the N. W. Frontier by *C. F. Andrews*.

बाबतींत जड व्हावें आणि सत्तासंक्रमणाचा (Transfer of Power) प्रसंग येणार असें दिसतांच त्यांनीं रुसून बसलेल्या विहिणीचा आव आणावा, यांत नवल काय?

१८९२ सालच्या कौन्सिलवाढीच्या कायद्यानें लोकांना अधिकार असे कांहींच दिले नाहींत. कॉंग्रेसच्या स्थापनेपासून सहा वर्षें चळवळ सुरू होती; व या अवधींत दोन वेळ इंग्लंडला शिष्टमंडळेंहि गेलीं होतीं. त्या मानानें पदरांत कांहींच पडलें नाहीं. हें खरें असलें तरी, वरिष्ठ कायदेमंडळाच्या व प्रमुख प्रांतांतल्या कायदेमंडळांच्या सभासदांची संख्या वाढली एवढी प्रगति झाली. लोकलबोर्डें व म्युनिसिपालिटचा यांच्यासारख्या स्थानिक स्वराज्यसंस्था, चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या व्यापारी हितसंबंधांचा विचार करणाऱ्या संस्था, विद्यापीठें अशा लोकसभांनीं ज्यांची शिफारस केली असेल त्या सभासदांची नेमणूक करण्याला सरकार तयार झालें. निवडणुकीच्या तत्त्वाला यापलीकडे स्थान देण्यांत आलें नाहीं. वार्षिक अंदाजपत्रकावर सर्वसामान्य चर्चा करण्याला मुभा मिळाली. पण अमुक खात्यांतला अमुक खर्च कमी करा असें ठरावाच्या रूपानें सांगण्याची सोय झाली नाहीं. प्रश्न विचारून माहिती मिळविण्याची शक्यता निर्माण झाली; पण, प्रश्नांच्या छापील उत्तरांत ज्या मेखा असतात त्यांचें दिग्दर्शन करण्याला उपयोगीं पडणारे पुरवणी प्रश्न विचारण्याला सवड देण्यांत आली नाहीं.

या कायद्यानें निवडणुकीचें तत्त्वच खऱ्या अर्थानें प्रस्थापित झालें नाहीं; त्यामुळें मतदारसंघांच्या स्वरूपाचा प्रश्नहि या वेळीं फारसा पुढें आला नाहीं. पण पडद्यामागें मात्र स्वतंत्र मतदारसंघांचा प्रश्न व त्याला अनुकूल अशी विचारसरणी सिद्ध करण्याचें काम चालू होतें. सर सय्यद अहमद या थोरणी गृहस्थांचे सतत चाललेले प्रयत्न मुसलमानांची दरबारी प्रतिष्ठा कशी वाढवीत होते याचें वर्णन करणारा पुढील उतारा मोठा सूचक आहे:

Sir Syed Ahmedkhan did all in his power to re-habilitate the reputation of the Moslems. He was bent upon reforming the Mohammedan educational system. He found it to be inadequate and out-of-date......Shortly before his death (1898), he combated Pan-Islamic sentiment excited by the Greco-Turkish war. He contributed

articles preaching loyalty to the British rulers of India even if they were compelled to pursue an unfriendly policy towards Turkey. He thus raised the status of his co-religionists in the estimation of the British rulers."*

(मुसलमानांची पत फिरून प्रस्थापित व्हावी म्हणून सर सय्यद अहमदखान यांनीं शक्य ते सर्व प्रयत्न केले. मुसलमानांची शिक्षणपद्धति अपुरी व मागसलेली असल्याचें लक्षांत आल्यामुळें ती सुधारण्याचा त्यांनीं निश्चय केला. ते १८९८ सालीं पैगंबरवासी झाले. ग्रीस व तुर्कस्थान यांच्या-मधील लढाईमुळें इस्लामच्या एकजुटीच्या भावना उद्दीपित होत होत्या. त्यांना त्यांनीं आपल्या मृत्युपूर्वीं आळा घातला. तुर्कस्थानला प्रतिकूल असें धोरण चालवावें लागलें तरी तें चालवूनहि, हिंदी मुसलमानांनीं ब्रिटिश राज्यकर्त्यांशीं राजनिष्ठ राहावें अशा आशयाचे प्रचारात्मक लेख त्यांनीं लिहिले. या मार्गांनीं त्यांनीं ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें आपल्या धर्म-बांधवांची योग्यता वाढविली.)

वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना इषारे देऊन हे सद्गृहस्थ आपल्या धर्म-बंधूंचें महत्त्व वाढविण्याची दक्षता कशी घेत असत याची साक्ष पुढील उताऱ्यावरून पटण्यासारखी आहे:

The Government was aware of the warnings of Sir Syed Ahmedkhan. He impressed upon the Government that if the agitation spread from the unwarlike (Hindu) to the warlike (Moslem) classes, it would go beyond writing and talking and would lead to blood-shed. If the Moslems joined the schemes of the congress, he warned that the Viceroy would realise that "a Mohammedan agitation was not the same as a Bengali agitation." The Government did not forget 1857 nor the need to conciliate the Moslems.†

(सर सय्यद अहमदखान यांनीं दिलेले इषारे सरकारच्या लक्षांत होते. पडखाऊवृत्तीच्या हिंदूंमधील चळवळीचें वारें लढाऊ वृत्तीच्या मुसलमानां-

*The Problem of Minorities by *K. B. Krishna*, p. 95.
†The Problem of Minorities, p. 108.

पर्यंत पोंचलें तर तें लिहिण्या–बोलण्याच्या मर्यादा ओलांडून पलीकडे जाईल आणि त्याचें पर्यवसान रक्तपातांत होईल हें म्हणणें त्यांनीं सरकारच्या मनावर ठसविलें. त्यांनीं व्हाइसरॉयला असा इषारा दिला कीं, मुसलमान कॉंग्रेसच्या योजनेंत सामील झाले तर, मुसलमानांची चळवळ म्हणजे बंगाली-बाबूंची चळवळ नव्हे, हें सरकारला कळून चुकेल! सरकारला १८५७च्या प्रसंगाचें विस्मरणहि झालें नव्हतें आणि मुसलमानांना संतुष्ट करण्याची गरजहि त्यांच्या स्मृतींतून गेलेली नव्हती ! )

सर सय्यद अहमदखान यांची पुण्याई हळुहळू कशी सफल होऊं लागली होती हें कळण्यासाठीं १८९२च्या कायद्यापूर्वीच्या कांहीं गोष्टी अभ्यासिल्या पाहिजेत. ६–११–१८८८ रोजीं विलायत सरकारकडे धाडण्यांत आलेल्या हिंदुस्थान सरकारच्या खलित्याला त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरिन यानीं स्वतःची म्हणून एक पत्रिका जोडली आहे. हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत धर्मभेद, आचारभेद, भाषाभेद वगैरेंचा बुजबुजाट कसा झालेला आहे याचें मोठें खुमासदार वर्णन त्यांनीं या पत्रिकेंत केलें आहे. १८९२च्या कायद्याची चर्चा पार्लमेंटमध्यें चालली असतां रिपन, नॉर्थब्रुक, ग्लॅडस्टन, टेंपल वगैरे वक्त्यांनीं या भेदांचा बाऊ करण्याला सोडलें नाहीं. डफरिनच्या जागीं आलेले गव्हर्नर जनरल लॉर्ड लॅन्सडाऊन यांच्यावर १८९२च्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग आला. कायद्यांत अंतर्भूत झालेलें औदार्य अंमलबजावणीचे नियम बनवितांना नाहींसें करून टाकण्याची विद्या या वेळीं उपयोगीं पडली आणि नियम करतांना जातिभेद व धर्मभेद यांच्यावर सडकून भर देण्यांत आला. १५–८–१८९२ रोजीं वरिष्ठ सरकारतर्फे प्रांतिक सरकारांना पत्रें धाडण्यांत आलीं. कायदेमंडळांच्या प्रतिनिधींना मान्यता देतांना कोणती दृष्टि ठेविली जावी याचें दिग्दर्शन या पत्रांत करण्यांत आलेलें आहे. प्रतिनिधित्व मिळण्याच्या योग्यतेचे व महत्त्वाचे म्हणून जे वर्ग वरिष्ठ सरकारनें सुचविले त्यांची संख्या नऊ असून, त्यांत हिंदूंच्या बरोबरीनें मुसलमान, बिनसरकारी युरोपियन व अँग्लोइंडियन, व्यापारी व कारखानदार, मळेवाले, मुंबई-कलकत्ता-मद्रास यांसारख्या शहरांतले नागरिक, मध्यम प्रतीच्या शहरांतले नागरिक, ग्रामीण वर्ग आणि धंदेवाईक व विद्याव्यवसायी वर्ग इतक्यांचा समावेश झालेला आहे.

# प्रकरण ४ थें

# मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास

## टप्पा दुसरा : १८९२ ते १९२०

**१८९२ चा** कौन्सिलसुधारणेचा कायदा व प्रांतांतून द्विदलराज्यपद्धतीचा प्रारंभ करणारा मॅांटफर्ड सुधारणांचा कायदा यांच्या दरम्यान जो पाव-शतकाचा अवधि लोटला त्यांतील महत्त्वाच्या घडामोडी आणि त्यांत मुसल-मानांच्या मागण्यांची झालेली वाढ यांचा विचार नीटपणीं करण्यासाठीं या कालखंडाचे कांहीं भाग पाडणें सोइस्कर होईल. कर्झनशाहीची सुरुवात होईपर्यंतच्या वर्षांचा एक खंड पडतो. कर्झनशहांच्या कारकीर्दीला स्वतंत्र खंड मानण्याइतकें महत्त्व देणें प्राप्त आहे. मोर्ले-मिंटो सुधारणांच्या वाटा-घाटींचा व अंमलबजावणीच्या सुरुवातीचा काळ स्वतंत्र खंड म्हणून विचारांत घेण्यासारखा आहे. महायुद्धकालीन घडामोडी, मॅांटफर्ड सुधारणांचा ऊहापोह आणि त्या सुधारणांची फलश्रुति या सर्वांचा मिळून विचार शेवटच्या कालखंडांत होण्यासारखा आहे.

कौन्सिलसुधारणेचा कायदा झाल्यानंतर पुढच्याच वर्षीं मुंबई शहरांत पहिला मोठा जातीय दंगा घडून आला. नाशिक जिल्ह्यांत येवलें मुक्कामीं याच वर्षीं झालेला दंगा वर्षभर धुमसत राहिला. धार्मिक भावना दुखविल्या जातात या काल्पनिक समजुतीनेंहि मुसलमान बेभान बनतात अशी सबब सांगणाऱ्या सरकारकडून हिंदूंच्या रास्त अधिकारांवर आक्रमण सुरू झालें. मुसलमानांच्या या नव्या वृत्तीची चर्चा सुरू झाली व हिंदुसमाजांत सुप्तावस्थेंत असलेल्या पराक्रमी वृत्तीची जोपासना करण्यासाठीं व हिंदु-समाजाला सुसंघटित करण्यासाठीं, लोकमान्य टिळकांनीं श्रीशिवाजी उत्सव सुरू केला. लवकरच या उत्सवाला देशव्यापी स्वरूप प्राप्त झालें.

एकतंत्री ब्रिटिश राज्यकारभारामुळें नवशिक्षित वर्ग चांगलाच असंतुष्ट होऊं लागला होता. या असंतोषाची लाट समाजांत खालवर पोंचविण्याचें

कार्य निसर्गानेंच केलें! वारंवार पडूं लागलेल्या दुष्काळांमुळें गरीब रयत कष्टी झाली व ती नव्या राज्यव्यवस्थेला नांवें ठेवूं लागली! इतक्यांत प्लेगच्या सांथीनें कहर उसळून दिला. तरणी–ताठीं माणसें तडकाफडकीं मरूं लागलीं! कर्ती माणसेंच दगावल्यामुळें कुटुंबेंच्या कुटुंबें हवालदील होऊं लागलीं! प्लेगप्रतिबंधक उपायांची अंमलबजावणी अशा कडक रीतीनें होऊं लागली कीं, या त्रासापेक्षां प्लेगनें मरण आलेलें पत्करलें, असें लोकांना वाटूं लागलें! या उपायांची अंमलबजावणी करणारा अधिकारी रँड फारच अप्रिय झाला! व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव-समारंभ २२ जून १८९७ रोजीं साजरा होणार आहे या गोष्टीचें टिपण साधून, प्रसिद्ध चाफेकर बंधूंपैकीं दामोदरपंत यांनीं पिस्तूल झाडून रँड व आयर्स्ट या साहेबांचा खून केला! राजकीय असंतोष प्रकट करण्याच्या या नव्या पद्धतीचे पडसाद हिंदुस्थानच्या सांदी-कोपऱ्यांतहि उमटले. इतकेंच नव्हे तर, ते सातासमुद्रापलीकडेहि जाऊन पोंचले!

चांदीच्या भावांतलीं अस्थिरता, चलनाबाबतचें सरकारचें धरसोडीचें धोरण, टांकसाळी बंद करून सरकारनें दाखविलेली अनास्था इत्यादि प्रकार याच सुमारास घडल्यामुळें व त्यांचे अनिष्ट परिणाम व्यापार व शेतकी या दोन्ही महत्त्वाच्या धंद्यांवर होऊं लागल्यामुळें, असंतोषाची कक्षा चांगलीच ऐसपैस वाढूं लागली. देशांत नव्यानें सुरू झालेल्या देशी कापडाच्या धंद्याला संरक्षण मिळालें तरच तो धंदा परदेशी कापडाशीं होणाऱ्या स्पर्धेत तग धरूं शकेल ही व्यापारी वर्गाची रास्त मागणीहि सरकारनें मानली नाहीं. असंतोष वाढण्याला हीहि गोष्ट कारणीभूत झाली. या सुमारास आफ्रिकेंत सुदानवर केलेल्या स्वारीचा खर्च इंग्लंडनें हिंदुस्थानवर लादला. याहि गोष्टीचा खूप बोभाटा झाला.

मुसलमानांच्या वाढत्या चढेलपणामुळें हिंदुसमाज त्यांच्या मोहरमासारख्या सणांत सामील होईनासा झाला व गणेशोत्सवासारखे सार्वजनिक उत्सव अखिल हिंदूंच्या संघटनेचें कार्य करूं लागले. मुसलमान समाजांतली दंडेली प्रसंगीं कोणत्या थरापर्यंत जात असे याचें उदाहरण म्हणून १८९४ सालीं पुण्यांत घडलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. वार्षिक वहिवाटीप्रमाणें श्री ज्ञानेश्वर-तुकाराम महाराजांच्या पालख्या शहरांतून मिरवत जात असतां,

मुसलमानांनीं लोकांच्या डोळ्यांदेखत जुनें खेटर व धोंडे पालखीवर मारले. १८९५ च्या पावसाळ्यांत धुळ्याच्या मुसलमानांनीं खुद्द सरकारी अंमलदारांशींच मारामारी केली ! इकडे हिंदुस्थानांत मुसलमान असे अनन्वित प्रकार करीत होते तर त्याच वेळीं इंग्लंडमध्यें तळ देऊन राहिलेले त्यांचे साहाय्यक तेथील लोकांना विपर्यस्त माहिती पुरवीत होते. मुसलमानांच्या असंतोषाची जबाबदारी चळवळ्या हिंदूंवरच आहे हा ग्रह इंग्लंडमध्यें प्रसरविला जात होता व या समजुतीच्या आहारीं गेलेले सर वुइल्यम हंटर 'लंडन टाइम्स'मध्यें मुसलमानांची तरफदारी करीत होते.*मुसलमानांची दंगेखोरपणाची वृत्ति नुसत्या मुंबई भागांतच नाचत होती असें नाहीं. पोरबंदर, कलकत्ता वगैरे ठिकाणींहि या वृत्तीचा स्फोट झाला होता. रँड-आयर्स्ट यांच्या खुनाच्या पुढच्याच वर्षीं मुसलमानांनीं मुंबईंत दंगा केला.

हिंदुस्थान सरकारचें लष्करी धोरण,आशिया खंडांतल्या ब्रिटिश वर्चस्वाला उत्पन्न होऊं पाहणारा जपान हा नवा प्रतिस्पर्धी, हिंदी लष्करांतलें मुसलमानांचें स्थान व बदलत्या परिस्थितीमुळें वाढत्या लष्कराची लागणारी जरुरी या सर्व गोष्टींचा मेळ घातला म्हणजे या कालखंडांत सरकारी धोरण मुसलमानांना खूष करण्याकडे कां कललेलें होतें याचा उलगडा उत्तम प्रकारें होतो. १८९५ सालीं चित्रळवरील मोहिमेंत चौदा हजार सैन्य गुंतवावें लागलें होतें. इराणच्या बाजूला रशियाच्या सूचक हालचाली चालत असल्याचा बोभाटा होताच! रशियाला पायबंद घालावयाचा म्हणजे वाढती लष्करी सिद्धता अपरिहार्यच होती. चीन–जपानचें युद्ध संपून त्यांत जपान विजयी झाल्यामुळें व जपानी राष्ट्र हें चीन–हिंदुस्थानप्रमाणें झोंपाळू नाहीं हें इंग्रजांना चांगलें माहीत झालें असल्यामुळें, या संभाव्य प्रतिस्पर्ध्याच्या भयानेंहि लष्करी सामर्थ्याकडे लक्ष देणें प्राप्तच होतें. आशियामधील साम्राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीनें लष्करी सामर्थ्याची वाढ करणें अवश्य असल्यामुळें, राजनिष्ठेबद्दल प्रसिद्धीस आलेल्या मुसलमानांना संतुष्ट ठेवणें हें इंग्रजांच्या दृष्टीनें क्रमप्राप्तच होतें. मुसलमानांच्या दांडगाईमळें अस्वस्थ झालेल्या हिंदूंनांच विशेषतः त्रासदायक

---

*लो० टिळकांचे केसरींतील लेख, राजकीय खंड पहिला, पराचा कावळा, लेखांक १–२.

झालेलें १५३–अ कलम १८९८ सालीं पीनल कोडमध्यें समाविष्ट करण्यांत आलें.

हिंदुस्थानची राजकारणी परिस्थिति अशा प्रकारची असतांना, १८९९ सालीं लॉर्ड कर्झन यांची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. आशियामधील साम्राज्यविषयक प्रश्न आपल्याला उत्तमच कळतात अशा तोऱ्यांत वागणाऱ्या या कट्टर साम्राज्यशाही मुत्सद्यानें पुढील ५–६ वर्षांत असा धुमाकूळ माजवून दिला कीं, टीकेचे शब्द अगदीं तोलूनजोखून वापरण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या कै० ना० गोखल्यांनाहि त्याची औरंगजेबाशीं तुलना करावी लागली. १९०५ सालीं बनारसला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गोखले यांनीं जें भाषण केलें त्यांत कर्झनशाहीच्या स्वरूपाचें व परिणामांचें मार्मिक वर्णन केलेलें आहे. गोखले म्हणाले :

How true it is that to everything there is an end! Thus, even the Viceroyalty of Lord Curzon has come to a close! For seven long years, all eyes had constantly to turn to one masterful figure in the land—now in admiration, now in astonishment, more often in anger and in pain, till at last it has become difficult to realize that a change has really come! For a parallel to such an administration we must, I think, go back to the times of Aurangzeb in the history of our own country.

(व्हाइसरॉय म्हणून कारभार करण्याची कर्झनची मुदत एकदांची संपली हें पाहिलें म्हणजे, भल्याबुऱ्या प्रत्येक गोष्टीला शेवट हा असतोच या सत्यावर विश्वास बसूं लागतो! सात संवत्सर म्हणजे कांहीं थोडा काळ नाहीं! या काळांत, कोटयवधि लोकांच्या या देशांत सगळ्यांचे डोळे सतत एकाच जबरदस्त व्यक्तीकडे वळलेले होते! या दृष्टींत कधीं कौतुकाचा भाव असे, कधीं विस्मयाचा भाव असे; पण, राग आणि दुःख हेच भाव फार वेळां असत! सात वर्षांच्या या संवयीचा परिणाम असा झाला आहे कीं, कारभारी पालटला हें सत्य मनाला पटणेंच दुस्तर झालें आहे! मला वाटतें कीं, अशा कारभाराची तुलनाच करावयाची तर आपल्याला आपल्या इतिहासांतल्या औरंगजेबाकडेच वळावें लागेल.)

शुद्ध वृत्तिनिरपेक्षपणानें (objectively) विचार केला तर, लॉर्ड कर्झननें योजलेल्या अगर केलेल्या सर्वच गोष्टींना आज नांवें ठेवितां येणारहि नाहींत ! पोलिसखात्याची पुनर्घटना करण्यासाठीं नेमण्यांत आलेलें कमिशन, प्लेग-प्रतिबंधक उपायांची चौकशी करण्यासाठीं नेमलेलें कमिशन, दुष्काळाच्या संकटाचा विचार करण्यासाठीं नेमलेलें कमिशन इत्यादि गोष्टी वाईटच होत्या असें नाहीं; पण, परकीय शासनसंस्थेकडून केल्या जाणाऱ्या गोष्टींचा विचार करतांना त्या गोष्टींमागें असलेल्या वृत्तीचाच विचार प्रजेकडून प्राधान्यें करून केला जातो. 'अमृतमपि विषम्' असा अनुभव यामुळें येतो. मग, जें विषच आहे तें प्रजेला किती जहरी वाटेल, हें काय सांगायला पाहिजे ? वाढत्या शिक्षणामुळें देशांत उद्भवलेल्या नव्या चैतन्याला भिऊन, कर्झननें विद्यापीठांच्या कारभारांत सरकारी होयबांचा शिरकाव करण्याचा प्रयत्न केला; त्याबरोबर लोकमत जास्तच खवळलें. स्थानिकस्वराज्यसंस्थांचे अधिकार संकुचित करण्याच्या कर्झनच्या प्रयत्नामुळेंहि असंतोष वाढीस लागला. या असंतोषामुळें, बंगालमध्यें गुप्त संघटना करण्यांत व क्रांति-प्रवण मनोवृत्ति निर्माण करण्यांत अरविंद बाबूंचे बंधु बारींद्रकुमार घोष यांना कसें यश आलें याची हकीकत सरकारी प्रतिवृत्तांतच देण्यांत आलेली आहे.* रँड-आयर्स्टचा खून होऊन त्या प्रकरणाचा निकाल झाला; तरी चाफेकर प्रकरण महाराष्ट्रांत धुमसतच होतें. चाफेकर बंधूंची माहिती सरकारला पुरविणाऱ्या द्रविड बंधूंचा १८९९ च्या फेब्रुवारींत खून झाला. या प्रकरणीं फरासखान्यांत चौकशी चालू असतां चाफेकर बंधूपैकीं धाकटे वासुदेवराव यांनीं आंगरख्यांत लपविलेलें सहाबारी पिस्तूल काढून फौजदार रामजी पांडु व ब्रुइनसाहेब यांजवर झाडलें. द्रविडबंधूंच्या खुनाचा पत्ता लागला; पण, झाडाच्या देठांतून देठ निघावे त्याप्रमाणें खुनांतून खून निघूं लागल्यामुळें, इंग्रजी पत्रें कटाच्या कल्पनेचे घोडे नाचवूं लागलीं. (केळकरकृत टिळकचरित्र : पूर्वार्ध : पृ. ६५६–६५७). मित्रमेळा वगैरे चळवळींच्या द्वारा नाशिक भागांत नवें चैतन्य निर्माण केल्यावर, सावरकर बंधूंपैकीं विनायकराव हे १९०१ सालीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें दाखल झाले होते. त्यांच्या प्रेरणेमुळें पुण्यांतल्या व पुण्याबाहेरील मराठी मुलखांतल्या

*Sedition Committee Report 1918, pp. 15–17.

तरुणांच्या वृत्तीला एक नवेंच वळण लागत होतें व सुशिक्षितांमधला असंतोष चौफेर पसरत होता.

सप्तजिव्ह अग्नीप्रमाणें हा अनेकजिव्ह असंतोषहि मोठा दाहक होता! पण, मुसलमानांना राजी राखलें म्हणजे हा असंतोष दडपून टाकितां येईल अशा घमेंडींत राहून, नोकरशाहीनें दडपशाहीचा अवलंब करण्याचें ठरविलें. मुसलमानांची मनधरणी करण्याचें सरकारी धोरण कोणत्या थरापर्यंत जाऊं शकतें याविषयींचीं या काळांतलीं कांहीं उदाहरणें नमूद करण्यासारखीं आहेत. विजयादशमीच्या दिवशीं नागपूरकर भोंसल्यांची स्वारी शहरांतून मिरवणुकीनें निघावयाची ही वहिवाट पुरातन असून, तिच्यावर कसला निर्बंध घातल्याचा दाखला १९०३ पर्यंत नव्हता. मशिदीपाशीं वाद्यें न वाजविण्याचा निर्बंध १९०३ सालीं घालण्यांत आल्यामुळें, त्या सालची मिरवणूक निषेध म्हणून बंदच ठेवली गेली! पूर्व बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर बॅम्फील्ड फुल्लर यांचें मुसलमानांना फूस देण्याचें धोरण स्पष्ट झाल्यामुळें त्या भागांत मुसलमानांची दंडेली हा एक मामुली विषय होऊन बसला. कै० सर सी० वाय० चिंतामणी यांनीं आपल्या ग्रंथांत * नमूद केलेलीं या प्रकाराचीं कांहीं उदाहरणें तर अशीं आहेत कीं, त्यांच्या खरेपणावर माणसाचा एकाएकीं विश्वासहि बसूं नये! खटल्यांतल्या साक्षीदारांचे हिंदु व मुसलमान असे वर्ग पाडावयाचे आणि मुसलमानांच्या म्हणण्यावर, ते मुसलमान आहेत एवढ्याचमुळें, जास्त विश्वास ठेवावयाचा असा प्रघात एका सेशन्स जज्जानें पाडला!

बंगालची फाळणी करण्याचा आपला निश्चय कर्झनसाहेबांनीं १९०५ च्या मध्याला जाहीर केला. त्यांचा हेतु चळवळ्या बंगाली हिंदूंचें बळ विभक्त करणें हा होता. केवळ कारभाराच्या सोईसाठीं कांहीं योजना आंखण्याचें त्यांच्या मनांत असतें तर विभागणीची पद्धत व वागण्याची पद्धत या दोहोंतहि त्यांना पुष्कळ फरक करतां आला असता. पूर्व बंगालचे जिल्हे व आसाम यांचे पाय एकत्र गुरफटविण्यांत हेतु असा होता कीं, पूर्व बंगालमधल्या बहुसंख्य मुसलमानांच्या संख्याबलाच्या मानानें त्या भागांतले हिंदु दुबळे ठरावे! बंगालच्या फाळणीमुळें—अर्थात् वंगभंगामुळें—जी चळवळ झाली ती राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासांत संस्मरणीय आहे. आजपर्यंत लोक नुसते स्वदेशीचा

*Indian Politics since the Mutiny, p. 57.

पुरस्कार करीत आणि स्वदेशी धंद्यांना सरकारनें संरक्षण द्यावें असें म्हणत. स्वदेशी धंद्यांना संरक्षण देण्याचा स्वाधीनचा मार्ग म्हणून बहिष्काराचा पुरस्कार होऊं लागला. नेभळेपणा व स्वाभिमानशून्यता यांपासून भावी पिढीची मुक्तता व्हावी यासाठीं राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था अस्तित्वांत येऊं लागल्या. Trumpet Voice of India (भारताची रणभेरी) या पदवीला पात्र ठरलेले सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं सारा देश हलवून सोडला. बिपिनचंद्र पाल यांनीं मद्रास प्रांतांत चळवळीची आग भडकविली. वातावरणांत कांहीं तरी नवी हवा खेळूं लागली आहे असें पंजाबमधील लोकांनाहि भासूं लागलें*

किचनेरशीं बेबनाव होऊन कर्झनशाहानीं १९०५ च्या ऑगस्टमध्यें राजीनामा दिला व त्यांच्या जागीं लॉर्ड मिंटो यांची नेमणूक झाली. याच सुमारास इंग्लंडमध्यें उदारमतवादी मंत्रिमंडळ अधिकारावर येऊन लॉर्ड मोर्ले यांची भारतमंत्रिपदावर नेमणूक झाली. सरकारचें धोरण व जनतेंतील चळवळ यांच्या मानानें काँग्रेसच्या धोरणांत बदल करण्याची भाषा सुरू झाली. पण, काँग्रेसमधल्या वजनदार व 'स्थितप्रज्ञ' मंडळींना ही भाषा रुचेना. १९०६च्या कलकत्ता काँग्रेसमध्येंच हे पक्षभेद व मतभेद वास्तविक विकोपास जावयाचे; पण, महर्षि दादाभाई नौरोजी यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यामुळें हा प्रसंग टळला. 'स्वराज्य' हें साध्य आणि राष्ट्रीय शिक्षण,स्वदेशी, बहिष्कार वगैरे साधनें या गोष्टी उघड बोलल्या जाऊं लागल्या. १९०७ च्या सुरत काँग्रेसमध्यें कलकत्ता येथील ठरावांच्या मानानें माघार घेतली जाईल, अशी भीति नव्या पक्षाला वाटूं लागली. नव्या जुन्या मंडळीं-मधले संबंध संशयग्रस्त मनोवृत्तीमुळें दुरावले होते आणि त्यामुळें सुरतच्या काँग्रेसमध्यें बखेडा माजला, तो स्वाभाविकपणेंच माजला.

जपानसारख्या टीचभर राष्ट्रानें १९०५ सालीं रशियाचा पराभव केला. या गोष्टीचा स्वातंत्र्येच्छु हिंदी लोकांच्या मनावर फार उत्साहवर्धक परिणाम झाला. बलशाली युरोपियन राष्ट्रांपुढें आशियांतल्या लोकांचें कांहीं चालत नाहीं या समजुतीला जपानच्या विजयामुळें धक्का बसला व आशियाच्या उत्कर्षाच्या आशांचें जपान हें एक केंद्र बनलें. अमेरिकेनें इंग्लंडची सत्ता

*Sedition Committee Report 1918, p. 141.

झुगारून दिली हा ऐतिहासिक प्रसंग जुना होता. ऑस्ट्रियाची सत्ता झुगारून देऊन इटलीनें स्वातंत्र्य मिळविलें तो प्रसंग त्या मानानें अलीकडचा ! हे सर्व प्रसंग पारखून हिंदी देशभक्त त्यांच्यापासून स्फूर्ति व बोध मिळवीत होते. जपानच्या विजयाचाहि त्यांनीं असाच उपयोग करून घेतला. रशियांतल्या झारशाहीला कंटाळलेल्या क्रांतिकारक देशभक्तांनीं कोणते उद्योग चालविले होते, इकडेहि या देशभक्तांचें लक्ष होतें.

पं० श्यामजी कृष्णवर्मा हे काठेवाडी गृहस्थ यापूर्वींच इंग्लंडमध्यें जाऊन राहिले होते. १९०५ सालीं त्यांनीं लंडनमध्यें इंडिया होमरूल सोसायटी काढली. 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' हें मासिक काढून त्यांनीं इंग्लिश लोकमत जागृत करण्याला सुरुवात केली. १९०५ च्या अखेरीस या गृहस्थांनीं असें जाहीर केलें कीं, युरोप-अमेरिका वगैरे देशांत जाऊन राजकीय चळवळ करण्याचें पूर्वशिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या सहा लायक तरुणांना छात्रवृत्त्या देण्याचा त्यांचा संकल्प आहे. पॅरिसमध्यें राहणारे राणा नांवाचे हिंदी गृहस्थहि पंडितजींच्या या संकल्पाशीं सहमत होते. सावरकर बंधूंपैकीं विनायकराव यांनीं या छात्रवृत्त्यांपैकीं एक छात्रवृत्ति मिळविली व १९०६ सालीं जून महिन्यांत ते इंग्लंडला गेले. हिंदुस्थानचें भवितव्य ज्या लोकांच्या हातीं गेलें आहे त्या इंग्रजांच्या घरांतच हिंदी चळवळ घुसण्याची सोय अशा रीतीनें झाली.

वंगभंगाच्या चळवळीमुळें झालेल्या जागृतीचा फायदा घेऊन बारींद्रकुमार घोष यांनीं बंगालभर क्रांतिप्रवण मनोवृत्तीच्या गुप्त संस्थांचें जाळें पसरून ठेविलें होतें. १९०७ च्या सुरुवातीला पंजाबमध्यें पुष्कळच अस्वस्थता उत्पन्न झाली होती. लाहोर-रावळपिंडी वगैरे कांहीं ठिकाणीं दंगेधोपे झाले व कांहीं प्रसंगीं युरोपियन अधिकाऱ्यांचा उपमर्दहि करण्यांत आला. या गोष्टींमुळें गोंधळून जाऊन सरकारनें लाला लजपतराय व अजितसिंह यांना हद्दपार केलें. ही गोष्ट नेमस्तांनाहि रुचली नाहीं. सरकारच्या या बेजबाबदारपणामुळें साऱ्या देशाला धक्का बसला आहे हें त्यांनीं ओळखिलें व लालाजींच्या मुक्ततेविषयींचे प्रयत्नहि त्यांनीं सुरू केले.*पण, सर्वच लोकांची प्रवृत्ति

*Life of Gopal Krishna Gokhale by the Rt. Hon. *V. S. Srinivasa Sastri*, p. 56.

अशा सीध्या पद्धतीनें प्रयत्न करण्याची नव्हती. परदेशांत राहणारे क्रांतिवादी व हिंदुस्थानांतील क्रांतिवादी यांचें दळणवळण सुरू होऊन राजकीय प्रचाराचीं नवीं तंत्रें व साधनें हिंदुस्थानपर्यंत पोंचूं लागलीं होतीं. १९०७ च्या शेवटीं ॲलन नांवाच्या बंगालमधल्या सरकारी अधिकाऱ्यावर गोळी झाडण्यांत आली. ३०–४–१९०८ रोजीं खुदीराम बोस या तरुणानें उडविलेल्या बॅांबमुळें, मिसेस केनेडी व त्यांची मुलगी अशा दोन स्त्रिया मरण पावल्या. मुझफरपूरचे न्यायाधीश मि० किंग्जफोर्ड यांच्यावर खुदीरामचा रोख होता; पण, योगायोगानें या स्त्रियाच मृत्युमुखीं पडल्या! या प्रकारानंतर तपासाचीं चक्रें खूप जोरानें फिरूं लागलीं व 'माणिकतोळा बाग प्रकरण' या नांवानें प्रसिद्ध असलेला कटच्या कट उघडकीस आला. लालाजी-प्रभृतींना नुसत्या संशयावरून हद्दपार केलें; मग, या कटवाल्यांना काय शिक्षा झाल्या असतील हें काय सांगायला पाहिजे? या बॅांब प्रकरणांतील लेखांमुळें लोकमान्य टिळकांना सहा वर्षें काळ्यापाण्याची शिक्षा सांगण्यांत आली व काळकर्ते प्रा० शिवरामपंत परांजपे यांना याच प्रकारच्या लेखांबद्दल १९ महिने सक्तमजुरीची शिक्षा सांगण्यांत आली. सावरकर बंधूंपैकीं वडील बंधु गणेशपंत यांनीं प्रसिद्ध केलेल्या कांहीं कवितांचें निमित्त करून सरकारनें त्यांना ९–६–१९०९ रोजीं जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा सांगितली. जागृत झालेले देशभक्त अशा दडपशाहीनें दबत नाहींत हें जगाला पटवून देण्यासाठींच कीं काय, या शिक्षासत्राच्या मागोमाग, मदन लाल धिंग्रा यांनीं खुद्द लंडनमध्यें कर्झन वायलीवर पिस्तूल झाडून त्याचा खून केला. २१–१२–१९०९ रोजीं नाशिकच्या विजयानंद नाटकगृहांत कलेक्टर जॅक्सन यांचा खून अनंत कान्हेरे यांनीं केला!

हिंदु देशभक्तांनीं सत्तासंपादनासाठीं व देशविमोचनासाठीं जे विविध प्रकारचे प्रयत्न चालविले होते ते सगळेच सर्वांना पटतील असें नाहीं. निराशेच्या पोटीं जन्मलेली धडपड असेंच या प्रयत्नांना कोणीं म्हटलें तरी इतिहास म्हणून त्यांचें महत्त्व कमी मानतां येणार नाहीं. या विविध प्रकारांपैकीं कोणत्याच प्रकारांत मुसलमान मनोभावें सामील झाले नव्हते, हें मात्र खरें. अरेरावी कारभारामुळें सगळा देश कर्झनसाहेबांना दूषणें देत होता; तर अलीगड कॉलेजचे मुसलमान व्यवस्थापक कर्झनसाहेबांना मानपत्र देण्यांत

पुरुषार्थ मानीत होते.* वंगभंगामुळें निर्माण झालेला असंतोष ब्रिटिश मालावरील बहिष्काराच्या रूपानें व्यक्त होत होता तर या बहिष्काराची चळवळ बारगळावी म्हणून बंगालमधील मुसलमान दंगेधोपे करण्यांत गढून गेलेले होते.† प्रचंड चळवळ चालू झाली आहे व सरकारकडून दडपशाहीचें धोरणहि अवलंबिलें जात आहे; त्या अर्थी सरकारच्या घट्ट मुठींतून कांहीं तरी अधिकार आतां लौकरच सुटणार हें त्यांनीं हेरलें होतें ! या अधिकारांत आपला जातीय हात जास्तींत जास्त घुसवून आपलें महत्त्व कसें वाढवावयाचें इकडे मात्र मुसलमानांचें पूर्ण लक्ष होतें. आगाखान, अमीरअल्ली वगैरे मुसलमान पुढारी लवकरच इंग्लंडमध्यें गेले व तेथें तळ देऊन बसले. हे पुढारी आपलें घोडें पुढें दामटण्यांत किती कुशल असत हें एका प्रसंगाच्या हकीकतीवरून लक्षांत येण्यासारखें आहे. या वेळचा सुधारणा कायदा घडवितांना मोर्लेसाहेबांनीं कै० ना० गोखले यांच्याशीं विचारविनिमय केला होता, ही गोष्ट खरी आहे. या गोष्टीचा विपर्यास करून मुसलमान पुढाऱ्यांनीं उमराव सभेंतल्या (House of Lords) प्रतिष्ठितांचे कान फुंकले ! मोर्लेसाहेबांनीं या सभेंत सुधारणांची रूपरेषा विशद केली, त्याबरोबर समोरच्या उमरावांकडून त्यांच्यावर टीकेची झोड सुरू झाली. संकल्पित सुधारणा भयंकर क्रांतिकारक स्वरूपाच्या आहेत हा आक्रोश तर सगळयांनीं केलाच. पण, सगळयांच्या पोटांतला खरा राग असा होता कीं, एका धूर्त दक्षिणी हिंदूच्या दुष्ट प्रभावामुळें या सुधारणांचा जन्म होत आहे ! मुसलमानांना तळहातावरच्या फोडाप्रमाणें संभाळण्याची आपण इतकी शिकस्त करतों तरी आपल्यावर असा भडिमार होतो हें पाहून मोर्लेसाहेबांना सहजच दुःख वाटलें व त्यांनीं समोरच्या शिष्टांना सांगितलें:

I have consulted Mohammedans as well and these are the results of the talks I have had.§

(मीं मुसलमानांचाहि विचार घेतला आहे आणि सुधारणांची योजना ही त्या विचारविनिमयांतून निर्माण झालेली आहे).

---

*लो० टिळकांचे राजकीय लेख, खंड २, पृ० २३३.

†Sedition Committee Report 1918, p. 19.

§Life of Gokhale by the Rt. Hon. *Sastri*, p. 64.

नव्या सुधारणा येणार या गोष्टीची कुजबूज १९०६ पासूनच ऐकूं येऊं लागली होती. १ ऑक्टोबर १९०६ रोजीं आगाखानप्रभृति मुसलमानांचें शिष्ट मंडळ लॉर्ड मिंटो यांना सिमल्यास जाऊन भेटलें व त्यांनीं मुसलमानांसाठीं स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली.* रिस्लेप्रभृति विघ्नसंतोषी सरकारी अधिकारीच या शिष्टमंडळाची कळ फिरविणारे नारद होते असा बोभाटा त्या वेळीं झालेला होता. मिंटोनें सरकारतर्फे मुसलमानांची ही मागणी मान्यहि करून टाकली ! सुधारणा मिळणार म्हणजे नेमकें मिळणार तरी काय याची कल्पनाहि अद्याप स्पष्ट झाली नव्हती. तोंच मुसलमानांना हें आश्वासन मिळूनहि गेलें ! याच सुमारास लीग ही संस्था स्थापन झाली. ब्रिटिश सरकारबद्दलची राजनिष्ठा वाढीस लावणें व मुसलमानांच्या गरजा व आकांक्षा सौम्य भाषेंत सरकारपुढें ठेवणें हे लीगचे प्रमुख उद्देश होते.

आगामी सुधारणांचीं चक्रें १९०७ च्या ऑगस्टमध्यें हिंदुस्थानमध्यें प्रथम फिरूं लागलीं. हिंदुस्थान सरकारचे होम सेक्रेटरी सर हॅरोल्ड स्टुअर्ट यांच्या सहीचें एक पत्रक प्रांतिक सरकारांकडे अभिप्रायासाठीं धाडण्यांत आलें. जुन्या कौन्सिलांत लोकलबोर्डांतर्फे वगैरे जे लोक आले होते त्यांत वकील-बॅरिस्टरांचा फार मोठा भरणा होता,ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत सलत होती. बडे जमीनदार, नामांकित लक्ष्मीपुत्र अशांचे स्वतंत्र मतदारसंघ निर्मून व मुसलमानांनाहि स्वतंत्र मतदारसंघ देऊन सुशिक्षित वर्गाचें महत्त्व कमी करण्याची या अधिकाऱ्यांची धडपड चालू होती. पण ही योजना फारच आक्षेपार्ह व अपायकारक वाटल्यानें, मोर्लेनें ती मान्य केली नाहीं. १९०८ च्या डिसेंबर महिन्यांत मोर्लेनें सुधारणांच्या स्वरूपाबद्दलचें

*मुसलमानांचें राजकीय महत्त्व ( Political importance ) आणि देशसंरक्षणाच्या कामीं त्यांची होणारी मदत ( Contribution to Imperial Defence) हे मुद्दे लक्षांत घेऊन सरकारनें मुसलमानांच्या संख्येच्या मानानें अधिक प्रतिनिधि त्यांना द्यावे अशी मागणी या शिष्टमंडळानें केली होती. दलितवर्ग व वन्यजाति यांच्या संख्येचा अंतर्भाव हिंदूंबरोबर केला जातो व त्यामुळें हिंदूंच्या मानानें मुसलमानांचें संख्याबल कमी दिसतें अशीहि तक्रार करण्याला हें शिष्टमंडळ चुकलें नाहीं. (Report of the Indian Statutory Commission. Vol. I, Survey, pp. 183–84.)

आपलें मत हिंदुस्थान सरकारला कळविलें. स्वतंत्र मतदारसंघांमुळें राष्ट्रीयत्वाची होणारी हानि टळावी म्हणून मुसलमानांना संयुक्त मतदारसंघांत जागा राखून ठेवण्याची सूचना मोर्ले यांजकडून करण्यांत आली. पण, हिंदुस्थान सरकारच्या सेक्रेटरिएटमधल्या मिरासदार सनदी नोकरांनीं मोर्लेसाहेबांच्या या सूचनेला सुरुंग लावण्याचें ठरविलें. सर हरबर्ट रिस्ले प्रभृतींनीं मुसलमानांच्या नाकांत काडचा घातल्या व त्यांना मोर्लेच्या सूचनेविरुद्ध खूप चळवळ करावयाला लाविलें. मोर्लेसाहेब भलतेंच कांहीं तरी करून टाकतील तें टळावें म्हणून आगाखान व अमीरअल्ली ही जोडी विलायतेस रवाना झाली.* संयुक्त मतदारसंघ मुसलमानांना मान्य नाहींत हें दर्शविण्यासाठीं तशा अर्थाच्या पत्रकावर खूप सह्या घेण्याचें काम सुरू करण्यांत आलें.

मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ मान्य करण्याला मोर्ले यांचा तत्त्वतः तीव्र विरोध असला पाहिजे हें अलीकडे प्रसिद्ध झालेलीं कागदपत्रें, चरित्रें इत्यादींवरून उघड होत आहे. ६–१२–१९०९ रोजीं गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांना लिहिलेल्या पत्रांत मोर्लेसाहेबांनीं पुढील उद्गार काढले आहेत :

I won't follow you again into our Mahomedan dispute. Only I respectfully remind you once more that it was your early speech about their extra claims that first started the Moslem hare.†

(मुसलमानांच्या विषयींच्या वादग्रस्त प्रश्नांत आपल्या मागोमाग फरपटत येण्याची माझी इच्छा नाहीं. पण, मी तुम्हांला नम्रतापूर्वक फिरून आठवण करून देतों कीं, मुसलमानांच्या जादा अधिकारांना मान्यता देणारें भाषण प्रारंभींच करून तुम्ही त्यांना निष्कारण चालना दिलीत.) हिंदुस्थानांतली नोकरशाही किती मुसलमानधार्जिणी बनली असेल व आगाखान-अमीरअल्ली प्रभृतींच्या जादूच्या खेळामुळें पार्लमेंटच्या सभासदांवरहि किती मोहनी पडली

*Morley's Recollections, Vol. II, p. 325.

†२७–१–१९०९ रोजीं मि. अमीरअल्ली प्रभृति मंडळी मोर्लेसाहेबांना भेटली. मुसलमानांचें राजकीय व लष्करी महत्त्व यांना साजेल असें प्रतिनिधित्व अशी '.समाधानकारक प्रतिनिधित्व ' या शब्दप्रयोगाची फोड त्यांनीं केली. Indian Statutory Commission, Vol. I, Survey, p. 186.

असेल याची कांहीं कल्पना ने० ना० शास्त्री यांच्या एका कथितावरून होऊं शकते. मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ मान्य करणार नसाल तर सुधारणा देण्याची भाषाच बंद करा असें मोर्लेसाहेबांना बजावण्यांत आलें असावें. ने० ना० शास्त्री लिहितात :

Lord Morley, unable to resist the pressure put upon him was faced with the necessity either of introducing the reforms with this principle of separate electorates, disfiguring and taking away from their worth or giving up the whole show. Now, like a man of compromise, the doctrinaire and honest John surrendered his principle.*

(मोर्लेसाहेबांवर विलक्षण दडपण टाकण्यांत आलें व त्याला पुरून उरण्याची शक्यता त्यांना दिसेना. सुधारणा योजनेला छिन्नभिन्न व निःसत्त्व करून टाकणारे स्वतंत्र मतदारसंघ मान्य करून ती योजना मांडा, नाहीं तर सगळी योजनाच फेंकून द्या असें बजावण्यांत आल्यामुळें, मोर्लेसाहेबांवर बिनतोड प्रसंग आला ! जॉन मोर्ले हा भला माणूस; एरवीं तत्त्वाला मोठा ताठर; पण, राजकारणांतली तडजोड म्हणून त्यानें या प्रसंगीं तत्त्व गुंडाळून ठेविलें).

स्वतंत्र मतदारसंघ अर्थात् मुसलमानांचे जातवार मतदारसंघ कै० ना० गोखले यांना मान्य होते कीं काय, मोर्ले-मिंटो सुधारणांतल्या या विषबीजाला त्यांचा आशीर्वाद मिळाला होता कीं काय या प्रश्नाची चर्चा महत्त्वाची आहे. हें विषबीज नष्ट होत नाहीं हें दिसूं लागल्यावर गोखले यांनीं नाइलाज म्हणून त्याच्यापुढें मान वांकविली असली तरी, त्यांची त्याला तात्त्विक मान्यता मुळींच नव्हती. ज्या घातकी तत्त्वाला मोर्लेची देखील तत्त्वतः मान्यता नव्हती त्याला गोखले कशी संमति देतील ? ही ब्याद टळत नाहीं असें दिसल्यावर त्यांनीं ती सहन केली असेल ! मोर्ले-मिंटो सुधारणांच्या घडणीसाठीं त्यांनीं इतके परिश्रम घेतले होते कीं, 'स्वतोक पितरां रुचे, जरिहि कर्दमीं रांगलें' या न्यायानें, सुधारणांबरोबर या जातवारीचा मळहि त्यांनीं आपद्धर्म म्हणून मान्य केला असेल. पण, हा मळ राजकारणांत शिरूं नये

*Life of Gokhale by the Rt. Hon. *Srinivas Sastri*, p. 106.

म्हणून त्यांनीं फार खटपट केली. स्वतंत्र मतदारसंघाचे दुष्परिणाम शक्य तोंवर कमी व्हावे या हेतूनें त्यांनीं एक विधायक योजनाहि मांडली होती. लोकसंख्येच्या प्रमाणांत मुसलमानांना न्यायतः किती जागा मिळाल्या पाहिजेत हें प्रथम ठरवावें, ही संख्या ठरल्यावर निवडणुकी करावयाच्या त्या प्रादेशिक, सर्वसामान्य मतदारसंघांतर्फें कराव्या, या निवडणुकींत मतें देणारे मतदार जसे हिंदु-मुसलमान सगळे असावयाचे त्याप्रमाणेंच उमेदवारहि सगळ्या जातीजमातींचे असावे, निवडणुकीचा निकाल झाला कीं या पद्धतीनें मसलमान किती निवडून आले आहेत हें पहावें आणि मुसलमानांच्या ठरलेल्या संख्येच्या मानानें ही संख्या कमी भरली तर, संख्याभरपाईसाठीं जी नवी निवडणूक होईल ती मात्र मुसलमान उमेदवार व मुसलमानच मतदार या पद्धतीनें व्हावी–अशा कांहीं तरी तपशिलाची एक योजना ना०गोखले यांनीं त्या वेळीं प्रचारिली होती.* गोखले यांना स्वतंत्र मतदारसंघ संमत नव्हते; लोक-संख्येच्या प्रमाणांत मिळणाऱ्या जागांपलीकडे मुसलमानांना कांहींहि देण्याचें कारण नाहीं असें त्यांचें मत होतें, इत्यादि गोष्टी ने० ना० शास्त्री यांच्या लिहिण्यावरून स्पष्ट ठरत आहेत.

> स्वतःला गोखल्यांचे शिष्य म्हणविणाऱ्या गांधीजींनीं आपल्या गुरूनें स्वतंत्र मतदारसंघ मान्य करून चूक केली असें एका परक्या स्त्रीसमोर हंसत हंसत मान्य करावें ही गोष्ट, हा पुरावा पुढें असल्यामुळें, मोठी उद्वेगजनक वाटते. पण, गांधीजींनीं आपल्या गुरूला बाधक ठरणारी ही कबुली गुरूची स्तुति करतां करतां दिली, याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं.

गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले तेव्हां त्यांची व मेरी मिंटो यांची भेट झाली. त्या प्रसंगींचा एक संवाद मेरी मिंटो यांनीं आपल्या जर्नलमध्यें दिला आहे. तो संवाद असा :

**मेरी मिंटो :**—गांधीजी, तुमचे पुढारी व तुमच्या आधींचे नेते गोखले यांनींच स्वतंत्र मतदारसंघाची योजना सुचविली होती, हें तुम्ही विसरून गेलांत वाटतें !

---

*Life of Gokhale by the Rt. Hon. *Srinivas Sastri*, p. 107.

**गांधीजी** (हंसत हंसत) :—गोखले भले गृहस्थ होते ! पण, चांगलीं माणसें सुद्धां चुका करूं शकतातच ! *

मोर्ले-मिंटो सुधारणांच्या योजनेला १९०९ सालीं कायद्याचें रूप आलें. या कायद्यामुळें प्रांतिक कायदेमंडळांतून बिनसरकारी सभासदांचें बहुमत झालें. अंदाजपत्रकावर करावयाच्या चर्चेची कक्षा वाढली. पुरवणी प्रश्न विचारण्याची सभासदांना परवानगी मिळाली. बिनसरकारी सभासदांना महत्त्वाच्या विषयावर ठराव मांडण्याची व त्या ठरावांवर मतनोंदणी मागण्याची सवड देण्यांत आली. वरिष्ठ कायदेकौन्सिलच्या कामाचें स्वरूपहि अशाच धर्तीवर सुधारलें आणि त्या कौन्सिलच्या सभासदांची एकूण संख्या ६० पर्यंत वाढली. याच सुमारास विलायतेंतल्या इंडिया कौन्सिलवर दोन हिंदी सभासद घेण्यांत आले. वरिष्ठ सरकारच्या कारभारी मंडळांत व प्रमुख प्रांतांच्या कारभारी मंडळांतहि एकेक हिंदी सभासद घेण्याची पद्धत सुरू झाली. मुसलमानांना आपले प्रतिनिधि निवडून देण्यासाठीं स्वतंत्र मतदारसंघ मिळाले; शिवाय, सर्वसाधारण मतदारसंघांत मत देण्याचा त्यांचा अधिकार अबाधितच राहिला. पंजाबमधील मुसलमानांना विशेष संरक्षणाची जरूरी नाहीं, असें ठरलें. वरिष्ठ कायदेमंडळाच्या सभासदांत जातीय मतदारसंघांतून ५ प्रतिनिधि जावे असें ठरलें. मद्रास व आसामच्या कायदेमंडळांत अशा रीतीनें प्रत्येकीं २ प्रतिनिधि जावे, मुंबई, बिहार-ओरिसा व संयुक्तप्रांत येथील कायदेमंडळांत प्रत्येकीं ४ प्रतिनिधि जावे व बंगालच्या कायदेमंडळांत ५ प्रतिनिधि जावे असें ठरलें.†

नव्या सुधारणा अंमलांत येण्यापूर्वींच काँग्रेसची चळवळ थंडावली ोती. सु तेच्या फाटाफुटीनंतर लौकरच जहाल पुढाऱ्यांना दडपशाहीचा प्रसाद मिळाला.

> नेमस्तांच्या अपेक्षा पदरांत पडून राष्ट्रीय राजकारणाची प्रगति व्हावयाची तर त्या प्रगतीसाठींसुद्धां, देशांत झणझणीत राजकारणाचा एक प्रवाह सुरूच राहावा लागतो. तो प्रवाह

---

**Mary Minto*, Journal of October, 1932.

†Report of the Indian Statutory Commission, Vol. I, Survey, p. 186.

मंदावल्यामुळें, यापुढील कांहीं वर्षे राजकारण फारच घरंगळल्यासारखें झालें.

नव्या सुधारणांनीं लोकमत संतुष्ट झालें नव्हतें हें जगाला कळवावें म्हणूनच कीं काय, कांहीं दहशतवादी लोकांनीं आपले उद्योग चालू ठेविले होते. १९०९ च्या अखेरीस लॉर्ड मिंटो अहमदाबादेस गेले असतां, त्यांच्या गाडीवर बॉंब फेंकण्याचा प्रयत्न झाला. नाशिक कटांतील आरोपींवरचे खटले, विनायकराव सावरकरांचें प्रकरण, बंगालमधील अत्याचार व कटवाल्यांवरील खटले, मद्रास भागांत व्ही० व्ही० एस्० आयर यांनीं चालविलेली संघटना व तिनेवेल्लीच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचा खून इत्यादि प्रकारहि वातावरणांत प्रक्षोभ उत्पन्न करीत होते. १९११च्या दिल्ली दरबारनें लोकांची मनें कांहीं वेळ आकृष्ट करून घेतलीं व बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा या प्रसंगीं करण्यांत आल्यामुळें, लोकमतावर थोडा अनुकूल परिणाम झाला. पण, हा परिणाम तात्पुरताच होता; कारण, १९१२च्या अखेरीस दिल्ली शहरांत खुद्द व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांच्यावर बॉंब टाकण्यांत आला. या अपेशी प्रयत्नांतून निर्माण झालेलें कटाचें लफडें पुढें पुष्कळच दिवस टिकलें. देशांतल्या राजकारणी कर्तृत्वाला आलेला निराशाजनक सुस्तपणा परमावधीला पोंचला होता. लोकमान्य टिळक मंडालेहून मुक्त होऊन परत आले. १९१४ चें महायुद्ध सुरू झालें.

भोंवतालची परिस्थिति टिळकांना कशी भासली याचें वर्णन त्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' महाराष्ट्राला पुरविणारे श्री०स०वि० बापट यांनीं त्यांच्याच शब्दांत दिलें आहे. आपल्या नव्या सावधपणाच्या धोरणाला नांवें ठेवणाऱ्या स्नेह्यांना उद्देशून टिळक म्हणाले : "माझ्या पश्चात् सहा वर्षांत जर सर्व मृतवत् झालें नसतें, कांहीं तयारी केली असती तर हा प्रसंग माझ्यावर कां येता ? सहा वर्षांत यांनीं कांहीं कामगिरी करून दाखविली असती तर, हल्लींच्या लढाईचा योग्य फायदा घेऊन, कोणाची वाट न पाहतां, हातांत बंडाचें निशाण घेऊन मीच पुढें झालों असतों !"*

*लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड १, भाग १, पृ० २२८

मोर्ले-मिंटो सुधारणांच्या निमित्तानें मुसलमानांनीं जी आग्रही वृत्ति धरली ती प्रभावशाली ठरल्यामुळें, लष्करी व मुलकी नोकऱ्या, प्रातिनिधिक संस्थांतली वजनदारी व वतनदारी इत्यादि बाबतींत मुसलमानांना विश्वास वाटूं लागला. त्याबरोबर भोंवतालच्या जगांतल्या घडामोडींकडे नव्या दृष्टीनें पाहण्याची इच्छा त्यांना साहजिकपणेंच होऊं लागली. इराण, अरबस्थान हे छोटेखानी मुसलमानी देश रशिया-इंग्लंड वगैरे जबरदस्त देशांच्या बुद्धिबळाच्या पटावरील प्याद्यांसारखे खेळविले जात आहेत, तुर्कस्थानवर संकट आलें तर इंग्लंडनें त्याला मदत करावयाची कीं काय हा प्रश्न इंग्लंडच्या सोईसवडीनुसार सुटत असतो, इत्यादि गोष्टी समजायला अगदीं साध्या आहेत. मुसलमानांना त्यांचें आकलन आतां होऊं लागलें. क्रिमियन युद्धापासूनच हिंदी मुसलमानांचा तुर्कस्थानविषयक आपलेपणा व्यक्त होऊं लागला होता. प्रवासाचीं व दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें, उत्तर हिंदुस्थानांतल्या मुसलमानांचें बाहेरच्या जगाकडे—विशेषतः बाहेरच्या इस्लामी जगाकडे—अधिकाधिक लक्ष लागत चाललें होतें. ब्रिटिश साम्राज्याचीं धोरणें बदललीं नाहींत तर आशिया व युरोप या दोन खंडांतल्या मुसलमानांचा दर्जा हीन ठरेल अशी भीति कांहीं लोकांकडून व्यक्त केली जात होती.* या सर्व प्रदेशांतल्या मुसलमानांच्या आशाआकांक्षा कांहीं बाबतींत सारख्याच धोरणानें खेळत असतात हें दूरदर्शीपणानें हेरणाऱ्या लो० टिळकांसारख्या अव्वल दर्जाच्या मुत्सद्यानें १९०३ सालींच असें भविष्य वर्तविलें होतें कीं, अफगाणिस्थानपासून तुर्कस्थानपर्यंत जीं महंमदानुयायी राष्ट्रें आहेत त्यांचें ऐक्य कधींकाळीं होणें असंभवनीय नाहीं.†

नुसत्या धार्मिक दृष्टीनें का होईना, हिंदी मुसलमानांनीं जगाच्या वाढत्या गुंतागुंतीकडे पाहण्याला सुरुवात केली; त्याबरोबर, हिंदी सरकार व ब्रिटिश सरकार यांची मनधरणी करून नोकऱ्यांचें व मानमान्यतेचें तूप आपल्याच रोटीवर ओढून घेण्यापलीकडे कांहींतरी केलें पाहिजे, हें त्यांच्यापैकीं कांहीं जणांना कळूं लागलें. बंगालची फाळणी १९११ सालीं रद्द होऊन, हिंदूंची चळवळ यशस्वी झाली असा त्यांचा ग्रह झाला होता. १९१३

*Sedition Committee Report, 1918, p. 173.

†लो० टिळकांचे केसरींतील लेख, राजकीय खंड २, पृ० ४४०.

सालीं मुस्लीमलीगनें साम्राज्यांतर्गत स्वराज्याला ध्येय म्हणून मान्यता दिली. त्याबरोबर जुन्या जमान्यांतल्या लीगपुढाऱ्यांना असें वाटलें कीं, ठरलेल्या धोरणांत निष्कारण बदल होत असून, हिंदुस्थानांत 'अल्पसंख्य वर्ग' म्हणून वागणाऱ्या मुसलमानांच्या हिताला हा बदल बाधक ठरेल. काँग्रेसच्या ध्येयाशीं लीगच्या ध्येयाचें बऱ्याच अंशीं साधर्म्य होणार हें दिसूं लागल्यावर थोड्याच काळांत, आगाखानांनीं लीगच्या अध्यक्षपदाचें त्यागपत्र दिलें.* सभोंवार पसरलेल्या दाट निराशेंतहि लो० टिळकांना जीं थोडीं आशास्थानें दिसलीं त्यांत कांहीं मुसलमानांच्या वृत्तींत झालेला हा पालट हें एक आशास्थान होतें, ही गोष्ट लोकमान्यांचें चरित्र इंग्रजी भाषेंत लिहिणारे श्री० आठल्ये यांनीं नमूद करून ठेविली आहे.†

युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन देशाची राजकीय प्रगति पदरांत पाडून घेण्याची पूर्वतयारी टिळकांना हिंदुस्थानांत दिसली नाहीं; पण, अशी कांहीं अर्धीबोबडी, वेडीवांकडी तयारी युरोप-अमेरिकेंतल्या क्रांतिकारकांनीं केली असली पाहिजे, असें दिसतें. १९०९च्या सुमारास बॅ० विनायकराव सावरकर हेच लंडनमधील इंडिया हाऊसमधल्या मंडळींचे सर्वमान्य पुढारी ठरले होते.§ त्यांना अटक झाली तत्पूर्वीच क्रांतिकारक पक्षाच्या कार्याचें जाळें फरान्स, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांपर्यंत पोंचलें होतें. लाला हरदयाळ यांनीं १९११ सालापासून अमेरिकेंत बरीच जागृति केली होती. अमेरिकेंतून येणाऱ्या मॅव्हेरिक वगैरे बोटींतून जर्मनीकडून शस्त्रपुरवठा केला जाईल त्याचा बँकॉक, बटेव्हिया इत्यादि केंद्रांमार्फत उपयोग करून घेण्याचा कट बराच गुंतागुंतीचा होता. कोमागाटामारू प्रकरणाची हकीकत नीट तपासली तर तिच्यामागेंहि क्रांतिकारकांच्या धडपडी स्पष्टपणें दिसतात. या सर्व धडपडींचा निष्कर्ष म्हणून Sedition Committee च्या सभासदांनीं पुढील उद्‌गार काढिले आहेत :

The revolutionaries concerned were far too sanguine and the Germans with whom they got in touch were very

---

*The Problem of Minorities by *K. B. Krishna*, p. 149.
†Lokamanya Tilak by *D. V. Athalye*, p. 215.
§Sedition Committee Report, 1918, p. 8.

ignorant of the movement of which they attempted to take advantage.*

(या धडपडींत गुंतलेले क्रांतिकारक फार आशावादी होते. त्यांनीं कांहीं जर्मन लोकांशीं संधानें बांधलीं. पण, हे जर्मन लोक ज्या चळवळीचा फायदा घेऊं पाहात होते त्या चळवळीचें ज्ञान त्यांना मुळींच नव्हतें.) हें सगळें खरें असेल; पण, युद्ध पुरें होण्यापूर्वींच, २०–८–१९१७ रोजीं, हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य देण्याबाबतची जी घोषणा अधिकृतरीत्या करण्यांत आली तिच्या बहुविध प्रवर्तक कारणांत या धडपडींचीहि गणना करावीच लागेल ! They also serve who only stand and wait, (चालू उद्योगाला विरोध न करतां तटस्थ राहणारे देखील उपकारक ठरतात) हें जर खरें तर, या धडपडी अजिबात उपकारक ठरल्या नसतील असें तरी कां मानावें? सरहद्दीलगतच्या मुसलमानांतहि आपल्या विचारांचें वारें फैलावतां येईल अशी क्रांतिकारकांची अपेक्षा होती.† ती अगदींच निराधार नव्हती ही गोष्ट 'रेशमी पत्रांचा कट' हें प्रकरण§ नीट तपासलें तर सहज पटते.

निराश होऊन स्वस्थ बसणें हा लो. टिळकांचा स्वभावच नव्हता. आपला राष्ट्रीय पक्ष सचेतन करून व संघटित पक्ष आणि जोरदार लोकमत यांच्या बळावर काँग्रेसमध्यें शिरून, काँग्रेसला फिरून जोरदार बनविण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. ॲनी बेझंट यांच्यासारख्या जगद्विख्यात विदुषीनें भारतीय राजकारणाचा प्रश्न हातीं घेतला असल्यामुळें, त्या प्रश्नाला आतां नव्या अर्थानें जागतिक मान्यता मिळेल हें ओळखून, त्यांनीं बेझंटबाईंच्या चळवळीला पाठिंबा दिला. होमरूलच्या चळवळीनें देशांत जागृति व संघटना होऊं लागली कांहीं तरी करावें लागणार असें वाटूं लागल्यामुळें, हिंदुस्थान–सरकारहि हलूं लागलें. पडद्याआड चाललेल्या या सरकारी हालचालींचा कानोसा लागतांच, वरिष्ठ कौन्सिलच्या १९ हिंदी सभासदांनीं आपली स्वराज्य-विषयक मागणीहि व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांच्यामार्फत विलायतेस पाठविली

*Sedition Committee Report, 1918, p. 125.

†Sedition Committee Report, 1918, p. 128.

§Sedition Committee Report, 1918, p. 176–77; आणि अ. ज. करंदीकर, लढाऊ राजकारण, पृ० १२४–२५.

(ऑक्टोबर १९१६). १९ हिंदी सभासदांत मुसलमान सभासदहि आहेत याचा पूर्ण फायदा घेण्याचें लो. टिळकांनीं ठरविलें. अहमदाबादच्या प्रांतिक सभेच्या अध्यक्षस्थानीं बॅ० जीनांची नेमणूक झाली. लखनौच्या संस्मरणीय कॉंग्रेसमध्यें जहाल, नेमस्त, मुस्लीमलीगवाले या सर्वांची दिलजमाई झाली. या प्रसंगीं कॉंग्रेस व लीग यांच्या दरम्यान जातीय प्रश्नाबाबत जो निकाल ठरला तोच प्रसिद्ध लखनौ-करार होय.

मोर्ले-मिंटो सुधारणांच्या प्रसंगीं मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ सुरू झाले त्याबद्दल गोखल्यांना नांवें ठेवणारे त्यांचे शिष्य आढळतात; त्याप्रमाणेंच, लखनौ-करारांतील स्वतंत्र मतदारसंघांबद्दल टिळकांना नांवें ठेवणारे टिळक-शिष्यहि आढळतात! चुकलेल्या गोष्टीला चूक म्हटल्याबद्दल राग न मानण्याइतके टिळक उदारवृत्तीचे होते! लखनौ-करारांत खरोखरच चुका असतील तर त्या दाखविल्याबद्दल स्वतः टिळकच रागावले नसते; मग इतरांना त्याबद्दल राग येण्याचें कांहींच कारण नाहीं! मुसलमान सध्यां जें पाकिस्तान मागत आहेत त्या पाकिस्तानमध्यें द्विराष्ट्रवाद हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. गोखले अगर टिळक यांनीं स्वतंत्र मतदारसंघांना आपद्धर्म म्हणून मान्यता दिली त्याच वेळीं, 'आम्ही स्वतंत्र राष्ट्र आहों' या मुसलमानांच्या मागणीलाहि त्यांनीं मान्यता दिली असें मानणें, म्हणणें अगर सुचविणें म्हणजे ऐतिहासिक घटनांच्या क्रमाची उलथापालथ करण्यासारखें आहे. द्विराष्ट्र-वाद बोकाळविण्यांत, बॅ० जीना हे अलीकडच्या जर्मनतंत्राचें लांडोराप्रमाणें अनुकरण करीत आहेत ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. हें जर्मनतंत्र भलें-वाईट कसेंहि असो, त्याचा उगम व्हर्साय तहाच्या वेळीं ज्या अन्यायांच्या राशी रचल्या गेल्या त्यांत आहे. या तहाच्या तीन वर्षें आधीं लखनौ-करार झाला. प्रादेशिक अगर भौगोलिक राष्ट्राची कल्पनाच त्या वेळीं सर्वांच्या मनांत होती. मुसलमान ही हिंदुस्थानांतली एक अल्पसंख्य जमात आहे ही भाषासरणी त्याच वेळीं रूढ होती असें नव्हे तर, परवांपरवांपर्यंत पुष्कळसे मुसलमानहि हीच भाषासरणी वापरीत होते. हिंदुस्थानांतल्या राष्ट्ररूप हिंदुसमाजातर्फे अल्पसंख्य मुसलमान वर्गाशीं तडजोड करतांना टिळकांनीं देवाणघेवाण केली आणि ती करतांना, नाइलाज म्हणून, त्यांनीं स्वतंत्र मतदार संघांना मान्यता दिली! याचा अर्थ त्यांनीं स्वतंत्र मुसलमान राष्ट्राला

मान्यता दिली हें मीमांसाशास्त्राच्या कोणत्या तत्त्वानें सिद्ध होतें कोणाला माहीत !

लखनौ-करारामुळें नेमकें झालें तरी काय या प्रश्नाचें उत्तर आरंभींच देणें सोइस्कर ठरेल. प्रांतिक विधिमंडळांच्या निवडणुकी प्रत्यक्ष मतदान-पद्धतीनें व शक्य तोंवर प्रादेशिक मतदारसंघांतर्फे व्हाव्या असें ठरलें. मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ मान्य करण्यांत आले; पण, स्वतंत्र मतदार-संघांत मत देऊन फिरून सर्वसामान्य मतदारसंघांतहि मतदानाचा अधिकार गाजविण्याची त्यांची सत्ता संपुष्टांत आली ! मध्यप्रांत व पंजाब येथें पूर्वी स्वतंत्र मतदारसंघ नव्हते ते आतां आले ! आसामशिवाय सर्व प्रांतांतल्या विधिमंडळांतल्या मुसलमानांच्या जागांचें प्रमाण निश्चित ठरलें ! जागा ठरल्या त्या सर्व हिंदुस्थानचें चित्र दृष्टीसमोर ठेवून मगच ठरल्या. म्हणजे असें कीं, पंजाब-बंगालसारख्या मुसलमान-संख्याधिक्याच्या प्रांतांत मुसल-मानांना ज्या जागा मिळाल्या त्या संख्येच्या न्यायानें त्यांना मिळूं शकणाऱ्या जागांपेक्षां थोड्या कमी मिळाल्या. इतर प्रांतांत त्यांना ज्या जागा मिळाल्या त्या त्यांच्या संख्येच्या प्रमाणाच्या मानानें पुष्कळच जास्त मिळाल्या ! हेतु असा होता कीं, प्रमाणाबाहेर जास्त जागा मिळाल्यानें त्यांना विधिमंडळांच्या एकंदर मामल्यांत प्रभावी स्थान मिळावें ! पुढील तक्त्यावरून हा मुद्दा स्पष्ट होईल:

| प्रांत | १९११च्या शिरगणतींत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण | लखनौ करारामुळें मिळालेल्या जागांचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| पंजाब | ५४·८ | ५० |
| संयुक्त प्रांत | १४ | ३० |
| बंगाल | ५२·७ | ४० |
| बिहार-ओरिसा | १०·६ | २५ |
| मध्यप्रांत | ४·१ | १५ |
| मद्रास | ६·६ | १५ |
| मुंबई (सिंधसह) | २०·४ | ३३ $\frac{१}{३}$ |

वरिष्ठ कायदेमंडळांतल्या हिंदी सभासदांतले तृतीयांश सभासद मुसलमान असावे व त्यांची निवडणूक स्वतंत्र मतदारसंघांतर्फे व्हावी ही गोष्टहि या करारानें मान्य करण्यांत आली.*

२५ वर्षांनंतरची म्हणजे आजची परिस्थिति लक्षांत घेऊन बोलणाऱ्याला या कराराविरुद्ध पुष्कळच बोलतां येईल आणि करार झाल्याबरोबर कांहीं गोष्टी त्याच्याविरुद्ध बोलल्या जाऊं लागल्याहि ! पंजाब व बंगाल हे दोन प्रांत असे आहेत कीं, तेथें मुसलमानांचें संख्याधिक्य असलें तरी तें बेताबाताचेंच आहे ! अशा प्रांतांतून संयुक्त मतदारसंघ आग्रहानें सुरू व्हावयाला पाहिजे होते अशी टीका करतां येईल, नाहीं असें नाहीं ! पण, आग्रह धरून संधि गमावण्यापेक्षां, देवाणघेवाण करून संधि साधणें हेंच टिळकांना श्रेयस्कर वाटलें असावें ! 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय' वगैरे सूत्र हल्लीं हिंदुसभावादी वारंवार बोलतात. तें टिळकांनीं कधीं बोलून दाखविलें नसेल ! हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याविना स्वराज्य अशक्य असेंहि त्यांनीं मोठ्याशा अट्टाहासानें कधीं प्रतिपादिलें नाहीं ! बोलण्यापेक्षां कृतीचेंच महत्त्व ते जास्त मानीत आणि आलेल्या संधीचा राष्ट्रदृष्ट्या पुरेपूर फायदा कसा घ्यावयाचा याच चिंतनांत त्यांची समयज्ञ बुद्धि गर्क असे ! मुसलमानांशीं ऐक्य साधावें म्हणून त्यांनीं कोणाच्या बंगल्यांवर खेटे घातले नाहींत अगर कोऱ्या चेकांची अवईहि उठविली नाहीं ! मुसलमानांसह कांहीं व्हावयाचें असेल तर तें मुसलमानांच्या अडीअडचणीच्या वेळीं जागरूक राहिल्यानेंच होईल, हें त्यांना पुरें माहीत होतें ! परकीयांपासून अधिकार मिळविण्याच्या बाबतींत जाणत्या हिंदूंचें मन सदैव तयारच आहे. स्वतःवरील कांहीं प्रसंगामुळें मुसलमानांचें मन तसेंच तयार होत आहे कीं काय हें पाहून, 'तप्तेन तप्तमयसा घटनाय योग्यम्' या न्यायानें मुसलमानांच्या तत्परतेचा फायदा घेऊन, पुढें जाण्याला हरकत नाहीं असें टिळक मानीत असावे. १९१२–१३ पासून मुसलमानांच्या वृत्तींत राज्यकर्त्यांच्या धोरणांविषयीं पूर्वीइतका निःशंकपणा शिल्लक राहिलेला नाहीं हें टिळकांच्या सूक्ष्म दृष्टीला दिसत होतें. वरिष्ठ कायदेमंडळाच्या हिंदुसभासदांनीं जी सुधारणांची

*Report of the Indian Statutory Commission, Vol. I, Survey, pp. 187–188.

मागणी केली तिला मुसलमान सभासदांनींहि विशेष आढेवेढे न घेतां पाठिंबा दिला होता. मुसलमान सभासदांची पूर्वींचीच प्रवृत्ति कायम असती तर हा पाठिंबा इतक्या सहजासहजीं मिळाला नसता, हें पूर्वानुभवावरून टिळकांना अवगत होतें. म्हणूनच त्यांनीं योग्य वेळीं देवाणघेवाणीच्या पद्धतीचा हा करार केला! संयुक्त प्रांत, मद्रासप्रभृति प्रांतांत त्यांनीं मुसलमानांना वाजवीहून बऱ्याच जास्त जागा दिल्या; पण, बेडूक कितीहि फुगला तरी तो बैल होऊं शकत नाहीं, हें त्यांना पक्कें माहीत होतें! स्वतंत्र मतदारसंघांत मत देऊन फिरून सर्वसामान्य मतदारसंघांतहि मत देण्याचा मुसलमानांचा हक्क त्यांनीं हिरावून घेतला! संयुक्त मतदारसंघांचा आग्रह धरल्यानें पंजाब व बंगालमधील हिंदूंना सुरक्षितता लाभली असती हें खरें; पण, या आग्रहाच्या नादांत वेळ टळून गेली असती तर, बंगाल व पंजाबमधील हिंदूंना जें मिळालें तेंहि कदाचित् हातचें निसटलें असतें! लोकसंख्येच्या मानानें सरळ जातीय मताधिक्य मिळण्याची शक्यता दिसत असतां, मुसलमानांना त्या शक्यतेपासून परावृत्त करणें ही गोष्ट सोपी नाहीं!

१९१६ सालीं घडून आलेल्या एकंदर गोष्टींकडे गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफर्ड यांचें लक्ष होतेंच. हिंदुस्थाननें युद्धांत केलेली मदत, हिंदी राज्यव्यवस्थेबद्दल जगभर चाललेला बोभाटा इत्यादींचा विचार करून कांहीं तरी नव्या सुधारणा लवकरच द्याव्या लागणार हें त्यांना दिसूं लागलें. १९१६ सालींच त्यांनीं हा प्रश्न हातीं घेतला. फिरून आय०सी०एस० नोकरांचा कोठावळेपणा सुरू झाला व त्यामुळें हिंदुस्थान सरकारनें तयार केलेली प्राथमिक योजना अगदींच भिकार ठरली. वरिष्ठ सरकारच्या कारभारी मंडळाचे सभासद सर शंकरन् नायर यांना ती योजना अत्यंत अपुरी वाटली व त्यांनीं आपला असंतोष चव्हाट्यावर मांडला. २० ऑगस्ट १९१७ रोजीं लंडनहून बादशाही घोषणा झाली कीं, जबाबदारीचें स्वराज्य देणें हेंच ब्रिटिश राजनीतीच्या भारतविषयक धोरणाचें साध्य आहे. या साध्याकडे जाण्याचें पहिलें पाऊल म्हणून सुधारणांचा नवा हप्ता लवकरच देण्यांत येईल, असेंहि जाहीर झालें. याबरोबर दुसरीहि एक महत्त्वाची घोषणा झाली. सैन्यामधल्या अधिकाराच्या जागाहि (Commissioned Ranks) हिंदी लोकांना पात्रतेप्रमाणें मिळूं शकतील, असें सांगण्यांत आलें. आज-

पर्यंत सैन्यांतल्या अधिकारांच्या जागांबद्दल कांहीं एक विशेष कटाक्ष होता. अगदीं अल्पिष्टन साहेबापासूनचे उदार इंग्रज मुत्सद्दी पाहिले तरी, त्यांचें सारें औदार्य मुलकी कारभारांत हिंदी लोकांना समाविष्ट करण्यापुरतेंच मर्यादित असे. तेवढचा क्षेत्रांतसुद्धां जरा जबाबदारीच्या जागीं हिंदी माणूस येणार असें दिसूं लागतांच, लब्धप्रतिष्ठित इंग्रजांच्या पोटांत मळमळूं लागेच ! State secrets म्हणजे राजनीतींतलीं गुह्यें व गुपितें हिंदी माणसांना कळूं द्यावयाचीं--हिंदी लोकांना इतकें विश्वासार्ह मानावयाचें--हें त्यांच्यापैकीं कित्येकांना असह्य वाटे ! लष्करांतल्या महत्त्वाच्या जागेवर हिंदी माणसाला घ्यावा हें तर त्यांच्या स्वप्नांतहि येत नसे.

ही पूर्वपीठिका पाहिली म्हणजे, ऑगस्ट १९१७ च्या दोन्ही घोषणा टिळकांसारख्या 'असंतोषः श्रियो मूलम्' असें मानणाऱ्या जहाल पुढाऱ्यालाहि स्वागतार्ह कां वाटल्या, हें लक्षांत येईल. 'जबाबदारीची राज्यपद्धति' या शब्दप्रयोगाच्या शिडीनें आपण लोकशाही पद्धतीच्या पार्लमेंटरी कारभारापर्यंत जाऊन भिडूं असा विश्वास त्यांनीं बाळगिला. मोर्लेसारखा उदार म्हणून प्रसिद्ध असलेला मुत्सद्दीहि ८–१० वर्षांपूर्वीं पार्लमेंटरी राज्यपद्धतीचें नांव काढावयाला तयार नव्हता; आज स्वतः राजेसाहेब जबाबदारीच्या स्वराज्याची भाषा--शेवटचें ध्येय म्हणून कां होईना--काढूं लागले, हेंच टिळकांना विशेष कां वाटलें हें नीटपणीं समजण्यासाठीं, १८६१ पासूनचा सुधारणांचा इतिहास तपासला पाहिजे. हिंदुस्थानांत जाऊन भारतमंत्र्यांनीं समक्ष सगळ्या गोष्टी तपासाव्या असें ठरून, मॉंटेग्युसाहेब हिंदुस्थानांत आले.

जबाबदारीच्या स्वराज्याच्या ध्येयाची घोषणा झाली, कांहीं सत्ता हातीं पडण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं, त्याबरोबर जो तो वर्ग आपल्या महत्त्वाचें तुणतुणें गाऊं लागला. आपल्यामागें कोणता तरी वाघ लागला आहे व म्हणून आपल्याला ब्रिटिश सत्तेचें संरक्षण पाहिजे आहे असें म्हणणाऱ्या संस्था, जुनाट घरांत कोळिष्टकें वाढतात तशा, वाढूं लागल्या. संयुक्त प्रांतांतल्या मुसलमानांनीं आपली 'डिफेन्स ॲसोसिएशन' काढली; मद्रासेंत 'जस्टिस पक्ष' जोरानें हालचाल करूं लागला; मुंबई इलाख्यांत 'ब्राह्मणेतर' ह्या विचित्र नांवाचा पक्ष निर्माण झाला; गेल्या १०–१५ वर्षांत वाढूं लागलेला गिरणी-कामगारांचा वर्ग संघटितपणें बोलूं लागला; पूर्वास्पृष्टांचीं गाऱ्हाणीं चव्हाट्या-

वर येऊं लागलीं; शिखांचीं महिम्नस्तोत्रें रचिलीं जाऊं लागलीं आणि अँग्लो-इंडियनादि वर्गहि पुढें सरसावूं लागले! मुसलमानांचें हुकमी बुजगावणें आपल्या हातांतून गेलें असें लखनौ-करारामुळें नोकरशाहीला वाटूं लागल्यामुळें, तिच्यांतल्या कांहीं उपद्व्याप्यांनीं, नवीं बुजगावणीं निर्माण करण्याच्या नादांत, संरक्षण मागणारीं कांहीं नवीं कळसूत्री बाहुलीं निर्माण केलीं असतील, हें अगदीं शक्य आहे.

मॉंटेग्युसाहेब हिंदुस्थानांत आले व पाहाणी करीत हिंडूं लागले. संरक्षण मागणाऱ्या लोकांमध्यें लागलेली अहमहमिका पाहून त्यांना काय वाटलें असेल याची कल्पना त्यांनीं लिहून ठेविलेल्या Indian Diary मधील पुढील उताऱ्यावरून करतां येईल. ते लिहितात :

What strikes me astounding about these non-Brahmanas is that although they are vigorous enough to object to the influence of the Brahamanas, they lie on their stomachs and appeal to the Government for help instead of fighting; and although there is the beginning of the most promising party system here, they want to spoil it by the horrible extention of communal representation.

(ब्राह्मणांच्या वर्चस्वाला हरकत घेण्याइतके हे ब्राह्मणेतर खंबीर आहेत. असें असून ते लोळण घेत मदतीसाठीं सरकारची याचना करतात, स्वतःच झगडत नाहींत, हा प्रकार मला अतिशय आश्चर्यकारक वाटतो. पक्षसंघटनेची नामी सुरुवात करण्याच्या दृष्टीनें ही संधि चांगली आहे. तरीहि, जातवारीच्या प्रतिनिधित्वाचा भयंकर विस्तार करून ब्राह्मणेतर त्या संधीचा बिघाड करीत आहेत.)

लोकशाहीच्या वाढीला जातवारीचें तत्त्व मारक आहे याची जाणीव मोर्लेंप्रमाणेंच मॉंटेग्युसाहेबांनाहि होती; कारण, ते आपल्या डायरींत लिहितात :

We must beware of this system which Morley introduced; for it is fatal to the democratization of institutions and causes disunion between the Hindu and the

Mohamedan; and, we must not extend it more than we can help.

(मोर्लेनें सुरू केलेल्या या पद्धतींतला धोका आपण लक्षांत ठेविला पाहिजे. संस्थांना लोकशाहीचें वळण लागण्याच्या दृष्टीनें ही पद्धत घातकी आहे. तिच्यामुळें हिंदु व मुसलमानांमध्यें बेबनाव उत्पन्न होतो. अगदीं नाइलाज झाला तरच या पद्धतीचा विस्तार करावयाचा या मुद्द्याबद्दल खबिरी बाळगिली पाहिजे.)

हीं तत्त्वें उराशीं बाळगणाऱ्या मॉंटेग्युसाहेबांनीं स्वतंत्र मतदारसंघांची वाढ बेसुमार होऊं दिली. १९१८ च्या जूनमध्यें मॉंटफर्ड अहवाल प्रसिद्ध झाला. लागलीच मुंबईस कॉंग्रेसचें जादा अधिवेशन भरलें. या अहवालांतील योजना 'अपुरी, असमाधानकारक व निराशाजनक' आहे असा ठराव मंजूर झाला. नेमस्तांनीं कॉंग्रेस सोडली होती व स्वतःचें स्वतंत्र 'फेडरेशन' थाटलें होतें. अहवालाच्या आधारें कायद्याचा मसुदा होईल व त्यावर पार्लमेंटांत चर्चा होईल, तेव्हां जागें राहण्याच्या दृष्टीनें भिन्न भिन्न शिष्टमंडळें विलायतेस गेलीं. १९१९च्या एप्रिल महिन्यांत सुधारणा कायद्याचें पहिलें वाचन पार्लमेंटमध्यें सुरू झालें. कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाला प्रतिस्पर्धी म्हणून मद्रासचे डॉ० नायर यांच्या कपाळीं पुढारीपणाचा शेंदूर थापण्यांत आला! अहवाला-पेक्षांहि कायद्याचें स्वरूप जास्त प्रतिगामी ठरलें.

प्रांतांतून द्विदल राज्यपद्धति सुरू करणाऱ्या १९१९च्या सुधारणा कायद्यानें स्वतंत्र मतदारसंघांचें खूळ किती माजविलें हें थोडक्यांत पाहण्यासारखें आहे. ज्या प्रांतांतून मुसलमान मतदार बहुसंख्य असतील त्या प्रांतांत मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ असण्याचें कारण नाहीं असें मॉंटफर्ड अहवालांत मान्य करण्यांत आलें आहे. पंजाब-बंगाल प्रांतांत मुसलमान वस्ती हिंदूंच्या मानानें अधिक असली तरी, मुसलमान मतदारांची संख्या हिंदु मतदारांच्या तुलनेनें कमी भरेल या भीतीनें, या प्रांतांतहि स्वतंत्र मतदारसंघ चालू ठेवण्यांत आले. मुसलमानांपुरता लखनौ-करार मान्य केल्यावर, या घटनेंत पंजाबच्या शिखांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यांत आले. मतदारांच्या संख्येचा न्याय मुसलमानांना तेवढा लावला; पण, पंजाबांत शीख मतदारांचें शेंकडा प्रमाण २४.१ होतें तरी, त्यांना जागा दिल्या त्या मात्र शेंकडा १७.९ या प्रमाणांत!

बिगर-मुसलमान मतदारसंघांत जागा राखून ठेवण्याची प्रथा पडून, मद्रासच्या बिगर-मुसलमान मतदारसंघातर्फें निवडून येणाऱ्या ६५ प्रतिनिधींपैकीं २८ ब्राह्मणेतर प्रतिनिधी या राखीव पद्धतीनें यावे असें ठरलें ! मुंबई इलाख्यांत ४६ बिगर-मुसलमान जागांपैकीं ७ जागा मराठ्यांच्या राखीव ठरल्या ! अस्पृश्यांच्या प्रतिनिधींची नेमणूक गव्हर्नरांनीं करावी असें ठरलें. कामगारांच्या प्रतिनिधींना हाच न्याय लागू करण्यांत आला. हिंदी ख्रिस्ती, अँग्लो इंडियन व युरोपियन यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची सूचना मॉंटफर्ड-अहवालांत नव्हती ! कायद्यांत ती सोय झाली ! संस्थानिकांनीं साम्राज्य सरकारला युद्धांत मदत केलीच होती. ब्रिटिश भारतांत वाढूं पाहणाऱ्या जबाबदारीच्या राज्यपद्धतीला लगाम घालण्याचें एक साधन म्हणून पुढें मागें संस्थानिकांचा उपयोग करतां येईल हें ओळखून, मॉंटफर्ड-अहवालांत संस्थानिकांचें महिम्न-स्तोत्र रचण्यांत आलें व १९२१सालीं 'प्रिन्सेस चेंबरची' प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली !

साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें उठविण्यांत आलेली ही भुतावळ साम्राज्यावरच कशी उलटवितां येईल व तिचाहि उपयोग राष्ट्रहिताच्या वाढी-साठीं कसा करतां येईल हा राष्ट्रनेत्यांनीं हातीं घेण्याचा यापुढील प्रश्न होता. १९१४ च्या महायुद्धाचा हेतु 'युद्धांची परिसमाप्ति करण्यासाठीं चाललेलें युद्ध' असा सांगण्यांत येत होता; पण, व्हर्सायच्या तहानेंच नव्या युद्धाचीं बीजें पेरून ठेविलीं होतीं. राष्ट्रांतील अंतस्थ कलह आंवरून धरणें, राजकीय प्रगतीचे टप्पे झपाट्यानें गांठीत जाणें व नवें जागतिक युद्ध सुरू होण्याच्या सुमारास सारें राष्ट्र स्वातंत्र्योन्मुख व स्वसंरक्षणक्षम बनविणें हीं कामें मोठ्या मुत्सद्देगिरीनें व्हावयास पाहिजे होतीं ! पण, देशाचें दुर्दैव असें खडतर कीं, लोकमान्य टिळक १ ऑगस्ट १९२० रोजीं इहलोक सोडून गेले !

## प्रकरण ५ वें

# मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास

## टप्पा तिसरा : १९२० ते १९४१

**कै० लोकमान्य टिळकां**विषयींची एक आख्यायिका मोठी सूचक आहे. होमरूल चळवळीला ऐन भर आला होता व टिळकांनीं ठिकठिकाणच्या ठळक पुढाऱ्यांना पुण्यास बोलावून घेतलें होतें. संध्याकाळच्या सुमारास ही मंडळी कांहीं महत्त्वाचें काम करीत होती; इतक्यांत, बैठकीच्या बाजूच्या सज्ज्यांत एक संन्याशी येऊन उभा ठाकला. बऱ्याच मंडळींचें लक्ष कामांतून निघालें व ती मंडळी बैठक सोडून, आदरमिश्रित जिज्ञासेनें, त्या संन्याशापाशींच बोलत उभी राहली ! कांहीं वेळानें संन्याशी निघून गेला. मंडळी परत बैठकींत आल्यावर टिळक जरा रागानेंच म्हणाले : माझ्या डोक्यावर शेंडीच्या दोन बटा शिल्लक आहेत; एवढ्यामुळें मी संन्याशी ठरत नाहीं कीं काय ?

टिळकांच्या प्रश्नाचें उत्तर त्यांच्या प्रश्नांतच आहे. वृत्तीनें संन्याशी नसून, मनुष्य नुसता वेषानें संन्याशी असला तरीहि, हिंदुसमाजांतलीं मोठमोठीं माणसें त्याच्याकडे आकर्षिलीं जातात. क्षीरसमुद्रानें श्रीविष्णूचा पीतांबर पाहून त्याला आपली मुलगी दिली; पण, शंकर दिगंबर असल्याचें दिसतांच त्यानें हलाहल विष त्याच्या हवालीं केलें. हिंदुस्थानांतल्या लोकसमुद्राची वृत्ति याच्या अगदीं उलट आहे ! दिगंबरत्वावर भाळून तो हवी ती वस्तु दिगंबराला अर्पण करण्याला प्रवृत्त होईल; पीतांबराला तो हलाहल देईल, असेंच केवळ नव्हे; पण, पीतांबरदर्शनानें त्याची सर्वस्वसमर्पणबुद्धि जागृत होणार नाहीं, हें मात्र खरें !

१९२० सालीं गांधीजींचा उदय हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर झाला; तेव्हां हिंदुसमाजाच्या मानसिक घडणींतला हा विशेष त्यांना पुष्कळच उपयोगीं पडला. पारतंत्र्यांत पिचत राहण्याला कंटाळलेल्या हिंदुसमाजाला एका वर्षांत स्वराज्यप्राप्तीची घोषणा करणारा हा संन्याशी ईश्वरी अव-

तारच भासला ! संन्यासप्रवण मनोवृत्तीला सहज पटणारा असहकारयोग, भूतदयेच्या धर्माचा उद्धार करूं पाहणारा अहिंसावाद वगैरे गोष्टींचा पुकारा होऊं लागतांच हिंदुसमाजाच्या झुंडीच्या झुंडी गांधी गोटांत गोळा होऊं लागल्या.

> हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा गांधीजींना ध्यास लागून राहिला; आणि, पहिले कांहीं दिवस या ऐक्याचा देखावाहि चांगलाच टिकला. पण, मुसलमान समाज या देखाव्यांत सामील झाला होता तो मुसलमान म्हणून त्याचें जें गाऱ्हाणें होतें त्याला वाचा फुटावी म्हणून सामील झाला होता ! हें गाऱ्हाणें संपतांच मुसलमान समाज जो दूर सटकला तो आतां कांहीं केल्या गांधीजींच्या हातीं लागत नाहीं !

'लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियम्। श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत्' हा श्रीसंपादनाच्या बाबतींत येणारा अनुभव मुसलमानांशीं ऐक्य जमविण्याच्या बाबतींत आल्यामुळें, गांधीजींनीं अलीकडे या बाबतींत जाहीरपणें तरी बोलण्याचें प्रायः सोडूनच दिलें आहे.

१९१९ सालीं हिंदु-मुसलमान समाजांची एकी झाल्याचा भास झाला. त्याचीं खरीं कारणें कोणतीं हें पुष्कळांच्या लक्षांत नसतें. युद्ध संपण्याच्या वेळीं युरोपांत ज्या घडामोडी झाल्या त्या समजल्याविना हीं कारणें लक्षांतहि येणार नाहींत. १९१९ सालीं सेव्हर्सच्या तहाचा मसुदा प्रसिद्ध झाला व तुर्कस्थानच्या भवितव्याबद्दल सारें इस्लामी जग साशंक बनलें. रशियांत तत्पूर्वी सुरू झालेल्या बोल्शेव्हिझमची झळ अफगाणिस्थानपर्यंत पोंचण्याचीं लक्षणें दिसूं लागल्यामुळें, हिंदुस्थान सरकारनें सरहद्दीबाबतच्या धोरणांत व अफगाणिस्थानविषयक धोरणांत कडकपणा धारण केला. विजयी झालेलीं युरोपमधील राष्ट्रें व अमेरिका इस्लामी राष्ट्रांबद्दल तिरस्कार बाळगीत आहेत असें वृत्तपत्रीय लेखांवरून दिसूं लागलें. या सर्व बनावांमुळें सारें इस्लामी जग प्रक्षुब्ध झालें. या प्रक्षोभापासून भारतीय मुसलमान अलिप्त राहूं शकले नाहींत व त्यामुळें खिलाफतीची चळवळ हिंदुस्थानांत सुरू झाली व बळावली !

मुसलमानांच्या या असंतुष्ट वृत्तीचा फायदा घेऊन भारतीय स्वातंत्र्याची चळवळ पुढें रेटणारा टिळकांसारखा मुत्सद्दी असता तर त्यानें, स्वतःच्या

विचाराची बैठक न सोडतां, परिस्थितीचा पुरा फायदा घेतला असता. स्वराज्याचा पुढील हप्ता पांच वर्षांत मिळवून, योग्य वेळ येतांच स्वातंत्र्य-प्राप्तीची सिद्धता करण्याची भाषा टिळक मृत्यूपूर्वी बोलतच असत; आणि, मामुली राजकारणाच्या घडामोडी आपल्या विश्वासांतल्या इतर माणसांवर सोंपवून, स्वतःचें लक्ष वरच्या राजकारणांत गुंतवावें असा विचार त्यांच्या मनांत शेवटीं शेवटीं घोळतहि होता. भारताच्या राजकारणी नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा गांधीजींनीं धरली यांत गैर कांहीं नाहीं. आफ्रिकेंतल्या लढ्यांत त्यांनीं मिळविलेलें यश, त्यामुळें त्यांना लाभलेली आंतरराष्ट्रीय कीर्ति, हिंदुमनाचा कबजा मिळविण्याला अत्यंत अनुकूल अशी त्यांची विचार-सरणी व आचारसरणी या सर्व गोष्टींचा समुच्चय त्यांना भारतीय नेतृत्वाकडे खेंचीतच होता. पण, सरकारच्या कारभारांत धोरणाचें सातत्य (Continuity of Policy) असणें जसें अवश्य, त्याप्रमाणेंच देशाच्या राजकारणांतहि हें सातत्य शक्य तोंवर टिकविणें अवश्य असतें! 'शठे सत्यं' कीं 'शठे शाठ्यम्' या शुष्क, शाब्दिक वादांची झुंज टिळकांशीं खेळत बसण्याऐवजीं, टिळकांच्या खोल राजकारणी बुद्धीचें आकलन करण्याचा व कोणतीं धोरणें बांधून टिळक राजकारण चालवितात हें समजून घेण्याचा प्रयत्न गांधीजींनीं आपलेपणानें केला असता तर, याच खिलाफतीच्या चळवळीचा उपयोग त्यांना उत्तम रीतीनें करून घेतां आला असता! पण, तसें घडलें नाहीं!

> 'नक्रः स्वस्थानमाश्रित्य गजेंद्रमपकर्षति' याच तत्त्वाचा आश्रय करून मुसलमानांना आपल्याकडे खेंचणें हितावह आहे हें विसरून, गांधीजी खिलाफतीच्या चळवळीमुळें कांहींसे बेभान बनले आणि मौलवी-मौलानांच्याहि पेक्षां अधिक उत्साहानें ते रान उठवूं लागले!

याचा परिणाम असा झाला कीं, चळवळ खूप तेजींत आली! पण, नुसतें जळण खूपसें जळून काम भागत नाहीं! जळण जाळल्यामुळें शिजलें काय व जें शिजलें तें पदरांत कोणाच्या पडलें हेच प्रश्न स्वाभाविकपणें महत्त्व पावतात!

चळवळींत खूप वारा भरल्यामुळें, पुष्कळशा लोकांना 'सैतानी सरकार' नष्टच झाल्याचा भास होऊं लागला. १९२१ सालीं मलबारांत झालेलें

मोपल्यांचें बंड याच आभासांतून निर्माण झालें. २० ऑगस्ट १९२१ रोजीं हें बंड प्रकट स्वरूपांत दिसूं लागलें व मलबारांतला लष्करी कायद्याचा अंमल २५–२–१९२२ रोजीं खलास झाला. या ७–८ महिन्यांनंतर मलबारांत ब्रिटिश सत्ता फिरून खंबीरपणानें नांदूं लागली; पण, मधल्या काळांत तेथील हिंदूंचें जीवन मात्र अक्षरशः असह्य झालें! माणुसकीला लांछन लावणारे प्रकार मलबारांत कसे घडले याचें सरकारी प्रतिवृत्तांतलें वर्णन डॉ० आंबेडकर यांनीं उद्धृत केलें आहे. हत्याकांडें, बलात्कारानें झालेलीं धर्मांतरें, मंदिरें उध्वस्त करण्याचा सपाटा, गरोदर स्त्रियांच्या शरीराच्या चीरफाडीसारखे अत्याचार करण्याची लाट, लूट, जाळपोळ इत्यादि सर्व प्रकार घडले*

> खऱ्या भूतदयेची व न्यायाची अधिक चाड बाळगणारा अगर असहाय हिंदूंच्या भवितव्याबद्दल कमी बेफिकिरी बाळगणारा दुसरा कोणीहि राष्ट्रनेता असता तर, त्यानें या हत्याकांडाबद्दल नापसंतीच व्यक्त केली असती! पण, गांधीजींनीं मोपले हे पापभीरू व देवभीरू (God-fearing) असल्याचें प्रशस्तिपत्र मोपल्यांना दिलें!

मोपला प्रकरणाची चर्चा कॉंग्रेसच्या समित्यांतून झाली; तेव्हां, त्या समित्यांतल्या मुसलमान गांधी-बंधूंनीं, आपल्या धर्मशास्त्राच्या आधारें, मोपल्यांच्या नादिरशाही वर्तनाचें समर्थनच केलें! कसल्याहि अत्याचारापुढें व अन्यायापुढें नमणें हें माणुसकीला कमीपणा आणणारें आहे हें विसरून, या समित्यांतल्या राष्ट्रधुरीणांनीं मूळ ठरावांतली कडक वृत्ति पार पातळ करून टाकली! लजपतराय, मालवीय, मुंजे इत्यादींना हा मुसलमान-धार्जिणेपणा शल्यासारखा बोंचूं लागला. हिंदूंना न्याय मिळावा व त्यांच्या हिताचें संगोपन व्हावें यासाठीं स्वतंत्र व्यवस्था करण्याची जरुरी त्यांना पटूं लागली व हिंदुमहासभेचें महत्त्व हळुहळू वाढूं लागलें.

नव्या सुधारणांचा नवा मनु सुरू झाला असल्याचें जाहीर करण्यासाठीं बादशाहांचे काका हिंदुस्थानांत आले. दिल्लीच्या विधिमंडळाचें उद्घाटन करतांना त्यांनीं राजबंद्यांच्या मुक्ततेची घोषणा केली. वसाहतीचें स्वराज्य

*Thoughts on Pakistan, p. 159.

हें हिंदुस्थानचें ध्येय निश्चित असल्याचें बादशाही आश्वासनहि त्यांनीं वाचून दाखविलें. कौन्सिलांवर काँग्रेसनें बहिष्कार घातला तरी कौन्सिलें ओस पडलीं नाहींत. युरोपांतल्या परिस्थितीच्या चांचल्याकडे लक्ष देणारे व 'स्वराज्य म्हणजे सैनिक-सत्ता' हें सूत्र लक्षांत ठेवणारे सर शिवस्वामी अय्यर यांच्यासारखे लोक लष्करी खर्च कमी करण्याबद्दलचा व सैन्याचें हिंदीकरण करण्याचा लकडा सरकारच्या मागें लावूं लागले. लोकांच्या आकांक्षांच्या मानानें नवीन सुधारणांनीं दिलेले अधिकार अपुरे आहेत हें मत वरिष्ठ व प्रांतिक कायदेमंडळांतूनहि अधूनमधून ऐकूं येऊं लागले.

इकडे असहकाराची चळवळ जोरांत चालूच होती. युवराजांच्या आगमनावर बहिष्कार घालण्याची चळवळ जोरावली. अशा चळवळी चालवितांना अहिंसेचें वातावरण संपूर्णपणें टिकलें पाहिजे असा आग्रह गांधीजी धरीत असले तरी, सामुदायिक व्यवहारांत तो आग्रह टिकूं शकत नव्हता. युवराजांच्या आगमनप्रसंगीं मुंबईंत मोठा दंगा झाला. युवराज पुष्कळ ठिकाणीं गेले; पण फार ठिकाणीं त्यांच्या आगमनप्रसंगीं कडक हरताळ पडले! राजघराण्यांतील प्रमुख व्यक्तींच्या आगमनाचा प्रसंग व्यवस्थितपणें पार पाडण्यावर हिंदुस्थानांतल्या बड्याछोट्या नोकरांची इभ्रत अवलंबून असल्यामुळें, हा हरताळ नोकरशाहीला फार जाणवला. या परिस्थितीचा देशाला फायदा मिळवितां आला असता! त्या वेळचे लॉ मेंबर सर तेज बहादूर सप्रु हे मध्यस्थी करूं लागले. सरकार पक्षांतील प्रमुखांची व लोकनायकांची गोलमेज परिषद व्हावी आणि देवाणघेवाणीच्या धोरणांतून प्रांतिक कारभारांतलीं बरीचशीं राखीव खातीं सोंपीव व्हावीं असा हेतु या प्रयत्नांच्या मागें असावा. दासबाबूंची या प्रयत्नांना मान्यता होती; पण गांधीजींनी मान्यता न दिल्यामुळें हे प्रयत्न थंडावले व शेवटीं निष्फळ ठरले!

देशांतली चळवळ चालूच राहिली. मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या धरपकडी होऊं लागल्या. ज्यांच्या वैभवामुळें संयुक्त प्रांताचा गव्हर्नरहि दिपून जात असे अशा पं० मोतिलालजी नेहरूंसारख्या मान्यवर पुढाऱ्यांपासून तों झोंपडींत राहून कणीकोंड्याचें कष्टांचें वैभव सहन करणाऱ्या खेडुतापर्यंत सर्व दर्जाचीं हजारों माणसें सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्याला डोळा भिडवून बोलूं-वागूं लागलीं आणि निर्भयपणें तुरुंगाचा मार्ग आक्रमूं लागलीं!

> देशाबद्दलचा विचार मनांत आणून, माणसांनीं सूर्याला नमस्कार घातले किंवा वडापिंपळाला प्रदक्षिणा घातल्या तरी त्याहि गोष्टी कौतुकार्ह समजाव्या अशी ज्या देशांतल्या लोकांची राजकारणी झोंपाळूपणाची परंपरासिद्ध स्थिति, त्या देशांत इतका निर्भयपणा ज्या एका व्यक्तीच्या प्रभावामुळें इतक्या अल्प काळांत निर्माण झाला त्या गांधीजींना लोक धन्यवाद देऊं लागले, हें बरोबरच झालें.

१९२२ च्या मार्च महिन्यांत गांधीजीच पकडले गेले. हिंदुस्थान हा स्वतंत्र व लोकसत्ताक राज्यपद्धतीचा देश आहे अशी घोषणा करण्यांत यावी अशी भाषा अल्लीबंधूंच्या तोंडीं १९२२ साल उजाडेपर्यंत खेळत होती.

मुसलमान व काँग्रेस यांची जूट फोडली पाहिजे हें सरकारनें ओळखलें आणि सेव्हर्सच्या तहाची फेरतपासणी कोणत्या रीतीनें व्हावी याबद्दलचें आपलें मत व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनीं इंग्लिश मुत्सद्यांना कळविलें. १९२३ च्या जुलैमध्यें युरोपांत लॉसेन परिषद होऊन तुर्कस्थानचा स्वतंत्र दर्जा मान्य करण्यांत आला. केमाल पाशाचा अधिकार तुर्कस्थानांत सुरू झाला व खिलाफतीचा निकाल त्यानेंच लावला. याच सालीं इंग्लंड व अफगाणिस्थान यांच्या दरम्यान तह झाला व त्यामुळें सरहद्दीवरची गडबडहि मंदावली.

> इस्लामी जगांतल्या घडामोडींना हें नवें वळण लागतांच, हिंदी मुसलमानांचा सरकारपाशीं असलेला तंटा संपला व या तंट्याला तेज चढावें या हेतूनें त्यांनीं काँग्रेसनेत्यांशीं जो सलोखा केला होता तोहि त्यांना अनवश्यक वाटूं लागला.

या अल्पकाळांत मुसलमानांना एक गोष्ट कळली व ती कळण्याला काँग्रेस-मधील हिंदूच कारणीभूत झाले. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा ध्यास धर-णाऱ्या या हिंदु पुढाऱ्यांना या ऐक्याविना स्वराज्यप्राप्ति अशक्य वाटते हें त्यांनीं ओळखलें ! स्वराज्याला हपापलेले हिंदु पुढारी ऐक्य टिकावें म्हणून किती लाचारपणानें वागतात याचाहि अनुभव त्यांना मोपला प्रकरणासारख्या प्रकरणांतून मिळाला. स्वराज्यपक्ष कौन्सिलांत जाऊन बसला तेव्हांपासून घटना दुरुस्त होण्याची भाषा वारंवार सुरू झाल्यामुळें, राजकीय हक्कांचा पुढचा हप्ता लौकरच पदरांत पडणार हें त्यांना नक्की कळून चुकलें ! सर-

कारचा रोष टाळून हिंदूंना भीति दाखवण्यांत मोठासा धोका नाहीं, त्यामुळें आपलें महत्त्व वाढण्याचीच शक्यता जास्त आहे हें ओळखून त्यांनीं तो उपक्रमहि सुरू केला.

गांधीजींनीं मधूनमधून उपासतापास करावे व आपला पश्चात्ताप चावडीवर मांडावा हाहि राजकारणांतला एक नित्याचा प्रघात होऊन बसला. गांधींनीं उपास केला कीं हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचीं बोलणीं हटकून सुरू व्हावयाचींच ! १९३२ सालच्या जातीय निर्णयानें (Communal Award) मुसलमानांनीं आपल्या चौदा मागण्या भरमाप पदरांत पाडून घेतल्या असें हिंदुमहासभा म्हणते व डॉ० आंबेडकर यांनींहि आपल्या पुस्तकांत (पृ० ९८ वर) ही गोष्ट मान्य केलेली आहे. जातिनिर्णयांत समाविष्ट झालेल्या बहुतेक अनिष्ट गोष्टींना ऐक्यासाठीं हपापलेल्या काँग्रेसवादी हिंदूंनीं मध्यंतरींच्या या काळांत केव्हां ना केव्हां तरी आगाऊ मान्यता देऊन ठेविलेली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १९२३ सालीं कै० दासबाबू यांनीं बंगालमधील मुसलमानांबरोबर बंगालपुरता एक करार केला होता व स्वतंत्रवृत्तीच्या हिंदूंना त्याबद्दलची नापसंती दर्शवावी लागली. सिंधला लागू असणारा असाच एक करार तयार झाला होता व हिंदूंनीं त्याबद्दलची नापसंति दर्शविली ही गोष्ट १९२८ सालीं प्रसिद्ध झालेल्या नेहरू-रिपोर्टांत नमूद झालेली आहे.* १९२४ सालीं मौ० महंमदअल्ली यांनीं स्वामी श्रद्धानंदजी यांच्या सहकार्यानें दिल्लीस एक ऐक्यपरिषद बोलावली होती. १९२५च्या जानेवारी महिन्यांत गांधीजींच्या अध्यक्षतेखालीं अशीच एक कमिटी नेमण्यांत आली होती. पं० मोतिलाल नेहरू हे या कमिटीचे चिटणीस होते. अशा कमिटयांतून निष्पन्न तर कांहींच झालें नाहीं. पण, या ऐक्योत्सुक हिंदूंनीं जी औदार्याची भाषा वापरली तिचा मात्र मुसलमानांनीं पुरा फायदा करून घेतला.

> 'मिळेल तें खिशांत टाका व उरलेल्यासाठीं झगडत राहा' हा उपदेश लो० टिळकांनीं सरकारपाशीं चाललेल्या राष्ट्रीय झगड्याला उद्देशून केला होता. इतरांनीं तो उपदेश कृतींत उतरविला असो वा नसो, हिंदी मुसलमानांनीं मात्र तो दुहेरी अर्थानें कृतींत आणिला आहे. हिंदु व इंग्रज राज्यकर्ते या

*All Parties Conference Report 1928, p. 68.

दोघांशींहि वागतांना ते याच न्यायानें वागतात आणि या दोघांनाहि आशेला लावून, ते आपला बाजारभाव वाढवून घेतात.

अशा भाकड वाटाघाटींतूनहि साधेल तितका स्वार्थ साधण्याला मुसलमान टपलेलेच असत! असल्या भाकड वाटाघाटी, मुसलमानांचा जागरूकपणा व ब्रिटिशांचा धोरणीपणा यांतूनच जिनांचे चौदा मुद्दे निघाले आहेत व जातीय निर्णयहि पर्यायानें याच पद्धतीनें उरावर बसला आहे! हरिश्चंद्राच्या बोकांडीं बसून त्यानें स्वप्नांत दिलेलें वचनसुद्धां पुरें करून घेणाऱ्या विश्वामित्राची उपमा सध्यांच्या काळांत कुणाला साजत असेल तर ती हिंदी मुसलमानांना होय! लखनौ करारांतली योजना सगळ्या हिंदुस्थानांतल्या हिंदु-मुसलमानांचें चित्र डोळ्यांपुढें ठेवून आंखलेली आहे. परस्परांच्या समजुतीनें सर्व हिंदुस्थानची योजना म्हणून एकादी नवी योजना सिद्ध होईपर्यंत ती योजना बदलण्याचें कारणच नव्हतें; पण, मध्यंतरींच्या काळांत ऐक्य-चिंतामणींनीं जो चाळा करून ठेविला तोच हिंदूंना घातक ठरला! १९२७ सालीं सायमन कमिशन नेमलें गेलें व त्याच्यावर बहिष्कार घालण्याचें राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनीं ठरविलें. सायमन कमिशनला उत्तर म्हणून नेहरू रिपोर्टींतली योजना मोठ्या विचारपूर्वक तयार करण्यांत आली. ही योजना सगळ्या हिंदुस्थानच्या स्वायत्त कारभाराची योजना म्हणून बहुतेक पक्षांना मान्य झाली. ब्रिटिश भारताच्या स्वायत्त सरकारचे हिंदी संस्थानिकांशीं संबंध कसे असतील याचेंहि दिग्दर्शन या रिपोर्टांत करण्यांत आलेलें आहे. वडिलांनीं तयार केलेला हा रिपोर्ट चिरंजीवांनीं रावी नदींत बुडविला असें या रिपोर्टाबद्दलचें एक वर्णन रूढ आहे. या रिपोर्टांतला स्वराज्याचा भाग, जड म्हणून कीं काय कोण जाणे, रावी नदीच्या गाळांत रुतून खोलांत गाडला गेला; पण, मुसलमानांना सोइस्कर असलेला हलका भाग मात्र नेमका तरंगत वर आला व मुसलमानांना त्याचा उपयोगहि झाला.

ऐक्यासाठीं धडपड, ऐक्यपरिषदा, उपोषणें इत्यादि धांवपळीचीं उदाहरणें म्हणून गांधीजींनीं लंडनमधील मुक्कामांत मुसलमानांशीं केलेल्या वाटाघाटी,† गांधीजींच्या उपोषणांतून निघालेला पुणें करार व त्या करारानंतर बंगाल-

†Thoughts on Pakistan, pp. 364–65.

मधील हिंदूंना झालेला पश्चात्ताप, १९३२ सालीं मुंबईस झालेल्या हिंदु-मुसलमान, खिस्ती वगैरे पुढाऱ्यांमधील वाटाघाटी इत्यादि घटना निर्देशितां येतील. संयुक्त मतदानपद्धति म्हणजेच राष्ट्रीयत्व आणि सर्वस्व, या प्रचलित भावनेचा फायदा घेण्याचेहि प्रयत्न सुरू झाले. १८–४–१९३१रोजीं लखनौ येथें सर अल्ली इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या अखिल भारतीय मुसलमानांच्या राष्ट्रीय परिषदेंत पास झालेले ठराव, १९३२च्या पावसाळ्यांत बंगाल कौन्सिलमध्यें पास झालेला ठराव, इत्यादि गोष्टी या दृष्टीनें तपासून पाहिल्या पाहिजेत. अशा उपक्रमांची उठावणी मुसलमानांचें संख्याधिक्य असलेल्या प्रांतांतूनच कां होते हा प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे. मुंबई इलाख्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांतून संयुक्त मतदानपद्धति अगदीं अल्पांशानें सुरू करण्याचा प्रश्न निघतांच ॲसेंब्लींतील मुसलमान सभासदांनीं आकाशपाताळ कसें एक केलें हें ज्यांच्या लक्षांत असेल त्यांना हें सहज समजेल कीं, मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतांतून मुस्लीम मतदार आतां चांगले ‘तयार’ झालेले असल्यामुळें, संयुक्त मतदानपद्धति तेथील मुसलमानांना मानवणारी आहे. नेहरू-रिपोर्ट १९२८ सालीं लिहिला गेला; त्या वेळीं हे मतदार इतके तयार झालेले नसावेत; तरीसुद्धां, संयुक्त मतदान पद्धतीमुळें मुसलमान मतदारांनीं मैमेनसिंग, चितगांग व जेसोर या जिल्ह्यांतल्या बोर्ड निवडणुकींच्या वेळीं हिंदु उमेदवारांना कसें धुळीला मिळविलें याचें वर्णन नेहरू रिपोर्टांत केलेलें आहे!*

> हें सर्व ओळखून हिंदूंनीं निष्कर्ष असा काढला पाहिजे कीं, अमुक गोष्टींत सर्वस्व व राष्ट्रीयत्व भरलेलें आहे अशी कायम ठशाची भावना त्यांनीं करून घेतली कीं, आपला जातिस्वार्थ साधण्यासाठीं त्या भावनेचा उपयोग करून घेण्याला मुसलमान टपून बसलेलेच आहेत! हिंदूंचें हित व इतर समाजांना धारवाडी काट्यानें मिळणारा न्याय म्हणजेच सर्वस्व आणि म्हणजेच राष्ट्रीयत्व असा ठाम सिद्धांत मनांत बिंबवून हिंदु वागतील तरच सर्व प्रश्न त्यांना समाधानकारक रीतीनें सोडवितां येतील.

ही कसोटी लावून आतां १९३२ च्या जातीय निर्णयाचा विचार करणें अवश्य

*All Parties Conference Report 1928, p. 47.

आहे. १९२०–४१ हा काळ अलीकडचा असल्यामुळें, या काळांतल्या घडामोडींचें स्मरण अजून पुसट झालेलें नाहीं. त्यामुळें या घडामोडींचा वृत्तांत विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं.

१९२७ सालीं नेमण्यांत आलेल्या सायमन कमिशनवर टाकण्यांत आलेला बहिष्कार, या कमिशनच्या सभासदांपुढें झालेल्या एकतर्फी साक्षी, पहिल्या गोलमेज परिषदेची आशादायक सुरुवात, १९३० ची सत्याग्रहाची चळवळ, गांधी-आर्यावन करार, दुसऱ्या गोलमेज परिषदेला गांधीजींची उपस्थिति, तेथें झालेलें हिंदी पुढाऱ्यांमधील भेदांचें ओंगळ प्रदर्शन, १९३२ ची सत्याग्रहाची दुसरी चळवळ व दडपशाही, मॅक्डोनल्डचा जातीय निर्णय, गांधीजींचा उपवास व त्यांतून निघालेला पुणेंकरार, जातीय निर्णयाचा निषेध करण्याच्या बाबतींतली कॉंग्रेसची शकारी वृत्ति, अणे-मालवीयजींनीं काढलेला कॉंग्रेस राष्ट्रीय पक्ष व मराठी मुलुखांत निघालेला लोकशाही स्वराज्य पक्ष, १९३३–३४ सालीं कॉंग्रेसनें लढविलेल्या दिल्ली ॲसेंब्लीच्या निवडणुकी, तेथून कॉंग्रेसच्या धोरणाला लागलेलें नवें वळण, १९३६ सालच्या अखेरीस कॉंग्रेसनें प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकी जिंकण्यासाठीं केलेली उठावणी, १९३७ च्या आरंभीं या निवडणुकींत कॉंग्रेसनें मिळविलेलें यश, आश्वासन मागणीचा हट्ट व हंगामी मंत्रिमंडळांची स्थापना, स्वातंत्र्यवीर सावरकर यांना लाभलेलें संचारस्वातंत्र्य व प्रचारस्वातंत्र्य, कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांमार्फत चाललेला प्रांतिक कारभार, अकरणरूप धोरणामुळें सांठत गेलेल्या कॉंग्रेसच्या लोकप्रियतेला प्रांतिक कारभारांतील चुकांमुळें लागलेली ओहोटी, बंगाल-सिंध वगैरे प्रांतांतील मंत्रिमंडळांचें हिंदुविरोधी धोरण व कॉंग्रेस मंत्रिमंडळांचें मुसलमानधार्जिणें धोरण, बॅ. सावरकरांच्या तेजस्वी कर्तृत्वामुळें व भोंवतालच्या परिस्थितीमुळें हिंदुमहासभेची वाढत चाललेली लोकप्रियता, महायुद्धाची सुरुवात व कॉंग्रेस मंत्रिमंडळांचे राजिनामे, मुस्लीमलीगनें साजरा केलेला ‘मुक्ति-दिन’, कॉंग्रेसच्या मागण्यांना उत्तर देतांना ब्रिटिश मुत्सद्यांनीं एकमुखी मागणीवर दिलेला भर, कॉंग्रेसचा पुणें ठराव व युद्धविरोधी घोषणा करून तुरुंगांत जाण्याची चळवळ, डाक्का, अहमदाबाद, मुंबई वगैरे ठिकाणच्या दंग्यांत हिंदूंचे झालेले हाल, मुस्लीमलीगच्या चढेल मागण्यांची बेसुमार वाढ, वरिष्ठ सरकारच्या कार्यकारी मंडळाची वाढ वगैरे गोष्टी अगदीं ताज्या इतिहासांत

जमा होत असल्यामुळें, त्यांचें वर्णन विस्तारानें करीत न बसतां, जातीय निर्णयाच्या रूपानें मुसलमानांच्या सगळ्या अतिरिक्त मागण्या त्यांच्या पदरांत कशा पडल्या एवढेंच सांगून पुढील विवेचनाकडे वळणें अवश्य आहे.

सायमन कमिशनच्या रिपोर्टाची व गोलमेज परिषदेंत झालेल्या चर्चेची छाननी केली तर एक गोष्ट स्पष्टपणें लक्षांत येते. जातवारीच्या मतदार-संघांबद्दल प्रत्येकानें नापसंति दर्शवावी व प्रत्येकानें त्या मतदारसंघांपुढें निमूटपणें, नाइलाज म्हणून मान वांकवावी असें एकसारखें घडत गेलें. प्रांतविभागणी, मतदारांची व मतदारसंघांची वाढ, प्रांतांतल्या लोकसंख्येंतली जातवारी पाहून झालेली जागांची वांटणी इत्यादि सर्व गोष्टी पूर्वींच कोणी ना कोणी ब्रिटिश मुत्सद्यांना व मुसलमानांना इष्ट अशा प्रकारें मान्य केल्या होत्या त्या जातीय निर्णयानें वज्रलेप झाल्या ! जात, पंथ, वर्ग, धर्म, हितसंबंध (Interest) इत्यादि शब्दांनीं निर्दिष्ट होणारे लोकसमूह दोरीसूदपणानें विभागलेले नसतात, अशा गोष्टी दृष्टीसमोर ठेवून समाजाची उभी-आडवी विभागणी करीत गेल्यास समाजाची शुद्ध चाळण बनेल इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींकडे साफ दुर्लक्ष होऊन, स्वतंत्र मतदारसंघांची नुसती खैरात झाली ! ज्यांनीं मागितले त्यांना तर हे मतदारसंघ मिळालेच; पण, ते न मागणाऱ्या भगिनीवर्गावरहि ते लादण्यांत आले !

जमलेल्या जातीय पुढाऱ्यांत मतैक्य होत नाहीं हें पाहून मॅक्डोनल्ड साहेबांनीं हा वादग्रस्त प्रश्न निकालांत काढण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. 'तुम्ही आपसांत सहमत होत नसाल तर लखनौ करारांतील तत्त्वांचीच परिस्थित्यनुरूप अंमलबजावणी होईल' असें ब्रिटिश पंतप्रधानांनीं टांसून सांगितलें असतें तर, लंडनमध्यें गोळा झालेले सारे दाढेदीक्षित ताड्कन् शुद्धीवर आले असते ! पण, राजकारणी पुरुष व्यवहार करूं लागले कीं, त्यांच्या उदात्त तत्त्वांचा नुसता इतिहास बनतो आणि त्यांच्या प्रत्यक्ष आचारावर स्वार्थाचीच घनदाट छाया पडते हा मोर्लेच्या वेळेपासून आलेला अनुभवच याहि वेळीं पुनरुक्त झाला. त्यांनीं दिलेला जातिनिर्णय सर्वच हिंदूंच्या दृष्टीनें घातकी ठरला. बंगाली हिंदूंच्या दृष्टीनें तर तो फारच घातकी ठरला ! दुर्दैवी सवर्ण बंगाली हिंदूंचें दैव असें खडतर कीं, मॅक्डोनल्ड-साहेबांनीं केलेल्या या अन्यायांत भर घालण्याला गांधीजी कारणीभूत झाले!

प्राणांतिक उपोषणाचें पिस्तुल हिंदुसमाजावर रोंखून व त्या 'अहिंसक' शस्त्राचे बार साऱ्या जगभर ऐकूं जातील याची दक्षता घेऊन, गांधीजींनीं जो पुणेंकरार घडवून आणला त्यानें शेवटीं कोणाचेंच समाधान झालें नाहीं! पूर्वास्पृष्टहि त्या कराराविरुद्ध जळफळत आहेत आणि बंगालमधील सवर्ण हिंदु तर त्या कराराची आठवण झाली कीं नुसते रागानें लाल होत आहेत!

> गेल्या युद्धांत हिंदुस्थाननें साम्राज्याला मनोभावें मदत केली तिचें बक्षिस म्हणून जालियनवाला बागेंतलें हत्याकांड पदरांत पडलें ही हिंदु राष्ट्रभक्तांची तक्रार अगदीं रास्त आहे. पण, त्या-बरोबरच त्यांनीं तितक्याच त्वेषानें हीहि तक्रार केली पाहिजे कीं, मुसलमानांच्या मोहबतीखातर खिलाफतीच्या चळवळीप्रीत्यर्थ हिंदूंनीं सर्व प्रकारें जी मदत केली तिचा मोबदला म्हणून मुसल-मानांनीं त्यांना मोपला प्रकरणांतील हत्याकांडाचें खरपूस बक्षिस तर दिलेंच; पण त्याशिवाय, काळजाला कटचारीसारखें हरघडी रुतत राहणारें जातिनिर्णयरूपी बक्षिसहि त्यांनींच हिंदूंना दिलें!

कानाला गोड लागणारीं वचनें कृतीचा प्रसंग येतांच इंग्रजांकडून विसरलीं जातात व या वचनभंगामुळें भारतीयांचीं हृदयें कायमचीं विद्ध होतात ही हिंदु राष्ट्रभक्तांची तक्रार खरी आहे. पण, ती एकटया इंग्रजांविरुद्ध करून काय होणार! इंग्रजांनीं 'भाई' म्हणून तरी हिंदूंचा विश्वासघात केलेला नाहीं! भरल्यापोटीं व्याख्यान देतांना करावयाची शाब्दिक आतषबाजी म्हणून 'राजकारणाचें अध्यात्मीकरण आणि उदात्तीकरण' वगैरे शब्दप्रयोग हिंदूंनीं खुशाल, अवश्य वापरावे! पण, प्रत्यक्ष राजकारणाचा व्यवहार करावयाला बसण्यापूर्वी त्यांनीं हे सारे शब्दप्रयोग बाटलींत कोंबून टाकावे व त्या बाटलीवर 'Poison' (विष) ही ठळक चिठी त्यांनीं लालभडक शाईनें लिहून लावावी! जगांतील राष्ट्रें व भोंवतालचे समाज पाशवी मनोरचनेंतून (Animalism) अद्याप पुरतेपणीं बाहेरहि पडावयाचे आहेत; तोंच हिंदुसमाजानें फाजील बुद्धिवादापर्यंत (Rationalism) मजल मारली यांतच हिंदुसमाजाच्या ऐहिक अपकर्षाचीं बीजें सांठलेलीं आहेत! साऱ्या अहिंदुसमाजांत भिनलेल्या पाशवी प्रवृत्तीइतपत तरी पाशवी

मनोवृत्ति हिंदुसमाजाच्या सगळ्या थराथरांतून खेळूं लागली तरच हा समाज भविष्यकाळीं ऐहिक उत्कर्षाच्या मार्गाला लागूं शकेल व त्या मार्गावर टिकूं शकेल !

> या प्रवृत्तीची जोपासना व उपासना करण्याऐवजीं हिंदु माणसें राजकारणाचें अध्यात्मीकरण व उदात्तीकरण यांची भाषा बोलूं लागतात हा हिंदूंच्या ऐहिक उत्कर्षाला होत असलेला अपशकुनच होय !

जातिनिर्णयानें हिंदूंवर कोणते अन्याय झाले व त्या निर्णयामुळें मुसलमानांचीं जागृतिस्वप्नें संपूर्णतया कशीं सफल झालीं याचें विवेचन डॉ० आंबेडकर यांनीं थोडक्यांत पण मार्मिकपणानें केलें आहे (पृ. ९७–१०६). जातिनिर्णयामुळें जातीय प्रश्नाच्या अल्पार्थक स्वरूपावर (lesser intent) व स्थूलार्थक स्वरूपावर (greater intent) कोणते परिणाम घडले हें डॉ. आंबेडकरांच्या मूलग्राही विवेचनाचें सार लक्षांत आल्यानें चांगलें पटेल. प्रत्येक विधिमंडळांत हिंदु व मुसलमान यांच्या प्रतिनिधींची संख्या किती असावयाची व या प्रतिनिधींची निवड ज्या मतदारसंघांनीं करावयाची ते मतदारसंघ कोणत्या स्वरूपाचे असावयाचे या प्रश्नांचा अंतर्भाव जातीय प्रश्नाचें 'अल्पार्थक स्वरूप' या शब्दप्रयोगांत होत असल्याचें सांगून डॉ० आंबेडकर यांनीं पुढील उद्गार काढिले आहेत:

The award gave the Muslims all that they wanted without caring for the Hindu opposition.*

(हिंदूंच्या विरोधाची बिलकूल पर्वा न करतां जातिनिर्णयानें मुसलमानांचें सर्व म्हणणें मान्य केलें.) मोर्ले-मिंटो सुधारणांच्या वेळीं मुसलमानांनीं मिळविलेले स्वतंत्र मतदारसंघ कायम राहिले, ज्या प्रांतांतून मुसलमान वस्तीचें प्रमाण कमी आहे अशा मुंबई, मद्रास, संयक्तप्रांत, वगैरे प्रांतांतून मुसलमानांना जें जादा प्रतिनिधित्व (Weightage) मिळालें होतें तें कायम राहिलें आणि बिहार, ओरिसा वगैरे जे नवे हिंदुप्रधान प्रांत निर्माण झाले त्यांनाहि तें तत्त्व लावण्यांत आलें. लखनौ-करारान्वयें देवाणघेवाणीच्या तत्त्वानुसार बहुसंख्य मुसलमान वस्तीच्या पंजाब व बंगाल प्रांतांमध्यें हिंदूंना

*Thoughts on Pakistan, p. 98.

जें एक प्रकारचें जादा प्रतिनिधित्व मिळालें होतें तें मात्र रद्द करण्यांत आलें ! या दोन्ही प्रांतांतून मुसलमानांचें बहुमत कायद्यानें सिद्ध केलें. सिंध व सरहद्द प्रांत हे दोन प्रांत नव्यानें निर्माण झाले. त्यांत मुसलमानांची लोकवस्ती अधिक असल्यामुळें, तेथेंहि मुसलमानांसाठीं कायदेशीर जातीय बहुमत निर्माण करण्यांत आलें. या व्यवस्थेंत नेमका अन्याय कोणता, या व्यवस्थेवर कोणती टीका निरपवादपणें करतां येईल हें सांगतांना डॉ. आंबेडकरांनीं मांडलेले मुद्दे फार चांगले आहेत. ज्या प्रांतांतून मुसलमान अल्पसंख्य आहेत तेथें, स्वत:चें हितरक्षण कोणत्या उपायानें होईल हें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार ठरवून, मुसलमानांनीं स्वेच्छेनें स्वतंत्र मुसलमान मतदारसंघ मागितले व पर्यायानें असें कबूल केलें कीं, बहुमतावर परिणाम घडवून आणून त्या बहुमताचें परिवर्तन करण्याचा अल्पमतवाल्यांचा स्वयंभू हक्क सोडण्यास आम्ही तयार आहों. ज्या प्रांतांत हिंदु अल्पमतवाले आहेत त्या प्रांतांतल्या अल्पसंख्य हिंदूंना स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा फायदा मिळालेला नाहीं. आपलें हितरक्षण संयुक्त मतदारसंघांच्या मार्गानें होईल असें त्यांना निश्चित वाटत असूनहि, त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून, त्यांच्यावर स्वतंत्र मतदारसंघ लादण्यांत आले—या गोष्टी अत्यंत आक्षेपार्ह व अन्याय्य आहेत असें डॉ. आंबेडकरांनीं म्हटलें आहे.

जातीय निर्णयाच्या स्थूलार्थक स्वरूपांत (greater intent) मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या प्रांतांची नवनिर्मिति हा मुद्दा उत्पन्न होतो. लखनौ-कराराच्या वेळीं फक्त पंजाब व बंगाल हेच दोन प्रांत असे होते कीं, तेथील एकंदर लोकवस्तींत मुसलमानांचें प्रमाण इतर सर्व धर्मातल्या लोकांच्या मानानें शेंकडा २-३ इतकें तरी जास्त होतें.

> धार्मिक दृष्ट्या बहुसंख्य वर्ग व उरलेले वर्ग यांमध्यें संख्याश्रेष्ठत्वाचें अंतर इतकें थोडें असल्यामुळें, या प्रांतांतून तरी संयुक्त मतदारसंघ निर्माण करण्याला कोणतीच हरकत नव्हती.

सगळ्या प्रांताच्या लोकसंख्येचा विचार केल्यावर मुसलमान केवळ शेंकडा २–३ इतक्या तोकड्या प्रमाणांत बहुसंख्य ठरतात म्हणून त्यांचें कौन्सिलांतलें बहुमत कायद्यानें कायमचें प्रस्थापित करावयाचें तर, बंगाल व पंजाब या दोन्ही प्रांतांतून, ज्या सलग जिल्ह्यांतून मुसलमानेतरांचें निश्चित संख्याधिक्य

आहे त्या जिल्ह्यांचा विचार स्वतंत्र रीत्या व्हावयाला पाहिजे होता. पंजाब-मधील हिसार, रोहटक, गुरगांव, कर्नाळ, अंबाला, सिमला, कांग्रा, होशियार-पूर, जालंदर, लुधियाना, फिरोजपूर, अमृतसर व गुरुदासपूर या १३ जिल्ह्यांत मुसलमान हे अल्पसंख्य आहेत.* गुरुदासपूर जिल्ह्यांत मुसलमान सर्वांत जास्त म्हणजे शेंकडा ५० आहेत तर कांग्रा जिल्ह्यांत ते सर्वांत कमी म्हणजे शेंकडा फक्त ५ आहेत. पंजाबचे १७ जिल्हे उरले. त्यांत लाहोर जिल्ह्यांत मुसलमानेतरांचें प्रमाण बरें असलें तरी, मुसलमान शेंकडा ५९.९ आहेत. सरहद्दीपलीकडचा बलुची मुलुख एकत्र करून जो जिल्हा बनविण्यांत आला आहे त्यांत मुसलमान शें० ९९.९ आहेत आणि ज्या अटकेवर मराठ्यांनीं झेंडे नाचविले त्या अटक भागांत मुसलमानांची वस्ती शेंकडा ९१ आहे. बंगाल-मध्यें बरद्वान, बीरभूम, बंकुरा, मिदनापूर, हुगळी, हावरा, हावरा शहर जिल्हा, चोवीस परगणे जिल्हा, डाक्का शहर जिल्हा, कलकत्ता, कलकत्ता उपनगर जिल्हा, खुल्ना, जलपैगुरी, दार्जिलिंग या १४ जिल्ह्यांत मुसलमानेतरांचें संख्याधिक्य आहे.† खुल्ना जिल्ह्यांत मुसलमान शेंकडा ४९.३ आहेत तर दार्जिलिंग जिल्ह्यांत मुसलमान फक्त २.५ आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या जिल्ह्यांशिवाय उरलेल्या १६ जिल्ह्यांत मुसलमानांची लोकसंख्या इतरांहून अधिक आहे. मुर्शिदाबाद व दिनाजपूर या जिल्ह्यांत हें आधिक्य बेताचेंच आहे; कारण, या दोन्ही जिल्ह्यांतलें मुसलमानवस्तीचें प्रमाण शेंकडा ५०.५ आहे.

हिंदुबहुसंख्य प्रांतांत मुसलमान लोकसंख्या अल्पप्रमाणांत असली तरी तिला कोणताच धोका नाहीं, हें मुसलमानांना मनांतून मान्य आहे व सरकार-लाहि ती गोष्ट पटत असली पाहिजे. शिवाय, स्वतंत्र मतदारसंघांमुळें कायमचें अल्पसंख्य राहण्यांत व हिंदूंना कायमचें बहुमत देण्यांत या प्रांतांतल्या मुसलमानांना धोका असलाच तर, त्यांनीं तो धोका उघड्या डोळ्यांनीं पत्करला आहे. त्या प्रांतांत मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ दिले ते त्यांनीं मागितले म्हणून दिले ! मुसलमानांच्या थोड्याशा संख्याधिक्यामुळें मुसल-मानेतरांना कायमचें अल्पसंख्य ठेवतांना असा कांहींहि प्रकार झालेला नाहीं.

*Thoughts on Pakistan, p. 355.
†Thoughts on Pakistan, p. 356.

पंजाब, सिंध, बंगाल, वायव्य सरहद्दप्रांत या प्रांतांतल्या मुसलमानेतरांनीं स्वतंत्र मतदारसंघांची मागणी विरोधिली असूनहि, स्वतंत्र मतदारसंघ त्यांच्यावर लादण्यांत आले. बंगाल व पंजाब या दोन महत्त्वाच्या प्रांतांतून जवळजवळ निम्म्या जिल्ह्यांतून मुसलमानांचें बहुमत नाहीं, या गोष्टीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष झालें.

> ज्या प्रांतांतून मुसलमानांची बहुसंख्या आहे त्या प्रांतांत कायद्यानें मुसलमानांचें बहुमत प्रस्थापित करण्यांत यावें या मुसलमानांच्या मागणींत कोणते दुष्ट हेतु दडून बसलेले आहेत हें न कळण्याइतकें सरकार वेंधळें नाहीं !

मुंबई, मद्रास वगैरे प्रांतांतल्या हिंदूंनीं तेथील अल्पसंख्य मुसलमानांचा छळ केला तर सिंध, बंगाल, पंजाब, सरहद्दप्रांत वगैरे भागांतल्या हिंदूंचा छळ करण्याचें शस्त्र आमच्या हातीं परजत राहिलें पाहिजे व त्यासाठीं आम्हांला हे सर्व प्रांत स्वायत्त व्हावयाला पाहिजेत अशा आशयाची विचारसरणी उत्तर हिंदुस्थानी मुसलमानांच्या मनांत १९२४–२५ पासून खेळत होती !

> हिंदुमहासभेला 'जातीय संस्था' या निंदागर्भ शब्दाचा अहेर करणाऱ्या, स्वतःच्या नामधारी 'राष्ट्रीय'त्वाची मिजास मारणाऱ्या व स्वतःची सरड्याची धांव जगतांत शस्त्रसंन्यास घडवून आणण्याइतकी प्रभावशाली आहे अशा शेखमहंमदी स्वप्नांत रंगून जाणाऱ्या 'हिंदी राष्ट्रीय' सभेचे सध्यांचे 'राष्ट्रीय' अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद यांनीं १९२७च्या डिसेंबर महिन्यांत कलकत्त्याच्या मुस्लीमलीगचे अध्यक्ष म्हणून जें भाषण केलें त्यांत या मुद्याचें विवेचन खुल्या दिलानें केलेलें आहे.

ते म्हणाले :

By the Lucknow pact, Muslims had sold away their interests. The Delhi proposals of March last opened the door for the first time to the recognition of the real rights of Mussalmans in India. Their existing small majority in Bengal and the Punjab was only a census figure; but the Delhi proposals gave them for the first time five provinces of which no less than three contained real overwhelming

Muslim majority. *If the Muslims did not recognise this great step, they were not fit to live.* There would now be nine Hindu provinces against five Muslim provinces and *whatever treatment Hindus accorded in the nine provinces, Muslims would accord the same treatment to Hindus in the five provinces. Was not this a great gain ? Was not a new weapon gained for the assertion of Muslim rights ?**

(लखनौचा करार करून मुसलमानांनीं आपले हितसंबंध विकून-टिकून घालवून टाकले होते ! गेल्या मार्च महिन्यांत दिल्लीस झालेल्या वाटाघाटींतून ज्या सूचना पुढें आल्या त्यांच्यामुळें, भारतीय मुसलमानांच्या खऱ्या हक्कांना मान्यता मिळण्याचा मार्ग प्रथम खुला झाला ! पंजाब व बंगालमध्यें मुसलमानांचें सध्यां जें संख्याधिक्य आहे तें अगदीं अल्प आहे. शिरगणतींतल्या कागदपत्रांतला एक निर्जीव आंकडा इतकेंच त्याचें महत्त्व ! दिल्लीच्या सूचनांमुळें मुसलमानांना प्रथमच पांच स्वतंत्र प्रांत मिळत आहेत. यांपैकीं निदान तीन प्रांतांत तरी मुसलमानांचें संख्याधिक्य अगदीं घसघशीत आहे ! हा उपक्रम किती महत्त्वाचा आहे हें जर मुसलमानांना कळत नसेल तर त्यांनीं जगावें तरी कशाला ! हिंदूंचे नऊ प्रांत व त्यांच्याविरुद्ध मुसलमानांचे पांच प्रांत † अशी घडी आतां बसणार !

> नऊ प्रांतांतल्या हिंदूंकडून मुसलमानांना ज्या तऱ्हेनें वागविण्यांत येईल त्याच तऱ्हेनें पांच प्रांतांतले मुसलमान तेथील हिंदूंना वागवितील ! हा एक मोठा फायदाच नव्हे काय ? मुसलमानांच्या हक्कांची हडसूनखडसून अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनें हें एक नवें हत्यारच मुसलमानांना मिळालें, असें नव्हे का ?

अकरा प्रांतांत प्रधानमंडळें नांदत होतीं त्या अवधींत कॉंग्रेसछाप हिंदु मंत्र्यांनीं मुसलमानांचा छळ कितीसा केला ! मुळींच नाहीं ! उलट या कुऱ्हाडीच्या दांड्यांनीं गोतास काळ बनून, हिंदूंचा मात्र मनस्वी छळ केला !

*डॉ० आंबेडकरांच्या ग्रंथांत पृ० १०४–०५ वर उद्धृत केलेला उतारा.

†बंगाल, पंजाब, सिंध, सरहद्दप्रांत व बलुचिस्थान हे पांच मुसलमान-प्रांत; सध्यांच्या हिंदुस्थानांतले उरलेले सात प्रांत; कर्नाटक व आंध्र विभक्त होतील या अंदाजानें मौलाना बोलले असावे !

बनारस शहरांत दंडेली केली अहिंदूंनीं; आणि पं० गोविंद वल्लभपंतांनीं अपमानकारक नियंत्रणें घातलीं बनारसच्या हिंदूंवर! मौलानांच्या मुठींत गेलेल्या महात्माशिष्यांनीं हिंदीच्या नांवानें ऊर्दूचे स्वैरसंचार चालूं दिले! ते मान्य न करणाऱ्या मद्रासमधील हिंदूंना राजाजींनीं अहिंसात्मक तुरुंग दाखविला!

> 'माझें तें माझें, तुझें तें माझ्या काकाचें' हा न्याय अंमलांत येतो व अल्पसंख्याकांचे लाड पुरवितांपुरवितां हिंदूंनाच शेवटीं अन्याय होतो, हें मुंबई ॲसेंब्लीच्या काँग्रेसपक्षीय हिंदूंनाहि हळुहळू पटूं लागलें होतें. आमदार सौ० अन्नपूर्णाबाई देशमुख, आमदार बाबुभाई पटेल व नामदार मुरारजी भाई देसाई यांचीं ॲसेंब्लींतलीं कांहीं भाषणें या दृष्टीनें पाहण्यासारखीं आहेत.

असा सगळा प्रकार असतां, मुसलमानांनीं आपल्या गाऱ्हाण्यांची यादी तयार असावी म्हणून 'पिरपूर' रिपोर्ट तयार केला! या पिरपूर रिपोर्टाची पिरपीर पूर्णपणें पिळपिळीत आहे, हें कोणालाहि सहज कळण्यासारखें आहे!

बंगालमधील हिंदूंना सतावून सोडण्याची भाषा उघडपणें उच्चारण्याआधींच हक्क मंत्रिमंडळानें हिंदूंना कायद्याच्या आधारानें सतावण्याला सुरुवात केली होती. पंजाबमधील शिकंदरी मंत्रिमंडळानें हिंदूंना बाधक असे कांहीं कायदे पास केल्यामुळें, डॉ० गोकुळचंद नारंग यांच्यासारख्या सात्त्विक प्रवृत्तीच्या गृहस्थांचाहि राग अनावर झाला व त्यांना पंजाबभर तुफानी दौरे काढून हे अन्याय वेशीवर टांगावे लागले! सिंधप्रांतांत तर मध्यंतरीं कांहीं दिवस असे गेले कीं, त्या काळांत हिंदूंचें जीवित व मालमत्ता यांना कोणत्याच प्रकारची सुरक्षितता लाभूं शकत नव्हती! डॉ० खानसाहेब यांचें मंत्रिमंडळ सरहद्दप्रांतांत नांदत होतें त्या काळांत तेथील हिंदूंच्या अपहरणादि प्रकारांच्या बातम्यांचा जितका सुळसुळाट झाला होता तितका, हें मंत्रिमंडळ अधिकारच्युत झालें तेव्हांपासूनच्या काळांत झालेला नाहीं! तात्पर्य असें कीं, मौलाना अझाद यांनीं केलेलें भविष्य मुसलमान प्रांतांनीं तंतोतंत खरें करून दाखविलें! हिंदु प्रांतांत तें खरें होणें शक्य नव्हतेंच! मुसलमान प्रांतांतल्या अत्याचारांचें व अन्यायांचें समर्थन व्हावें म्हणूनच

कीं काय, कॉंग्रेस मंत्रिमंडळांच्या अधिकारसंन्यासानंतर बॅ० जीनांनीं ' मुक्ति-दिनाचें ' नाटक हिंदुस्थानभर रंगविलें !

सिंध, सरहद्दप्रांत, बंगाल, पंजाब, या प्रांतांतल्या हिंदूंना छळण्याची सत्ता जातीय निर्णयानें—म्हणजे ब्रिटिश सरकारनें—त्या प्रांतांतल्या मुसलमानांच्या हातीं दिली हें तर अरिष्ट आहेच ! पण, या सत्तेच्या आर्थिक स्थैर्याची जबाबदारी त्यांनीं प्रायः हिंदूंवर टाकली ही गोष्ट नुसती अनिष्ट नसून ती उपमर्दकारक आहे.

> सिंध-सरहद्द प्रांतांतल्या हिंदूंना तेथील मुसलमानांनीं प्रांतिक स्वायत्ततेच्या नांवावर छळीत बसावयाचें आणि आपल्या राष्ट्र-बंधूंचा व धर्मबंधूंचा हा छळ सुसूत्र चालावा म्हणून प्रायः हिंदूंनींच प्रतिवर्षी २ कोटी ५ लक्ष रुपये द्यावयाचे अशी व्यवस्था या जातिनिर्णयानें व तदंगभूत व्यवस्थेनें अस्तित्वांत आलेली आहे.

सिंधप्रांतांतली प्रांतिक स्वायत्तता शाबूत राहावी म्हणून मध्यवर्ति सरकार सिंधच्या प्रांतिक सरकारला प्रतिवर्षी १ कोटि ५ लक्ष रुपये मदतीदाखल देत असतें ! सरहद्दप्रांताच्या स्वायत्ततेसाठीं अशीच १ कोट रुपयांची चांदरात झडत असते ! प्राप्तीवरील कर, पोस्टखात्याचें उत्पन्न, रेल्वेचें उत्पन्न, जकातीचें उत्पन्न अशा मार्गांनीं मध्यवर्ति सरकारची तुंबडी भरते. या तुंबडींतला फार मोठा भाग हिंदुप्रांतांकडून वसूल केला जातो. वसूल देणारे जर हिंदु प्रांत तर त्या पैशाच्या उपभोगाचे स्वामी मुख्यतः हिंदु-प्रांतच असले पाहिजेत ! पण, उपभोगाचे स्वामी आहेत मुसलमान प्रांत !

> हिंदी सैन्याप्रीत्यर्थ मध्यवर्ति तिजोरींतून जाणारा पैसा पंजाब व सरहद्द प्रांत या बकासुरांच्या भक्ष्यस्थानीं पडतो आणि सरहद्द प्रांत व सिंध हे दोन मुसलमान प्रांत वार्षिक मदत म्हणून २ कोटी ५ लक्ष रुपये हातोहात लांबवितात !

इंग्लंडांत राहून व हिंदी लोकांचें पेन्शन खाऊन हिंदुस्थानच्या आकांक्षांना अपशकुन करणाऱ्या बुद्रुक आय० सी० एस० मंडळीला दूषणें देण्याचा हिंदूंना हक्क आहेच आहे. पण, देशबंधु म्हणून गळयांत पडणाऱ्या व भारताच्या अखंडत्वाच्या ध्येयाच्या नरडीला नखच लावण्याला प्रवृत्त झालेल्या मुसल-मानांनाहि तींच व तितकींच दूषणें लाविलीं पाहिजेत, हें हिंदूंनीं विसरूं नये !

चालू महायुद्ध सुरू झाल्यापासून मध्यवर्ति सरकारनें करांत पुष्कळ वाढ केली आहे. युद्ध चालवावयाचें म्हणजे करवाढ टाळतांहि येणार नाहीं ! उद्यां राष्ट्रीय सरकार अधिकारावर आलें तरी त्यालाहि कर कमी करतां येतीलच, असें नाहीं ! कर कमी करण्याचीं वचनें विश्वासार्ह नसतात हें काँग्रेस मंत्रिमंडळांच्या औटघटकेच्या कारभारावरूनहि सिद्ध झालें आहे. तेव्हां करवाढीविरुद्ध तक्रार करण्यांत मतलब नाहीं. पण, करवाढ करून नवा पैसा उत्पन्न करूं पाहणाऱ्या सरकारनें, पूर्वींचा सारा पैसा न्यायानें खर्च होतो हें प्रजेला पटवून दिलें पाहिजे. युद्ध सुरू झाल्यानंतर बड्या पगारांचे अधिकारी नेमले ही तक्रार या दृष्टीनें पूर्ण समर्थनीय ठरते. तशीच एक समर्थनीय तक्रार सिंध-सरहद्द प्रांतांना मिळणाऱ्या मदतीच्या बाबतींत करण्यासारखी आहे. आमच्या धर्मबंधूंचा व राष्ट्रबंधूंचा छळ करणाऱ्या सिंध व सरहद्द प्रांतांत स्वायत्तता नांदावी म्हणून दरसाल २ कोटी ५ लक्ष रुपये करांचा बोजा सहन करण्याची आमची तयारी नाहीं,

> या प्रांतांना देण्यांत येत असलेली ही मदत बंद करून, मध्यवर्ति सरकारनें प्रथम ती रक्कम युद्धकार्याकडे वळती करून घ्यावी व मग जो पैशाचा तुटवडा पडेल त्याच्यासाठीं करवाढ करावयाची कीं काय तें पाहावें, असें हिंदूंनीं मध्यवर्ति सरकारला कां म्हणूं नये ?

या प्रांतांना मिळणाऱ्या मदतीची योजना घटनेंत केलेली आहे ही सबबहि पुरी पडणार नाहीं, असें वाटतें ! सरकारच्या सोईसाठीं घटना चटकन् बदलतां येते ही गोष्ट युद्ध सुरू झाल्यापासून व युद्धाचे ढग आकाशांत गोळा होऊं लागल्यापासून, दोन वेळां तरी स्पष्ट झाली आहे. तसाच बदल या प्रकरणीं कां होऊं नये ? या प्रांतांना मिळावयाच्या मदतीची योजना घटनेनें झाली त्या वेळीं मामुली परिस्थितींत नांदणारी घटनाच डोळ्यापुढें होती. युद्धकाळांत हिंदु प्रांतांनीं वाढत्या करांचे बोजे सोसावे व या मिजासखोर प्रांतांनीं मध्यवर्ति सरकारकडून मिळणाऱ्या मलिद्यावर जगावें हा हेतु घटनेंत अभिप्रेत नव्हता व नाहीं, अशी तक्रार हिंदुमहासभेनें व नेमस्तादि न्यायनिष्ठुर पक्षांनीं कां करूं नये ?

जातीय निर्णयामुळें मुसलमानांचे सर्व हेतु सिद्ध झाले; हिंदूंचें मात्र त्यामुळें

सर्वच बाजूंनीं नुकसान झालें ! हिंदूंचें नुकसान कसें व किती झालें हें पाहण्यासाठीं या निर्णयाची आणखी थोडी छाननी करणें जरूर आहे. १६ ऑगस्ट १९३२ रोजीं सिमल्याहून प्रसिद्ध करण्यांत आलेल्या या निर्णयापूर्वी सरकारनें असें जाहीर करून ठेविलें होतें कीं, या निर्णयामुळें सर्वांचें सर्वतोपरी समाधान होणार नाहीं, हें सरकारला विदित आहे. हिंदूंशिवाय इतर कोणाचेंहि या निर्णयामुळें नुकसान झालें नाहीं ! इतरांनीं त्याविरुद्ध ओरडण्याचें कांहीं कारण नव्हतें ! पण, कांहीं धूर्त मुसलमान पुढाऱ्यांनीं जातिनिर्णय प्रसिद्ध झाल्यावर नक्राश्रु ढाळलेच ! जातिनिर्णयांत विचार केलेला आहे तो फक्त प्रांतांचाच केला आहे; आणि, असा विचार करून अल्पसंख्याकांच्या प्रश्नाची समाधानकारक रीतीनें वासलात लावणाऱ्या कोणाहि प्रामाणिक माणसाला ही गोष्ट सुचली पाहिजे कीं, मुसलमान, शीख, हिंदी ख्रिस्ती, अँग्लो-इंडियन व युरोपियन यांचे स्वतंत्र मतदारसंघ प्रत्येकीं भिन्न भिन्न असे मान्य करून, हिंदूंना सर्वसाधारण मतदारसंघांत कोंबणें हें सर्वच प्रांतांत शक्य नाहीं.

> मतदारसंघांची ही फाळणी कोणत्या तत्त्वावर झाली, हेंहि स्पष्ट नाहीं. धर्मभेदानुसार झाली म्हणावी तर पारशी लोक हिंदूंहून धर्मदृष्ट्या भिन्न असल्यामुळें, त्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाला पाहिजे होता. त्यांना हिंदूंच्या बरोबर कोंबून टाकणें तर्कशुद्ध नव्हतें. ख्रिस्ती, अँग्लो-इंडियन व युरोपियन हे सगळे एकाच ख्रिस्ताचे अनुयायी असल्यामुळें, त्यांना तीन मतदारसंघ देऊन त्यांचें महत्त्व वाढविण्याचें कारण नव्हतें !

सर्व तऱ्हेचीं फाऊन्टन पेन्स विकत मिळतात
व
रिपेअर केलीं जातात.
काळे ब्रदर्स
फाऊन्टन पेन्सचे व्यापारी
फरासखाना हौदानजीक, पुणें २.

प्रांतिक बहुसंख्य समाज व प्रांतिक अल्पसंख्य समाज अशी विभागणी करून 'मेजॉरिटी' व 'मायनॉरिटी' असें नुसतें म्हटल्यानें वास्तविक काम भागलें असतें. मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा व आसाम हे प्रांत हिंदुप्रांत असल्यामुळें, तेथें हिंदु हे 'मेजॉरिटी' म्हणून मान्यता पावले असते; व सर्व अहिंदूंचा मिळून जो अल्पसंख्य गट राहिला असता त्याच्या न्याय्य हितसंबंधांचें रक्षण व्हावें म्हणून काय योजना करावयाची ती शास्त्र-शुद्ध पद्धतीनें करतां आली असती. या सर्व प्रांतांतून अहिंदु समाजाच्या लोकसंख्येचें मान ज्या प्रमाणांत आहे त्याच्या किती पटीनें वाढ प्रतिनिधि-प्रमाणांत झाल्यानें अल्पसंख्याकांचें संरक्षण होऊं शकेल, हें मग न्यायानें ठरवितां आलें असतें; व या सर्व अल्पसंख्य गटांचा एकगठ्ठा संयुक्त मतदारसंघ तयार केल्यानें, निदान या अल्पसंख्याकांमध्यें तरी एकत्वभावना व परस्परा-वलंबन यांची वाढ झाली असती! मुंबई व मद्रास या इलाख्यांतून मुसलमान, ख्रिस्ती (युरोपियन व अँग्लोइंडियनसुद्धां), पारशी, यहुदी, इत्यादींची मिळून लोकसंख्या १० टक्के आहे असें क्षणभर मानलें तर, त्या सर्वांना मिळून प्रतिनिधि-संख्येंत शेंकडा शंभर वाढ करून, २० टक्के प्रतिनिधित्व दिल्यानेंही फारसें बिघडलें नसतें. मात्र, हिंदुप्रधान प्रांतांना लावावयाचा हा न्याय मुसलमानप्रधान प्रांतांनाही लावावा लागला असता. मुंबईंत शेंकडा ९० हिंदु आहेत, म्हणून त्यांनीं जर सर्व अहिंदूंना मिळून शेंकडा १०च्या ऐवजीं शेंकडा २० जागा द्यावयाच्या तर सिंधमध्यें शेंकडा ७३.७ इतक्या बहुसंख्येनें असणाऱ्या मुसलमानांना, त्यांचें नैसर्गिक संख्याधिक्य टिकावें असें धरलें तरी, सर्व मुसलमा-नेतरांना मिळून ४०–४५ टक्के जागा सोडाव्या लागल्या असत्या. कारण, सिंधमध्यें नुसते हिंदूच २५ टक्के आहेत. या न्यायानें विचार झाला असता तर पंजाबबंगालमध्यें संयुक्त मतदारसंघांची स्थापना करणें हाच एक व्यवहार्य मार्ग आहे असें मान्य करावें लागलें असतें. आणि सरहद्द प्रांत वगळून इतर सर्व प्रांतांतल्या हिंदूंना सध्यांपेक्षां किती तरी जास्त समाधान मिळण्याचा संभव निर्माण झाला असता! पण, जातिनिर्णयाच्या मांडणींत अल्पसंख्याक वर्गांचें हितसंरक्षण ही बुद्धि नाममात्रच असल्यामुळें व हिंदूंना हरतऱ्हेनें अन्यायच करण्याची बुद्धि प्रबळ असल्यामुळें, या साध्या गोष्टी हि सरकारनें केल्या नाहींत.

जातिनिर्णयानें केलें काय हें खोलांत शिरून पाहण्यासारखें आहे. भांडवल-

वाले, जमीनदार, मजूरवर्ग, विद्यापीठें वगैरेंचे प्रतिनिधी जातिविचारातीत आहेत असें क्षणभर गृहीत धरलें तरी, या निर्णयानें उरलेल्या प्रतिनिधींची जातवारी पिंजून पिंजून किती बारीक केली, हें पाहण्यासारखें आहे. मुसलमान, युरोपियन, अँग्लोइंडियन, ख्रिश्चन, दलितवर्ग, शीख हे सहा मतदारसंघ पृथक् निर्माण केले आणि प्रायः हिंदूंचाच अंतर्भाव ज्यांत होतो अशा मतदार-संघाला सर्वसामान्य ही संज्ञा देऊन, मतदारसंघांना 'हिंदु' या नांवाचा स्पर्शहि होऊं नये, अशी दक्षता घेतली! आणखी पांचशें वर्षांनीं एकादा जबरदस्त धरणीकंप झाला व त्यानंतर एखाद्या संशोधकाच्या हातीं जातीय निर्णयाचा चिटोराच तेवढा लागला तर त्यानें खुशाल असें अनुमान काढावें कीं,विसाव्या शतकाच्या द्वितीय चरणांत हिंदुस्थानांत हिंदूंचें वास्तव्य नव्हतेंच! स्त्री प्रतिनिधींच्या जागा राखून ठेविल्या त्याहि जातवार मतदारसंघांतून! तरी बरें, ख्रिश्चन, शीख, अँग्लोइंडियन, युरोपियन, दलितवर्ग यांच्याहि गळ्यांत स्त्रियांच्या राखीव जागा अशाच तऱ्हेनें बांधल्या नाहींत!

याचा परिणाम काय झाला हें १९३५ च्या कायद्यांतलें पृ० २४५ वरील कोष्टक तपासलें म्हणजे नीट समजतें. मुंबई अॅसेंब्लीच्या प्रतिनिधींची एकूण संख्या १७५ आहे. त्यांतल्या १७ जागा अशा मानल्या जातात कीं, त्यांत जातवारीचा प्रश्न निघत नाहीं. कारण, या जागा मजूर, भांडवलवाले, विद्यापीठ इत्यादींच्या आहेत. सर्वसामान्य म्हणजे ज्यांत हिंदूच प्रमुख आहेत अशा मतदारसंघांत एकूण १२१ प्रतिनिधींचा समावेश होतो. यांपैकीं ५ जागा स्त्रियांच्या, १५ दलितवर्गाच्या, १ जागा मागसलेले भाग व जमाती यांची, अशी विभागणी आहे. या १२१ जागांपैकीं कांहीं जागा पारशांना मिळतात आणि सध्यांच्या अॅसेंब्लीचे तिघे पारशी सभासद डॉ० गिल्डर, वीर नरिमन व सर धनजीशहा कूपर हे याच सर्वसामान्य मतदारसंघांतून निवडून आले आहेत. हा बारीक विचार सोडला व १२१ जागा हिंदूंच्या मालकीच्या मानल्या तरी प्रमाण काय पडतें? जातवारीनें हिंदूंना १२१ जागा मिळाल्या असें मानलें तर, मुसलमानांना २९, अँग्लो इंडियनांना २, युरोपियनांना ३, व ख्रिस्त्यांना ३ अशा ३७ जागा अहिंदूंना मिळाल्या. अहिंदूंच्या बाजूला औदार्याचा कांटा कितीहि कलता ठेवला आणि त्यांच्या संख्याबलाच्या मानानें मिळणाऱ्या जागांपेक्षां दुप्पट म्हणजे १०० टक्के

चढावा करून त्यांना जागा द्यावयाच्या म्हटल्या तरी, त्यांना ३० पेक्षां एकहि अधिक जागा मिळतां कामा नये! पण, लोकवस्तींत फक्त शेंकडा ८ इतकें ज्यांचें प्रमाण त्या मुसलमानांना १२–१३ च्या ऐवजीं २९ जागा मिळाल्यावर कोणताहि न्याय व्हावाच कसा!

बंगालची स्थिति तर फारच विचित्र आहे. बंगाल ॲसेंब्लींत एकूण सभासदांची संख्या २५० आहे. मजूर, भांडवलदार अशा बिनजातवारीच्या मतदारसंघांचे प्रतिनिधी ३४ आहेत. म्हणजे जातवार संघांतून निवडून येणाऱ्या सर्व सभासदांची संख्या २१६ उरते. यांतले ११७ मुसलमान, ३ अँग्लोइंडियन, ११ युरोपियन, व २ ख्रिस्ती असे मिळून १३३ अहिंदु वगळले कीं, फक्त ८३ जागा हिंदूसाठीं शिल्लक उरतात. यांतच पूर्वास्पृष्टांचा अंतर्भाव व्हावयाचा आहे. हिंदु हे अल्पसंख्य म्हणून त्यांना संरक्षण देण्याचा प्रश्न दृष्टिआड केला तरी, शुद्ध लोकसंख्येच्या प्रमाणांत सुद्धां त्यांना शंभराच्या आसपास जागा मिळाल्या पाहिजेत! पण, मुसलमान हे बहुसंख्य असूनहि त्यांचे लाड लोकसंख्येच्या धारवाडी कांट्यानें पुरविण्याचें ठरविल्यावर आणि सगळ्यांना पुरून उरणाऱ्या युरोपियनांना संख्येच्या प्रमाणाचा काडिमात्र विचार न करतां ११ जागा देण्याचें ठरल्यावर, हिंदूंना विचारतो कोण!

> हिंदु हे या देशांतले सर्वश्रेष्ठ नागरिक! असें असून, मतदारसंघांच्या मांडणींत ते आगंतुकासारखे 'सर्वसामान्य' ठरले; त्याच वेळीं हा अन्याय त्यांच्या बोकांडीं बसला! 'आगंतूनामन्ते निवेशः' हा न्याय ठरलेलाच आहे! सगळ्यांचीं पोटें फुटेपर्यंत भरलीं म्हणजे मग हिंदूंचें पान कोपऱ्यांत मांडावयाचें व उरल्यासुरल्या शिळ्यापाक्या अन्नाचें समाधान त्यांना द्यावयाचें हेंच तर सरकारी धोरण आहे!

आणि तरी आमचे 'देशभक्त' गरजतात कीं, चारदोन जागांसाठीं भांडण्यांत काय मातब्बरी आहे! हे शहाणे मुसलमानांना अगर युरोपियनांना मात्र आपली एकहि जागा सोडायला सांगत नाहींत अगर सोडायला लावीत नाहींत! मुसलमानांना मिळालेला फायदा सोडायला लावण्याला 'टिळक' लागतात हें या देशभक्तांना काय माहीत! आणि मुसलमानांना या जागा सोडायला लावूनहि टिळकांनीं आपला बोज इतका राखला कीं, जीना अद्याप खाजगी

भाषणांत सांगतात : The Hindu community must produce a Tilak. (हिंदुसमाजांत फिरून टिळक अवतीर्ण झाले पाहिजेत!)

जातीय निर्णयाचें स्वरूप इतकें घातकी असूनहि कॉंग्रेसनें त्याचा निषेध करण्याच्या बाबतींत अळंटळं चालविली! १९३६ सालच्या निवडणुकींची वेळ आली! १९३४ सालच्या मध्यवर्ति ॲसेंब्लीच्या निवडणुकींत जातीय निर्णयाला महत्त्व आल्यामुळें, बंगालमध्यें कॉंग्रेसला चांगलीच चपराक बसली होती! त्यामुळें, १९३६च्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत कॉंग्रेसनें जातीय निर्णयाला खूप नांवें ठेविलीं; पण, त्या निर्णयाच्या विरुद्ध कांहीं चळवळविळवळ मात्र करावयाची नाहीं, असें ठरविलें! याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं, निवडणुकींत विजय मिळाल्यावर कॉंग्रेस घटनाभंग करणार असल्यामुळें, सगळ्या घटनेच्या भंगाबरोबरच तिचा अवयव जो जातिनिर्णय त्याचाहि भंग होऊन जाईल! पुढें घटना तर भंगलीच नाहीं; पण, राजीनामे देऊन कॉंग्रेसच्या मंत्र्यांना ऐन वेळीं अधिकारत्याग करावा लागल्यामुळें, देशांतील शांतता मात्र चांगलीच भंगली! हिंदु प्रांतांतली लोकसत्ता लुली पडल्यावर, मध्यवर्ति कारभारावर त्या सत्तेचें पडणारें वजन ढिलें झालें! मुसलमानप्रधान प्रांतांतली लोकसत्ता नांदती राहिल्यामुळें व त्या सत्तेनें ब्रिटिश सरकारशीं युद्धसहकार्य करण्याचें धोरण आंखल्यामुळें, त्या सत्तेचें स्तोम माजलें! सरकार व कॉंग्रेस या दोन्हींच्याहि दरबारांत आपली इभ्रत भलतीच वाढवून बसलेल्या जीनांना यामुळें चांगलेंच फावलें! पूर्वीं-पासून जीना व त्यांची लीग फेडरेशनला विरोध करीत होती, त्याचें कारण एकच होतें. त्यांना प्रांतांवरील मध्यवर्ति सरकारची सत्ता नको होती किंवा ती राहणारच असेल तर ती नाममात्र असावी, असें त्यांना वाटत होतें. प्रांत हे स्वतंत्र सार्वभौम घटक असावे अशी त्यांची पूर्वींपासून मागणी होती. या मागणीचें रूपांतर होऊनच 'पाकिस्तान'ची मागणी धाष्टर्यानें पुढें मांडण्यांत आली! 'पाकिस्तान मिळणार नाहीं हें मुसलमानांनाहि पक्कें ठाऊक आहे; त्यांना हिंदूंचें अधिराज्य नको आहे; व म्हणून वरिष्ठ सत्तेमधील निम्मेनिम वाटणी पदरांत पाडून घेण्याच्या हेतूनें त्यांनीं 'पाकिस्तान'चें पिशाच्च उठविलें आहे' असें कित्येक मनकवडे म्हणतात!

स्वाभिमानी हिंदूंना पाकिस्तानहि मान्य करून भागणार नाहीं व मध्यवर्ति अगर प्रांतिक सत्तेंत मुसलमानांना पन्नास टक्के जागाहि देतां येणार नाहींत. म्हणून, जीनांच्या म्हणण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून त्यांनीं आपल्या स्वाभिमानास साजेल असा स्वतंत्र मार्गच चोखाळला पाहिजे.

सरकारच्या कुशींत शिरून, आपल्या अज्ञानाचें व दारिद्र्याचें रडगाणें गाऊन, जरूर असेल तेव्हां हिंदूंची खुशामत करून व फिरून त्यांच्यावर साफ उलटून, मुसलमानांनीं गेल्या ८० वर्षांत आपलें स्तोम कसें माजवून ठेविलें हें ऐतिहासिक दृष्ट्या कळल्यानंतर तरी,कोणताहि स्वाभिमानी हिंदु ऐक्य प्रस्थापनेसाठीं मुसलमानांच्या मागें लागणार नाहीं ! स्वराज्य हा हिंदूंचा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मिळविल्याशिवाय त्यांना गत्यंतरच नाहीं ! पण, मुसलमानांच्या नादीं लागून तें मिळेल हा शुद्ध भ्रम आहे ! स्वराज्यप्राप्तीचे मार्ग अन्य आहेत. Hindu–Muslim unity may be the result of Swaraj; it can never be the cause of it (स्वराज्यप्राप्तीचा परिणाम म्हणून हिंदु-मुस्लीम ऐक्य साध्य होईल हें शक्य आहे; हें ऐक्य स्वराज्यप्राप्तीचें कारण मात्र असूं शकणार नाहीं) हे हुतात्मा स्वामी श्रद्धानंदजींचे उद्गार शब्दशः खरे आहेत. हें लक्षांत ठेवून, हिंदूंनीं स्वराज्यप्राप्तीचा आपला स्वतंत्र मार्ग शोधून काढिला पाहिजे.

---

ब्लॉकचें अगर डिझाइनचें
कोणतेंही काम आपणांस जलद गतीनें पाहिजे असल्यास
के. सी. भिडे ब्लॉकमेकर
यांच्याकडे चौकशी करा.
मोठ्या गांवीं एजंट नेमणें आहेत.
हुजुरपागा चौक, किताब बिल्डिंगसमोर. लक्ष्मी रोड, पुणें.

## प्रकरण ६ वें

# प्रांतांची अडाणी मांडणी

**हिंदुस्थान**च्या राज्यकारभारासाठीं पार्लमेंटनें जो कायदा १९३५ सालीं मान्य केला त्या कायद्याच्या ४६व्या कलमांत गव्हर्नरच्या प्रांतांची म्हणजे स्वायत्त प्रांतांची नांवनिशीवार यादी दिलेली आहे. मद्रास, मुंबई, बंगाल, संयुक्तप्रांत, पंजाब, बिहार, मध्यप्रांत (वऱ्हाडसह), आसाम, वायव्य सरहद्दप्रांत, ओरिसा व सिंध असे अकरा प्रांत स्वायत्त असल्याचें या कलमान्वयें जाहीर करण्यांत आलेलें असून, पूर्वी हिंदुस्थानांत समाविष्ट करण्यांत आलेला ब्रह्मदेश हा भाग हिंदुस्थानपासून अलग करण्यांत आला असल्याचेंहि याच कलमांत सांगण्यांत आलेलें आहे. या अकरा प्रांतांतले सिंध, पंजाब, व सरहद्दप्रांत हे तीन प्रांत मुसलमान लोकांच्या बहुसंख्य वस्तीचे प्रांत असून ते शेजारीं शेजारीं असल्यानें एका अर्थीं सलगहि आहेत. २६ मार्च १९४० रोजीं मुस्लीमलीगनें लाहोर येथील अधिवेशनांत एक ठराव संमत करून पाकिस्तानची मागणी जगजाहीर केली. या ठरावाच्या तिसऱ्या परिच्छेदांत प्रांतरचनेच्या ज्या तत्त्वांचा आग्रह धरण्यांत आलेला आहे तीं तत्त्वें या तीन प्रांतांना लागू पडत आहेत. भौगोलिक दृष्टया सलग असलेले भाग (Geographically contiguous units) आणि मुसलमानांची बहुसंख्य वस्ती असलेले भाग ( In which the Muslims are in a majority) यांची रचना अमुक तऱ्हेनें झाली तरच मुसलमान ती स्वीकारतील असें लीगनें या परिच्छेदांत बजावून सांगितलें आहे. लीगच्या कल्पनेशीं तंतोतंत जुळणारे हे तीन प्रांत हिंदुस्थानच्या वायव्य हद्दीवर उपस्थित झाले ते कांहीं केवळ योगायोगानें उपस्थित झालेले नाहींत. १९१९ च्या घटना कायद्यांत नसलेली प्रांतरचना १९३५ च्या कायद्यांत उमटली ती हेतुपुरस्सर उमटली आहे. नवी प्रांतरचना कायदेशीर रीतीनें मान्य होतांच त्या रचनेच्या मागें दडून बसलेला हेतु सहजच सफल होईल; व त्यानंतर पाकिस्तानचा संकल्प थोडया विलंबानें पण निश्चित साध्य होईल, या दूरदर्शी

धोरणानेंच ही प्रांतरचना करविण्यांत आलेली आहे. सध्यांच्या प्रांतांची संख्या, त्यांचें क्षेत्रफळ, त्यांतील लोकवस्तींतलें हिंदु-मुसलमानांचें प्रमाण इत्यादि गोष्टींचा नीट बारकाईनें तपास केला कीं, १९३५च्या कायद्यानेंच पाकिस्तानची पूर्वतयारी करून ठेवलेली आहे, हें स्पष्ट होईल.

डॉ० आंबेडकर यांनीं Thoughts on Pakistan या पुस्तकांत कॉंग्रेसनें मान्य केलेल्या प्रांतांची यादी दिली आहे. १९३५च्या कायद्याप्रमाणें आसाम, बिहार, ओरिसा, व सिंध हे प्रांत स्वतंत्र झाले ही गोष्ट कॉंग्रेसच्या प्रांतरचनेप्रमाणेंहि वाजवीच झाली असें म्हणून, आंबेडकरांनीं कर्नाटक-विभक्तीकरण व आंध्र-विभक्तीकरण यांबाबत चाललेली चळवळ व त्या चळवळीला मिळालेला कॉंग्रेसचा पाठिंबा यांचा उल्लेख केला आहे. या ठिकाणीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ओरिसा प्रांत वेगळा करण्याची आवश्यकता कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचना मान्य केली त्या आधीं पुष्कळच वर्षें भासूं लागली होती. The Oriya Movement by *Two Bachelors of Arts* हें पुस्तक १९१९ सालीं प्रसिद्ध झालेलें आहे. या पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, ओरिसा प्रांत बंगालमधून वेगळा काढण्याची आवश्यकता माहितगार सरकारी अधिकाऱ्यांना १८६८ सालापासूनच भासत होती. हिंदुस्थान सरकारचा सेक्रेटरी H. H. Risley यानें ३-१२-१९०३ रोजीं बंगाल सरकारच्या चीफ सेक्रेटरीला लिहिलेल्या पत्रांत देखील या मुद्यावर भर देण्यांत आलेला आहे. ओरिसा प्रांत वेगळा करण्याला लॉर्ड कर्झन कबूल होता; पण, कांहीं प्रांतिक सरकारांच्या विरोधामुळें त्यानें तो विषय तसाच सोडून दिला अशीहि माहिती वर उल्लेखिलेल्या पुस्तकांत दिलेली आढळते. ओरिसाची इतकी जुनी मागणी कित्येक वर्षेंपर्यंत लोंबकळत राहिली होती. कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचनेची पद्धति सुरू केल्यानतर १२-१३ वर्षांनीं ओरिसाचें स्वतंत्र स्थान सरकारकडून मान्य करण्यांत आलें. सिंधची मागणी मात्र लगोलग स्वीकारण्यांत आली! या दोन घटनांमधील फरक कॉंग्रेसच्या भाषावार प्रांतरचनेमुळें झालेला नसून, तो सरकारच्या नागमोडी धोरणांमुळेंच झालेला आहे. कॉंग्रेसनें आपल्या चळवळीच्या दृष्टीनें व संघटनेच्या दृष्टीनें प्रांतांची विभागणी भाषावारीच्या तत्त्वावर केली. राज्यकारभाराच्या दृष्टीनें प्रांतांची फेर-

रचना करतांना भाषावारीचें तत्त्व मान्य व्हावें असेंहि ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें मुंबईस मे १९२७मध्यें टरविलें. पण, राज्यकारभारांत प्रांतविभागणीचें हें एकच एक तत्त्व काँग्रेस मान्य करील असें म्हणतां येणार नाहीं. काँग्रेसची प्रांतरचना राज्यकारभाराच्याहि दृष्टीनें मान्य करण्यांत आलेली आहे असें गृहीत धरलें तर, त्यांतून असा निष्कर्ष निघेल कीं, राज्यकारभाराच्या सोईसाठीं मुंबईशहर पृथक् समजण्यांत यावें, या गोष्टीलाहि काँग्रेसची मान्यता मिळालेलीच आहे!

इतर महत्त्वाच्या मुद्यांकडे दुर्लक्ष करून, केवळ भाषावारीच्या तत्त्वावर प्रांतांची विभागणी करणें हें किती अनर्थावह आहे याचें मार्मिक विवेचन डॉ० आंबेडकर यांनीं केलेलें आहे. ते म्हणतात :

In this distribution, there is no attention paid to considerations of area, population or revenue. The thought that every administrative unit must be capable of supporting and supplying a minimum standard of civilized life for which it must have sufficient area, sufficient population and sufficient revenue has no place in this scheme of distribution of areas for provincial purposes.*

(या विभागणींत क्षेत्रफळ, लोकसंख्या व उत्पन्न या मुद्यांकडे लक्षच देण्यांत आलेलें नाहीं. राज्यकारभारासाठीं जो विभाग कल्पावयाचा तो विभाग कांहीं एका किमान प्रमाणांत आधुनिक सुखसोयींनीं सजलेलें जीवन नागरिकांना पुरवूं शकेल असा असला पाहिजे, हा विचार महत्त्वाचा आहे. यासाठीं अशा विभागांत पुरेशी लोकसंख्या असली पाहिजे, त्याचें क्षेत्रफळ पुरेसें असलें पाहिजे, आणि त्यांतून पुरेसें उत्पन्नहि उभें करतां आलें पाहिजे. काँग्रेसच्या प्रांतविभागणींत या गोष्टींना स्थानच मिळालेलें नाहीं.)

पुष्कळशा बाबतींत हिंदुमहासभेकडून काँग्रेसचें अनुकरण केलें जातें व त्यामुळें हिंदुमहासभेच्या घटनेंतहि भाषावार प्रांतरचना मान्य करण्यांत आलेली आहे. डॉ० आंबेडकर यांनीं काँग्रेसच्या भाषावार प्रांतरचनेमुळें जो कोटिक्रम रचिला आहे तो निर्दोष नसला तरी, अशा कोटिक्रमाला जागाच

*Thoughts on Pakistan, pp. 21–22.

राहूं नये अशी व्यवस्था हिंदुमहासभेनें केली तर तें श्रेयस्कर ठरण्यासारखें आहे. छोटे छोटे प्रांत व त्यांतून निघणारे प्रांतिक अभिमान यांपासून निर्माण होणारा धोका किती जबरदस्त आहे हें ओळखून, योग्य ती व्यवस्था आंखण्याचें हिंदुमहासभा मनांत आणील तर, बॅ० सावरकर यांनीं अंदमानच्या अंधेरींतून १९१५ सालीं व्यक्त केलेले पुढील दूरदर्शीपणाचे विचार तिला मार्गदर्शक ठरतील. ९–३–१९१५ रोजीं अंदमानच्या अंधेरींतून लिहिलेल्या वार्षिक पत्रांत बॅ० सावरकर लिहितात :

Andhra Sabha is a great and grand movement; but, the question of getting that province separated from the Tamil one is not ennobling.....In this little thing and straw, we see the direction of an ominous wind to come. This is one of the unhealthy reactions of the grand Swadeshi movement and must be corrected before it is too late. The swadeshi, connected in Bengal with the little partition question, brought in this reaction. Every province wants to be separated and shouts and invokes long life to itself. But, how can the province live unless the nation lives ?*

(आंध्र सभेची चळवळ ही एक मोटी उमदी चळवळ आहे. पण आंध्र प्रांत तामीळ प्रांतांतून वेगळा करण्याचा प्रश्न मात्र तसा नाहीं. या विचार-सरणींत जें विषबीज दडून बसलें आहे तें आज सूक्ष्म दिसत असलें तरी, त्यांतूनच उद्यां प्रचंड विषवृक्ष निघण्याची भीति आहे. स्वदेशीचें आंदोलन झालें तें फार उदात्त होतें; पण, त्या आंदोलनाची ही एक रोगट प्रतिक्रिया झालेली आहे. तिला वेळींच आळा घातला पाहिजे. बंगालमध्यें स्वदेशी चळवळीची सांगड फाळणीच्या स्थानिक प्रश्नाशीं घालण्यांत आलेली होती आणि त्यामुळें ही प्रतिक्रिया निर्माण झाली. प्रत्येक प्रांत विभक्त होण्याची इच्छा धरीत आहे आणि आपल्यालाच दीर्घायुष्य लाभावें असें जोरजोरानें प्रार्थीत आहे. पण, राष्ट्र जगल्याविना प्रांत जगणार कसा ?)

कॉंग्रेसनें मान्य केलेल्या भाषावार प्रांतरचनेवर आक्षेप घेऊन मुसलमानांच्या

---

*An Echo from the Andamans, p. 36.

पाकिस्तान मागणीचें प्रच्छन्नपणें समर्थन करणाऱ्या डॉ० आंबेडकर यांच्यासारख्या गृहस्थांना आणखीहि एक प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे. ओरिसा, विहार, आसाम वगैरे जे प्रांत अलीकडे स्वायत्त प्रांत म्हणून नांदूं लागले आहेत त्यांनीं, अगर कर्नाटक, आंध्रप्रभृति जे प्रांत स्वायत्त व स्वतंत्र होऊं पाहात आहेत त्यांनीं अखिल भारतीय मध्यवर्ति सरकारच नको असें कधीं म्हटलें अगर सुचविलें आहे कीं काय, हाच तो प्रश्न होय. या प्रांतांनीं असे विचार व्यक्त केले असल्याचें जोंवर सिद्ध होत नाहीं तोंवर कॉंग्रेसच्या अगर हिंदुमहासभेच्या भाषावार प्रांतरचनेचा आधार पाकिस्तानच्या मागणीला पोषक म्हणून घेतां येईल, असें वाटत नाहीं.

कूर्ग, अंदमान-निकोबार बेटें वगैरे किरकोळ भाग हिंदुस्थानचे राजकीय घटक म्हणून हिंदुस्थानांत अंतर्भूत झालेले असले तरी, प्रस्तुत विचाराच्या दृष्टीनें ते फारसे महत्त्वाचे नाहींत. पाकिस्तानची मागणी संमत केली गेली अगर हिंदूंची संमति नसतांना सरकारकडून ती मागणी पुरविली गेली तर, हिंदूंना केवढ्या क्षेत्रफळाला मुकावें लागतें, या क्षेत्रफळाचें आर्थिक व औद्योगिक महत्त्व काय, हें क्षेत्रफळ हातचें गेल्यानें हिंदुस्थानच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर कांहीं परिणाम होतात कीं काय वगैरे गोष्टींचाच विचार प्रस्तुत असल्यामुळें, अकरा स्वायत्त प्रांत, बलुचिस्थान व संस्थानी हद्दींतला हिंदुस्थान एवढ्यासंबंधींचाच विचार कर्तव्य आहे.

## १. मद्रास

अकरा स्वायत्त प्रांतांपैकीं मद्रास इलाखा हा एक महत्त्वाचा प्रांत आहे. १९ व्या शतकाच्या आरंभापासून या प्रांताची जी रचना चालत आली आहे तिच्यांत आजपर्यंत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. या इलाख्याचें क्षेत्रफळ १,४२,२७७ चौरस मैल असून १९३१च्या शिरगणतीप्रमाणें त्याची लोकसंख्या ४,६७,४०,१०७ आहे. यांत मुसलमान ३३,०५,९३७ म्हणजे शेंकडा ६·२ आहेत. या लोकसंख्येंत सर्व हिंदूंची एकूणात ३॥। कोटी असून त्यांत दलित हिंदु ६० लक्ष आहेत. या इलाख्यांत ख्रिस्त्यांची लोकसंख्या १५ लक्षांच्या आसपास आहे. हिंदी ख्रिस्त्यांची सगळ्या हिंदुस्थानांतील लोकसंख्या १९२१च्या शिरगणतीप्रमाणें ४५ लक्ष आहे. या लोकसंख्येंतली

सुमारें २७,७५,००० एवढी संख्या ब्रिटिश भारतांत असून, उरलेली संस्थान हद्दींत आहे. १८८१ ते १९२१ या चाळीस वर्षांत ख्रिस्त्यांच्या लोकसंख्येंत दामदुपटीपेक्षांहि अधिक वाढ झाली आहे. मद्रास इलाख्याच्या अगदीं लगत असलेल्या त्रावणकोर व कोचीन या दोन हिंदु संस्थानांत ख्रिस्ती लोकवस्तीचें प्रमाण प्रतिसहस्रीं अनुक्रमें २९२ व २६८ आहे.

मद्रास इलाख्यांत मुसलमान वस्तीचें प्रमाण जेमतेम शेंकडा ७ असल्यानें त्या भागांत जातीय तेढ नाहीं, तेथें जातीय प्रश्न अस्तित्वांतच नाहीं असें म्हणून, डोक्यावरून पांघरूण घेऊन झोंपणाऱ्या स्वप्नाळू लोकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, पाकिस्तानचा आधार असें जें निजामी राज्य तें दक्षिण भारतांतच आहे. किनाऱ्यालगतच्या मोपल्यांचा उपद्रव हिंदूंना कसा होऊं शकतो हें अलीकडच्या इतिहासांत स्पष्ट झालेलें आहे. मोपल्यांचा हा मलबार प्रांत तोडून मागण्याचीं स्वप्नें मुसलमानांना पडत आहेत.* याच्या जोडीला दक्षिण भारतांत ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचारकार्याचें फळ म्हणून ख्रिस्त्यांचें संख्याबळहि वाढतें आहे. या सर्व हिंदुबाधक घटनांचा ताप टाळावयाचा कसा या प्रश्नाचा विचार वेळींच झाला नाहीं तर, वायव्य सरहद्दीवर 'सिंधुस्तान' हें अलग इस्लामी राज्य निर्माण करण्याचें स्वप्न मुसलमानांना जसें पडूं लागलें तसेंच

> पुढें मागें नैर्ऋत्य हद्दीवर एखादें सुटसुटीतसें 'ख्रिस्तीस्तान' मागण्याचेंहि ख्रिस्त्यांच्या मनांत येऊं शकेल. ही पट्टी समुद्रकिनाऱ्याची आहे आणि म्हणून संरक्षण आणि व्यापार या दोन्ही दृष्टींनीं ती फार महत्त्वाची आहे हें विसरून चालणार नाहीं.

दक्षिण भारतांत निर्माण होणाऱ्या या संभाव्य संकटाची कल्पना शक्य तितकी जास्त स्पष्ट होणें अवश्य आहे. या दृष्टीनें या भागांतल्या ख्रिस्ती लोकवस्तीचे १९३१ च्या शिरगणतींतले आंकडेहि अभ्यासार्ह आहेत. या शिरगणतीप्रमाणें हिंदुस्थानांतील ख्रिस्त्यांची एकुणात ६२·५ लक्षांजवळ आहे. १९२१च्या शिरगणतीच्या तुलनेनें पाहतां ही संख्यावाढ शेंकडा ३२·५ इतकी आहे. यांतली शेंकडा २० वाढ धर्मांतरामुळें झालेली आहे.

*Pakistan by Dr. *Rajendra Prasad*, pp. 37 and 43.

या ६२·५ लक्ष ख्रिस्ती लोकसमूहांतले शेंकडा ६० म्हणजे सुमारें ३७·५ लक्ष ख्रिस्ती मद्रास इलाखा आणि कोचीन व त्रावणकोर हीं संस्थानें येथेंच आहेत. मद्रास इलाख्याच्या खालसा हद्दींत ख्रिस्त्यांचें प्रमाण शेंकडा ३·५ इतकेंच आहे. कोचीन संस्थानांत मात्र हें प्रमाण शेंकडा २७ आहे; आणि त्रावणकोर-मध्यें तर तें शेंकडा ३१·५ आहे.*

## २. सिंध

१९३५चा कायदा अमलांत येईपर्यंत सिंध हा मुंबई इलाख्याचा भाग म्हणून नांदत होता. हा प्रांत वेगळा तोडून मागण्याची बुद्धि मुसलमानांत कां उद्‌भवली हें इंग्रजांना चांगलें माहीत आहे. सायमन कमिशनच्या अह-वालांत या संबंधींची कबुली पुढील स्पष्ट शब्दांत दिलेली आहे :

This demand has gathered strength not so much in the homes of the people or among the Mohammedan cultivators of Sind as among leaders of Mohammedan thought all over India to whom the idea of a Moslem province, contiguous to the predominently Moslem area of Baluchistan, the N. W. F. Province and the Punjab naturally appeals as offering a stronghold against the fear of Hindu domination.†

(ही मागणी बळावली ती सिंधमधील सर्वसामान्य लोकांच्या घरांत अगर तेथील मुसलमान शेतकऱ्यांच्या मनांत बळावली नाहीं. हिंदुस्थानभर पसरलेल्या मुसलमान पुढाऱ्यांच्या मनांत ही मागणी बळावली. बलुचिस्थान, सीमाप्रांत व पंजाब या मुसलमानांच्या बहुसंख्य वस्तीच्या मुलखालगत सिंध हा मुसलमान प्रांत असावा ही कल्पना त्यांना सहजच रोचक वाटली. हिंदु वर्चस्वाविरुद्ध बळकट आधार, या दृष्टीनें त्यांना या कल्पनेचें महत्त्व वाटलें.)

मुसलमान पुढाऱ्यांना खूष करण्याच्या नादांत ब्रिटिश सरकारनें सिंधप्रांत मुंबई इलाख्यापासून वेगळा केला खरा; पण, त्यामुळें अन्याय मात्र कल्पनातीत

*The Times of India–Indian Year Book, 1935–36, p. 40.

†Report of the Indian Statutory Commission, Vol. I, Survey, p. 59.

झाले आहेत. सक्करच्या धरणाच्या सगळ्या योजनेपायीं जवळजवळ एक कोटि ६० लक्ष पौंड खर्च झाला आहे. व्याजाची फेड व कर्जाची हप्तेबंदीनें फेड या मुद्यांतून निर्माण होणारे प्रश्न महत्त्वाचे व गुंतागुंतीचे आहेत. १९४६ पासून धरणाची योजना किफायतशीर होईल हा अंदाज खरा मानला तरी धरणाची योजना खऱ्या अर्थानें फायदेशीर कर यासाठीं नव्या रेल्वे, रस्ते वगैरेपायीं नवीन खर्च होणारच ! सध्यांच सिंधचा प्रांतिक कारभार तुटीचा असल्याकारणानें मध्यवर्ति सरकारला प्रायः हिंदूंकडून जो कर दिला जातो त्यांतले सालिना एक कोटि पांच लक्ष रुपये सिंधच्या प्रांतिक सरकारला द्यावे लागतात. १८४२ पासून हा प्रांत मुंबई इलाख्याच्या बरोबर नांदत आला आहे. जवळजवळ शंभर वर्षांच्या या काळांत या एकवट प्रांताचे जमाखर्च एकत्रच असत. सिंधच्या आंतबट्ट्याच्या कारभारासाठीं महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक येथील हिंदूंचे कोटयवधि रुपये खर्च झालेले आहेत. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ या भागांतल्या हिंदूंनीं सिंधच्या वाढीला महत्त्वाची मदत केलेली आहे. सिंध केवळ मुंबई इलाख्यांतूनच नव्हे तर थेट हिंदुस्थानांतूनच फुटून निघेल अशी अंधुक कल्पनाहि या हिंदूंच्या मनाला शिवली नव्हती ! त्यामुळें, या प्रांतांत कायम वास्तव्य करण्याच्या किफायतशीर व आकर्षक योजना पुढें आलेल्या असूनहि, हिंदंनीं त्यांचा विचार केला नाहीं. ब्रह्मदेशच्या विभक्तीकरणांत ब्रिटिश व्यापाऱ्यांची स्वार्थी दृष्टि व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची लष्करी दृष्टि यांचा संयोग झाला.* त्याप्रमाणेंच सक्करच्या धरणामुळें निघणाऱ्या कापसाच्या पिकावर नजर ठेवून व पंजाबमधील गहूं परभारा बाहेर नेण्याला उपयोगी पडणाऱ्या कराची बंदरावर नजर ठेवून, सिंधविभक्तीकरणाच्या योजनेच्या फुग्यांत ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं वारा भरला असेल, असाहि संभव आहे. विमान वाहतुकीच्या दृष्टीनें कराचीला आलेलें आंतरराष्ट्रीय महत्त्व ब्रिटिश लष्करी तज्ज्ञांच्या नजरेपुढें नसेल, असेंहि म्हणवत नाहीं.

स्वतंत्र झालेल्या सिंध प्रांताचें क्षेत्रफळ ४६,३७८ चौरस मैल असून त्याची

---

*अ. ज. करंदीकर; लढाऊ राजकारण, पृ. ३१०; आणि
Report of the Indian Statutory Commission, Vol. I, Survey, p. 81.

लोकसंख्या १९३१च्या शिरगणतीप्रमाणें ३८,८७,०७० आहे. या लोकसंख्येंत २८,३०,८०९ म्हणजे शें० ७३·७ मुसलमान आहेत. १९२१च्या शिरगणतींत येथील लोकसंख्या ३२,७९,३८७ होती. १९२१ ते १९३१ च्या दहा वर्षांत पंजाबमधील लोकसंख्या शेंकडा १४ या प्रमाणांत वाढली. सिंध सोडून मुंबई इलाख्याची लोकसंख्या शेंकडा १२·४ या प्रमाणांत वाढली आणि सिंधमध्यें मात्र ही वाढ शेंकडा १८·५ इतकी झाली!


## ३. मुंबई

गुजराथचा बिनसंस्थानी भाग, मुंबई शहर, महाराष्ट्राचा बिन संस्थानी भाग व कर्नाटकचे जिल्हे मिळून जो मुंबई इलाखा उरला तो १८१८ पासून जवळजवळ आहे तसाच आहे. या विभागाचें क्षेत्रफळ ७७,२७१ चौरस मैल असून, १९३१च्या शिरगणतीप्रमाणें लोकसंख्या १,७९,९६,३१८ आहे. यांत मुसलमान १५,८३,२५९ असून त्यांचें शेंकडा प्रमाण ८·३ आहे.

## ४. बंगाल

बंगाल, बिहार, आसाम, ओरिसा हे प्रांत आज भिन्न भिन्न दिसतात; पण, एके काळीं हे सर्व प्रांत व सध्यांच्या संयुक्त प्रांतांतला आग्रा विभाग यांची दावण एकत्र गुंफण्यांत आलेली होती. १८३४ सालीं आग्रा विभाग बंगालमधून अलग करण्यांत आला. शिल्लक उरलेला भूभागहि अफाट होता. राज्यकारभाराच्या सोईसाठीं या भागाची विभागणी करावी अशा योजना मधून मधून पुढें येत होत्या. पण कर्झनशाहींत बंगालच्या फाळणीची जी योजना पुढें आली तिच्या पोटांत दुष्ट हेतु दडून बसलेला होता. पूर्व-बंगालचे १५ जिल्हे व आसाम यांचा मिळून नवा प्रांत बनविण्याची क्लृप्ति मुसलमानांचें वर्चस्व निर्माण करण्यासाठींच सुचली होती. बंगालची ही फाळणी लोकांच्या भावनांना फार झोंबली व तिच्याविरुद्ध होणाऱ्या चळवळीमुळें देश दुमदुमून गेला. १९११ सालच्या दिल्ली दरबारच्या वेळीं ही फाळणी रद्द करण्यांत आली. या वेळींच बिहार-ओरिसा हा भाग स्वतंत्र प्रांत म्हणून वेगळा काढण्यांत आला आणि आसामवर स्वतंत्र चीफ कमिशनरची नेमणूक झाली.

बंगाल व आसाम प्रांतांतील जिल्ह्यांचा नकाशा




रेखांकित भाग --- हिंदू वस्तीचा.
इतर भाग ..... मुसलमान वस्तीचा.

सध्यांच्या बंगाल प्रांताचें क्षेत्रफळ ८२,९५५ चौरस मैल आहे व १९३१च्या शिरगणतीप्रमाणें या प्रांताची लोकसंख्या ५,०१,१४,००२ आहे. यांत मुसलमानांची लोकसंख्या २,७४,९७,६२४ आहे. म्हणजे एकूण लोकसंख्येंत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५४·१ आहे. हिदूंची लोकसंख्या २,२०,००,००० आहे. केवळ लोकसंख्येला महत्त्व देऊन जातवारीच्या तत्त्वावर प्रतिनिधित्व दिलें म्हणजे अन्याय कसा होतो याचें बंगाल हें ठळक उदाहरण आहे. १९१९च्या घटना कायद्यांत मुसलमानांचे स्वतंत्र मतदारसंघ होतेच. पण मतदानाचा अधिकार सध्यांच्या इतका स्वस्त झालेला नव्हता. यामुळें काय प्रकार घडला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. बंगालमधील मुसलमानांचें त्या वेळच्या लोकसंख्येंतलें शेंकडा प्रमाण ५४.६ असूनंहि, मतदारांच्या एकूण संख्येशीं मुसलमान मतदारांच्या संख्येचें प्रमाण ४५.१ इतकेंच होतें.

मुसलमानांची वस्ती बंगालच्या पूर्व भागांत विशेष आहे. या भागांतला हिंदुवंश मृत्युपंथाला लागल्यासारखा दिसतो, असे हृदयविदारक उद्‌गार सावित्रीदेवी यांनीं काढिले आहेत.* कृष्णपूर, कालीपूर, सीतारामपूर, अशा हिंदुत्वसूचक गांवांतल्या लोकवस्तींत हिंदु औषधालाहि मिळत नाहीं, असेंहि सावित्रीदेवींनीं म्हटलें आहे.†

मुसलमानांच्या मनांतून सगळाच बंगाल प्रांत हिंदुस्थानांतून तोडून पाकिस्तानांत सामील करावयाचा आहे. डॉ० आंबेडकर यांच्या कल्पनेप्रमाणेंहि पूर्वबंगालचा अंतर्भाव पाकिस्तानमध्यें होण्यासारखा आहे.

> बंगालचा पूर्व भाग हाच अत्यंत सुपीक भाग आहे.§ तागाचें पीक पूर्व व मध्य बंगालवर अवलंबून आहे. या तागाच्या पिकाच्या बाबतींत बंगाल प्रांत फक्त हिंदुस्थानांतच नव्हे तर, साऱ्या जगांत अग्रगण्य आहे, हें विसरून चालणार नाहीं.

ब्रह्मदेशच्या समृद्धीवर डोळा ठेवणाऱ्या ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं ब्रह्मदेशच्या

*Warning to the Hindus

†Warning to the Hindus

§Report of the Indian Statutory Commission, Vol. I, Survey, p. 61.

विभक्तीकरणाला हातभार लाविला ! पंजाबच्या विभक्तीकरणाला काल्व्हर्ट-सारखे धूर्त इंग्रज प्रोत्साहन देत आहेत, हें 'पंजाबी' यानीं Confederacy of India या आपल्या पुस्तकांत काल्व्हर्टच्या The Wealth and Welfare of the Punjab या पुस्तकाच्या आधारें जें विवेचन केलें आहे त्यावरून स्पष्ट होत आहे.* १९३३–३४ सालीं बंगालमधून तागाच्या मालाची जी निर्यात झाली ती किती आणि किती मोलाची होती यासंबंधींचे आंकडे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. १४,२०,००० टन वजनाचा तागाचा माल त्या सालीं निर्गत झाला आणि या मालाची किंमत सुमारें ३२ कोटी ३३ लक्ष रुपये ठरली. हे आंकडे नजरेसमोर खेळूं लागले म्हणजे असें वाटतें कीं, बंगालमधील तागाच्या गिरण्यांच्या धंद्यावर लोभी नजर ठेवणाऱ्या लोकांकडून पाकिस्तानचा पाठपुरावा केला जात असला पाहिजे.

## ५. आसाम

१८७४ सालीं आसामला कांहींसें स्वतंत्र स्थान प्राप्त झालें. १९०५ च्या फाळणीच्या वेळीं आसामची पूर्वबंगालबरोबर सांगड घालण्यांत आली होती; पण, फाळणी रद्द झाल्यावर म्हणजे १९१२ सालीं आसाम स्वतंत्र घटक म्हणून पूर्वीप्रमाणें बंगालकडे आला. १९१९ च्या घटना कायद्यानें या प्रांताचा राजकीय दर्जा वाढला व त्यावर स्वतंत्र गव्हर्नरची नेमणूक होऊं लागली.

आसामच्या उत्तर व पूर्व सीमेकडील कांहीं भाग प्रांतिक स्वायत्ततेच्या कक्षेंत पूर्णपणें सामील करण्यांत आलेला नाहीं. हा भाग वगळला म्हणजे या प्रांताचें क्षेत्रफळ ५५,०१४ चौरस मैल उरतें. आसामचे जे तीन महत्त्वाचे विभाग आहेत त्यांत मणिपूर हा एक संस्थानी विभाग आहे. त्याचें क्षेत्रफळ ८,६२० चौरस मैल आहे. १९३१च्या शिरगणतीप्रमाणें या प्रांताची लोकसंख्या ९२,४७,८५७ आहे. यांतली ४,४५,६०६ इतकी लोकसंख्या मणिपुरांत आहे. म्हणजे आसामच्या खालसा भागाची लोकसंख्या ८८,०२,२५१

*The Confederacy of India, pp. 101–17.

तकी भरते. एकंदर लोकसंख्येंत सुमारें ५२.५ लक्ष हिंदु आहेत, २७–२८ लक्ष मुसलमान आहेत, २.५ लक्षांच्या आसपास ख्रिस्ती आहेत आणि टोळी-वाल्यांच्या जमातींची एकत्रित संख्या सुमारें १० लक्ष आहे.

या प्रांतांत डोंगराळ भाग फार आहे. आसाम व्हॅली व सुर्मा व्हॅली या दोन भागांतच लोकवस्ती फार आहे. १९२१च्या शिरगणतींत आसामच्या खालसा भागाची लोकसंख्या ७५ लक्ष भरली होती. त्यांतली ६५ लक्ष लोकसंख्या या दोन विभागांतच होती. १९२१ च्या शिरगणतींत आसामच्या लोकसंख्येपैकीं ३५ लक्ष बंगाली असल्याचें आढळलें व १७–१८ लक्ष लोक आसामी असल्याचें आढळलें. हे सर्व लोक या दोन प्रमुख भागांतच वास्तव्य करणारे आहेत.

चहाच्या मळ्यांच्या वाढीमुळें आसाम व्हॅली विभागाची लोकसंख्या १९०१ ते १९२१ या वीस वर्षांत १० लक्षांनीं वाढली. सुर्मा व्हॅलीमधील सिल्हेट जिल्हा मोठा आहे. त्यांतहि लोकसंख्येची वाढ झपाट्यानें होत आलेली आहे. आसाम व्हॅलीमधला गोलपारा विभाग व सुर्मा व्हॅलीमधला सिल्हेट विभाग यांमध्यें बंगाली लोकांची वस्ती पुष्कळ आहे. याम्रुळें सिल्हेट जिल्हा फिरून बंगालमध्यें सामील व्हावा अशा आशयाचा ठरावहि कौन्सिलांत एकदां पास झाला होता. अलीकडे मात्र, आसामचे कोणतेहि जिल्हे बंगाल-मध्यें सामील होऊं नयेत, हें लोकमत प्रबळ झालेलें आहे. सिल्हेट भागाची लोकवस्ती १९२१च्या शिरगणतीप्रमाणें २५ लक्ष होती व यांत मुसलमान बहुसंख्य होते.* सिल्हेट जिल्ह्याच्या लोकवस्तींत मुसलमानांचें प्रमाण ५९·२ आहे, असें डॉ० आंबेडकर यांनींहि म्हटलें आहे.† गोलपारा विभागांत मुसलमानांचें प्रमाण ४२·८ आहे असें डॉ० आंबेडकर म्हणतात. सिल्हेट भागाचें क्षेत्रफळ सुमारें ५,००० चौरस मैल असून, गोलपारा भागाचें क्षेत्रफळ ४,००० चौरस मैल आहे.

> पूर्व बंगालमधून निघून मुसलमानांनीं आसामांत घुसावें व त्या भागांतली आपली लोकसंख्या त्यांनीं वाढवावी हा

---

*Indian Statutory Commission. Vol. I. Survey, p. 74.
†Thoughts on Pakistan, p. 357.

> क्रम १९३० पूर्वीपासूनच सुरू झालेला असून,* तो आजतागायत चाललेलाच आहे.

चहाच्या मळ्यांवर या प्रांताचें सारें वैभव अवलंबून आहे. १९३३ सालीं हिंदुस्थानांत चहाच्या लागवडीनें व्यापलेली एकंदर जमीन ८,०९,००० एकर होती. त्यांतली ४,३०,००० एकर जमीन फक्त आसाममधील होती. १९३३ सालीं ३७ कोटी ९० लक्ष पौंड चहा विक्रीसाटीं हिंदुस्थानाबाहेर गेला होता. त्यांतला आसाममधून किती गेला असेल याची कल्पना स्थूलमानानें सहज करतां येण्यासारखी आहे. बाहेर गेलेल्या चहाची त्या वर्षांतली एकंदर किंमत १७ कोटी १५ लक्ष रुपये होती. आसामच्या वांटणीला यांतला केवढा हिस्सा येईल हें तर्कानें समजण्यासारखें आहे. चहाच्या मळ्यांत जें भांडवल गुंतलेलें आहे त्यांतलें पाऊण हिस्सा भांडवल युरोपियनांचें आहे. पाकिस्तानच्या मुसलमानांनीं मांडलेल्या योजनांपैकीं लतीफ-योजनेनें पूर्व-बंगाल व आसाम यांची सांगड घातलेली आहे.† अलीगडच्या दोन विद्वानांनीं आसाममधील सिल्हेट भाग बंगाली पाकिस्तानमध्यें दडपला आहे.§

> चहाच्या किफायतशीर धंद्यावर स्वार्थी नजर ठेवूनच ही सर्व योजना आंखण्यांत आली असावी, अशी शंका कोणी घेतली तर ती अगदींच निराधार ठरण्यासारखीं नाहीं.

## ६. बिहार

पूर्वीं बंगालशीं निगडित झालेले बिहार-ओरिसा हे प्रांत १९१२ सालीं बंगालमधून वेगळे काढण्यांत आले. १९३३ पर्यंत बिहार-ओरिसा प्रांतांतच छोटा-नागपूर विभागाचा समावेश होत असे. बिहार व ओरिसा या दोन प्रांतांमधील भेदांना थेट भाषेपासून सुरुवात होते. बिहारमध्यें हिंदी भाषा रूढ आहे तर, ओरिसाचे लोक ओरिया किंवा उडिया ही भाषा बोलणारे आहेत. आपला प्रांत अगदीं स्वतंत्र करण्यांत यावा, ही ओरिसामधील लोकांची

---

*Indian Statutory Commission Vol. I Survey, p. 74.

†Pakistan by Dr. *Rajendra Prasad*, p. 42.

§Pakistan by Dr. *Rajendra Prasad*, p. 36.

मागणी बरीच जुनी आहे. १९३५च्या कायद्यानें ती मागणी मान्य करण्यांत आली व बिहार आणि ओरिसा वेगळे झाले. बिहारप्रांताचें क्षेत्रफळ ६९,३४८ चौरस मैल आहे व १९३१च्या शिरगणतीप्रमाणें या प्रांताची लोकसंख्या २,५७,२७,५०० आहे. यांत मुसलमानांची संख्या ४१,४०,३२७ म्हणजे जवळजवळ शेंकडा १५ इतकी आहे.

## ७. ओरिसा

नव्यानेंच स्वतंत्र झालेल्या या प्रांताचें क्षेत्रफळ ३२,६९५ चौरस मैल असून १९३१च्या शिरगणतीप्रमाणें त्याची लोकसंख्या ५३,०६,१४२ आहे. मुसलमानांची लोकसंख्या १,३१,२३३ म्हणजे जेमतेम शेंकडा २ इतकीच आहे.

## ८. मध्यप्रांत–वऱ्हाड

मध्यप्रांत या नांवाचा स्वतंत्र प्रांत १८६१ सालीं बनविण्यांत आला. १९०३ सालीं निजामनें वऱ्हाड प्रांत कायमच्या भाडेपट्ट्यानें ब्रिटिशांना दिल्यावर तो या प्रांताला जोडण्यांत आला. १९२० सालापर्यंत हा प्रांत दुय्यम दर्जाचा समजण्यांत येत असे. त्यामुळें चीफ कमिशनर हाच या प्रांताचा मुख्य अधिकारी असे. १९२० सालीं या प्रांताचा दर्जा वाढला व चीफ कमिशनरच्या जागीं गव्हर्नर आला.

मध्यप्रांताचें क्षेत्रफळ ८२,१०९ चौरस मैल असून वऱ्हाडचें क्षेत्रफळ १७,७६७ चौरस मैल आहे. १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें मध्यप्रांताची लोकसंख्या १,२०,६५,८८५ असून वऱ्हाडची लोकसंख्या ३४,४१,८३८ आहे. मध्यप्रांताच्या लोकसंख्येंत मुसलमान ३,८३,१७४ असून त्यांचें शेंकडा प्रमाण ३·८ आहे. वऱ्हाडांत २,९९,६८० मुसलमान असून त्यांचें शेंकडा प्रमाण ८·७ आहे.

वऱ्हाडवरील आपल्या स्वामित्वाच्या खुणा पुनरुज्जीवित करण्याचे नेटाचे प्रयत्न निजामाकडून केले जात आहेत व सत्तारहित स्वामित्वाचें समाधान तरी त्याला तूर्त मिळत आहे, असें म्हणण्याला हरकत नाहीं. याचा परिणाम हळूहळू दिसूं लागला आहे. पाकिस्तानच्या अलीगड-योजनेंत हैद्राबाद संस्थानाबरोबर वऱ्हाडहि जोडून देण्यांत आलेला असून, त्या सर्व

भागाचा एक गट म्हणून निर्देश केलेला आहे.* प्रसंग पाहून वऱ्हाड परत मिळण्याबद्दलची मागणी निजामाकडून केली जाईल, यांत संशय नाहीं. ब्रिटिश सरकार ती मान्य करील कीं काय हें परिस्थितीवर अवलंबून राहील. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा सोईस्करपणानें उपयोग करून हवे ते प्रांत वेगळे तोडून देणारें ब्रिटिश सरकार अशा प्रसंगीं वऱ्हाडच्या हिंदुप्रजेचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करील कीं नाहीं, हा प्रश्न तर्कशास्त्रानें सुटणारा नसून तो राजनीतिशास्त्रानें सुटणारा आहे. वऱ्हाडला वेढणाऱ्या निजामी हद्दींतील मुसलमानांची वऱ्हाडांतली आवक गेलीं ८–१० वर्षें वाढत असून, त्यांच्या बोलीचा परिणाम वऱ्हाडांतील मराठी भाषेवर यापूर्वींच होऊं लागलेला आहे !

## ९. संयुक्तप्रांत

१८३४ सालीं बंगालमधून निराळा काढलेला आग्रा प्रांत व अयोध्या प्रांत या दोघांचा मिळून संयुक्तप्रांत बनविण्यांत आला व १९०२ सालीं या प्रांतावर लेफ्टनंट गव्हर्नरची नेमणूक करण्यांत आली. १९२१ सालीं लेफ्टनंट गव्हर्नरच्या जागीं गव्हर्नर आला. प्रांताचे एकंदर ४८ जिल्हे आहेत. त्यांतले ३६ आग्रा विभागांत असून १२ अयोध्या विभागांत आहेत. प्रांताचें क्षेत्रफळ १,०६,२४८ चौरस मैल आहे. त्यांत आग्रा प्रांताचेंच ८२,१३७ चौरस मैल आहे. १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें आग्रा प्रांताची लोकसंख्या ३,५६,१३,७८४ असून अयोध्या प्रांताची १,२७,९४,९७९ आहे. आग्रा प्रांतांतल्या मुसलमानांची संख्या ५३,१८,०७७ असून त्यांचें प्रमाण शेंकडा १४·१ आहे. अयोध्या प्रांतांत मुसलमानांची लोकसंख्या १८,६३,८५० आहे व त्यांचें शेंकडा प्रमाण ८ आहे. काशी, प्रयाग, हरद्वार, मथुरा इत्यादि हिंदूंचीं क्षेत्रें याच प्रांतांत आहेत. एक लक्षाहून जास्त वस्तीचीं सात शहरें या प्रांतांत आहेत. या प्रांतांत चार विद्यापीठें आहेत.

सगळ्या प्रांतांत मुसलमान अवघे शेंकडा १४ आहेत हें खरें; पण शहरी वस्तींत मुसलमानांचें प्रमाण जवळजवळ शेंकडा ४० आहे.

जुन्या परंपरेमुळें मुसलमानांना प्राप्त होणारें वजन, जमीनदारवर्गांतलें त्यांचें स्थान, अलीगडच्या मुसलमानी केन्द्राचें

*Pakistan by Dr. *Rajendra Prasad*, p. 36.

सान्निध्य, दिल्ली-पंजाबचा शेजार इत्यादि मुद्यांचा विचार केला व या प्रांतांत मुसलमानांकडून हिंदूंच्या कुरापती किती वारंवार काढल्या गेल्या आहेत याचें स्मरण ठेवलें म्हणजे हिंदुसंघटनेच्या कार्याचा मारा या प्रांतांत विशेषतः करणें कां अवश्य आहे, हें चाणाक्ष हिंदूंना सहज समजेल.


## १०. पंजाब

पंजाब प्रांताचें क्षेत्रफळ ९१,९१९ चौरस मैल असून १९३१च्या शिरगणतीप्रमाणें तेथील लोकसंख्या २,३५,८०,५२० आहे. त्यांत मुसलमान १,३३,०२,९९१ म्हणजे सुमारें शेंकडा ५६·५ आहेत. १९२१च्या शिरगणतीप्रमाणें लोकसंख्या २ कोटी ५ लक्ष होती.त्यांत १ कोटी १५लक्ष मुसलमान होते, ६५ लक्ष हिंदु होते व २५ लक्ष शीख होते. १९३१च्या शिरगणतीप्रमाणें येथील हिंदूंची लोकसंख्या ७१,६३,१६४ असून त्यांतली ३१,७१,००४ इतकी हिंदुवस्ती अंबाला, कांग्रा व होशियापूर जिल्हा या भागांत आहे.* यांतला अंबाला विभाग दुष्काळपीडित म्हणून प्रसिद्ध आहे.† पंजाबच्या खालसा हद्दींतील शिखांची लोकसंख्या ३०,६४,१४४ आहे.§ ही वस्ती होशियारपूर, लुधियाना, जालंदर, फिरोजपूर, अमृतसर व गुरुदासपूर या जिल्ह्यांत विशेष एकवटलेली आहे. या जिल्ह्यांचें क्षेत्रफळ व त्यांपैकीं प्रत्येकांतली हिंदु, शीख व मुसलमान यांची वस्ती यांची माहिती पुढीलप्रमाणें आहे.¶

| जिल्हा | क्षेत्रफळ चौरस मैल | हिंदु | मुसलमान | शीख | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| होशियापूर | १;२०१ | २,६२,६६४ | ९३,११९ | ८२,८५७ | ४,३८,६४० |
| लुधियाना | १,३९६ | ८३,४२६ | २,३५,६९० | ३,१२,८२९ | ६,३१,९४५ |
| जालंदर | ५८८ | ६८,९८९ | १,२६,३६८ | १,३०,७९१ | ३,२६,१४८ |
| फिरोजपूर | १,५३९ | ४२,८९६ | १,४७,९१० | २,३५,४२० | ४,२६,२२६ |
| अमृतसर | १,१४३ | १,३१,५६९ | ४,०६,५०७ | ३,४४,३७१ | ८,८२,४४७ |
| गुरुदासपूर | ४९७ | ४१,०८८ | ९८,७७८ | ६२,४१५ | २,०२,२८१ |

*Confederacy of India by *A Punjabi*, p. 252.
† ,, ,, ,, p. 269.
§ ,, ,, ,, p. 181,
¶ ,, ,, ,, p. 182.

पंजाब प्रांतातील जिल्ह्यांचा नकाशा




हिंदु वस्तीचा भाग ---
मुसलमान वस्तीचा भाग ......

डॉ० आंबेडकर यांच्या मनांतून कांग्रा, अंबाला, कर्नाळ, रोहटक, गुरगांव, हिसार, फिरोजपूर, लुधियाना, जालंदर, अमृतसर, गुरुदासपूर, होशियारपूर व सिमला हे सध्यांच्या पंजाबमधले जिल्हे तोडून ते हिंदुस्थानांत राखून ठेवावयाचे आहेत; कारण, या सर्व जिल्ह्यांतून हिंदु व शीख हे लोकसंख्येनें मुसलमानांच्यापेक्षां अधिक आहेत. Confederacy of India या पुस्तकाचे कर्ते 'ए पंजाबी' हे इतका मुलुख सोडावयाला तयार नाहींत. अंबाला, कांग्रा व होशियारपूर एवढे तीनच जिल्हे सोडण्याची त्यांची तयारी आहे. अंबाला जिल्हा दुष्काळपीडित असल्याबद्दलची त्यांचीच कबुली वर उद्धृत करण्यांत आलेली आहे. लुधियाना, जालंदर, फिरोजपूर वगैरे जिल्हे सध्यांच्या पंजाब प्रांताच्या मध्यभागीं आहेत; व या भागांत शीख हे संख्याधिक्यामुळें श्रेष्ठ आहेत. प्रत्येक जिल्ह्यांत हिंदु व शीख यांच्या तुलनेनें मुसलमान हे कमी असल्यामुळें 'ए पंजाबी' यांनीं हे जिल्हे सोडून देण्यास वस्तुतः तयार झालें पाहिजे; पण, तसें करण्याला ते मुळींच तयार नाहींत. याचें कारण सांगतांना पंजाबी लिहितात :

The Muslims can never agree to any proposal regarding the exclusion of the central districts from the Punjab, firstly because, most of the Muslim intelligentsia is concentrated in them, secondly because *the soil of these districts is the best in the whole of the Indus region* and after their exclusion, a federation of the remaining Muslim tracts will be a federation of the sandy tracts of Bahawalpur and Khairpur States, barren and rocky soil of the Rawalpindi division, sandy stretches and colony areas of the Multan division which are already becoming water-logged and being deserted, bad soil of North West Frontier Province and the sand dunes of Baluchistan and Sind.*

(पंजाबचे मध्यवर्ति जिल्हे वगळण्याच्या कोणत्याहि योजनेला मुसलमान केव्हांहि मान्यता देणार नाहींत. याचें पहिलें कारण असें कीं, बुद्धिवान मुसलमान वर्ग या भागांत एकवटलेला आहे. दुसरें कारण असें कीं, सरहद्द

*Confederacy of India, p. 184.

विभागाच्या सगळ्या जमिनीमध्यें या जिल्ह्यांची जमीन सर्वश्रेष्ठ आहे. हे जिल्हे सोडून उरलेल्या मुसलमानी भागाचें संघराज्य बनविलें तर त्या संघराज्यांत शिल्लक काय उरेल ? भावलपूर व खैरपूर संस्थानांचे वालुकामय प्रदेश, रावळपिंडी विभागांतील वैराण व खडकाळ जमीन, मुलतान विभागांतील वाळूचे पट्टे, आणि पाणथळ बनल्यामुळें टाकाऊ ठरलेले वसाहतीचे विभाग, सरहद्द प्रांताची कनिष्ठ जमीन आणि बलुचिस्तान आणि सिंध यांमधील रेताड उंचवटे ! )

> शीख वस्तीचे हे मध्यवर्ति जिल्हे म्हणजे पंजाब प्रांतांतला लोण्याचा गोळा आहे. तो सोडून बाकीच्या भागांतलें ताकवणी 'पंजाबी 'ना नको आहे. शिखांचें कृपाण आपल्या छातीवर सतत लटकत राहाणार हें 'पंजाबी 'ना पक्कें माहीत आहे. तें टाळणें शक्य असतें तर त्यांनीं तें टाळलेंहि असतें.

कारण ते लिहितात :

The geographical situation of the Shikh areas in the Punjab is such that they cannot be easily excluded from it as could have been possible if they had been all located to one side of Industan, like the Ambala division or the Kangra district.*

(पंजाबांत शिखांचें भौगोलिक स्थान असें आहे कीं, त्या स्थानामुळें त्यांना सहज बाहेर काढतां येत नाहीं. अंबाला विभाग, कांग्रा जिल्हा यांच्याप्रमाणें सिंधुस्तानच्या एका टोंकाला त्यांचे स्थान असतें तर त्यांना बाहेर काढणें शक्य झालें असतें.)

तें शक्य नसल्यामुळें सामदामाची भाषा बोलून शिखांना आपल्या पाकिस्तानांत समाविष्ट करण्याचा प्रयत्न 'पंजाबी 'नीं केला आहे. मोठ्या औदार्यानें 'पंजाबी' लिहितात :

The Shikhs can hope to get at least one minister in Federal Government of Sindistan while they can never

---

*Confederacy of India, p. 183.

dream of having a Shikh minister in the Cabinet of the Federal Government of India.*

(वायव्य कोपऱ्यांतील विभागाच्या संघराज्यांत शिखांना एकादी तरी दिवाणगिरी मिळण्याची आशा करतां येईल. पण, उभ्या हिंदुस्थानच्या संघराज्याच्या मंत्रिमंडळांत एकादें मंत्रिपद मिळेल ही कल्पना शिखांनीं स्वप्नांतहि आणूं नये.)

> शिखांची लष्करी परंपरा हिंदूंना अवगत असल्यामुळें, भारताच्या संघराज्यांत एकाद्या लायक शिखाला केवळ साधा मंत्री नव्हे, तर लष्करी खात्याचा मंत्री होतां येईल हें 'पंजाबी'च्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं.

गेल्या सालीं व्हाइसरॉयचें कार्यकारी मंडळ विस्तृत होण्याची भाषा सुरू झाली आणि हिंदुमहासभेनें हिंदूसाठीं सहा जागांची मागणी केली. त्या वेळीं, या सहा जागांपैकीं एक जागा शिखांसाठीं व एक जागा पूर्वास्पृष्टांसाठीं मागण्यांत येत आहे असा खुलासा करण्यांत आला होता हें 'पंजाबी'च्या खोडसाळ मुद्याला पुरेसें उत्तर आहे. असल्या विषगर्भ मधाच्या बोटावर शीख लुब्ध होतील असें समजणाऱ्या 'पंजाबी'नीं एक गोष्ट ध्यानांत धरावी ! आपल्यावरून जग ओळखणें हें बरें असलें तरी, तें नेहमींच बरोबर मात्र नसतें !

## ११. वायव्य सरहद्दप्रांत

हा प्रांत इंग्रजांनीं १८४९ मध्यें काबीज केला व कारभाराच्या सोईसाठीं पंजाबला जोडला. परक्या शत्रूंच्या स्वाऱ्यांचा पूर्वापार चालत आलेला मार्ग म्हणून हा प्रांत प्रसिद्ध आहे व त्यामुळेंच त्याला महत्त्वहि आहे. या प्रांताच्या आसपास डोंगराळ मुलखांत राहणाऱ्या टोळ्यांना फार जपावें लागतें. या जमातींच्या मनोरचनेचें वर्णन पुढीलप्रमाणें करण्यांत आलेलें आहे :

Environment has developed in them a freedom born of their wind-swept mountain sides, a hatred of control and a patriotic spirit amounting to a religion.†

---

*Confederacy of India, p. 186.

†The Challenge of the North-West Frontier by *C. F. Andrews.*

(भोंवतालच्या परिस्थितीमुळें त्यांच्यांत स्वतंत्रवृत्तीचा विकास झालेला आहे. वाऱ्याशीं खेळत असलेल्या भोंवतालच्या डोंगरपठारांमुळेंच ही वृत्ति जन्मलेली दिसते. नियंत्रणांचा त्यांना तिटकारा वाटतो आणि त्यांच्या देशप्रेमाच्या स्वरूपांत धर्मप्रेमाची तीव्रता आहे.)

साम, दाम, दंड, भेदादि उपायांनीं या लोकांना आंवरण्याचें काम सरकारला नेहमीं करावें लागतें. या प्रांताची परिस्थिति अशी नाजूक असल्यामुळें, त्याचीं स्थित्यंतरेंहि पुष्कळ झालीं आहेत. १९०१ मध्यें हा प्रांत पंजाबपासून अलग करण्यांत आला. दीर, स्वात, चित्रळ वगैरे भाग त्यांत सामील करण्यांत आले व त्याच्यावर चीफ कमिशनरची नेमणूक करण्यांत आली. हा प्रांत फिरून पंजाबला जोडावा अशा सूचना पुढें येऊं लागल्यामुळें या प्रश्नाची पहाणी करण्यासाठीं १९२२ सालीं एक समिति नेमण्यांत आली. हा प्रांत पंजाबला जोडावा असें समितीपुढें आलेल्या हिंदु साक्षीदारांचें मत पडलें. निदान येथील न्यायखातें तरी पंजाब हायकोर्टाच्या अधिकाराखालीं जावें अशी त्यांची मागणी होती. सरहद्दीवर पठाणांचा स्वतंत्र प्रांत असणें हें हिंदुस्थानच्या अखंडपणाला बाधक ठरेल हा इषारा समितीला देण्यांत आला.

> परकी आक्रमण वेळींच थांबविण्याच्या दृष्टीनें संतुष्ट पठाणांचा स्वतंत्र प्रांत उपयोगी पडेल असा कोटिक्रम लढवून, हा इषारा अव्हेरिला गेला.

या प्रांताला स्वायत्त प्रांताचा दर्जा देण्याचा विचार १९३२ सालीं ठरला. या प्रांताचें क्षेत्रफळ १३,५१८ चौरस मैल आहे. १९३१च्या शिरगणतीप्रमाणें येथील लोकसंख्या २४,२३,३८० आहे. हिंदु वस्तीचें प्रमाण शेंकडा ५ आहे. कांहीं हजार शिखांचीहि वस्ती या प्रांतांत आहे.

## १२. बलुचिस्थान

बलुचिस्थानचे तीन महत्त्वाचे भाग पडतात. १८७९च्या तहानें ब्रिटिशांकडे आलेला भाग : याचें क्षेत्रफळ ९,४७६ चौरस मैल आहे. भाडेपट्ट्यानें ब्रिटिशांकडे असलेला किंवा अन्य मार्गानें ब्रिटिशांनीं वहिवाटीला घेतलेला मुलूख—याचें क्षेत्रफळ ४४,३४५ चौरस मैल आहे. कलात व लास-बेला

स्वायत्त प्रांत :

| प्रांत | क्षेत्रफळ चौरस मैल | प्रांतांतून वसूल होणारें एकूण उत्पन्न | | १९३१ सालीं |
|---|---|---|---|---|
| | | प्रांतिक कारभारासाठीं | मध्यवर्ति कारभारासाठीं | हिंदुप्रभृति सर्वसाधारण |
| १ मद्रास | १,४२,२७७ | १६,१३,४४,५२० | ९,५३,२६,७४५ | ३,९०,८३,३४२ |
| २. मुंबई | ७७,२७१ | १२,४४,५९,५५३ | २२,५३,४४,२४७ | १,५६,०२,९३२ |
| ३. मध्यप्रांत (वऱ्हाडसह) | ९९,९५७ | ४,२७,४१,२८० | ३१,४२,६८२ | १,४८,१५,०५४ |
| ४. संयुक्तप्रांत | १,०६,२४८ | १२,७९,११,८५१ | ४,०५,५३,०३० | ४,०९,०५,५८६ |
| ५. बिहार | ६९,३४८ | ५,२३,८३,०३० | १,५१,३७,७४२ | २,८१,९४,६२१ |
| ६. आसाम | ५५,०१४ | २,५८,४८,४७४ | १,८७,५५,९६७ | ४८,५८,७७९ |
| ७. ओरिसा | ३२,६९५ | १,८१,९१,८२३ | ५,६७,३४६ | ८०,४३,०१८ |
| ८. बंगाल | ८२,९५५ | १२,७६,६०,८९२ | २३,७९,०१,५८३ | २,२४,९३,६५९ |
| ९. पंजाब | ९१,९१९ | ११,३५,८६,३५५ | १,१८,०१,३८५ | ९३,२८,४१५ |
| १०. सिंध | ४६,३७८ | ३,७०,२९,३५४ | ५,६६,४६,९१५ | १०,१५,२२५ |
| ११. वायव्य सरहद्दप्रांत | १३,५१८ | १,८०,८३,५४८ | ९,२८,२९४ | १,४२,९७७ |

## उत्पन्न व लोकसंख्या दर्शविणारा पट

| झालेल्या शिरगणतीप्रमाणें लोकसंख्या | | | | १९४१ च्या शिरगणतीप्रमाणें एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| मुसलमान | हिंदी ख्रिस्ती | अँग्लो-इंडियन | युरोपियन | |
| ३२,९०,२९४ | १७,०३,७९१ | २८,६३० | १२,३४१ | ४,९३,४२,००० |
| १६,०२,३८५ | २,६७,४६० | १४,१७६ | १८,०२८ | २,०८,५८,००० |
| ६,८२,८५४ | ३५,५३१ | ४,७४० | ५,०७५ | १,६८,२२,००० |
| ७१,८१,९२७ | १,७०,२१६ | ११,२६३ | २२,०४३ | ५,५०,२१,००० |
| ४१,४०,३२७ | ३,३१,१८५ | ५,८९२ | ५,३९० | ३,६३,४०,००० |
| २७,५३,५६३ | १,१७,२०० | ५५८ | २,९६१ | १,०२,०५,००० |
| १,३१,२३३ | ३६,५७३ | ६३५ | ८५६ | ८७,२९,००० |
| २,७४,९७,६२४ | १,२९,१३४ | २७,५७३ | २०,८९५ | ६,०३,१४,००० |
| १,३३,०२,९९१ | ३,९२,१४४ | २,९९५ | १९,१०६ | २,८४,१९,००० |
| २८,३०,८०० | ६,६२७ | १,९३० | ६,५७६ | ४५,३७,००० |
| २२,२७,३०३ | ४,११६ | १५० | ७,९४७ | ३०,३८,००० |

या दोन संस्थानांचें क्षेत्रफळ ८०,४१० चौरस मैल आहे. १९३१च्या शिरगणतीप्रमाणें येथील लोकवस्ती ८,६८,६१७ आहे. या प्रांताला अद्याप स्वायत्तता मिळाली नाहीं. ती मिळावी अशी मुसलमानांची मागणी आहे.

सध्यां ब्रिटिश हिंदुस्थानांत जे अकरा स्वायत्त प्रांत आहेत त्यांच्यांत समतोलपणा काडीचाही नाहीं. क्षेत्रफळ, लोकसंख्या, उत्पन्न या सर्वांचा विचार करून, प्रांतांतील लोकांच्या प्रांतिक गरजा भागण्याच्या दृष्टीनें प्रांत स्वयंपूर्ण होण्यासारखा आहे कीं नाहीं याचा कांहींहि विचार न करतां, प्रांतांचीं अव्यवस्थित बोचकीं बांधण्यांत आलेलीं आहेत. प्रांतांची शास्त्रशुद्ध रचना कोणत्या तत्त्वांवर व्हावी हें एकदां ठरावें लागेल. या अकरा प्रांतांसंबंधींची महत्त्वाची माहिती एका कोष्टकांत समाविष्ट केली म्हणजे प्रांतांमधील विषमता बुद्धीला सहज पटेल; म्हणून तें कोष्टक पृ. ११०–१११ वर मांडून दाखविलें आहे. देशी संस्थानांमध्येंहि अशीच विषमता आहे.

* मंगलप्रसंगीं भेट देण्याच्या वस्तू
* सर्व मेकचीं फाऊन्टन पेन्स व
* हरतऱ्हेची स्टेशनरी
मिळण्याचें पुण्यांतील प्रमुख ठिकाण
व्ही. जी. गोखले आणि कं.
स्थापना १९२८
मुख्य दुकान पुणें — शाखा पुणें
फरासखाना हौदासमोर—सरस्वतीविलास लक्ष्मीरोड

# देशी संस्थानें

१९३५च्या घटना कायद्यांत फेडरेशनचे दोन प्रकार कल्पिलेले आहेत. स्वायत्त ब्रिटिश प्रांतांचें फेडरेशन आणि हे प्रांत व देशी संस्थानें मिळून होणाऱ्या सर्व हिंदुस्थानचें फेडरेशन. या घटनेनें मध्यवर्ति सरकारच्या कारभारांत जी थोडीफार जबाबदारी देण्यांत आलेली आहे, ती बिनशर्त नसून सशर्त आहे. संस्थानें सामील होऊन सर्व हिंदुस्थानचें फेडरेशन झालें तरच ही जबाबदारी मिळावी अशी मेख कायद्यांत घालून ठेवण्यांत आलेली आहे. यामुळें हिंदी संस्थानांची बरीचशी तपशीलवार माहिती घटनाकायद्यांत अंतर्भूत करण्यांत आलेली आहे.

आकार, उत्पन्न, लोकसंख्या वगैरे दृष्टींनीं ब्रिटिश प्रांत जसे एकसारखे नाहींत तशींच संस्थानेंही सारखीं नाहींत. हिंदुस्थानांत एकंदर ६२७ संस्थानें आहेत. यांपैकीं १४७ संस्थानांची नांवनिशीवार यादी घटनाकायद्यांत समाविष्ट करण्यांत आलेली आहे. ६२७ संस्थानांतलीं कांहीं संस्थानें किती क्षुद्र आहेत हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. एका संस्थानाचें वार्षिक उत्पन्न ५०० रुपये असून त्यांतली लोकसंख्या २०६ आहे. दुसऱ्याची लोकसंख्या १२५ असून उत्पन्न १६५ रुपये आहे. आणि सर्वांवर कळस म्हणजे, कोणा एका संस्थानाचें उत्पन्न ८० रुपये असून लोकसंख्या २७ आहे.*

घटनाकायद्यांत ज्या १४७ संस्थानांचा नामनिर्देश करण्यांत आलेला आहे तीं सर्वच महत्त्वाचीं आहेत असें नाहीं. या १४७ संस्थानांचे १७ गट पाडण्यांत आलेले आहेत. १७ व्या गटांत संस्थानांचीं नांवें दिलेलीं नाहींत. फक्त पहिल्या १६ गटांतच नांवें दिलेलीं आहेत. या गटांतल्या ठळक संस्थानांचा क्रमानें विचार करणें अवश्य आहे; कारण, मुसलमानांकडून हिंदुस्थानच्या फाळणीच्या ज्या योजना मांडण्यांत आलेल्या आहेत त्यांत संस्थानांचाहि विचार करण्यांत आलेला आहे. डॉ० आंबेडकर यांनीं मात्र संस्थानें वगळून ब्रिटिश हिंदुस्थानचाच तेवढा विचार केलेला आहे.


---

*Federation *vs.* Freedom by Dr. *B. R. Ambedkar.*

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें.

## "प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग" पुणें.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | .... रु. | २,७१,१०० |
| वसूल भांडवल | .... रु. | ६५,१६५ |




**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

रा. ग. रा. साठे
चेअरमन

रा. दा. ग. बापट
व्हा. चेअरमन

रा. श्री. म. जोशी
रा. ग. उ. चितळे
रा. वा. पां. वैद्य
रा. स. के. भावे
रा. ल. रा. धडफळे
रा. चिं. त्रिं. चितळे
रा. स. गो. केणी—
—खातेदारांतर्फे डायरेक्टर.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

**जी. डी. जोगळेकर,**
बी.ए. (ऑ.), बी.कॉम., एलएल.बी.
मॅनेजर

**चिं. त्रिं. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पांच मोठीं संस्थानें

काश्मीर, हैद्राबाद, म्हैसूर, ग्वाल्हेर व बडोदें या पांच मोठ्या संस्थानांचा प्रत्येकीं स्वतंत्र गट घटनाकायद्यांत दर्शविलेला आहे. या पांच संस्थानांचें अनुक्रमें क्षेत्रफळ ८४,२५८; ८२,६९८; २९,४८३; २६,३६७; व ८१,६०४ चौरस मैल आहे. १९३१च्या शिरगणतीप्रमाणें या संस्थानांची अनुक्रमें लोकसंख्या ३६,४६,२४३; १,४४,३६,१४८; ६५,५७,३०२; ३५,२३,०७० व २४,४३,००७ आहे. हैद्राबाद संस्थानांत मुसलमान वस्तीचें शेंकडा प्रमाण १०·४ आहे; काश्मिरांत तें प्रमाण ७७·७ आहे. म्हैसूर, ग्वालेर व बडोदें या संस्थानांतील मुसलमान वस्तीचें शेंकडा प्रमाण अनुक्रमें ६·१, ५·९, व ७·२ आहे. हैद्राबादचें उत्पन्न सारखें वाढत असून अलीकडे प्रसिद्ध झालेला वार्षिक उत्पन्नाचा आंकडा ९$\frac{१}{४}$ कोटी निजामशाही रुपये इतका आहे. काश्मीरचें उत्पन्न २ कोटी ७० लक्ष रुपये आहे. म्हैसूरचें उत्पन्न ३,९८,८२,८०० रुपये आहे. ग्वालेरचें वार्षिक उत्पन्न सरासरी २॥ कोटी रुपये असून बडोद्याचें उत्पन्नहि जवळजवळ तितकेंच आहे.

## कलात व सिकीम

कलात व सिकीम या दोन संस्थानांचा प्रत्येकीं स्वतंत्र गट पाडण्यांत आला आहे. पहिलें मुसलमानी संस्थान बलुचिस्तान नजीक असून त्याचें क्षेत्रफळ ७३,२७८ चौरस मैल आहे. या संस्थानची लोकसंख्या ३,४२,१०१ आहे. संस्थानचें सरासरी वार्षिक उत्पन्न १५ लक्ष ७० हजार रुपये आहे. लासबेला हें छोटें संस्थान कलातच्या अंगभूत आहे व त्याची लोकसंख्या ६३ हजार आहे. या मुसलमानी संस्थानाचें वार्षिक उत्पन्न ३ लक्ष ६० हजार रुपये आहे. सिकिम संस्थान तिबेट-नेपाळ सरहद्दीनजीक आहे. त्याचें क्षेत्रफळ २,८१८ चौरस मैल असून लोकसंख्या १,०९,८०८ आहे. सरासरी वार्षिक उत्पन्न ५। लक्ष रुपये आहे.

## रामपूर-बनारस

रामपूर हें मुसलमानी संस्थान मध्य भारतांत असून त्याचें क्षेत्रफळ ८९३ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ४,६४,९१९ असून वार्षिक उत्पन्न

जवळजवळ ५० लक्ष रुपये आहे. बनारस संस्थानचें क्षेत्रफळ ८७५ चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ३,९१,२७२ आहे. १९३५च्या घटनाकायद्यांत हीं दोन संस्थानें क्रमांक ८च्या गटांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत.

## त्रावणकोर–कोचीन गट

संस्थानांच्या ९व्या गटांत त्रावणकोर, कोचीन, पुदुकोटा, बंगनपल्ली व सोंडूर हीं पांच संस्थानें आहेत. यांपैकीं त्रावणकोर व कोचीन हीं मोठीं संस्थानें आहेत. त्रावणकोरचें क्षेत्रफळ ७,६२५ चौरस मैल आहे. त्याची लोकवस्ती ५०,९५,९७३ आहे व वार्षिक उत्पन्न सरासरी २ कोटी ३२ लक्ष रुपये आहे. त्रावणकोरच्या लोकवस्तींत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण ६ आहे. कोचीनचें क्षेत्रफळ १,४१७ चौरस मैल आहे, लोकसंख्या १२,०५,०१६ आहे व वार्षिक उत्पन्न सरासरी ९२ लक्ष रुपये आहे. मुसलमान लोकवस्तीचें प्रमाण ६·८ आहे. सोंडूर या छोटेखानी मराठा संस्थानचें क्षेत्रफळ अवघें १६७ चौरस मैल असून, त्याचें वार्षिक उत्पन्न सरासरी १॥ लक्ष रुपयें आहे. तेथील लोकवस्ती फक्त १३,५८३ आहे.

## रजपूत संस्थानें

उदेपूर, जयपूर, जोधपूर, बिकानेर, भरतपूर, बुंदी, कोटा, अल्वार वगैरे १८ रजपूत संस्थानांचा संघ क्रमांक १० या गटांत समाविष्ट करण्यांत आलेला आहे. या सर्व संस्थानांत मिळून मुसलमान लोकवस्तीचें प्रमाण शेंकडा १० च्या आसपास आहे. रजपुतान्यांतल्या सर्व संस्थानांची एकवट लोकसंख्या १ कोटि १२। लक्ष आहे. उदेपूर संस्थानचें क्षेत्रफळ १२,९४१ चौरस मैल असून त्याचें वार्षिक उत्पन्न सुमारें ८१ लक्ष रुपये आहे. जयपूरचें क्षेत्रफळ १६,६८२ चौरस मैल आहे व वार्षिक उत्पन्न जवळजवळ १॥ कोटी रुपये आहे. या गटांतलें सर्वांत मोठें संस्थान जोधपूर आहे. त्याचें क्षेत्रफळ ३६,०७१ चौरस मैल असून वार्षिक उत्पन्न १॥। कोटि रुपये आहे. बिकानेरचें क्षेत्रफळ २३,३१७ चौरस मैल असून उत्पन्न १॥ कोटीच्या आसपास आहे. भरतपूरचें क्षेत्रफळ २,००० चौरस मैल असून वार्षिक उत्पन्न ३२–३३ लक्ष रुपये आहे. बुंदी संस्थानचें क्षेत्रफळ २,२२० चौरस मैल असून त्याचें

वार्षिक उत्पन्न सरासरी १६ लक्ष रुपये आहे. कोटा संस्थानचें क्षेत्रफळ ५,६८४ चौरस मैल असून वार्षिक उत्पन्न ५३ लक्ष रुपये आहे. अल्वारचें क्षेत्रफळ ३,१५८ चौरस मैल आहे. वार्षिक उत्पन्न ४० लक्ष रुपयांच्या आसपास आहे.

## मध्यभारतांतील इंदूरप्रभृति संस्थानें

संस्थानांच्या अकराव्या गटांत इंदूर, भोपाळप्रभृति मध्यभारतीय संस्थानांचा समावेश केलेला आहे. या गटांतल्या लहानमोठ्या सर्व संस्थानांची संख्या २९ आहे. या सर्व संस्थानांची मिळून लोकसंख्या ६६,३२,७९० असून या लोकसंख्येंत मुसलमानांचें प्रमाण ४·६ आहे. प्रमुख संस्थानांचें क्षेत्रफळ, लोकसंख्या व वार्षिक उत्पन्न यांच्याविषयींची पुढील माहिती उपलब्ध आहे : भोपाळ व जावरा येथील संस्थानिक मुसलमान आहेत.

| संस्थान | क्षेत्रफळ चौरस मैल | लोकसंख्या | वार्षिक उत्पन्न (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| इंदूर | ९,९०२ | १३,२५,०८९ | १२६ |
| भोपाळ | ६,९२४ | ७,२९,९५५ | ८० |
| रेवा | १३,००० | १५,८७,४४५ | ५१·८० |
| ओर्च्छा | २,०८० | ३,१४,६६१ | १३·८२ |
| दतिया | ९१२ | १,५८,८३४ | १३·७५ |
| धार | १,८०० | २,४३,५३० | १७·५ |
| देवास (थोरली पाती) | ४४९ | ८३,३२१ | ६·७५ |
| देवास (धाकटी पाती) | ४१९ | ७०,५१३ | ६·७५ |
| जावरा | ६०२ | १,००,१६६ | १२·५ |

## गुजराथ-काठेवाड भागांतील संस्थानें

बडोदें संस्थान वगळून गुजराथ-काठेवाड भागांतल्या सर्व संस्थानांचा मिळून क्रमांक १२ हा गट बनविण्यांत आला आहे. या गटांत २९ संस्थानांची गर्दी झालेली आहे. या सर्व संस्थानांत मिळून जवळजवळ ४० लक्ष लोक राहतात व या एकंदर वस्तींत मुसलमानांच्या वस्तीचें प्रमाण शेंकडा १३ आहे. जुनागड, खंबायत, राधनपूर, सचीन, वगैरे संस्थानें मुसलमानी आहेत.

जव्हार हें महाराष्ट्रीय संस्थान याच गटांत समाविष्ट करण्यांत आलें आहे. या गटांतील कांहीं प्रमुख संस्थानांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :

| संस्थान | क्षेत्रफळ (चौरस मैल) | लोकसंख्या | उत्पन्न (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| नवानगर | ३,७९१ | ४,०९,१९२ | ९४ |
| भावनगर | २,९६१ | ५,००,२७४ | १२० |
| जुनागड | ३,३३७ | ६,७०,५१५ | १०० |
| राजपिपला | १,५१७ | २,०६,०८५ | २७ |
| धरमपूर | ७०४ | १,१२,००० | ८॥ |
| लुनावाडा | ३८८ | ९५,१६२ | ५॥ |
| राधनपूर | १,१५० | ७०,५३० | ८ |
| इदर | १,६६९ | २,६२,६६० | २३ |
| जव्हार | ३०८ | ५७,२६१ | ४ |
| राजकोट | २८३ | ७५,५४० | १४ |

## दक्षिण महाराष्ट्र संस्थानें

कोल्हापूर, सांगली, मिरजप्रभृति १६ महाराष्ट्रीय संस्थानांचा मिळून क्रमांक १३ चा गट बनविण्यांत आला आहे. या गटांत जंजिरा हें मुसलमानी संस्थान आहे. या सर्व संस्थानांची मिळून लोकसंख्या सुमारें ४५ लक्ष असून या लोकसंख्येंत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ९ आहे. या संस्थानांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :

आपले केमिस्टस् व ड्रगिस्टस् कोण, तें आधीं ठरवा.
एन्. महादेव अँड को.
केमिस्टस् अँड ड्रगिस्टस्
लक्ष्मीरोड नाका, सिटीपोस्टानजीक, पुणें

| संस्थान | क्षेत्रफळ | लोकसंख्या | उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|
| कोल्हापूर | ३,२१७ | ९,५७,१३७ | ५२,०३,७०१ |
| सांगली | १,१३६ | २,५८,४४२ | १५,९७,००० |
| सावंतवाडी | ९३० | २,३०,५८९ | ६,४२,९५१ |
| जंजिरा | ३७९ | १,१०,३८८ | ८,८५,६४३ |
| मुधोळ | ३६९ | ६२,८३२ | ३,३४,००० |
| भोर | ९१० | १,४१,५४६ | ५,७४,००० |
| जमखंडी | ५२४ | १,१४,२८२ | ९,३९,००० |
| मिरज-थोरली पाती | ३४२ | ९३,९३८ | ४,६६,००० |
| मिरज-धाकटी पाती | १९६॥ | ४०,६८६ | ३,३२,००० |
| कुरुंदवाड-थोरली पाती | १८२॥ | ४४,२०४ | २,३२,८७३ |
| कुरुंदवाड-धाकटी पाती | ११६ | ३९,५८३ | १,८५,००० |
| अक्कलकोट | ४९८ | ९२,६०५ | ६,५९,००० |
| फलटण | ३९७ | ५८,७६१ | ८,४७,००० |
| जत | ९८० | ९१,१०२ | ३,१०,००० |
| औंध | ५०१ | ७६,५०७ | ३,१८,००० |
| रामदुर्ग | १६९ | ३५,४५४ | १,७७,००० |

## पंजाबलगतचीं संस्थानें

'पंजाब स्टेटस' या नांवानें ओळखला जाणारा संस्थानांचा गट मुळांत खूप मोठा आहे. या गटांत ४५ संस्थानें आहेत. पण, ज्यांचें क्षेत्रफळ पुरें १०० चौरस मैलहि नाहीं अशीं संस्थानें या गटांत पुष्कळच असल्यामुळें, घटना कायद्यांतल्या १४ व्या गटांत या भागांतल्या संस्थानांचा नामनिर्देश करतांना फक्त १५ संस्थानांनाच महत्त्व देण्यांत आलेलें आहे. या सर्व संस्थानांची मिळून लोकसंख्या जवळजवळ ५० लक्ष आहे. कांहीं विभागांत मुसलमान लोकवस्तीचें प्रमाण शेंकडा ३५ इतकें आहे. मालेरकोटला, फरीदपूर, भावलपूर वगैरेंचे संस्थानिक मुसलमान आहेत. महत्त्वाच्या संस्थानांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :

| संस्थान | क्षेत्रफळ | लोकसंख्या | उत्पन्न रु. |
|---|---|---|---|
| पतियाळा | ५,९४२ | १६,२५,५२० | १,४१,९६,००० |
| भावलपूर | १६,४३४ | ९,८४,६१२ | १,२१,३०,००० |
| खैरपूर | ६,०५० | २,२७,१८३ | २४,७५,००० |
| कपूर्थळा | ५९९ | ३,१६,७५७ | ३३,९५,००० |
| झिंद | १,२०९ | ३,२४,६७६ | २६,०२,००० |
| नाभा | ९६६ | २,८७,५७४ | २८,३१,००० |
| मंडी | १,१३९ | २,०७,४६५ | ११,८१,००० |
| बिलासपूर | ४५३ | १,००,९९४ | २,९८,००० |
| सुकेत | ३९२ | ५८,४०८ | २,५६,००० |
| तेरी-गढवाल | ४,५०० | ४,७०,१९० | १८,५१,००० |
| सिरमूर | १,०४६ | १,४८,५६८ | ८,६७,००० |
| चंबा | ३,१२७ | १,४६,८७० | ९,८१,००० |
| फरीदकोट | ९३८ | १,६४,३६४ | १७,००,००० |
| मालेरकोटला | १६५ | ८३,०७२ | ८,६५,००० |
| लोहारू | २२६ | २३,३३८ | १,४४,००० |

## बंगाली संस्थानें

घटना कायद्यांतल्या १५ व्या गटांत कूचबिहार, त्रिपुरा व मणिपूर या तीन संस्थानांचा समावेश करण्यांत आलेला आहे. कूचबिहारचें क्षेत्रफळ १,३१८ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ५,९०,८६६ आहे व वार्षिक उत्पन्न सुमारें ३६ लक्ष रुपये आहे. त्रिपुरा संस्थानचें क्षेत्रफळ ४,११६ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ३,८२,४५० आहे; व वार्षिक उत्पन्न सुमारें २६ लक्ष रुपये आहे. मणिपूर संस्थानचें क्षेत्रफळ ८,६२० चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ४,४५,६०६ आहे.

## बिहार-ओरिसांतील संस्थानें

बिहार व ओरिसा या प्रांतांलगतहि बारीकसारीक संस्थानें पुष्कळ आहेत. या सर्व संस्थानांचा समावेश घटना कायद्यांत १६ व्या गटांत केलेला आहे.

या सर्व संस्थानांची लोकसंख्या ४६,५२,००७ आहे. मुसलमानांचें प्रमाण अत्यल्प आहे. मयूरभंज या महत्त्वाच्या संस्थानाचें क्षेत्रफळ ४,२४३ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ९,८९,८८७ आहे व वार्षिक उत्पन्न ३४ लक्ष रुपये आहे. मध्यप्रांत, ओरिसा व मद्रास इलाखा यांच्या सीमेवर असणारें बस्तर संस्थानहि मोठें आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें ११ हजार चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या ५,२४,७२१ असून वार्षिक उत्पन्न सुमारें १२ लक्ष रुपये आहे.

* * *

अशीं हीं शेंकडों क्षुद्र संस्थानें, त्यांचे बादशाही संबंध वगैरे संभाळून अखिल भारतीय फेडरेशन अस्तित्वांत आणून, स्वराज्याची व स्वातंत्र्याची मजल गांठावयाची म्हणजे एक संकटच आहे. यामुळें, अशी सूचना करण्यांत येत असते कीं, अगदीं लहान संस्थानांच्या मालकांना वर्षासन नेमून द्यावें व त्यांचा मुलूख खालसा करण्यांत यावा.

पुढील प्रकरणांत मुसलमानांनीं मांडिलेल्या पाकिस्तानच्या योजनांचा विचार करतांना, पाकिस्तानमध्यें संस्थानी मुलुख किती मागितला जात आहे हें ठरवितांना, वरील संस्थानविषयक माहिती उपयोगी पडेल.

---

जुनीं दुर्मिळ पुस्तकें मिळण्याचें पुण्यांतील एकच ठिकाण !
डी. व्ही. ब्रदर्स, बुकसेलर्स
४९५ शनिवार, मेहुणपुरा कॉर्नर, पुणें २.
शाळा कॉलेजांना लागणारीं जुनीं व नवीं पुस्तकें विकत मिळतात;
तसेंच
जुनीं पुस्तकें योग्य किंमतीस विकत घेतलीं जातात.

## प्रकरण ७ वें

# मुसलमानांनीं मांडलेल्या पाकिस्तानच्या योजना

**मुस्लीमलीगनें** २६-३-१९४० रोजीं लाहोर येथें जो ठराव पास केला त्यांत प्रांतपुनर्घटनेचें तत्त्व कोणतें असावें ही गोष्ट स्पष्ट झाली. लीगनें पाकिस्तानचा पुरस्कार अधिकृतरीत्या केला असें त्या ठरावावरून स्पष्ट होतें. लीगनें सुचविलेली प्रांतिक पुनर्घटना झाली कीं पुढें काय होईल याची कल्पना जगाला व्हावी म्हणून, लीगनें आपल्या कारभारी मंडळाला कांहीं बाबतींत अधिकार देऊन टाकिला. राष्ट्ररक्षण, परराष्ट्रीय संबंध, रस्ते-रेल्वे वगैरे दळणवळणाचीं साधनें, जकात इत्यादि सर्व बाबतींतले अधिकार शेवटीं पुनर्घटित प्रांतांपैकीं प्रत्येकाला मिळावें अशा दृष्टीनें या कारभारी मंडळानें एक योजना आंखावयाची आहे. इतक्या सर्व क्षेत्रांतले अधिकार प्रत्येक प्रांतिक घटकाकडे यावयाचे याचा अर्थच असा कीं, सर्व हिंदुस्थानची मध्यवर्ति सत्ता शिल्लक राहिलीच तरी, तिच्या हातीं अधिकार कांहीं नसावा, असें लीगचें म्हणणें आहे.

आपल्या कल्पनेप्रमाणें प्रांतिक पुनर्घटना झाली तर प्रत्येक प्रांतिक घटकाची स्थिति कशी काय राहील, हिंदुस्थानांत नेमका कोणता मुलुख राहील व पाकिस्तानांत कोणता व किती मुलुख राहील, या पुनर्घटित प्रांतांचें आर्थिक स्थैर्य टिकाऊ ठरेल काय, प्रत्येक प्रांत स्वसंरक्षणक्षम ठरेल काय, प्रांतांची अशी विभागणी झाली तर त्या गोष्टीचा भविष्यकाळीं सगळ्या हिंदुस्थानवर काय परिणाम होईल इत्यादि तपशिलाच्या गोष्टी बोलण्याची लीगची तयारी नाहीं. इतर संस्थांनीं लीगचीं तत्त्वें प्रथम मान्य करावीं असा बॅ० जीनांचा आग्रह आहे. तपशीलवार योजना पुढें आल्याशिवाय योजनेचा विचार करावयाचा कसा, अशा आशयाचा प्रश्न विचारून राजेंद्रबाबूप्रभृति लोक

असें सुचवितात कीं, तपशील पुढें आला व योजना स्वीकार्य दिसली तर ती स्वीकारण्याला आमची हरकत नाहीं! गेल्या मे महिन्यांत बॅ० जीनांनीं मद्रास येथें पाकिस्तानवर प्रवचन झोडलें. त्यानंतर व तत्पूर्वी भारतमंत्र्यांसारख्या इंग्रज अधिकाऱ्यांनीं केलेलीं भाषणें लक्षांत घेतलीं तर, पाकिस्तान योजनेला त्यांचा विरोध असला तरी तो गुळमुळीतच दिसतो! २२-४-१९४१ रोजीं मि० ॲमेरी यांचें पार्लमेंटमध्यें भाषण झालें. त्यांतलीं पुढील वाक्यें या दृष्टीनें पाहण्यासारखीं आहेत. मि० ॲमेरी म्हणाले :

I am not concerned here to discuss the immense practical difficulties in the way of this so-called Pakistan project stated in this its extreme form nor need I go back to the dismal record of India's history in the eighteenth century to point out the terrible dangers inherent in any break-up of the essential unity of India, at any rate in its relation to the outside world.

(अशा अतिरेकी स्वरूपांत मांडलेल्या पाकिस्तान योजनेंत व्यावहारिक अडचणी किती जबरदस्त आहेत याची येथें चर्चा करणें मला अवश्य दिसत नाहीं. हिंदुस्थानचें मूलभूत ऐक्य बिघडल्यानें नुसत्या बाहेरच्या जगांतून देखील हिंदुस्थानवर किती संकटें येण्याचा संभव आहे हें दाखविण्यासाठीं १८व्या शतकांतल्या हिंदुस्थानच्या इतिहासाच्या उदास क्रमाकडे वळण्याचेंहि मला कारण दिसत नाहीं.)

ही भाषा मोठी मुत्सद्देगिरीची आहे—म्हणजेच तिच्यांत दुटप्पीपणा ओतप्रोत भरलेला आहे. 'अतिरेकी' स्वरूपामुळें पाकिस्तानची योजना मान्य नाहीं, व्यावहारिक अडचणींमुळें ती स्वीकारतां येत नाहीं हे शब्दप्रयोग मुसलमानांच्या आशांना फुलोरा आणणारे आहेत. उलटपक्षीं, हिंदुस्थानच्या मूलभूत ऐक्याचा उल्लेख हिंदूंनीं संतुष्ट राहावें यासाठीं केलेला आहे.

> अशी अतिरेकी व अव्यवहार्य योजना न मांडतां पाकिस्तानची कल्पना बोलाल तर तिचा विचार करूं, असेंहि आश्वासन या भाषेंत दडून बसलेलें आहे. त्याचा फायदा मुसलमान घेणार नाहींत, असें नाहीं.

आजवर मुसलमानांकडून मांडल्या गेलेल्या योजना तपासणें हें या दृष्टीनें जरूर आहे. लीगनें अधिकृतरीत्या योजना मांडूं नये, इतरांनींच तपशील बोलावा असा सिद्धसाधकपणाचा संकेतहि या सगळ्या प्रकरणीं असण्याचा संभव आहे. पुष्कळसें मागत राहावें, म्हणजे हिंदु पुढारी फुटीरपणानें कांहीं तरी कबूल करीत जातात व त्यांतून बराचसा फायदा उगवून घेतां येतो, हा मुसलमानांचा आजवरचा अनुभव असल्यामुळें, 'त्रयाणाम् धूर्तानाम्' या गोष्टींतल्या धूर्तांप्रमाणें मुसलमान वागत असतील, असाच संभव विशेष आहे.

लीगच्या ठरावांत संस्थानांचा उल्लेख नाहीं. फेडरेशनची चर्चा करण्याचे प्रसंग उद्‌भवले तेव्हां लीगनें व जीनांनीं दोन तीन मुद्यांवर भर दिलेला आहे. १९३५ च्या घटना कायद्यांत फेडरल ॲसेंब्लीच्या प्रतिनिधींची जी विभागणी मांडलेली आहे ती ब्रिटिशहद्दींतल्या हिंदुस्थानपुरती आहे. अकरा स्वायत्त प्रांत, ब्रिटिश बलुचिस्थान, दिल्ली, अजमीर-मारवाड, कूर्ग वगैरे किरकोळ विभाग या सर्वांचे मिळून २५० प्रतिनिधी फेडरल ॲसेंब्लींत जावयाचे असून, त्यांत मुसलमान प्रतिनिधींची संख्या ८२ ठरविण्यांत आलेली आहे. फेडरल ॲसेंब्लींत संस्थानांतून १२५ प्रतिनिधि येतील; त्यांतहि मुसलमानांचें हेंच प्रमाण असलें पाहिजे, असा जीनांचा आग्रह होता. १९३५ च्या फेडरल घटनेंतील प्रांत हे मध्यवर्ति सत्तेवरच पुष्कळ बाबतींत अवलंबून राहणारे आहेत. जीनांना प्रांतांचें हें परावलंबित्व संमत नाहीं. त्यांना प्रांत हे स्वयंभू, स्वयंपूर्ण व स्वयंतंत्र घटक ( Sovereign units ) असावे, असें वाटतें. या स्वयंतंत्रपणाच्या कल्पनेंत फेडरेशनमधून फुटून बाहेर पडण्याच्या हक्काचाहि अंतर्भाव होत असेल तर, जीनांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, मुसलमानी प्रांत फेडरेशनमधून केव्हांहि बाहेर पडतील व जरूर तर अफगाणिस्थानपाशीं एकरूप होतील ! प्रांत स्वयंतंत्र ठरले कीं, फेडरेशनमध्यें सामील होणारीं संस्थानेंहि आपोआपच स्वयंतंत्र ठरणार व मग निजामशहांचें सध्यांचें लोकशाहीविरोधी व हिंदुविघातक धोरणहि 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' या न्यायानें आपोआपच चालू राहणार ! जगांतल्या लोकसमूहाकडे पाहण्याची इस्लामी दृष्टि जीनांच्या या म्हणण्यांत कशी सूक्ष्मपणानें प्रतिबिंबित झालेली आहे हें पाहण्यासारखें आहे. मुसलमानांकडून पाकि-

स्तानच्या ज्या योजना तपशिलासह मांडण्यांत आलेल्या आहेत, त्यांतहि हीच दृष्टि आहे.

## 'पंजाबी'ची योजना

'पंजाबी' हें टोपण नांव धारण करणाऱ्या लेखकानें मांडलेली 'पाकिस्तान'ची योजना Confederacy of India (भारताचें सरसंघराज्य) या नांवानें ओळखली जाते. या योजनेच्या जन्मदात्यानें आपली योजना ग्रंथरूपानें लोकांपुढें मांडली आहे. हिंदुस्थानांत प्रथम पांच संघराज्यें (Federations) स्थापन व्हावीं आणि या सर्वांना एकत्र नांदविणारें सरसंघराज्य (Confederacy) अस्तित्वांत यावें असें 'पंजाबी'चें म्हणणें आहे. या पांच संघराज्यांतल्या पहिल्या संघराज्याला त्यांनीं The Indus Regions' Federation (सिंधु-स्तान संघराज्य) असें नांव दिलें आहे. सिंध, वायव्य सरहद्दप्रांत, बलुचिस्तान, व (अंबाला जिल्हा, कांग्रा जिल्हा व होशियारपूर जिल्ह्यांतले उना व गऱ्हशंकर तालुके एवढा भाग वगळून उरलेला) पंजाब एवढा सध्यांच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतला भूभाग, व काश्मीर, भावलपूर, अंब, दीरस्वात, चित्रळ, खानपूर, कलात, लासबेला, कपूर्थळा व मालेरकोटला एवढा संस्थानी मुलुख या सगळ्यांचें मिळून सिंधु-स्तान संघराज्य बनावयाचें आहे. या क्रमांक १ च्या संघराज्यांत ३,९३,८३८ चौरस मैल क्षेत्रफळाचा भूभाग जात असून, त्यांत एकंदर ३ कोटी ३० लक्ष लोक नांदावयाचे आहेत. या लोकसंख्येंत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ८२ असेल, शिखांचें प्रमाण शेंकडा ६ असेल व हिंदूंचें प्रमाण शेंकडा ८ असेल, असा अंदाज करण्यांत आलेला आहे.

पांच संघ-राज्यांपैकीं दुसरें संघराज्य 'हिंदुभारत संघराज्य' म्हणून ओळखलें जावें, असें 'पंजाबी' म्हणतात. संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, ओरिसा, आसाम, मद्रास, मुंबई, बिहार व बंगालचा थोडासा भाग एवढा सध्यांच्या ब्रिटिश भारतांतला भूभाग आणि राजस्थानी संस्थानें व 'दक्षिणी संस्थान संघराज्यांत' न घेतलेलीं संस्थानें हा संस्थानी विभाग यांचें मिळून हें 'हिंदु भारत संघराज्य' निर्माण व्हावयाचें आहे. या संघराज्याचें क्षेत्रफळ ७,४२,१७३ चौरस मैल असेल. त्यांत २१,६०,४१,५४१ लोक नांदतील व या लोकसंख्येंत

हिंदूंचें व मुसलमानांचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ८३·७२ व ११ असें असेल. असा हिशोब मांडण्यांत आलेला आहे.

'राजस्थानी संघराज्य' या तिसऱ्या संघराज्यांत ब्रिटिश हद्दींतला मुलुख मुळींच नसून, राजस्थानमधील सर्व संस्थानें व मध्यभारतांतील संस्थानें यांचा अंतर्भाव या संघराज्यांत होणार आहे. या संघराज्याचें क्षेत्रफळ १,८०,६५६ चौरस मैल भरेल व त्यांत १,७८,५८,५०२ लोक नांदतील, असा अंदाज आहे. यांत हिंदु व मुसलमान यांचें शेंकडा प्रमाण अनुक्रमें ८६·३९ व ८·०९ असें राहील

'दक्षिणी संस्थान संघराज्य' या संघराज्यांत हैद्राबाद, म्हैसूर, व बस्तर संस्थानें यांचा अंतर्भाव होणार आहे. याचें क्षेत्रफळ १,२५,०८६ चौरस मैल भरेल व त्यांत २,१५,१८,१७१ लोक नांदतील असा अंदाज बांधण्यांत आलेला आहे. हिंदु व मुसलमान यांचें या लोकवस्तींतलें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ८५·२६ व ८·९९ भरेल.

'बंगाली संघराज्य' या पांचव्या संघराज्यांत पूर्वबंगालमधील बहुतेक सगळा भाग, आसामचे गोलपारा व सिल्हेट हे दोन जिल्हे आणि त्रिपुरा, कूचविहार वगैरे संस्थानें यांचा समावेश व्हावयाचा आहे. या संघराज्याचें क्षेत्रफळ ५९,७६४ चौरस मैल भरेल असा अंदाज आहे. त्यांत नांदणाऱ्या ३ कोटी १० लक्ष लोकसंख्येंत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण ६६·१ राहील व हिंदूंचें शेंकडा प्रमाण ३३·९ राहील, असाहि तर्क करण्यांत आलेला आहे.

हीं जीं पांच संघराज्यें होणार त्या प्रत्येकावर एक गव्हनर जनरल सत्ता चालविणार व या संघराज्यांत समाविष्ट होणाऱ्या प्रांतिक घटकांवर प्रत्येकीं एक या प्रमाणांत गव्हर्नरांची सत्ता चालणार! या पांच संघराज्यांचें मिळून जे सरसंघराज्य बनणार त्याचा अधिकारी 'व्हाइसरॉय' या नांवानें ओळखला जाणार! या संघराज्यांच्या व सरसंघराज्याच्या कारभाराविषयीं पंजाबींनीं जो तपशील मांडला आहे त्याच्याशीं 'पाकिस्तान' अमान्य करणाऱ्या लोकांना तूर्त तरी कांहीं कर्तव्य नाहीं!

पंजाबींच्या या संघराज्य-योजनेवर व सर-संघराज्यकल्पनेवर डॉ॰राजेंद्र प्रसाद यांच्यासारख्या शांतदांत कॉंग्रेसजनानें जे आक्षेप घेतले आहेत त्यांची नोंद करून ठेवणें अवश्य आहे. भौतिक, भौगोलिक वगैरे सर्व दृष्टींनीं हिंदुस्थान

हा एक देश आहे व त्याचें एकत्व श्रीरामचंद्रापासून आजपर्यंत राजकीय दृष्ट्याहि मान्य व सिद्ध झालेलें आहे असें सांगून, राजेंद्रबाबूंनीं द्विराष्ट्रवाद साफ खोटा असल्याचें स्पष्ट शब्दांत बजावलें आहे. ज्या भानगडी मिटाव्या म्हणून पंजाबींनीं एवढा खटाटोप केला त्या भानगडी शेवटीं शिल्लकच राहतात हें त्यांनीं 'सिंधुस्तान संघराज्या'चें उदाहरण घेऊन स्पष्ट केलें आहे. या संघराज्यांतहि 'अल्पसंख्य विरुद्ध बहुसंख्य' हें भांडण शिल्लक राहतेंच आणि एवढ्याशा या भागांतहि भाषाभेदांचा बुजबुजाट टिकून राहतोच. मग, सिंधुस्तानच्या मर्यादेंत जो प्रकार चालू देण्याला पंजाबी तयार आहेत तोच प्रकार आजच्या हिंदुस्थानांत चालू देण्याला मात्र पंजाबींचा इतका विरोध कां असावा, असा सवाल राजेंद्रबाबूंनीं पंजाबींना विचारला आहे. इतक्या सर्व गोष्टी नीटपणीं मांडल्यावर, राजेंद्रबाबूंनीं एक गोष्ट केली आहे ती मात्र सर्वस्वीं अनवश्यक आहे. मुसलमानांना एका बाबतींत निर्विवाद अधिकार आहे हें सांगण्याला आपण विलंब केला याबद्दल हळहळ वाटून राजेंद्रबाबू लिहितात :

The Muslims have every right to insist that they shall not be interfered with in the observance of their religious rites and worship.*

(धार्मिक विधि व पूजाअर्चा या बाबतींत इतरांनीं आम्हांला अडथळा करतां कामा नये असें हक्कानें आग्रहपूर्वक म्हणण्याचा मुसलमानांना अधिकार आहे!)

> हिंदूंनीं या बाबतींत मुसलमानांना कधीं अडथळा केला नाहीं हें सत्य दृष्टिआड करून, अशा मागणीबाबतचा मुसलमानांचा अधिकार मान्य करणें म्हणजेच हिंदूंची नालस्ती करणें होय!

मुसलमानांचे सगळे रास्त अधिकार हिंदूंनीं आजवर वाजवीहून अधिकच मानले आहेत. हिंदूंचे अधिकार मात्र इतरांकडून संधि साधेल तेव्हां पायातळीं तुडविले गेले आहेत! यामुळें, मुसलमानांना हमी देण्याऐवजीं हिंदूंनीं त्यांच्याकडूनच हमी मागितली पाहिजे! पण, डॉ० राजेंद्रबाबूंना हे विचार सुचावे कसे? ते कांहीं 'हिंदु' म्हणून कोणत्याहि गोष्टीचा विचार करीत

*Pakistan, p. 29.

नाहींत! ते पडले 'राष्ट्रीय'! पण, जे लोक हिंदु म्हणून विचारच करीत नाहींत–इतकेंच नव्हे तर हिंदु म्हणून विचार करणें निषिद्ध मानतात– त्यांना अहिंदूंना हिंदूंच्यातर्फे हमी देण्याचा अधिकार तरी कसा प्राप्त होतो?

## अलीगड-योजना

अलीगडचे दोन प्रोफेसर सय्यद झाफरुल हसन व महंमद अब्दुल हुसेन काद्री यांनीं आपल्या संयुक्त बुद्धिबलानें पाकिस्तानची एक योजना घडविली आहे. तिची रूपरेषा पुढीलप्रमाणें आहे :

(१) पंजाब, सिंध, वायव्य सरहद्दप्रांत, बलुचिस्तान हा ब्रिटिशहद्दींतला भाग आणि काश्मीर (जम्मूसह), मंडी, चंबा, सकीत, सुमीन, कपूर्थळा, मालेरकोटला, चित्रळ, दीर, कलात, लोहारू, बिलासपूर, सिमला हिल-स्टेट्स्, भावलपूर हा संस्थानी विभाग या सगळ्यांचा अंतर्भाव पाकिस्तान-मध्यें व्हावा. या पाकिस्तानची लोकसंख्या ३,९२,७४,२४४ भरेल; व त्यांत राहणाऱ्या २,३६,९७,५३८ मुसलमानांचें एकंदर लोकवस्तींत प्रमाण शेंकडा ६०·३ राहील.

(२) हावरा व मिदनापूर हे दोन जिल्हे वगळून उरलेला सर्व बंगाल, बिहारमधील पूर्णिया जिल्हा व आसाममधील सिल्हेट जिल्हा यांचा मिळून बंगाली विभाग पाडण्यांत यावा. या विभागांत ५,२५,७९,२३२ लोक नांदतील व त्यांत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण ५७ भरेल.

(३) हैद्राबाद संस्थान विभागांत समाविष्ट होणारा भाग, पाकिस्तान आणि बंगाललगतच्या संस्थानांसुद्धां बंगालविभाग एवढा भाग वगळून उरलेल्या सध्यांच्या हिंदुस्थानला 'हिंदुस्थान' हें नांव द्यावें. या हिंदुस्थानची लोकसंख्या २१ कोटी ६० लक्ष भरेल व त्यांत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण ९·७ राहील.

(४) सध्यां मद्रास इलाख्यांत असलेला व ओरिसा प्रांतांत गेलेला कर्नाटक विभाग धरून सगळा कर्नाटक प्रांत व वऱ्हाड हे निजामला फिरून देण्यांत यावे व सध्याचें हैद्राबाद संस्थान, नवसंयुक्त कर्नाटक व वऱ्हाड अशा सर्व संघटित भूभागाला 'हैद्राबाद' अशी संज्ञा देण्यांत यावी. या

विभागांत २,९०,६५,०९८ लोक नांदतील व त्यांत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण ७·४ असेल.

(५) दिल्ली, मीरत विभाग, रोहिलखंड विभाग व अलीगड विभाग यांचा मिळून स्वतंत्र गट बनवावा. या गटांत १,२६,६०,००० लोक नांदतील व त्यांत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा २८ असेल

(६) मलबार व दक्षिण कारवार अशा मुलखाचा मिळून मलबारप्रांत बनविण्यांत यावा. यांत लोकसंख्या ४९,००,००० असेल व या लोकसंख्येंत मुसलमानांचें शेंकडा प्रमाण २७ राहील. पन्नास हजार लोकवस्तीहून जास्त लोकवस्तीच्या सर्व शहरांना 'स्वतंत्र शहरें' असा नवा दर्जा मिळावा व राज्यकारभाराच्या दृष्टीनें हीं शहरें स्वायत्त असावीं अशी या प्रोफेसरद्वयाची मनीषा आहे. अशा सर्व शहरांत मिळून मुसलमानांची लोकवस्ती १३,८८,६९८ भरेल, असें या प्रोफेसरांनीं हिशोबीपणानें सांगितलें आहे. ज्या खेड्यांतून मुसलमानांची वस्ती सध्यां तुरळक आहे तीं खेडीं सोडून, मुसलमानांची वस्ती बरीच असेल अशा खेड्यांत जाऊन मुसलमान खेडुतांनीं रहावें, अशी या दुकलीची सूचना आहे.

> नवा मुलुख घशांत पडल्यावर संघटित झालेल्या हैद्राबाद संस्थानला सार्वभौमत्वाच्या दृष्टीनें नेपाळच्या बरोबरीचा तरी दर्जा मिळाला पाहिजे, अशी हि या दोन विद्वानांची महत्त्वाकांक्षा आहे !

## लतीफ-योजना

डॉ० लतीफ यांनीं मांडलेली योजना 'पंजाबी' यांच्या योजनेहून आणि अलीगडच्या प्राध्यापकांनीं मांडलेल्या योजनेहून भिन्न आहे. त्यांनीं सर्व हिंदुस्थानचे चौदापंधरा गट (Zones) कल्पिले असून त्या गटांची विभागणी सांस्कृतिक दृष्टचा केली असल्याचें त्यांच्याकडून सांगण्यांत येतें. सिंध, बलुचिस्तान, पंजाब, वायव्य सरहद्दप्रांत त्याचप्रमाणें खैरपूर आणि भावलपूर हीं संस्थानें अशा सहांचा मिळून पहिला गट मानण्यांत आलेला आहे. या सर्वांचें मिळून फेडरेशनच्या पद्धतीनें एक स्वायत्त राज्य निर्माण करणें हा हेतु या योजनेंत आहे. पूर्वबंगाल व आसाम यांचा मिळून एक गट हिंदुस्थानच्या

ईशान्य कोपऱ्यांत पाडण्यांत आलेला आहे. पतियाळाच्या पूर्वहद्दीपासून लखनौपर्यंत आणि रामपूर संस्थानाला पोटांत घेऊन आग्रा, दिल्ली, कानपूर आणि लखनौ एवढ्या भूभागाचा मिळून तिसरा गट पाडण्यांत आलेला आहे. हैद्राबाद संस्थान, वऱ्हाड आणि कर्नूळ, कडाप्पा, चितूर, उत्तर अर्काट, चिंगलपट अशा रोंखानें मद्रासपर्यंत जाऊन समुद्राला भिडणारा जमिनीचा पट्टा या सगळ्याचा मिळून चौथा गट बनविण्यांत आलेला असून, त्याला दक्षिण गट असें नांव देण्यांत आलेलें आहे. हे चार मुसलमानी गट असून उरलेले हिंदुगट आहेत. या गटांपैकीं पहिल्या गटांत बंगालचा उरलेला भाग आणि बंगालशीं ज्याचें साधर्म्य आहे असा बिहारचा भाग यांचा समावेश केलेला आहे. ओरिसा प्रांताचा स्वतंत्र गट पाडण्यांत आलेला आहे. बिहार, संयुक्तप्रांताचा उरलेला भाग आणि मध्यभारतांतील संस्थानें यांचा मिळून तिसरा गट पाडण्यांत आलेला आहे. रजपुतान्यांतील संस्थानें, काठेवाडसह गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक, तामीळ भाषाप्रधान मुलुख, मलबार आणि वायव्य सरहद्दीलगतचा हिंदु–शीख वस्तीचा भाग असे स्वतंत्र गट मानण्यांत आलेले आहेत. शेवटच्या गटांत काश्मीर संस्थानांतील कांहीं भागाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे.

> ज्या गटांत हिंदुवस्ती प्रधान आहे त्या गटांतील मुसलमानांनीं स्थानांतर करावें व लगतच्या मुस्लीम गटांत सामील व्हावें आणि मुस्लीम गटांत असणाऱ्या हिंदुशीखांनींहि याच मार्गाचा अवलंब करावा असें डॉ० लतीफ यांनीं सुचविलें आहे.

हरिजनांनीं हिंदुगटांत राहावयाचें कीं मुस्लीम गटांत जावयाचें हें ठरविण्याची मुभा हरिजनांना देण्यांत आलेली आहे.

## शिकंदर हयातखान यांची योजना

शिकंदर हयातखान यांनीं मांडलेली योजना हिंदुस्थानच्या विभक्ती-करणाची योजना नाहीं असें सकृद्दर्शनीं भासतें. १९३५ च्या घटना काय-द्याची दुरुस्ती कशी करावी हें सुचविण्याच्या हेतूनें सदर योजना तयार करण्यांत आलेली आहे. या योजनेंत संस्थानी हिंदुस्थान व ब्रिटिश हिंदुस्थान या सगळ्याचे मिळून सात विभाग पाडण्यांत आलेले आहेत. पश्चिमेकडील

एकटोन जिल्हे वगळून उरलेला बंगाल प्रांत, आसाम, बंगाली संस्थानें आणि सिकिम संस्थान या सगळ्यांचा मिळून पहिला गट पाडण्यांत आलेला आहे. पहिल्या गटांत बंगालमधून वगळलेले जिल्हे, ओरिसा व बिहार यांचा मिळून दुसरा गट पाडण्यांत आलेला आहे. संयुक्त प्रांत आणि त्या प्रांतालगतचीं संस्थानें यांचा मिळून तिसरा गट बनविण्यांत आलेला आहे. मद्रास, त्रावण-कोर, मद्रास भागांतील संस्थानें आणि कूर्ग यांचा समावेश चौथ्या गटांत झालेला आहे. मुंबई, हैद्राबाद संस्थान, काठेवाड-गुजराथकडील संस्थानें, महाराष्ट्रीय संस्थानें, म्हैसूर आणि मध्यप्रांतालगतचीं संस्थानें यांचा मिळून पांचवा गट पाडण्यांत आलेला आहे. बिकानेर, जेसलमीर हीं दोन संस्थानें वगळून उरणारीं राजस्थानमधील संस्थानें, ग्वालेर संस्थान, इंदूर, धार प्रभृति मध्यभारतीय संस्थानें, बिहार व ओरिसालगत असलेलीं संस्थानें आणि मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांचा समावेश सहाव्या गटांत केलेला आहे. पंजाब, सिंध, वायव्य सरहद्दप्रांत, काश्मीर आणि जेसलमीर या सगळ्यांचा मिळून सातवा गट कल्पिलेला आहे.

या प्रत्येक गटाचें स्वतंत्र विधिमंडळ असावें आणि या विधिमंडळांत ब्रिटिश मुलुखाचे व संस्थानी मुलुखाचे प्रतिनिधी एकत्र करण्यांत यावे अशी योजना सुचविण्यांत आलेली आहे. अशा सर्व प्रतिनिधींचें मिळून मध्यवर्ति फेडरल विधिमंडळ बनेल आणि या विधिमंडळाच्या ३७५ सभासदांपैकीं १२५ प्रतिनिधी संस्थानांच्या वांटणीला येतील, असें या योजनेंत सुचविण्यांत आलेलें आहे. या ३७५ प्रतिनिधींपैकीं १२५ प्रतिनिधी मुसलमान असले पाहिजेत, असा आग्रह या योजनेंत धरण्यांत आलेला आहे. १९३५ च्या घटना कायद्यानें फेडरल असेंब्लींत मुसलमानेतर अल्पसंख्याकांना म्हणजे अँग्लोइंडियन, युरोपियन व हिंदी ख्रिस्ती यांना अनुक्रमें ४, ८ व ८ जागा दिलेल्या आहेत. मुसलमानांना १२५ जागा, इतर अल्पसंख्याकांना २० जागा ही सर्व योजना पाहिली म्हणजे कोणाच्याहि असें लक्षांत येईल कीं, मध्यवर्ति विधिमंडळांत

बहुसंख्य हिंदूंना अल्पसंख्य बनविण्याचाच हेतु या योजनेमागें दडून बसलेला आहे. पाकिस्तान न मागतां पाकिस्तान

प्रस्थापित करण्याचा धूर्त डाव शिकंदर हयातखान यांच्या मनांत आहे असें या योजनेवरून अनुमान काढावयाला हरकत नाहीं.

विधिमंडळांत अल्पसंख्याकांचें बहुमत आणि सैन्यांत १९३७ च्या आरंभीं मुसलमानांना असलेल्या संख्याधिक्याला कायमपणा देण्याबद्दल आग्रह या दोन गोष्टींवर सर सिकंदर हयातखान विशेष भर देत आहेत आणि म्हणून असें स्पष्टपणें म्हटलें पाहिजे कीं, उघड पाकिस्तान मागणारे मुसलमान एका अर्थीं बरे; पण, सोज्ज्वळपणानें बोलून हिंदूंना कायमचे गुलाम बनवूं पाहणारे हे मुसलमान मुत्सद्दी नकोत !

---


**सावधगिरीची सूचना**

जीवनाचें ध्येय म्हणजे पैसा व प्रतिष्ठा
यांना अंकित करण्यासाठीं शरीरसंपत्ति वाढवा

# सुका मेव्यानें

**शरीर धष्टपुष्ट होतें**

सुदृढ शरीर पैसा मिळवितें व पैसा ? पैसा प्रतिष्ठेला जन्म देतो. अजून वेळ गेली नाहीं, बलवर्धनाला आजच आरंभ करा.

**ग. कृ. ताम्हनकर,**
किराणा व सुका मेवा व्यापारी, ५ शुक्रवार, पुणें २.

प्रकरण ८ वें

# आंबेडकर व पाकिस्तान

## द्विराष्ट्रवादाचें खंडन

**To my mind** there is no doubt that this Gandhi age is the dark age of India. It is an age in which people, instead of looking for their ideals in the future, are returning to antiquity. It is an age in which people have ceased to think for themselves and as they have ceased to think, they have ceased to read and examine the facts of their lives......Such an age, I thought, needed something more than a mere descriptive sketch of the Federal Scheme. It needed a treatment which was complete though not exhaustive and pointed, without being dogmatic, in order to make it alive, to the dangers arising from the inauguration of the Federal Scheme.*

(सध्यांचें गांधीयुग हें हिंदुस्थानांतलें अज्ञानयुग आहे याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. ध्येयसंशोधनार्थ भविष्यकाळाकडे वळावयाचें सोडून या युगांतले लोक भूतकाळाच्या भुयाराकडे परत चालले आहेत. या युगांतल्या लोकांनीं स्वतंत्र विचार करण्याचें सोडून दिलें आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, ग्रंथ वाचण्याचें व जीवनांतल्या घटनांचें परीक्षण करण्याचें कार्यहि त्यांनीं सोडून दिलें आहे. ... फेडरल घटनेच्या नुसत्या वर्णनात्मक रूपरेषेपलीकडे कशाची तरी गरज या युगांतल्या लोकांना आहे, असें मला दिसलें. फेडरल घटनेचें सर्वांगपूर्ण नसलें तरी संपूर्ण विवेचन या युगांतील लोकांच्या साठीं करणें जरुरीचें आहे असें मला वाटलें. फेडरल घटना प्रस्थापित झाली तर कोणतीं संकटें उद्भवतील याचें दिग्दर्शन होऊन,

*Federation *vs.* Freedom, p. 154.

हे लोक सावध होतील असें सूचक विवेचन करावें व तें करतांना कोणत्याहि आग्रहाला बळी पडूं नये, असें मला वाटलें.)

२९-१-१९३९ रोजीं डॉ० आंबेडकर यांनीं पुण्यास 'फेडरेशन विरुद्ध स्वातंत्र्य' या विषयावर एक विचारप्रवर्तक व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानाची भूमिका स्पष्ट करून सांगतांना डॉ० आंबेडकर यांनीं वरील शब्द वापरले होते. Thoughts on Pakistan या पुस्तकाची भूमिकाहि जवळजवळ तशीच आहे. पाकिस्तान या महत्त्वाच्या विषयाचा विचार लोकांनीं डोळसपणानें करावा या बुद्धीनें डॉ० आंबेडकर यांनीं हा ग्रंथ लिहिला आहे. रानडे-गोखले-टिळक यांच्या विचारनिष्ठ राजकारणाचे डॉ० आंबेडकर हे अभिमानी आहेत. अभ्यासूपणा व स्वतंत्र विचार हीं जीं या राजकारणाचीं लक्षणें तीं लक्षणें डॉ० आंबेडकर यांच्या पुस्तकांत उत्कटपणें आढळतात. गेल्या सातआठ महिन्यांत 'पाकिस्तान' या विषयावर मराठींत जें लिखाण प्रसिद्ध झालें आहे त्याला आधारभूत असलेली माहिती डॉ० आंबेडकर यांच्या पुस्तकांतूनच प्राय: घेण्यांत आलेली आहे. श्री० म० तु० कुलकर्णी यांच्या छोटेखानी पुस्तकांत ऊर्दू लेखांचीं कांहीं भाषांतरें दिलीं आहेत; तेवढा ठळक अपवाद वगळला तर, याच खाणींतला मालमसाला उकरून व उपसून लेखांच्या बहुतेक इमारती रचण्यांत आलेल्या आहेत. या विषयापुरतेंच बोलावयाचें झालें तर डॉ० आंबेडकर यांच्या या पुस्तकाला 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' हें वचन लावावयालाहि मी कचरणार नाहीं. एखाद्या विषयाला पैलू पाडून त्याचा अभ्यास कसा करावा हें तरुणांना शिकावयाचें असेल तर हा ग्रंथ त्यांना निश्चित मार्गदर्शक ठरेल.

हें पुस्तक वाचणाऱ्या हिंदूंना आणखीहि एका कारणामुळें आनंद वाटेल, असें मी समजतों. डॉ० आंबेडकर हे महाराष्ट्रांतल्या महार समाजाला बरोबर घेऊन मुसलमान होणार असल्याचा बोभाटा मध्यंतरीं बराच झाला होता. या बाबतींत डॉ० आंबेडकर नेमकें काय म्हणाले होते व तें म्हणण्यांत त्यांचा हेतु काय होता हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. हें पुस्तक वाचल्यावर इतकें मात्र स्पष्टपणें निष्पन्न होतें कीं,

> डॉ० आंबेडकर आतां मुसलमान होण्याची गोष्ट बोलणार नाहींत आणि त्यांनीं अशी भाषा अत:पर काढली तरी कोणताहि

> शाहणा मुसलमान त्या भाषेवर विश्वास ठेवणार नाहीं!डॉ०आंबेड-करांनीं या पुस्तकांत हिंदुसमाजाचे पुष्कळ दोष दाखविले आहेत व हिंदुसमाजाचें सध्यांचें नेतृत्व पांढरपेशा, सवर्ण हिंदूंच्या हातीं असल्यामुळें हिंदुसमाजाचें नुकसान होत आहे असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. हें सारें विवेचन वादग्रस्त असलें तरी, एकंदर पुस्तकाची दृष्टि हिंदुसमाजाबद्दलच्या परकेपणाच्या भावनेनें दूषित झालेली नाहीं.

डॉ० आंबेडकरांच्या मनांत हिंदुसमाजाबद्दलचा आपलेपणा वाढत आहे. उदारवृत्तीचा हिंदुसमाज हें ओळखील; व आपल्या माणसानें लाथ मारली तरी, विष्णूनें भृगूच्या लाथेचें श्रीवत्सचिन्ह भूषण म्हणून मिरविलें त्याप्रमाणें ती सहन करावी असें मानील, असें गृहीत धरून चालावयाला हरकत नाहीं. हें पुस्तक वाचणारे शहाणे मुसलमान मनांत चरफडूं लागावे, इतकी खरपूस टीका डॉ० आंबेडकर यांनीं मुसलमानांच्या मनोवृत्तीवर व समाजरचनेवर साधार केली आहे. असें असूनहि, कांहीं संस्थानांतल्या मुसलमानांना डॉ० आंबेडकरांनीं पाकिस्तान मान्य केलें, या खऱ्याखोट्या कल्पनेनें आनंदाच्या उकळ्या फुटल्या! प्रसृत झालेलें हें वृत्त खरें असेल तर, या 'आनंद-कंदां'च्या बुद्धीची तारीफ करावी तितकी थोडीच ठरणार आहे!

पाकिस्तानचा पुरस्कार करण्याच्या हेतूनें आपण हें पुस्तक लिहीत नाहीं हें डॉ० आंबेडकरांनीं (पृ०११ वर) स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. कांहीं एका मर्यादित अर्थानें आंबेडकर यांनीं 'पाकिस्तान' मान्य केलें आहे. त्याचें कारण असें आहे कीं,

> हिंदुस्थानांत हिंदुराष्ट्र व मुसलमान राष्ट्र हीं दोन भिन्न राष्ट्रें आहेत असें त्यांनीं गृहीत धरलें आहे.

हिंदुराष्ट्रपति बॅ० सावरकर यांच्या भाषणांतले अनेक उतारे उद्धृत करून (पृ० १२७–१३७) त्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, मुसलमानांचें स्वतंत्र राष्ट्र हिंदुस्थानांत असल्याची कबुली बॅ० सावरकरांनीं दिलेली आहे (पृ० १३८). हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू, पारशी अशा सर्वांचें मिळून हिंदी राष्ट्र व या सर्वांच्या ऐक्यावर हिंदुस्थानची राजकीय प्रगति अवलंबून या लुल्या, पराधीन व प्रगतिबाधक विचारसरणीला उत्तर म्हणून बॅ० सावरकर

असें म्हणतात कीं, हिंदुस्थान हीच ज्यांची पितृभू व पुण्यभू आहे अशा तीस कोटी हिंदूंचें हिंदुस्थानांत राष्ट्र आहे व या राष्ट्राचें सारें भवितव्य या देशाच्या स्वातंत्र्याशीं व सुरक्षिततेशीं निगडित झालें असल्यामुळें, तें राष्ट्र एकाकीहि स्वातंत्र्यार्थ झगडेल. इतर लोक येतील तर हिंदु त्यांच्या मदतीचा स्वीकार करून झगडतील; न येतील व स्वस्थ बसतील तर एकटे हिंदु झगडा चालवितील आणि विरोध करतील तर त्याहि विरोधाला तोंड देऊन हिंदु आपलें ध्येय गांठतील; मदतीचा मोबदला म्हणून अहिंदूंनीं अवास्तव असें कांहीं अपेक्षूं अगर मागूं नये, तें त्यांना मिळणार नाहीं—हा या विचारसरणींतला आशय आहे. हिंदी मुसलमान हे 'स्वतंत्र राष्ट्र' आहेत असें बॅ० सावरकरांचें अगर हिंदुसभेचें मत आहे, असें अधिकृतरीत्या बाहेर आलेलें नाहीं.

पण, बॅ० सावरकरांचें मत कांहींहि असलें तरी डॉ० आंबेडकरांवर तें बंधनकारक नाहीं! या द्विराष्ट्रवादाची चर्चा करतांना त्यांनीं पुष्कळ ग्रंथकारांचीं अवतरणें दिलीं आहेत (पृ० २५–३३). या अवतरणांच्या आधारें डॉ० आंबेडकरांच्या विवेचनाचा विचार केला तर असें दिसतें कीं, वंश, भाषा, परंपरा, संस्कृति इत्यादि गोष्टींचा विचार केला तर हिंदूंचेंहि एक राष्ट्र ठरत नाहीं व मुसलमानांचेंहि एक राष्ट्र ठरत नाहीं. मुसलमान हे तर परवांपरवांपर्यंत स्वतःचें वर्णन जमात, समाज, अल्पसंख्य वर्ग वगैरे शब्दांनीं करीत होते, या गोष्टीची जाणीव डॉ० आंबेडकरांनाहि आहे (पृ० ३१–३२).

> ऊर्दू ही मुसलमानांची राष्ट्रभाषा आहे, इतकेंच नव्हे तर, ती उभ्या हिंदुस्थानचीच राष्ट्रभाषा आहे या मुसलमानांच्या प्रचारांत शुद्ध झोंडपणा कसा भरलेला आहे हें डॉ० आंबेडकर यांनींच दर्शविलें आहे (पृ० २६२).

हिंदूंची एकजूट होत आहे व आपल्याला एकराष्ट्र म्हणून नांदलें पाहिजे ही भावना हिंदु समाजांत वाढत आहे, हें डॉ०आंबेडकरांनाहि मान्य आहे (पृ० ६).

स्वतःच गोळा केलेल्या पुराव्याच्या आधारें डॉ० आंबेडकर यांनीं वस्तुतः असें म्हणावयाला पाहिजे होतें कीं, हिंदुस्थानांत स्वतंत्र इस्लामी राष्ट्र असल्याची भाषा साफ खोटी व अनैतिहासिक आहे. हिंदूंचें स्वतंत्र राष्ट्र असल्याची कबुली त्यांना त्यांच्या पुराव्यावरून देतां आली नसती तरी,

त्यांना असें निश्चित म्हणतां आलें असतें कीं, समान नागरिकत्वाच्या पायावर हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी इत्यादि सर्वांचें राष्ट्र हिंदुस्थानांत निर्माण होतच नसेल तर, राष्ट्र म्हणून नांदण्याचा जास्तींत जास्त हक्क हिंदूंनाच पोंचतो.

पण, डॉ० आंबेडकरांनीं असें म्हटलें नाहीं. एकाच मुद्याला जास्त महत्त्व दिल्यामुळें विचाराचें अवधान कसें सुटतें हें डॉ० आंबेडकरांनीं या प्रकरणीं जें विवेचन केलें आहे त्यावरून स्पष्ट दिसतें. द्विराष्ट्रवादांतला अत्यंत विचारार्ह मुद्दा कोणता याचें उत्तर त्यांनीं (पृ० २९वर) दिलें आहे. हिंदु-मुसलमानांना एकत्र बांधणाऱ्या व या दोन्ही समाजांच्या हर्षामर्षाला कारणीभूत होणाऱ्या कांहीं ऐतिहासिक गोष्टी आहेत काय, असा प्रश्न डॉ० आंबेडकरांनीं (पृ०२९ वर) उपस्थित केला आहे. हिंदु-मुसलमानांमधले ऐतिहासिक काळांतले झगडे विस्तारानें रंगवून (पृ० ३० व पृ० ४९–५९) डॉ० आंबेडकरांनीं या प्रश्नाचें नकारार्थी उत्तर दिलें आहे. एकत्र नांदण्याची इच्छा हाहि एकराष्ट्रभावनेचा फार मोठा आधार आहे असें दिग्दर्शित केल्यावर, मुसलमानांची हिंदूंच्या बरोबर नांदण्याची इच्छा नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं डॉ० आंबेडकरानीं गेल्या वीस वर्षांत देशभर झालेल्या जातीय अत्याचारांची जंत्री विस्तारानें दिली आहे (पृ० १५८–१८३).

१८९५ पासून पुढें जी जातीय दांडगाई सुरू झाली व जी दांडगाई या क्षणापर्यंत एकसारखी वाढतच आहे तिचा विचार केला म्हणजे, हिंदु-मुसलमान समाजाला एकत्र गोंवणाऱ्या, दोन्ही समाजांनीं ज्यांच्याबद्दल अभिमान बाळगावा, दोन्ही समाजांना ज्यांबद्दल उद्वेग वाटावा अशा गोष्टी मुळांत खरोखरच नसाव्या, असें वाटूं लागतें. पण, खरी स्थिति तशी नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्या डाक्का शहरांत परवां कल्पनातीत जाळपोळ व हाणमार झाली व हिंदूंचें जीवन असह्य झालें त्याच डाक्का शहरांतल्या हिंदु-मुसलमानांचे संबंध शेंसव्वाशें वर्षांपूर्वीं किती एकसंध झालेले होते हें १८३९ सालीं लिहिण्यांत आलेल्या एका ग्रंथांतील पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल:

Religious quarrels between the Hindus and the Mussalmans are of rare occurrence. These two classes live

in perfect peace and concord and a majority of the individuals belonging to them have even overcome their prejudices so far as to smoke from the same Hookah*.

(हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें धार्मिक स्वरूपाचे झगडे क्वचित् होतात. या दोन वर्गांमध्यें पूर्ण सलोखा व दिलजमाई नांदत आहे. दोन्ही जमातींतल्या बहुसंख्य वर्गानें आपले धार्मिक आग्रह इतके दाबून टाकले आहेत कीं, परस्परांमध्यें हुक्कापाण्याचा व्यवहार निःसंकोच मनानें होतो.)

वरवर कितीहि राज्यक्रांत्या झाल्या तरी, महापुरांत तग धरणाऱ्या लव्हाळ्याप्रमाणें, चौफेर पसरलेल्या ग्रामसंस्था व पंचायती तग धरून होत्या व अज्ञानानें वा अनिच्छेनें मुसलमानी धर्मांत गेलेल्या ग्रामस्थांना सांभाळून घेऊनच खेडुतांचे सगळे व्यापारव्यवहार चालत होते. संत-महंत, पीर-फकीर, नाटक्ये-चेटक्ये यांच्याबद्दलचे बरेवाईट भाव बहुधा सर्वांच्या ठिकाणीं सारखेच असत. कारण, पुराणाची जागा कुराणानें घेतली तरी, मनाची मशागत प्रायः एकाच पद्धतीनें होत असल्यामुळें व मूळची माती बहुधा एकाच खाणींतली असल्यामुळें, हर्षामर्षाच्या प्रसंगांत व अभिमानविषयांत मोठासा फरक होत नसे.

लुटालूट करण्यासाठीं परके मुसलमान येत ते बहुधा वळिवासारखे येत व जात. त्यांचा उपद्रव मनस्वी होई; पण, तो प्रासंगिक उपद्रव टळून गेला कीं, जीवनाची घडी फिरून सुरळित बसल्यासारखी होई व जीवनाच्या पुष्कळशा प्रांतांत हिंदु–मुसलमान हा भेद लोप पावे. मुसलमान राज्यकर्ते स्थायिक झाले व स्थायिकपणानें राज्य करूं लागले तेव्हां त्यांना पुष्कळशा बाबतींत मुसलमानपणा विसरूनच वागावें लागलें. मुसलमान राज्यकर्ते असल्यामुळें, मुसलमानांत अमिरी व फकिरी यांच्यावरच अवलंबून राहण्याचा षोख बळावला; हिंदु जिंकले गेले असले तरी त्यांच्यामधील राजकारणी परंपरा जागृतच असल्यामुळें, प्रांतोप्रांतींचे प्रमुख हिंदु सरकारचे सावकार, लष्करी व मुलकी अधिकारी इत्यादि पदांवर राहिले. कांहीं बाबतींत मुसलमानांचें घोडें अजून कसें लंगडेंच आहे हें प्रांतिक स्वायत्तता सुरू झाल्यानंतर बनलेल्या मंत्रिमंडळांत झालेल्या खातेविभागणीवरून दिसून येतें. हिंदुमंत्री उपलब्ध

*Topography of Dacca by Dr. *Taylor*.

असूनहि, मुंबई, मद्रास, संयुक्तप्रांत येथें पब्लिक वर्क्स हें भुसभुशीत खातें मुसलमान दिवाणांच्या हातीं देण्यांत आलें. मुसलमानी प्रांतांत नाइलाज म्हणून हिंदु अर्थसचिव नेमण्यांत आले. मुसलमानी राज्यांसाठीं प्राण पणाला लावून लढणारे शहाजीसारखे रणशूर, खुद्द औरंगजेबाच्या वतीनें स्वारी-शिकारीवर जाणारे रजपूत योद्धे, दक्षिणेंतल्या शाह्यांचें निर्मूलन करूं पाहणारे मोंगल सम्राट, यवनीशीं विवाहबद्ध होणारा जगन्नाथपंडित, उपनिषदांचें फारशींत भाषांतर करणारा राजपुत्र दारा शुकोह, बाल शाहूवर मातृवत् प्रेम करणारी रोषनारा बेगम, अहंमदशहा अब्दालीच्या भुलावणीला वश न होतां पानिपतावर तोफखान्याचें विक्राळ युद्ध करून भाऊसाहेब पेशव्यांबरोबर धारातीर्थी देह ठेवणारा इब्राहिमखान गारदी, कोल्हापूरच्या कै० शाहू छत्रपतींनीं गुणी म्हणून दरबारांत ठेवलेला गवई अल्लादियाखां इत्यादि नांवांतली हिंदु-मुसलमानांची गल्लत पाहिली म्हणजे, धर्मभेद असूनहि, हिंदु-मुसलमान समाज कित्येक शतकें कसा एकरूप बनत चालला होता याची कल्पना करतां येते! हिंदु हे वृत्तीनेंच क्षमाशील;* त्यामुळें त्यांनीं इतरांवर केवळ धर्मभिन्नतेमुळें सहसा आक्रमण केलें नाहीं. हिंदु म्हणून त्यांचा इतरधर्मीयांकडून छळ होऊं लागला व तो अगदीं असह्यच झाला म्हणजे तेहि आपली प्रतिकारवृत्ति दाखवीत; पण, ती जशी मुसल-

*Intolerance is not a defect of Hinduism. Mahomedan princes gladly confided to learned and astute Brahmins civil trusts of importance and many a Mussalman rose to honour and fortune in a Maharaja's camp. The ministers of Hyder Ali, who concealed for a time the event of his death, were Hindus of the highest caste; and when a Chancellor of the Exchequer was to be appointed at Morshidabad, the Nawab Nazim tried to have Nund Coomar appointed instead of Mahamad Rezakhan. Sunnis, Shias, Marhattas and Sikhs competed freely for distinction and profit in every city and camp of Hindustan. The tide of war ebbed and flowed, but mosque and temple stood unscathed where they had stood before—Empire in Asia by *W. M. Torrens*, M. P.

मानांच्या विरुद्ध दाखविली जाई तशीच ख्रिस्त्यांविरुद्धहि दाखविली जाई हें वसईच्या संग्रामाच्या हकीकतीवरून कळण्यासारखें आहे. एरवीं, मुसलमानांच्यासुद्धां इभ्रतीला उगीच दुखवूं-डिवचूं नये अशीच सर्वसामान्य वृत्ति असे हें शाहू महाराज, सुरजमल जाट, मल्हारराव होळकर यांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होत आहे.

हिंदु-मुसलमानांच्या झगड्यांना आलेलें अवास्तव महत्त्व अलीकडचें आहे व त्याचीं कारणें प्राकृतिक अगर स्वाभाविक नसून राजकीय आहेत. आपल्या नव्या अवताराला अनुरूप अशीं अभिमानस्थानें शोधून काढण्यांत कांहीं मुसलमान आपल्या बुद्धीचा व्यय करीत असतात. हिंदूंपासून आपण सर्वस्वीं भिन्न आहोंत असें दाखविण्यासाठीं मुसलमानांनीं जसें ऊर्दूचें सोंग उठल्याबसल्या नाचविण्याला सुरुवात केली आहे अगर 'फैझ' टोपीची नवी टूम काढिली आहे त्याप्रमाणेंच आणखी कांहीं प्रचारात्मक गोष्टी त्यांनीं मोठ्या हिरीरीनें सुरू केल्या आहेत. प्रत्येक प्रांतांतले पुष्कळसे मुसलमान मूळचे हिंदुवंशांतले असल्याकारणानें व त्यांच्या घराण्यांत इस्लाम-स्वीकार नेणतेपणानें केला गेला असल्यामुळें, त्यांच्यामध्यें हजारों चालीरीति व प्रचार-प्रघात मूळचे म्हणजे हिंदूंचेच रेंगाळत राहिले आहेत. कायद्याच्या कक्षेंतहि हा प्रकार शिल्लक आहे. कांहीं विशिष्ट बाबतींत मुसलमानांना त्यांचा इस्लामी कायदा लावावा अशी मुभा आहे; पण, या बाबतींत व्यावहारिक अनुभव असा येतो कीं, कांहीं मुसलमानांनीं मूळच्या हिंदुकायद्याप्रमाणें व्यवहार चालू ठेविले आहेत ! या मुसलमानांना आपल्या मूळच्या हिंदुपणाची इतकीहि आठवण राहूं नये यासाठीं मुसलमानांनीं अलीकडे असे उद्योग केले कीं, त्यांमुळें सर्व मुसलमानांना सर्व बाबतींत मुसलमानी कायदाच लागू व्हावा ! इस्लाम धर्माची नालस्ती करणाराचा वध धर्म्यच होय अशी इस्लामी शिकवण असल्यामुळें, पाकिस्तान सिद्ध झाल्यावर, पाकिस्तानांत अशा प्रकरणांतल्या खुनी इसमांना तेथील सरकार फांशीं देईल कीं अशा इसमांना तें सरकार पारितोषिक देईल, हा प्रश्न मनोरंजक म्हणून मनांत घोळविण्यासारखा आहे !

मुसलमानांतल्या हिंदुपणाच्या अवशिष्ट खाणाखुणा नष्ट करण्याच्या उद्योगाबरोबरच आणखीहि एक उद्योग सुरू झाला. हिंदूंचे अभिमानविषय

व आमचे अभिमानविषय भिन्न आहेत हें दाखविण्याची जरुरी वाटूं लागल्याबरोबर, मुसलमानांनीं इतिहाससंशोधनाला सुरुवात केली! इतिहाससंशोधनामुळें अप्रिय गोष्टींच्या बुजलेल्या जखमांतून रक्त भळभळा वाहूं लागतें अशा आशयाचा इषारा देणारें एक अवतरण डॉ० आंबेडकर यांनीं (पृ० ३० वर) दिलें आहे. त्या इषाऱ्याची महति विसरून,

> भारतीय मुसलमान आपले राष्ट्र-पुरुष कोण हें धुंडाळूं लागले! आणि, या संशोधनांतून निष्पन्न काय झालें! १९२६ च्या जूनमध्यें सिंध खिलाफत कमिटीनें अखिल भारतीय खिलाफत कमिटीकडे एक शिफारसवजा ठराव धाडून दिला! औरंगजेबाचा राज्यारोहणदिन व महंमद बिन कासिमच्या सिंधविजयाचा दिन हे दोन 'दिन' हिंदुस्थानभर साजरे केले जावे, अशी मागणी या कमिटींतल्या अडाणी माणसांनीं केली!

इतिहास-संशोधनाच्या अशा आडरानांत शिरणाऱ्या पंडितांना डॉ० आंबेडकरांसारख्या विचारनिष्ठ विद्वानानें अनेक प्रश्न विचारले पाहिजेत! आपले पुरातन हक्क कोर्टांतून प्रस्थापित करण्याचा प्रसंग आला तर आपले वंशवेल कोर्टापुढें येऊं नयेत अशी धडपड तुमच्यामधले लोक करतात कीं नाहीं हा पहिला प्रश्न डॉ० आंबेडकरांनीं अशा लोकांना विचारला पाहिजे. चारदोन पिढ्यांपूर्वींचे आपले वंशज हिंदु होते, आपण मुसलमान आहों हा फरक जिव्हारीं झोंबत असल्यामुळेंच तुम्हांला या कामीं संकोच वाटतो ना, असा दुसरा प्रश्न डॉ० आंबेडकरांनीं विचारला पाहिजे! चारदोन पिढ्यांपूर्वींचे तुमचे वंशज जर हिंदु होते तर महंमद बिन कासिम अगर औरंगजेब यांच्या काळीं तुमच्या आजोबांच्या आजोबांचे आजोबा जिवंत असतील तेहि हिंदूच असतील ना, असा सवाल डॉ० आंबेडकरांनीं विचारण्यासारखा आहे.

> इतिहास-संशोधन करून राष्ट्र-पुरुष धुंडाळणाऱ्या मुसलमानांना डॉ० आंबेडकरांनीं सांगावें कीं, भाईहो, संशोधनच करावयाचें तर तें खोलवर व दूरवर तरी करा!

प्रतापगड किल्ल्यावर अफझलखानाची कबर आहे. 'मरणान्तानि वैराणि' हें उदात्त तत्त्व कृतीनें सिद्ध करणाऱ्या उदारधी श्री शिवरायांनीं

अफझलखानाचें शव गडावर पुरण्याला परवानगी दिली म्हणून ही कबर तेथें प्रतिष्ठितपणानें राहिली आहे. अफझलखान म्हणजे कोणी मोठा राष्ट्र-पुरुष अशी स्वतःची समजूत करून घेतलेले कांहीं मुसलमान ठराविक दिवशीं मुंबईपासून येऊन तेथें गोळा होतात व मोठा उत्सव साजरा करतात! इतिहाससंशोधनाची दृष्टि खोलवर व दूरवर पोंचवून वागावयाचें या मुसल-मान बंधूंनीं ठरविलें तर त्यांच्या लक्षांत येईल कीं, अफझलखान हा त्यांचा राष्ट्र-पुरुष होऊं शकत नाहीं. या दृष्टीनें विचार केल्यावर

> मुसलमानांना हेंच कबूल करावें लागेल कीं, धार्मिक आचार-विचाराच्या बाबतींत हिंदूंहून भिन्नच राहावयाचें त्यांनीं ठरविलें तरी, इतिहास, परंपरा, संस्कृति, भाषा इत्यादि यच्चयावत् गोष्टींत भोंवतालच्या हिंदूंशीं तादात्म्य पावल्याखेरीज त्यांना दुसरा मार्गच उरत नाहीं! इतिहास व परंपरा यांचे निर्माते,संस्कृ-तीचे संगोपक, भाषेचे संवर्धक इत्यादींच्या वंशवेलाचें चित्र त्यांनीं आपल्या चित्तचक्षूंपुढें उभें करावें; म्हणजे त्यांचें मनच त्यांना असें सांगूं लागेल कीं, या सर्व बाबतींत हिंदूंचे व आपले अभिमान-विषय सारखेच आहेत! या चित्रदर्शनाबरोबर त्यांच्या रक्तांतहि जागृति उत्पन्न होईल व त्यांच्या मनांत उमटणाऱ्या मुक्या बोलांना या जागृतीचा पाठिंबा मिळेल!

मुसलमानांचीं अभिमानस्थानें, त्यांच्या हर्षामर्षाचे विषय इ० गोष्टी त्या त्या ठिकाणच्या हिंदूंच्या अभिमानाहून भिन्न नाहींत हें स्पष्टपणें सिद्ध होण्यासारखें असल्यामुळें, या मुद्यावर भर देऊन भारतीय मुसलमानांचें हिंदुस्थानांत स्वतंत्र राष्ट्र आहे हें सिद्ध करण्यासारखें नाहीं. मग, भारतीय मुसलमानांचें वर्णन तरी कसें करावयाचें असा प्रश्न विचारला जाईल. त्याचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, सध्यांचे प्रांत आहेत असेच राहतील तोंवर, भारताच्या अकरा प्रांतांपैकीं चार प्रांतांत मुसलमानांचा धार्मिक गट (Religious Group) बहुसंख्य राहील व उरलेल्या सात प्रांतांत तो गट अल्पसंख्य राहील. लोकांच्या ऐतिहासिक विकासांतील साम्य, प्रांतांच्या योगक्षेमापुरतें उत्पन्न लाभण्याची शक्यता, या उत्पन्नाच्या व एकंदर योगक्षेमाच्या दृष्टीनें पुरेसें क्षेत्रफळ व लोकसंख्या, संरक्षणाच्या (Defence) सर्वांगीण सिद्धतेची प्रत्येक प्रांतांतल्या लोकांना महती पटण्याची जरुरी इत्यादि महत्त्वाचे मुद्दे

लक्षांत घेऊन प्रांतरचना झाली व प्रांतांची संख्या आजच्याहून कमी झाली तर, एकाद्या प्रांतांत मुसलमानांचा धार्मिक गट कदाचित् बहुसंख्य राहील; इतर सर्व प्रांतांत तो अल्पसंख्य राहील. सबंध देशाचा व त्या देशाच्या मध्यवर्ति सरकारचा विचार करतांना मुसलमान फार तर अल्पसंख्य वर्ग (Minority) ठरतील. फक्त धार्मिक बाबतींत ते हिंदूंहून भिन्न आहेत. धार्मिक गोष्टींच्या संरक्षणाची योजना प्रांतांतच पूर्णपणें होण्यासारखी असल्यामुळें, अखिल भारताच्या कारभारांत व व्यवस्थेंत मुसलमानांचें भिन्नपण मान्य करण्याचें कारणच नाहीं.

एकत्र नांदण्याची मुसलमानांची इच्छा नाहीं, जबरदस्तीनें एकत्र नांदावें लागत असल्यामुळें ते कटकटी करतात, अशा स्थितींत वेळींच त्यांचें भिन्नपण मान्य करावें व स्वतंत्र राष्ट्र म्हणून त्यांना वेगळा संसार थाटूं द्यावा अशा आशयाचाहि कोटिक्रम डॉ० आंबेडकरांनीं केला आहे. या कोटिक्रमामागें अनेक गोष्टी उभ्या आहेत. त्यांतल्या कांहीं हिंदुहिताच्या आहेत असें डॉ० आंबेडकरांचें मत आहे. त्यांचा विचार मागाहून करण्याचें ठरवून तूर्त एकाच मुद्याचा विचार करूं. एकत्र नांदण्याची व भिन्नपणें नांदण्याची इच्छा (Will) हा मुद्दा मोठा मजेचा आहे.

> लखनौ करारापासून ज्या सगळ्या योजना हिंदूंकडून स्वीकारण्यांत आल्या अगर हिंदूंवर लादण्यांत आल्या त्यांमध्यें अखंड देशाची कल्पना साक्षात् गोंविलेली आहे. हें विसरून, मुसलमानांच्या इच्छेपुढें दबून, 'पाकिस्तान' म्हणून देशाच्या एका भागावर हिंदूंनीं तुळशीपत्र ठेवावयाचें तर हळुहळू त्यांना दक्षिणभागांत एकाद्या ख्रिस्ती-स्तानाचीहि जागा खालीं करून द्यावी लागेल !

कारण, कोचीन, त्रावणकोर वगैरे भागांत आजच ख्रिस्ती लोकसंख्या बेसुमार आहे व ख्रिस्ती लोकसंख्येचें प्रमाण त्या भागांत झपाट्यानें वाढत आहे. हा प्रकार असाच चालला तर कोणाची मजल कोठवर जाईल याचा नेमच नाहीं. इच्छेचें हें अडाणी माप रूढ झालें तर, अँग्लोइंडियन व डोमिसाइल्ड युरोपियन हेहि हिंदुस्थानांत एकादें 'नॅशनल होम' मागूं लागतील ! गोलमेज परिषदेच्या वेळीं यांतल्या कांहीं बृहस्पतींच्या मनांत अशी कांहीं

कल्पना चमकून गेलीहि होती म्हणतात! खरी गोष्ट काय हें डॉ० आंबेड-करांनाच माहीत असण्याचा संभव विशेष; कारण, भोंवतालीं चाललेल्या अनेक गोष्टींकडे त्यांचें बारीक लक्ष असे!

हिंदूंशीं जमत नाहीं असें म्हणून आपला वेगळेपणा व्यक्त करण्याची इच्छा कोणाला कोणत्या प्रेरणेमुळें होते हें समजणें अगर सांगणें सोपें नसलें तरी, अशी इच्छा होते हें मात्र खरें. हिंदूंपासून वस्तुतः अभिन्न असलेल्या लोकांच्या-हि मनांत ही इच्छा कशी उद्‌भवते याचें विवेचन डॉ० श्री० व्यं० केतकर यांनीं केलें आहे. ते लिहितात : ज्यास हिंदूंच्या समाजांतून फुटून जावें असें वाटेल तो हिंदु या शब्दाची व्याख्या संकुचित आणि प्रसंगीं अपमानकारक करतो आणि ज्यास हिंदुसमाजांत आपला अंतर्भाव असावा असें वाटतें तो तीच व्याख्या विस्तृत करतो... ज्या जैनांस आपण हिंदूंपेक्षां निराळें व्हावें


## 'कॉमनवेल्थ'ची विजयपताका

१९४०चे पूर्ण झालेले विमे ४५ लक्षांहून अधिक

कंपनीची मालमत्ता ....२७८३,००० रु.

लाइफ फंड .... ....२०,६३,००० रु.

कंपनीचे चालू विमे .... १॥। कोटींहून अधिक

'कॉमनवेल्थ'ची पॉलिसी म्हणजेच
सुखी जीवनाचा आधारस्तंभ

## कॉमनवेल्थ अशु. कंपनी लि.

सर्वत्र एजंट पाहिजेत. ] पुणें शहर

चेअरमन
खा. ब. एम्. एन् मेथा
C. I. E. M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस-सुपरिटेंडेंट
एम्. एन् भागवत
B.A.

असें वाटतें ते हिंदु या शब्दाची व्याख्या संकुचित करतात आणि त्या व्याख्येंत आपण नाहीं असें भासवितात. हीच गोष्ट शीखांस लागू आहे.*

मुसलमान समाजाला आपलें वेगळेंपण व्यक्त करण्याची इच्छा इतक्या तीव्रतेनें कां होते हें डॉ० आंबेडकर ओळखून आहेत. एकाद्या समाजाचें राजकीय महत्त्व (Political Importance) विशेष आहे, एकादा समाज राजनिष्ठ आहे, एकाद्या समाजानें ब्रिटिश साम्राज्याची अगर ब्रिटिश सरकारची महत्त्वाची कामगिरी केली आहे म्हणून त्या समाजाला जादा प्रतिनिधित्व (Weightage) देणें गैर आहे असें डॉ० आंबेडकरांनींच गोलमेज परिषदेच्या वेळीं बजावलें होतें.† जादा प्रतिनिधित्वाच्या वेळीं आपलें राजकीय महत्त्व गाजविणारा समाजच आज पाकिस्तान मागत आहे; मग, डॉ० आंबेडकरांनीं त्या मागणीला अंशत: तरी तात्त्विक मान्यता कां द्यावी?

हिंदूंशीं आपलें पटण्यासारखें नाहीं आणि आपली त्यांच्याशीं एकत्र नांदण्याची इच्छा नाहीं हें जगाला दिसावें म्हणून मुसलमानांनीं गेल्या १५–२० वर्षांत कोणते उपाय योजले व त्यांचा परिणाम काय झाला याची जंत्री दिल्यानंतर, डॉ० आंबेडकर यांनीं पृ० १८० वर या प्रकरणाचा सूचक सारांश थोडक्यांत दिला आहे. फेब्रुवारी १९२९ पासून एप्रिल १९३८ पर्यंत जो नऊ वर्षें दोन महिन्यांचा काळ लोटला तेवढ्याचा विचार केला तर त्यांतल्या २१० दिवसपर्यंत मुंबई शहरांत रक्तपात चालला होता आणि या काळांत अशा लढतीमुळें ५५० माणसें मेलीं व ४,५०० माणसें जखमी झालीं. बंगाल सरकारनें पुरविलेल्या माहितीवरून डॉ० आंबेडकर यांनीं असा निष्कर्ष काढिला आहे कीं, १९२२ ते १९२७ या पांच वर्षांत बंगालमध्यें जवळजवळ २५ हजार स्त्रियांचें अपहरण झालें. आपले राजकीय हेतु सिद्ध व्हावे म्हणून मुसलमानांनीं अवलंबिलेल्या मार्गांचें वर्णन करण्यासाठीं डॉ० आंबेडकर यांनीं Gangsters' Methods (वाटमारी करणाऱ्या लोकांचे मार्ग) हा शब्दप्रयोग बनविला आहे (पृ० २६७). मशिदीजवळ हिंदूंकडून वाजविण्यांत येणारीं वाद्यें वगैरे निमित्तें काढून मुसलमानांकडून हें आक्रमण

*ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड, विभाग १, पृ० ७७.

†Indian Round Table Couference Proceedings of Sub-Committees, Part II, Sub-Committee III 1931, p. 110.

यापूर्वी करण्यांत येत होतें; पण अरालें निमित्त किती खोटें असूं शकतें हें पैगंबरवासी मौ० शौकतअल्ली यांच्याच कबुलीवरून सिद्ध करतां येण्यासारखें आहे. दिल्लीच्या ऐक्य परिषदेच्या वेळीं मौलाना महाशयांनीं स्वतःच्या लग्नाच्या वेळची हकीकत निवेदन केली होती. रामपूर येथील मशिदीसमोर लग्नाच्या मिरवणुकींतील वाद्ये थांबविण्यांत आलीं नव्हतीं असें त्यांनीं कबूल केलें होतें. दिल्लींत मुसलमानी राजसत्ता नांदत होती तेव्हांहि असे प्रकार घडत नसत. वाजतगाजत जाणाऱ्या रामलीलेच्या मिरवणुकी पाहण्यासाठीं राजघराण्यांतील मंडळी मशिदींत जमत आणि मिरवणुकींतून चाललेल्या रामाच्या गळ्यांत हारहि घालीत ! बेंगॉल प्रेसिडेन्सी मुस्लीम लीगचे चिटणीस मि० कुतुबुद्दीन अहमद यांनीं ऑगस्ट १९२६ मध्यें प्रसिद्धिलेल्या पत्रकांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, मशिदीपुढें वाद्यें बंद ठेवावीं या म्हणण्याचा शरियतशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसून, हें म्हणणें कोणा स्वार्थी व्यक्तींकडून अगर पक्षांकडून पिकविण्यांत आलेलें आहे. पूर्वीं हिंदूंच्या कुरापती काढण्याला मुसलमानांना अशीं कांहीं निमित्तें तरी शोधून काढावीं लागत. पण, प्रांतिक स्वायत्तता सुरू झाल्यापासून बंगाल व सरहद्द प्रांत येथें जे प्रकार घडून येत आहेत त्यांच्या समर्थनार्थ कांहीं निमित्तहि देण्यांत येत नाहीं. सिंध प्रांतांत दररोज दोघा हिंदूंचे खून पडत होते असा बोभाटा मध्यंतरीं झालेला होता.

> वेळींच जागृत होण्याची प्रवृत्ति हिंदूंत नाहीं हें खरेंच आहे शिवाय, कायद्यानें निर्माण केलेले अधिकारहि पुरेपूर वापरण्याचें शिक्षण त्यांस मिळालेलें नाहीं. 'हिंदूहि आतां प्रतिकार करण्याला शिकत आहेत आणि मुसलमानाच्या शरीरांत सुरा खुपसतांना त्यांनाहि आतां दयामाया वाटेनाशी झाली आहे, असें एक विधान आंबेडकर यांनीं पृष्ठ २६७ वर केलें आहे. गांधीजींच्या अहिंसेच्या शिकवणींत मुरलेला समाज असें कांहीं करूं लागेल, हें संभाव्य दिसत नाहीं.

पण या समाजानें आत्मसंरक्षणाच्या कायद्याचा तरी भरपूर उपयोग करावयाला शिकलें पाहिजे. इंडियन पीनल कोडमध्यें आत्मसंरक्षणाचीं (Self-Defence) कलमें समाविष्ट करण्यांत आलीं त्या वेळीं सध्यांच्या कडक स्वरू-

पांतला आर्म्स ॲक्ट अस्तित्वांत आलेला नव्हता. म्हणजेच असें कीं, आततायी माणसाला आवरण्याची शक्यता त्या वेळीं व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं आजच्याहून अधिक होती. ही शक्यता कमी झाल्यामुळें, काठीलाठी या साधनांचा तरी स्वसंरक्षणार्थ नीट उपयोग व्हावयाला पाहिजे. पण दंगे सुरू होऊन अशांतता पसरली कीं, भांबावून गेलेले अधिकारी स्वसंरक्षणाचीं हींच साधनें मामुली व्यवहार करणाऱ्या नागरिकांच्या हातीं नांदूं देत नाहींत ! निसर्गानें पुरविलेलीं हात, दांत वगैरे साधनेंहि आक्रमक स्वरूपाचीं आहेत असें समजून, अधिकारी त्यांच्या उपयोगावर अद्यापि नियंत्रण घालूं लागले नाहींत, हेंच भाग्य समजण्याची वेळ आली आहे !

हिंदु समाजाच्या या असहायपणाचा फायदा घेऊन, वाटमारीच्या पद्धतीनें आपलें म्हणणें त्यांच्या गळीं उतरवूं पाहणाऱ्या समाजाची पाकिस्तानची मागणी देऊन टाकावी असें डॉ० आंबेडकर म्हणत असतील तर, त्यांना कोणताहि स्वाभिमानी हिंदु असेंच विचारील कीं, हिंदूंच्या या वृत्तीला शरणागतीच म्हणावें लागणार नाहीं काय ? मुसलमानांशीं मिळतें घ्यावयाचें तर तें शरणागतीच्या मार्गानें (Appeasement) घ्यावें कीं तडजोडीच्या मार्गानें (Settlement) घ्यावें असा मुद्दा डॉ० आंबेडकर यांनीं आपल्या ग्रंथाच्या समारोपांत (पृ० ३४७ वर) उपस्थित केला आहे. त्यांनींच गोळा केलेल्या माहितीच्या आधारें त्या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट शब्दांत असें आहे कीं, आततायीपणा करणाऱ्या लोकांशीं मिळतें घेण्याचा विचारहि मनांत आणणें हें समाजाच्या अगर राष्ट्राच्या स्वाभिमानाच्या दृष्टीनें शक्यच नसल्यानें, मुसलमानांशीं कोणत्या पद्धतीनें मिळतें घ्यावें हा मुद्दाच अप्रस्तुत आहे.

हिंदु व मुसलमान हीं दोन भिन्न राष्ट्रें आहेत असें गृहीत धरून मुसलमानांच्या भिन्नत्वाची अगर भिन्न राष्ट्रत्वाची जी मीमांसा डॉ० आंबेडकर यांनीं केली आहे तिचें स्वरूप कसें सदोष आहे हें या विवेचनावरून स्पष्ट होईल. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरे सर्वांची जूट घडवून आणण्याची गांधीजींची महत्त्वाकांक्षा, हिंवाळ्यांत सकाळीं दिसणाऱ्या धुक्याप्रमाणें, गेल्या वीस वर्षांच्या काळांत हळुहळू पार विरून गेली आहे. अशा परिस्थितींत विचार शिल्लक उरतो तो एकच !

चाळीस कोटी लोकसंख्येच्या या देशांत प्रादेशिक एकराष्ट्रीयत्व शक्य नसेल तर, दुसरें कोणतें राष्ट्रीयत्व या देशांत नांदूं शकेल ? या प्रश्नाचें एकच उत्तर आहे आणि तें 'हिंदुराष्ट्रीयत्व' हेंच आहे.

हिंदुस्थानांत इतस्ततः विखुरलेले मुसलमान हे जसे सगळे एका वंशाचे नाहींत तसेच सगळ्या हिंदुस्थानभर पसरलेले जवळजवळ तीस कोटी हिंदु हेहि सगळे एका वंशाचे नाहींत. शुद्ध, बिनभेसळीच्या रक्ताचाच विचार केला तर, आर्य, द्रविड, मंगोल, सिथियन अशा अनेक प्रकारच्या रक्तांची भेसळ येथें झालेली आढळते. आर्य लोक या देशांत आले ते संख्येनें बेताचेच होते. येथें स्थिर झाल्यावर त्यांनीं येथें पूर्वीच असलेल्या अनार्य लोकांना आत्मसात् व सुसंस्कृत करण्याचा उद्योग सुरू केला व तेव्हांपासून ही रक्ताची भेसळ अव्याहत चालूच आहे. भीमसेन आणि हिडिंबा यांचा पुराणांत प्रसिद्ध असलेला विवाह हें या रक्तमिश्रणाचें प्रसिद्ध उदाहरण म्हणून सांगतां येईल. पण, एखाद्या लोकसमूहांत भिन्न भिन्न रक्तांची भेसळ असली तरी, तो समूह इतर अनेक कारणांमुळें 'राष्ट्र' या पदवीप्रत पोंचूं शकतो! त्या समूहाला एका सूत्रांत गोंवण्याचे डोळस प्रयत्न किती व किती सातत्यानें झाले आहेत या मुद्याचा विचार करूनच अशा समूहाची 'राष्ट्र' ही पदवी प्रस्थापित करावी लागते.

या दृष्टीनें कांहीं गोष्टी महत्त्वाच्या म्हणून लक्षांत ठेविल्या पाहिजेत. भरतखंडाच्या दक्षिण भागांत द्राविड भाषा रूढ आहेत हें खरें; पण संस्कृत भाषेंत पांडित्य करणारे बहुतेक सर्व मोठे आचार्य दक्षिण भारतानेंच पुरविले आहेत, ही गोष्ट उपेक्षणीय नाहीं. द्राविडभाषा संस्कृतोद्भव नाहींत हें खरें असलें तरी, त्याहि भाषा संस्कृतमुळें समृद्ध बनलेल्या आहेत. हिंदुस्थानच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पसरलेल्या कोट्यवधि हिंदूंना एकत्र करण्याचें एक साधन म्हणून संस्कृत भाषा व तिच्यापासून निघालेल्या अगर तिच्या वर्चस्वामुळें समृद्ध झालेल्या भारतीय भाषा यांचा फार उपयोग झालेला आहे. बर्लिन येथील प्रशियन म्यूझियममधील भारतीय विभागाचे क्यूरेटर डॉ० वॉल्डस्मिथ यांनीं संस्कृत भाषेचें हें महत्त्व ओळखून असें म्हटलें आहे कीं, ज्या हिंदूला संस्कृत कळत नाहीं तो वस्तुतः हिंदूच नव्हे. हें विधान शब्दशः मान्य करण्याचें कारण नसलें तरी,

> या देशांतील कोटचवधि हिंदु लोकांची सांस्कृतिक भाषा संस्कृत हीच आहे हें विसरून चालणार नाहीं.

वैदिक संस्कृत भाषा हळुहळू मागें पडूं लागली आणि वाढत्या हिंदुसमाजाच्या गरजांच्या मानानें ती कठिणहि भासूं लागली. तेव्हां प्राचीन विचारवीरांनीं बहुजन समाजाच्या ज्ञानसंवर्धनासाठीं पुराणें रचिलीं. वाढत्या समाजांत वाढत व बदलत जाणारे विचार, त्या समाजांत उद्‌भवणारीं नवीं नवीं तत्त्वज्ञानें, त्या समाजाला रुचूं लागणारीं नवीं नवीं दैवतें या सगळ्यांचा समन्वय साधण्याचें व या सर्वांमधील संघर्षांचा शक्य तोंवर परिहार करण्याचें बिकट कार्य हिंदुसमाजांतील विचारवीरांना मधून मधून करावें लागलेलें आहे. व्यास व वैशंपायन यांच्या वेळच्या त्रोटक भारताला महाभारत हें स्वरूप देणाऱ्या सौतीनें प्राचीन काळीं हेंच कार्य केलें. एवढ्या अफाट देशभर पसरलेल्या लोकांच्या चित्तांत देशाच्या ऐक्याची कल्पना स्थिर व्हावी म्हणून अनेकांकडून विविध प्रयत्न करण्यांत आलेले आहेत. आद्य शंकराचार्यांनीं आपले जे चार मठ स्थापिले ते हिंदुस्थानच्या चार भिन्न टोंकांना स्थापण्यांत त्यांच्या हाच हेतु दिसतो. अयोध्या, मथुरा, द्वारका, कांची इत्यादि तीर्थक्षेत्रांची यादी पाहिली तर तिच्यांतहि हाच हेतु प्रतिबिंबित झालेला दिसतो. देवीगीतेंत देवीचीं म्हणून जीं प्रसिद्ध स्थानें सांगितलेलीं आहेत त्यांत कलकत्ता, काशी, पंजाबमधील कांग्रा, मदुरा वगैरे स्थानांचा उल्लेख आहे. त्याप्रमाणेंच, नेपाळ व चीनमधीलहि स्थानांचा उल्लेख आहे. भाषेचें ऐक्य, विचारांचें ऐक्य व प्रदेशाचें ऐक्य या कल्पनांनीं हिंदुस्थानांतील अफाट मानवसमाज एकत्र निगडित करण्याचे असे प्रयत्न पूर्वीं झालेले असल्यामुळेंच या देशाला सांस्कृतिक ऐक्य प्राप्त झालेलें आहे आणि ती संस्कृति हिंदु संस्कृतीच आहे, असें म्हणणें प्राप्त आहे.

> हिंदुस्थान ही हिंदूंची नुसती पितृभू नसून पुण्यभूहि आहे असें बॅ० सावरकर ठसकेबाजपणानें सांगतात त्यांतलें रहस्य हेंच आहे.

एखाद्या राजराजेश्वरापासून तर एखाद्या भिक्षाधीशापर्यंत सर्व हिंदूंना काशी क्षेत्र म्हटलें कीं, आजहि कांहीं एक अभिमान वाटतो. नवखंडाबाहेर असलेलें हें काशीखंड तत्कालीन अनार्यांपासून घेऊन तें व्यापक आर्य संस्कृतींत

अगर हिंदु संस्कृतींत समाविष्ट करण्याचे जे प्रयत्न झाले त्या प्रयत्नांपायीं सहस्रावधि हिंदूंना आपले प्राण त्या पवित्र रणक्षेत्रावर ठेवावे लागलेले आहेत. आपल्या अनेक पूर्वजांनीं लढून-झगडून आत्मसात् केलेलें क्षेत्र ही भावना वाराणसी क्षेत्राभोंवतीं घुटमळत राहिलेली असल्यामुळेंच, विरक्त अशा हिंदु संन्याशालाहि अद्याप वाराणसी क्षेत्राचें नांव उत्तेजक वाटतें.

अफाट समाजामध्यें ऐक्यभावना प्रस्थापित करण्याचे हे प्रयत्न एकाच कालखंडांत झाले, असें नाहीं. हिंदुस्थानांतील साधूंच्या पंथांचा इतिहास त्या दृष्टीनें कोणी लिहिलेला अद्याप पाहण्यांत नाहीं. पण, महाराष्ट्रांतल्या भागवतधर्मीय साधूंनीं जें कार्य केलें त्याचें स्वरूप अशाच प्रकारचें आहे, हें थोडा विचार केला असतां कोणालाहि मान्य करावें लागेल. श्री ज्ञानेश्वर महाराज हे नाथपंथीय साधु आहेत. या नाथपंथाचा उगम महाराष्ट्राबाहेर—बहुधा बंगालमध्यें—झाला असावा, असा समज आहे. बंगालमधील एका पंथाचा प्रसार महाराष्ट्रापर्यंत होऊन, श्री ज्ञानेश्वर महाराज त्या पंथांत सामील होतात ही गोष्ट, त्या काळचीं दळणवळणाचीं अपुरीं साधनें लक्षांत आल्यावर, अद्‌भुत वाटते. आणि, या पंथांत शिरलेल्या या 'ज्ञानियांच्या राजा'नें केलें काय हें पाहिलें म्हणजे तर मन थक्कच होतें. गीतेसारख्या अलौकिक ग्रंथांतील ज्ञानभांडार संस्कृत भाषेमध्यें कोंडलें गेलें असल्यामुळें, त्याचा खुराक समाजांतील फार मोठ्या वर्गाला मिळूं शकत नव्हता. या परिस्थितीमुळें समाजांतील बहुसंख्य वर्ग आणि अल्पसंख्य पंडित यांच्या दरम्यान वैचारिक साम्य निर्माण होऊं शकत नव्हतें. या विचारानें अस्वस्थ होऊन, श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं ही 'कोडिसवाणी श्रुति' मराठी भाषेंत प्रकटविली आणि स्त्रिया, शूद्र आणि अतिशूद्र (आनिया) एवढ्या मोठ्या वर्गाला त्यांनीं हें ज्ञान सुलभ करून दिलें. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेंतल्या नामदेव महाराजांचे कित्येक अभंग पंजाबमधील शिखांच्या धर्मग्रंथांत मान्यता पावलेले आहेत. हीं साधूंचीं मंडळें, साधूंचे हे 'गुप्त पंथ' अथांग हिंदु समाजांत वैचारिक व सांस्कृतिक ऐक्य निर्माण करण्याचें केवढें कार्य करीत होते—ज्या वेळीं साक्षरताप्रसारासाठीं ग्रँट्स् दिल्या जात नव्हत्या, वैचारिक साम्य निर्माण करण्याचीं वृत्तपत्रें, रेडियो, बोलपट वगैरे साधनें युरोपांतहि निघालीं नव्हतीं आणि प्रवास अत्यंत कष्टमय होता अशा युगांत साधूंच्या या

मेळाव्यांनीं केलेल्या कार्याचें या दृष्टीनें महत्त्व किती आहे याची नेमकी कल्पना लोकांना अद्याप यावयाची आहे.

लहानपणींच साऱ्या हिंदुस्थानभर हिंडून, मुसलमानी अंमलामुळें तीर्थ-क्षेत्रांची झालेली दीनवाणी स्थिति पाहून, रामदासांनीं आपले मठ व महंत यांच्या संस्थापनेनें सारा हिंदुस्थान कसा संघटित केला असेल याची कल्पना त्या मठांचे आजचे निःसत्त्व अवशेष पाहूनहि होऊं शकते. भागवत धर्मांतील कवींनीं महाराष्ट्रांत ज्या वैष्णव संप्रदायाचा फैलाव केला त्याच्या विचारांशीं अगदीं सदृश असे विचार तत्कालीन तामीळ संत व तामीळ आचार्य यांच्या वाङ्मयांत व्यक्त झालेले आहेत ही गोष्ट कै० ल० रा० पांगारकर यांनीं 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथाच्या पहिल्या खंडांत स्पष्ट केली आहे. अशा प्रकारचीं वैचारिक व सांस्कृतिक साम्यें वाढत्या प्रमाणावर निर्माण करण्याला अवश्य असणारें विश्वासू व टिकाऊ मनुष्यबळ पुरें पडलें नाहीं, सुरू झालेला 'मिशनरी' प्रयत्न पुरा व प्रभावशाली करण्याइतकी संघटना होऊं शकली नाहीं अगर टिकूं शकली नाहीं, या गोष्टी कबूल करा-वयाला हरकत नाहींत. पण सर्व हिंदुसमाजाला एका सूत्रांत गुंफून त्याला डोळस व कार्यक्षम बनविण्याची प्रक्रिया पूर्वीं अनेकवार घडलेली आहे आणि यांतच हिंदुसमाजाचें राष्ट्रीयत्व सांठलेलें आहे. वैचारिक व सांस्कृतिक ऐक्याची जोपासना अशा प्रकारें होत होती तर रामचंद्र युधिष्ठिरापासूनचे हिंदुसम्राट् देशांत राजकीय ऐक्य निर्माण करण्यासाठीं झटत होते. अशोक, हर्षवर्धन, समुद्रगुप्त प्रभृति हिंदु सम्राटांनीं या राजकीय ऐक्याची जोपासना केली आणि या राजकीय ऐक्याच्या प्रस्थापनेसाठींच मराठ्यांनीं हिंदुस्थानभर संचार केला. सर्वांगीण ऐक्य निर्माण करण्याची ही प्रक्रिया पुनरु-ज्जीवित करून तिला अद्ययावत् स्वरूप देणें हेंच हिंदुसंघटनेचें उद्दिष्ट आहे. हिंदु समाजांत ऐक्य-भावना वाढत आहे आणि एकराष्ट्रीयत्वाची जाणीव बळावत आहे ही गोष्ट डॉ० आंबेडकरहि कबूल करीत आहेत. या कार्याला अधिकाधिक चेतना आणणें आणि ही चेतना विफल ठरूं नये म्हणून इतर आक्रमकांच्या दटावणीला निर्भयपणानें तोंड देणें हेंच पाकिस्तानचा प्रतिकार करण्याचें साधन आहे, असें हिंदुमहासभेच्या शिकवणीचें सार आहे. इतिहास-लेखन हिंदुसमाजाच्या विघटनेला पोषक कसें होईल ही दृष्टि ठेवून हिंदु-

समाजाच्या शत्रूंनीं इतिहास लिहिले; त्यामुळें बुद्धधर्माच्या उदयापासून सत्य-शोधक-समाजाच्या स्थापनेपर्यंत ज्या चळवळी झाल्या त्या विकृत रूपांत मांडल्या गेल्या. या सर्व चळवळी बंडखोर आहेत; पण, ऐक्यविघातक नाहींत. जुन्या पद्धतीनेंच धंदा चालवावा असें म्हणणारे वडील व धंद्यांत नवा जोम आणणारे चिरंजीव यांच्यांत होणाऱ्या लढ्यासारखा लढा हिंदुधर्म व हे पंथ यांच्यामध्यें झालेला आहे. व्यक्तीच्या शरीराच्या संगोपनाचाच न्याय येथेंहि लागू पडतो. जुन्या काळच्या वैदिक लोकांपासून आजच्या सनातनी मंडळींपर्यंतचे लोक समाजघटनेच्या संग्राहक स्वरूपामुळें समाजाचें वैशिष्टच लोपूं नये यासाठीं झटत आले आहेत; तर, बौद्ध जैन, महानुभाव, शीख, आर्यसमाजी,सत्यसमाजी,ब्रह्मो इत्यादि सर्व पंथांतील लोक वैशिष्टचरक्षणानेंच भागत नाहीं, विकासक्षमतेकडेहि लक्ष पुरवावें लागतें असें म्हणत आलेले आहेत. हिंदुभूरूपी विनतेच्या पोटीं जन्मलेल्या हिंदुसमाजरूपी गरुडाचे दोन प्रबळ पंख म्हणजेच परस्परांवर फडफडणाऱ्या या दोन विचारपद्धति !

हिंदुस्थानांत राष्ट्र या पदवीला योग्य असणारा समाज हिंदु समाजच आहे हें या विवेचनावरून सिद्ध होत असल्यामुळें, आतां एकच प्रश्न शिल्लक उरतो.

> हिंदुस्थान या अखंड देशांत हिंदु हेच राष्ट्र म्हणून नांदणार व त्यांच्या संस्कृतीचा ठेवा ज्या संस्कृत व तत्सदृश भाषांत आहे त्या भाषांचाच तेथें पुरस्कार होणार, हें उघडच आहे. पण, याचा अर्थ इतरांना येथें कांहींच अधिकार नाहींत, असा मात्र नव्हे.

प्रांतांच्या योग्य मांडणीचें स्थूल स्वरूप वर एकदां सूचित करण्यांत आलेलें आहे. तसे प्रांत पडले तर बहुतेक प्रांतांतून हिंदु राष्ट्राचे प्रांतिक अवयवच बहुसंख्य म्हणून नांदतील. एखाद्या प्रांतांत त्यांना अल्पसंख्य म्हणून राहावें लागलें तरी, या हिंदुराष्ट्राचा अवयव म्हणून ते तेथें राहतील; पण, अखिल भारताच्या व्यवस्थेमध्यें राष्ट्र म्हणून मान व अधिकार हिंदूंचाच राहील. अहिंदूंना न्यायतः व प्रमाणतः जे हक्क मिळावयाचे तेवढे त्यांना अवश्य मिळ-तील; पण, हिंदूंना कमीपणा येईल अगर अन्याय होईल असे कोणतेहि अधिकार अहिंदूंना मिळणार नाहींत. अहिंदूंना अवश्य असणारें धार्मिक संरक्षण प्रांतिक क्षेत्रांतच मर्यादित झालेलें असल्यामुळें, वस्तुतः अहिंदूंनीं मध्यवर्ति कारभारांत व व्यवस्थेंत हिंदूबरोबर नागरिकत्वाच्या समान भूमिकेवर

धर्मनिरपेक्ष दृष्टीनें सहकार्य करावें, हेंच श्रेयस्कर ! तसें करण्याची त्यांची इच्छा नसेल तर लोकसंख्येच्या कांटेकोर न्यायानें त्यांना जें मिळेल तेवढ्या-वरच त्यांना समाधान मानावें लागेल.

द्विराष्ट्रवाद अस्तित्वांत आहे, हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान हीं दोन भिन्न व विरोधी राष्ट्रें आहेत असें गृहीत धरून, पाकिस्तान अपरिहार्य अस-ल्याची कल्पना डॉ० आंबेडकर यांनीं मांडली आहे. त्यांचें हें गृहीत कृत्यच तर्कशुद्ध नसल्यामुळें त्यांचें या मुद्यासंबंधींचें बरेंचसें विवेचन अग्राह्य वाटतें ! पण त्यांच्या ग्रंथांत इतर कांहीं भाग विचारार्हहि आहे.

---

सर्वस्वी प्रामाणिकपणा, सचोटी, सरळ व्यवहार.

द. ना. हेजीब, पुणें

किराणा व सुका मेवा यांचे व्यापारी

स्थापना : सन १९२२

आमचेकडील सुका मेवा व निवडक किराणा माल

वापरून आपली खात्री करा.

पत्ता—२०, शुक्रवार पेठ, पुणें शहर.

## प्रकरण ९ वें

# आंबेडकर व पाकिस्तान

### डॉ० आंबेडकरांना कांहीं सवाल

**हिंदुस्थानांतले** हिंदु व मुसलमान यांचें व इतर भारतीयांचें मिळून एक राष्ट्र हिंदुस्थानांत नांदत नसून हिंदुराष्ट्र व मुसलमानी राष्ट्र अशीं दोन भिन्न राष्ट्रें या देशांत नांदत आहेत ही गोष्ट गृहीत धरून अगर मान्य करून, डॉ०आंबेडकर यांनीं आपल्या ग्रंथांत पाकिस्तान या विषयाचा विचार केलेला आहे. ही गृहीत गोष्टच बरोबर नाहीं. या देशांत नांदणारे सर्व धर्मपंथ व जातिजमाति यांचें मिळून एकराष्ट्र सिद्ध होण्याची शक्यता मुसलमानांच्या वृत्तीमुळें नाहींशी झालेली असल्यामुळें, या देशांत हिंदुराष्ट्र हें एकच राष्ट्र शिल्लक उरतें. इतर धर्मांचे व पंथांचे लोक या देशांत अल्पसंख्य वर्ग म्हणून राहूं व नांदूं शकतात. हेंच मत बरोबर असल्यामुळें, डॉ० अ बेडकर यांच्या सगळ्या इमारतीचा पायाच उखडल्यासारखा होतो. अशा स्थितींत, डॉ० आंबेडकर यांनीं उपस्थित केलेले इतर मुद्दे विचारांत घेण्याचेंहि कारण नाहीं, असें कोणी म्हटलें तर तेंहि बरोबर ठरेल; पण, डॉ० आंबेडकर यांची विद्वत्ता, त्यांचा राजकारणांतील दर्जा आणि विचाराची देवाण-घेवाण करून मत बनविण्याची आणि बदलण्याची त्यांची वृत्ति या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे वरील गृहीत कृत्य अमान्य करूनहि, कांहीं मुद्यांचा विचार करणें श्रेयस्कर ठरतें.

डॉ० आंबेडकर यांनाहि एक महत्त्वाची गोष्ट मान्य आहे. हिंदुस्थानांत निर्माण होणारी मध्यवर्ति सत्ता खंबीर असली पाहिजे असें त्यांचेंहि मत असल्याचें दिसतें. मुसलमानांना अनुकूल अशी सध्यांची प्रांतरचना व सध्यांची मुसलमानांची वृत्ति या गोष्टी कायम आहेत तोंवर या देशांत खंबीर मध्यवर्ति सरकार नांदूं शकणार नाहीं-तें नांदण्याची सोय व्हावी म्हणून हिंदु व मुसलमान विभागांची सोईस्कर विभागणी करण्यांत यावी, असें डॉ० आंबेडकर यांचें म्हणणें आहे. या म्हणण्याचा विचार नीट, दूरदर्शीपणानें करतांना,

राष्ट्रसंघ व हिंदुस्थानचें तेथील स्थान या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. हिंदुस्थानचा राष्ट्रसंघांत प्रवेश झाला तो राष्ट्रसंघाच्या कॉव्हेनँटच्या पहिल्या कलमाच्या आधारें झाला नाहीं; इंग्लंडच्या कृपेमुळें झाला, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. हिंदुस्थानचे इतर राष्ट्रांशीं संबंध कसे राहावे व हिंदुस्थानच्या सैनिक शक्तीचें नियंत्रण कोणी करावें या प्रश्नांचा विचार निघाला कीं, हिंदुस्थानची राजकीय प्रगति कुंठित झाल्यासारखी दिसते, ती अनेक कारणांमुळें होय. हिंदुस्थानचा राष्ट्रसंघांतला दुय्यम दर्जा व हा प्रश्न यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. या दृष्टीनें हिंदुस्थानचा दर्जा दुय्यम असला तरी, राष्ट्रसंघांत हिंदुस्थानचें अखंडत्व मान्य व सिद्ध झालेलें आहे ही गोष्ट विसरून कां चालावें ? मुसलमान दांडगाईनें हिंदुस्थानचे तुकडे करूं पाहतील अगर ब्रिटिश सरकार आपल्या स्वार्थासाठीं हिंदुस्थानचीं शकलें होऊं देण्याला मान्यता देईल तर त्या प्रकाराविरुद्ध जगभर डांगोरा पिटण्याचें, मोडकेंतोडकें कां होईना, एक साधन हिंदूंच्या हातांत आहे; तें हिंदूंनीं स्वेच्छेनें कां गमवावें? राष्ट्रसंघाची एकंदर घडण कशी आहे, तेथें खरा न्याय कितीसा मिळेल वगैरे प्रश्न दुर्लक्ष करण्यासारखे नसले तरी, हातीं असलेलें तोकडेंसें हत्यार तरी हिंदूंनीं कां गमवावें ? मनुष्य कल्पक असला आणि त्याची बुद्धि चौफेर खेळत असली म्हणजे अशा तोकड्या बोथट शस्त्राचाहि उपयोग करण्याला तो कसा प्रवृत्त होतो हें बॅ०सावरकर यांच्या चरित्रांतल्या ' मार्सेल्स ' प्रकरणाचें ज्यांना स्मरण आहे त्यांना तरी नव्यानें सांगावयाला नको. आंवळ्याभोपळ्यांची मोट हेंच ज्याचें स्वरूप आहे असा राष्ट्रसंघहि बॅ० सावरकरांच्या त्या साहसाच्या वेळीं अस्तित्वांत नव्हता; नुसत्या आंतरराष्ट्रीय कायद्याचा फायदा घेण्याच्या बुद्धीनें त्यांनीं साहस केलें ! हें जर खरें, तर, आजच्या हिंदूंनीं राष्ट्रसंघांतला हिंदुस्थानचा दर्जा ' अखंड हिंदुस्थान ' हें ध्येय टिकविण्याच्या कामीं जास्तींत जास्त उपयोगांत आणण्याचें ठरविलें तर तें चुकीचें कां ठरावें ? राज्य कसें चालेल ही गोष्ट ज्याप्रमाणें राज्य करणारावरच मुख्यतः अवलंबून असते तद्वत्‌च शस्त्र व साधन यांचा उपयोग कसा होईल हेंहि त्यांचा उपयोग करणारावरच प्रायः अवलंबून असतें ! हिंदुस्थानचीं शकलें होण्याला संमति देऊन हें शस्त्र स्वखुषीनें हातचें गमाविण्याला आम्ही हिंदु तयार नाहीं;

असें हिंदूंनीं म्हटलें तर तें चुकेल कीं काय, या प्रश्नाचें उत्तर डॉ० आंबेडकर देतील तर हिंदूंना तें हवें आहे.

हिंदुस्थानांत एका सार्वभौम सत्तेऐवजीं अनेक सार्वभौम सत्ता निर्माण झाल्यामुळें केवढा धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे हें ज्ञानकोशकार डॉ० केतकर यांनीं यापूर्वींच सूचित करून ठेविलें आहे.* निजामच्या राज्याला स्वतंत्र सार्वभौम सत्तेचें स्थान मिळावें आणि उत्तर भारतांत एक आणि पूर्व भारतांत एक, अशीं दोन सार्वभौम मुसलमानी राज्यें निर्माण करावीं असा पाकिस्तानवाल्या मुसलमानांचा डाव आहे. हा डाव सफल झाला तर, राष्ट्रसंघांत सर्व हिंदुस्थानचा फक्त एक प्रतिनिधि आणि या तीन इस्लामी राज्यांचे तीन प्रतिनिधि अशी परिस्थिति निर्माण होईल हा संभवहि विसरून चालणार नाहीं. पाकिस्तान निर्माण झालें म्हणजे थोडक्याच काळांत पाकिस्तानमधील सार्वभौम मुसलमानी राज्यांचे परराष्ट्रीय संबंध स्वतंत्रपणें चालावे असें मुसलमानांना वाटत आहे. या स्वतंत्र परराष्ट्रीय संबंधांची वाढ हिंदुस्थानला घातक होणार नाहीं अशी हमी कोण देऊं शकणार आणि ती कोणी दिली तरी, हिंदूंनीं ती कां मान्य करावी? या विचारसरणींत आणखी पुष्कळच महत्त्वाचे मुद्दे दडून बसलेले आहेत. पण, त्या सर्वांचाच उच्चार आजच करणें हितावह नसल्यामुळें, तूर्त डॉ० आंबेडकरांना एवढाच प्रश्न विचारावासा वाटतो कीं, या दृष्टीनें विचार करूनहि ते त्यांच्या पाकिस्तानला मान्यता देणार आहेत काय?

हिंदुस्थानांत नांदणारे बहुसंख्य हिंदु हे आक्रमक वृत्तीचे आहेत आणि म्हणून इतर अल्पसंख्याक वर्गांना त्यांच्यापासून धोका आहे, असेंहि एक मत डॉ० आंबेडकरांनीं नमूद केलें आहे. बहुसंख्य हिंदूंना आक्रमक (Aggressive) हें विशेषण लावण्याची इच्छा डॉ० आंबेडकरांच्याहि मनांत आहे कीं काय, हें त्यांच्या लिहिण्यावरून तितकेंसें स्पष्ट झालेलें नाहीं. या मुद्याचा विचार करतांना त्यांनीं ज्या एका घटनेवर भर दिला आहे ती घटना या मुद्याच्या विवेचनांत गैरलागू आहे. हिंदुसमाज आक्रमक वृत्तीचा आहे कीं काय हें ठरवितांना, अडीच तीन वर्षें प्रांतिक कारभार करतांना कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं काय केलें हा मुद्दा विचारांत घेण्याचेंहि वस्तुतः कारण नाहीं.

* ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, विभाग पहिला, पृ० ६२.

कॉंग्रेस मंत्रिमंडळांना प्रांतांतून सत्ता लाभली ती हिंदु मतदारांच्या औदार्यामुळें लाभली एवढ्याच अर्थानें या मंत्रिमंडळांना हिंदु मंत्रिमंडळें म्हणतां येईल. अवांतर गोष्टींचा विचार केला तर, या मंत्रिमंडळांना हिंदु मंत्रिमंडळें म्हणतांच येणार नाहीं. किंबहुना,

> **आमचें मंत्रिमंडळ हें हिंदु मंत्रिमंडळ नाहीं हीच तर कॉंग्रेस मंत्रिमंडळांची प्रौढी आहे.** कॉंग्रेस ही संस्था हिंदुहिताचें पालन व संवर्धन करूं शकत नाहीं, तें कार्य करण्याचा मक्ता हिंदु-सभेनें घेतला आहे असें गांधीजीनी ' हरिजन 'मध्यें कांहीं महिन्यां-पूर्वी स्पष्ट लिहिलें होतें, हेंहि लक्षांत ठेविण्यासारखें आहे.

कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनीं मुसलमानांच्या बाबतींत अगर अन्य जमातींच्या बाबतींत अवलंबिलेलें धोरण चुकीचें असेल; पण, तें आक्रमक स्वरूपाचें होतें हें म्हणणें बरोबर नाहीं. या धोरणांतील चुकांचा विचार स्वतंत्रपणें करण्या-सारखा असल्यामुळें, तूर्त एकच गोष्ट सांगितली म्हणजे पुरे आहे. हिंदुसमाज आक्रमक वृत्तीचा आहे कीं काय या प्रश्नाचें तर्कशुद्ध उत्तर द्यावयाचें तर कॉंग्रेस मंत्रिमंडळांचा आचार कसा होता हा मुद्दा विचारांत घेतां येणार नाहीं. हिंदुसमाजाची परंपरासिद्ध वृत्ति आक्रमक आहे कीं काय, हाच मुद्दा या बाबतींत महत्त्वाचा आहे आणि या मुद्याचें स्पष्ट उत्तर नकारार्थीच देणें प्राप्त आहे.

हिंदुधर्म व त्या धर्माचा आचार करणारा हिंदुसमाज यांचें मुसलमानी अगर ख्रिस्ती अशा समाजांपासून भिन्नत्व कोणतें आहे या प्रश्नाचें सांगोपांग विवेचन या ठिकाणीं करणें शक्य नाहीं. एकच गोष्ट सांगून हा मुद्दा संपविला पाहिजे. भौतिक शास्त्रांचा विचार करणारे युरोपांतले आधुनिक विद्वान् ज्या शास्त्रीय पद्धतीचा अंगीकार करतात त्याच पद्धतीचा अवलंब करून, हिंदु विचार-वीरांनीं आपल्या तत्त्वज्ञानाचें भांडार संपन्न केलें आहे. कसलीहि आग्रही वृत्ति धरणारा संशोधक खरा संशोधक ठरूंच शकत नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. संशोधन करणाऱ्या माणसाला आपल्या बुद्धीचीं सगळीं द्वारें सताड खुलीं ठेवावीं लागतात. पृथक्करण, तुलना इत्यादींच्या मार्गानें आपल्या मताची छाननी त्याला करावी लागते आणि त्यामुळें फार वेळपर्यंत त्याचें मन हेलकावेच खात राहतें. आग्रहशून्यपणा हा गुण अशा संशोधक-

वृत्तीमुळें निर्माण होतो; आणि, हिंदुधर्मांत आज हा गुण पराकोटीला जाऊन पोहोंचलेला दिसत असेल तर त्याचें मूळ कारण हेंच आहे.

> केवळ बाह्य आचार, केवळ एखाद्या विशिष्ट उपास्या-बद्दलची भक्ति, केवळ एखाद्या प्रेषिताच्या अंत:स्फूर्तीवरील श्रद्धा यांच्या पायावर हिंदुधर्म उभा असता तर, अत्यंत शास्त्रशुद्ध धर्म म्हणून आज त्याचा जगभर जो लौकिक झाला आहे तो झालाच नसता.

अशी आग्रही वृत्ति हिंदुधर्मांत नसल्यामुळेंच, हिंदुधर्मानें चार्वाकासारख्या बंडखोरालाहि आपल्या ऐसपैस कक्षेंत स्थान दिलें आणि बौद्ध, लिंगायत वगैरे अनेक बंडखोर पंथ निघाले तरी, हिंदुधर्माचें मन:स्वास्थ्य ढळलें नाहीं. सहिष्णुता या गुणाला हिंदुधर्मांत व हिंदुसमाजांत दुर्गुणाचें स्वरूप प्राप्त झालें आहे तें कां, या प्रश्नाचा छडा लावण्याचा प्रयत्न जो जो मनुष्य करील त्या त्या मनुष्याला हिंदुधर्मांतील या वैशिष्ट्यापर्यंत जाऊन भिडावें लागेल. महंमद, ख्रिस्त वगैरेंनीं ज्या धर्मांचें प्रवर्तन केलें त्या धर्मांच्या अनुयायांमध्यें ही सहिष्णु वृत्ति निर्माण होऊं शकली नाहीं. याचें कारणच हें कीं, ते धर्म शास्त्रीय चिकित्सेच्या कसोटीला उतरणाऱ्या तत्त्वज्ञानावर आधारलेलेच नाहींत. अशा धर्मांना इंग्रजींत Credal Religions म्हणतात. ( 'व्यक्ति-निष्ट धर्म' या शब्दप्रयोगानें मूळच्या इंग्रजी शब्दांत अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त करतां येईल.) हिंदुधर्माचें हें वैशिष्ट्य बरें कीं वाईट, या वैशिष्ट्यामुळें हिंदु समाजाचें हित झालें कीं अहित झालें या प्रश्नांचीं उत्तरें येथें देत बसण्याचें

सुंदर चहासाठीं नांवाजलेलें
विद्यार्थ्यांचें अत्यंत आवडतें
बॉंबे रेस्टॉरंट, पेरूगेट
सदाशिव पेठ, पुणें.
प्रोप्रायटर—जी. डी. तुळपुळे.

कारण नाहीं. येवढें मात्र निश्चित खरें कीं, बुद्धीच्या अशा ठेवणींतून निर्माण झालेल्या धर्माचा अभिमानी व अनुयायी असा जो हिंदुसमाज तो आक्रमक असूंच शकत नाहीं. तो आक्रमक नाहीं हेंच तर त्या समाजाचें सद्य:कालीं दुर्भाग्य ठरत आहे. या सर्व परंपरा विसरून, डॉ० आंबेडकर यांनीं हिंदुसमाज आक्रमक वृत्तीचा आहे या विधानाचा पुरस्कार नसला तरी उच्चार तरी कां करावा, हें समजत नाहीं !


आपल्या भोंवतालचा हिंदुसमाज संख्याश्रेष्ठ असला तरी, संख्याबलाचा दुरुपयोग करून तो आपला छळ करणार नाहीं हें मुसलमानहि मनांत ओळखतात, हें डॉ० आंबेडकरांनाहि माहीत आहे. ज्या प्रांतांत हिंदु निर्विवाद बहुसंख्येंत आहेत त्या प्रांतांत कायद्यानेंच निर्माण होणारें हिंदूंचें बहुमत मान्य करून, मुसलमान स्वतंत्र मतदारसंघांची मागणी कां करतात या प्रश्नाचें विवेचन डॉ० आंबेडकरांनीं आपल्या ग्रंथांत (पृ० १००-१०१ वर) केलें आहे.

> हिंदूंमध्यें जातिविषयक व वर्णविषयक भेद असून ते भेद खोलवर रुतलेले आहेत हें जाणणाऱ्या मुसलमानांना अशी खात्री वाटते कीं, हिंदु आपलें संख्याबल मुसलमानांविरुद्ध कधींहि वापरूं शकणार नाहींत.

या खात्रीमुळें मुसलमानवर्ग हिंदु बहुसंख्य प्रांतांत निर्धास्तपणें नांदूं शकतो, हें जाणणाऱ्या डॉ० आंबेडकरांनीं हिंदूंच्या संख्याधिक्याला आक्रमक हें विशेषण लावण्याला स्वत: कां प्रवृत्त व्हावें अगर इतर कोणी तसें विशेषण लावलें तर त्यांनीं तें सहन कां करावें, हें नीटसें समजत नाहीं. हिंदूंच्या धार्मिक शिकवणीचा व समाजरचनेचा भलाबुरा परिणाम असाच झालेला आहे कीं, मुसलमानांनीं अगर इतर कोणत्याहि धर्माच्या लोकांनीं त्यांच्या संख्याबलाला काडीमात्र भिण्याचें कारण नाहीं. संख्याधिक्यापासून कोणी भयच बाळगावयाचें असेल तर तें अहिंदूंनीं बाळगावयाचें नसून, हिंदूंनींच बाळगावयाचें आहे. हिंदु व अहिंदु यांच्या दरम्यान तडजोड घडावयाचीच असेल तर शुद्ध न्यायाच्या व ऐतिहासिक पुराव्याच्या आधारानें ती कशी घडूं शकेल या प्रश्नाचें विवेचन केव्हां तरी होणें अवश्य आहे.

> संख्याबलाच्या जाणिवेमुळें हिंदु यापूर्वी कधींहि आक्रमक बनले नाहींत, स्वभावानेंच ते तसे बनूं शकत नाहींत, आणि म्हणूनच, हिंदूंवर आक्रमकपणाचा आळ कोणीं घेतला तर तो साफ अमान्य केला पाहिजे !

कांहीं एका मर्यादित स्वरूपांत पाकिस्तान मान्य करण्याला आज तयार झालेल्या डॉ० आंबेडकरांना आणखी एक महत्त्वाचा प्रश्न विचारणें अवश्य आहे. Thoughts on Pakistan या पुस्तकांत डॉ० आंबेडकर यांनीं फक्त ब्रिटिश अंमलाखालीं असणाऱ्या हिंदुस्थानचाच विचार केलेला आहे. हिंदी संस्थानांसह फेडरेशन मान्य करण्यांत स्वातंत्र्यसिद्धीच्या दृष्टीनें कोणता धोका आहे, हें डॉ० आंबेडकर यांना चांगलें माहीत आहे. आणि म्हणूनच, संस्थानांच्या भानगडींत अजिबात न पडतां, ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांनीं आपला प्रश्न आपल्यापुरत स्वतंत्रपणें सोडवावा अशी भूमिका त्यांनीं घेतलेली आहे. मुसलमानांनीं पाकिस्तानच्या ज्या निरनिराळ्या योजना मांडल्या आहेत त्यांत संस्थानांचाहि समावेश झालेला आहे. मुसलमानांच्या कल्पनांमध्यें तरंगत असलेलें पाकिस्तान व डॉ० आंबेडकर यांनीं मान्य केलेलें मर्यादित पाकिस्तान यांत हा जसा एक महत्त्वाचा फरक आहे, तसाच आणखीहि एक महत्त्वाचा भेद त्यांत असल्याचें स्पष्ट होत आहे. पंजाब व बंगाल हे दोन्ही प्रांत शक्य तितक्या अधिक प्रमाणांत पचनीं पाडावे असा मुसलमानांनीं मांडलेल्या योजनांचा रोख आहे. या दोन प्रांतांतील जेवढा मुलुख नाइलाजानें सोडावा लागेल तेवढाच मुसलमानांसाठीं सोडावा, अशी डॉ० आंबेडकर यांची योजना आहे. त्यामुळें, पंजाबमधील कांग्रा, अंबाला, कर्नाळ, रोहटक, गुरगाव, हिसार, फिरोजपूर, लुधियाना, जालंदर, अमृतसर, गुरुदासपूर व होशियारपूर इतके जिल्हे त्यांनीं हिंदुस्थानांत सामील केले असून, बंगालमधील जेसोर, नडिया, पबना, राजशाही, बोग्रा, मैमनसिंग, डाक्का, टिपेरा, नौखाली, फरीदपूर, बकरगंज, चितगांग व चितगांग हिल्स एवढे जिल्हे व आसाममधील सिल्हेट जिल्हा एवढाच भाग मुसलमानांच्या पूर्वेकडील स्वतंत्र राज्यांत समाविष्ट होऊं देण्याला त्यांनीं मान्यता दिलेली आहे. हे सर्व भाग, त्याचप्रमाणें सिंध, सरहद्दप्रांत, बलुचिस्थान इत्यादि




भाग निर्हिंदु व्हावे हा त्यांचा हेतु असल्यामुळें, त्यांनीं हिंदु-मुसलमान लोकसंख्येची सोइस्कर रीतीनें अदलाबदल करण्यांत यावी, असेंहि सुचविलें आहे.

अशी अदलाबदल हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील कोपऱ्यांत व पूर्व कोपऱ्यांत झाली तरीहि, दिल्ली-संयुक्तप्रांतापासून खालीं जो सलग हिंदुस्थान राहतो त्यांत हिंदु-मुसलमानांची संमिश्र वस्ती शिल्लक उरते आणि त्यामुळें या भागांत निर्माण होणाऱ्या राज्यव्यवस्थेला हिंदुमुसलमानांच्या कटकटीची बाधा होण्याचा संभव शिल्लक उरतो हें स्वतः डॉ० आंबेडकरांनींच कबूल केलें आहे. उत्तरेकडील व पूर्वेकडील विभागांत मुसलमानांचीं सलग राज्यें निर्माण झाल्यानें त्या भागांत अंतर्गत शांतता कितीशा प्रमाणांत नांदेल, त्या भागांपासून अलग करण्यांत आलेल्या हिंदुस्थानांतील हिंदु-मुसलमानांच्या

कटकटी खरोखर कितीशा टळतील, कटकटी टाळण्याच्या हेतूनें प्रेरित होऊन मुलूखचे मुलूख सोडून देण्याचें तत्त्व कितीसें श्रेयस्कर ठरेल, इत्यादि महत्त्वाच्या मुद्यांचा विचार पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें करावयाचा आहे. या ठिकाणीं डॉ० आंबेडकरांना बारीकसा पहिला प्रश्न विचारावयाचा तो हा कीं,

> लोकसंख्येची अदलाबदल करण्याचें ठरविण्यापूर्वी, या अदलाबदलीमुळें ज्यांच्या जीवितावर महत्त्वाचे परिणाम घडणार त्या लोकांची संमति घ्यावयाला नको काय? मुसलमान प्रांत वेगळे तोडून देण्याला जर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा आधार शोधावयाचा तर त्याच तत्त्वाची अंमलबजावणी या अदलाबदलीच्या बाबतींत कां होऊं नये? ही अंमलबजावणी करावयाची तर ती कोणत्या धोरणानुसार करावयाची?

अशा तऱ्हेच्या प्रश्नांव्यतिरिक्त आणखीहि एक प्रश्न महत्त्वाचा म्हणून डॉ० आंबेडकरांना विचारण्यासारखा आहे. पंजाबमधील फिरोजपूर, गुरुदासपूर, जालंदर वगैरे ज्या सहा सात जिल्ह्यांत शीख व हिंदु यांच्या संयुक्त लोकसंख्येचें श्रेष्ठत्व निर्विवाद सिद्ध होत आहे ते जिल्हे 'इंडस्तान' मध्यें कोंबण्याला पाकिस्तानवाले प्रवृत्त झालेले आहेत. काय वाटेल तें झालें तरी हे जिल्हे घालविण्याला मुसलमान राजी होणार नाहींत हें 'पंजाबी' यांनीं आपल्या पुस्तकांत निःसंदिग्ध शब्दांत बजाविलें आहे.* हे जिल्हे मागण्याचा हट्ट मुसलमान धरतील तर त्यांना काय उत्तर द्यावयाचें हें डॉ० आंबेडकरांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलेलें आहे. "पाकिस्तानचें मुस्लीम राज्य निर्माण झालें आणि या राज्याचा अंतस्थ कारभार व बाह्य संबंध हे स्वतंत्र झाले तर, हें राज्य मध्यवर्ति सत्तेच्या नियंत्रणापासून सर्वस्वी मुक्त होईल; आणि, त्या राज्यांत अल्पसंख्य हिंदु असतील तर, त्यांना दाद मागण्याची सोय कोठेंच उरणार नाहीं. राज्यसंस्थेनें त्यांना अपाय केला तर, त्या राज्यसंस्थेला लगाम घालण्याच्या हेतूनें मध्यस्थी करूं शकेल अशी सत्ताच अस्तित्वांत राहणार नाहीं. तुर्कांच्या अंमलाखालीं आर्मीनियन लोकांची, झारशाहींत अगर नाझीशाहींत ज्यूंची जी गत झाली तीच गत पाकिस्तानमधील हिंदूंची सहजासहजीं होईल. अशी योजना असह्य ठरेल आणि

*Confederacy of India, p.184.

> हिंदूंना न्यायानें असें म्हणतां येईल कीं, मुस्लीम राज्याच्या धर्मवेडाला दिलेले असहाय बळी म्हणून आमच्या धर्मबांधवांना पाकिस्तानांत सोडावयाला आम्हीं तयार नाहीं*

असें ठसकेबाज उत्तर डॉ० आंबेडकरांनींच देऊन ठेविलेलें आहे.

'पंजाबीं'चा आग्रह आणि डॉ० आंबेडकरांच्या उत्तरांतील हा फणकारा ह्या दोहोंचा एकत्र विचार केला म्हणजे सहज असें मनांत येतें कीं, या दोन गोष्टींचा मेळ मुळींच बसण्यासारखा नाहीं. आणि, हिंदुमहासभेप्रमाणेंच डॉ० आंबेडकरहि पाकिस्तानची मागणी झिडकारून लावावी अशाच मताचे असावे. डॉ० आंबेडकरांच्या वतीनें कदाचित् असें म्हणतां येईल कीं, नकार यावयाचा तो मुसलमानांकडून आला म्हणजे मग हिंदूंना आपल्या अटींवर त्यांच्याशीं तडजोड करणें शक्य व्हावें म्हणून डॉ० आंबेडकरांनीं त्यांच्या मागणीला मर्यादित स्वरूपांत मान्यता दिलेली आहे. डॉ० आंबेडकरांचें समर्थन म्हणून असा कोटिक्रम कोणी केलाच तर त्याला असें उत्तर आहे कीं, अशा रीतीनें हातटेकीस येण्याइतके मुसलमान कच्च्या दिलाचे नाहींत. डॉ० आंबेडकरांनीं द्विराष्ट्र कल्पनेला मान्यता दिली आहे. द्विराष्ट्र कल्पनेच्या पोटांतलें पाकिस्तान अपरिहार्य आहे ही कबुलीहि त्यांनीं दिली आहे, एवढ्या सोइस्कर गोष्टींनाच मुसलमान बिलगून बसतील आणि पाकिस्तानांत किती मुलूख दडपावयाचा व तडजोड म्हणून कोणता मुलूख सोडावयाचा एवढ्याच मुद्यापुरता घोळ ते घालीत बसतील, हीच भीति विशेष आहे. मुसलमानांना सवलत देण्याबाबत तोंडांतून निघून गेलेला शब्द अगर मुसलमानांच्या पदरांत पडलेली सवलत यांचा पाय केव्हांहि मागें आलेला नाहीं, हें गेल्या ८०-९० वर्षांच्या इतिहासाचें सार आहे. डॉ० आंबेडकरांनीं आपली म्हणून जी योजना मांडली ती मांडण्यांत त्यांचा सद्हेतूच असेल; हिंदूंच्या हितासाठींच त्यांनीं हा खटाटोप केला असेल; पण, सद्हेतूनें केलेल्या गोष्टी सुफलदायीच ठरतात हा नियम मुसलमानांच्या बाबतींत तरी खोटा ठरला आहे, हें डॉ० आंबेडकरांनीं तरी कसें विसरून चालेल? गोलमेज परिषदेच्या सगळ्या कामकाजाकडे आस्थेवाईकपणानें व अभ्यासूपणानें पाहणाऱ्या डॉ० आंबेडकरांना हें माहीत आहेच कीं, सर तेज बहादुर सप्रू, डॉ० जयकर, डॉ० मुंजे

*Thoughts on Pakistan, p. 106.

सर चिमणलाल सेटलवाड, खुद्द डॉ० आंबेडकर अशा सर्वांनीं ज्या गोष्टी नाइलाज म्हणून पण सद्हेतूनें मान्य केल्या त्या स्वार्थीपणानें पदरांत पाडून घेऊन, मुसलमानी मागण्यांचें शेंपूट, प्रसिद्ध असलेल्या कुत्र्याच्या शेंपटाप्रमाणें, वांकडेंच राहिलें!

मुसलमानांची पाकिस्तानची मागणी मर्यादित अर्थानें मान्य करणाऱ्या डॉ० आंबेडकरांना त्यांच्या स्वतःच्याच पूर्वीच्या विचारांचें विस्मरण झालें ही गोष्ट विशेषच विस्मयजनक आहे! १९३९ सालीं त्यांनीं पुण्यास 'फेडरेशन विरुद्ध फ्रीडम' या विषयावर जें मार्मिक व्याख्यान दिलें त्यांतील मुद्यांचा विचार करणाऱ्या कोणाहि इसमाला असें भासेल कीं, पाकिस्तानची नवी कल्पना पुढें येतांच आपल्या जुन्या विवेचनांतील महत्त्वाचे मुद्दे विसरणाऱ्या डॉ० आंबेडकरांची गत, जुन्या क्रमिक पुस्तकांतील 'यमुना आणि तिची मैना' या गोष्टींतल्या यमुनेसारखी झालेली आहे. १९३५च्या घटनाकायद्यांत दोन प्रकारच्या फेडरेशनचा उल्लेख आहे या गोष्टीकडे विद्वानांचें व मुत्सद्यांचें दुर्लक्ष झालें अशी तक्रार त्यांनीं 'फेडरेशन विरुद्ध स्वातंत्र्य' या पुस्तकाच्या १३३ ते १३६ या पृष्ठांवर केलेली आहे. ही नजरेआड झालेली कल्पना लोकांपुढें ठळकपणानें मांडण्याचें श्रेय त्यांनीं स्वतःकडे घेतलें आहे त्यांतहि गैर कांहींच नाहीं. १९३५च्या घटनाकायद्यांत मध्यवर्ति कारभारांत जी तुटपुंजी जबाबदारी दिलेली आहे ती सशर्त आहे, संस्थानिक फेडरेशनमध्यें आले तरच ही तुटपुंजी जबाबदारी पदरांत पडणार आहे, संस्थानिक फेडरेशनमध्यें आले तर या जबादारीची वाढ कायमचीच कुंठित होत आहे, इत्यादि मुद्दे त्यांनीं मोठ्या मनोवेधक पद्धतीनें या व्याख्यानांत स्पष्ट केलेले आहेत. आणि त्यांनीं असेंहि बजाविलें आहे कीं, १९३५ची घटना अंमलांत येऊन स्वायत्त प्रांतांचा कारभार त्या घटनेप्रमाणें सुरू झाल्या क्षणापासून ब्रिटिश हिंदुस्थानच्या अकरा स्वायत्त प्रांतांचें फेडरेशन सिद्ध झालेलेंच असून, या फेडरेशनचा मध्यवर्ति भाग जबाबदार व्हावा असें हक्कानें म्हणण्याचा अधिकार प्रांतांना प्राप्त झालेला आहे.

फेडरल राज्यव्यवस्थेचा ऊहापोह करतांना एक महत्त्वाचा मुद्दा नेहमीं पुढें येत असतो. फेडरेशनमधील घटकांना फेडरेशनमधून फुटून बाहेर निघण्याचा अधिकार आहे कीं काय, हाच तो मुद्दा होय. १९३५च्या कायद्यांत

ज्या फेडरेशनची रूपरेषा आंखलेली आहे त्या फेडरेशनमध्यें या प्रश्नाचें काय उत्तर देण्यांत आलेलें आहे या विषयाची चर्चाहि डॉ०आंबेडकरांनीं आपल्या व्याख्यानांत केलेली आहे (पृ० ४२–४३). संस्थानिक फेडरेशनमध्यें सामील झाले तर त्यांना त्यांतून फुटून निघण्याची सत्ता देण्यांत आलेली आहे; पण, फेडरेशनमध्यें सामील होणाऱ्या अकरा प्रांतांना मात्र ही सत्ता नाहीं असें डॉ० आंबेडकरांनीं म्हटलेलें आहे. पार्लमेंटनें १९३५चा मवंध कायदाच उखडून टाकला आणि सगळीच सृष्टि नव्यानें उभारण्याचा घाट घातला तर काय घडेल ही सुलतानी आपत्ति सोडली तर, प्रांतांना फेडरेशनमधून स्वेच्छेनें फुटून बाहेर निघण्याची सोय या कायद्यांत नाहीं! सध्यां फक्त सिंध, पंजाब, बंगाल प्रभृति प्रांतांत लोकसत्ता नांदत असल्यामुळें आणि हिंदुस्थानच्या बहुसंख्य प्रांतांतून लोकसत्तेचा लोप झालेला असल्यामुळें, पुष्कळांना असा भास होतो कीं, फेडरेशन सध्यां अस्तित्वांतच नाहीं! ही कल्पना साफ चुकीची आहे. सात प्रांतांत मंत्रिमंडळें नसलीं, त्या प्रांतांचा कारभार गव्हर्नर आपल्या एकटयाच्या हुकमतीखालीं चालवीत असले तरी, ते प्रांत ब्रिटिश इंडियन फेडरेशनचे घटक आहेत, फेडरेशनसाठीं अवश्य असणारी फेडरल कोर्ट वगैरे सामग्री निर्माण झालेली असून ती सध्यांहि विद्यमान आहे, कायदेकानू करण्याबाबत प्रांतिक सत्ता व मध्यवर्ति सत्ता यांच्या दरम्यान क्षेत्रविभागणी कशी व्हावी याचें १९३५च्या कायद्यांत सांगितलेलें तंत्र सुरूच आहे आणि त्यामुळें, फेडरेशन अजिबात अस्तित्वांतच नाहीं हा रूढ असलेला समज सर्वस्वीं निराधार आहे.

Federation *vs.* Freedom या पुस्तकाच्या पृष्ठ १३० वर डॉ० आंबेडकर यांनीं पुढील वाक्य लिहिलें आहे :

British Indians should first ask for a federation and responsibility confined to British India.

(ब्रिटिश हद्दींतील हिंदुस्थाननें म्हणजेच अकरा प्रांतांनीं प्रथम आपल्यापुरतें फेडरेशन मागावें आणि या ब्रिटिश प्रांतांच्या फेडरेशनला मध्यवर्ति कारभारांत जबाबदारी मिळावी, अशी मागणी त्यांनीं करावी). सदर पुस्तकाच्या पृष्ठ १४१ वर डॉ० आंबेडकरांनीं पुढील वाक्य लिहिलें आहे।

They have a federation of their own and they have a right to demand responsibility for their federation.

(ब्रिटिश प्रांतांना स्वतःचें फेडरेशन मिळालेलें आहे आणि या फेडरेशनच्या मध्यवर्ति कारभारांत जबाबदारी मिळावी अशी मागणी करण्याचा त्यांना अधिकार आहे.)

डॉ० आंबेडकर हे आपला Thoughts on Pakistan हा ग्रंथ सजवीत होते त्या वेळींच कॉंग्रेसनें पुणें येथें ठराव करून मध्यवर्ति कार-भारासाठीं राष्ट्रीय सरकारची स्थापना व्हावी अशी मागणी केलेली होती. पूर्वींच अस्तित्वांत आलेल्या फेडरेशनचा कळस लोकायत्त स्वरूपाचा व्हावा



या मागणीचा डॉ० आंबेडकरांनीं केलेला पुरस्कार आणि काँग्रेसनें केलेली ही मागणी यांत तत्त्वतः फरक नाहीं. काँग्रेसच्या राष्ट्रीय सरकारच्या मागणी-प्रमाणें अस्तित्वांत येणारें मंत्रिमंडळ मध्यवर्ति विधिमंडळाला जबाबदार राहिलें असतें आणि मध्यवर्ति कारभारांत जबाबदारीच्या तत्त्वाचा प्रवेश व्हावयाचा तर हेंच होणें शेवटीं अपरिहार्यहि आहे. पण, सरकारला तत्काल हें घडवून आणतां येत नसेल तर, जबाबदारीची दिशा किंचित्शी फिरवावी आणि मंत्रिमंडळ विधिमंडळाला जबाबदार राहण्याऐवजीं तें गव्हर्नर जनरलला जबाबदार राहावें, अशी मागणी सप्रू परिषदेनें केली. ज्या मागणीचा वर उद्धृत केलेल्या वाक्यांत डॉ० आंबेडकरांनीं पुरस्कार केलेला आहे त्याच मागणीच्या वाटेनें सप्रू परिषदेची मागणी चालत आहे. सप्रू परिषदेनंतर कांहीं महिन्यांनीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचा विस्तार झाला आणि अणेप्रभृति राष्ट्रीय वृत्तीचे लोकनायक तेथें जाऊन बसले. ब्रिटिश प्रांतांच्या फेडरेशनची मध्यवर्ति सत्ता हळुहळू कमी बेजबाबदार कशी होईल हें पाहावें याच हेतूनें निदान लोकनायक अणे तरी तेथें गेलेले आहेत. आणि, भोंवतालची परिस्थिति मोठीशी उत्साहजनक नसतांहि, सामुदायिक जबाबदारीचें तत्त्व फेडरल मंत्रिमंडळांत प्रविष्ट करण्याचा नेटाचा प्रयत्न सध्यां चालू आहे. अशा वेळीं, डॉ० आंबेडकर यांनीं आपलें पूर्वीचें विवेचन विसरावें व अस्तित्वांत असलेल्या फेडरेशनमधून फुटून बाहेर पडण्याची सत्ता सिंध, पंजाब, सरहद्द प्रांत, बंगाल प्रभृति प्रांतांना आहे असें सुचवावें हें मोठें चमत्कारिक दिसतें. Federation *vs.* Freedom या पुस्तकांतील मुद्देसूद विवेचन लोकांपुढें मांडणाऱ्या डॉ० आंबेडकरांनीं, मध्यवर्ति कारभारांत जबाबदारीचें तत्त्व प्रस्थापित करण्याचे जे प्रयत्न चाललेले आहेत त्यांना वस्तुतः आशीर्वाद द्यावयास हवा! या प्रयत्नांना मूर्त स्वरूप येऊं लागल्या-पासून, बॅ० जीनांचा कसा जळफळाट सुरू झाला आहे, सर शिकंदर ह्यातखान यांची हैद्राबादच्या दिशेनें धांवपळ कशी सुरू झालेली आहे वगैरे गोष्टींचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करणाऱ्या प्रत्येक इसमाला हें पटेल कीं, आपण रचीत असलेला डाव साफ उधळला जातो कीं काय, या भीतीनें मुसलमान अस्वस्थ झालेले आहेत! ब्रिटिश विभागांच्या फेडरेशनमधून फुटून निघण्याची शक्यता कायदेशीररीत्या दिसत असती तर, बंगालसारख्या एकाद्या प्रांतांत

तरी तेथील मंत्रिमंडळानें तशा आशयाचा ठरावहि पास करून घेतला असता. यांतलें कांहींच घडलेलें नाहीं; आणि, मध्यवर्ति कारभारांत लोकसत्तेचा चंचुप्रवेश होतांच मुसलमानांचा जीव कासावीस होऊं लागला, या घटना कमी सूचक नाहींत! इमारत पक्की बांधून झाल्यावर पाडापाड करण्याचा प्रसंग येऊन सगळाच गोंधळ होण्यापेक्षां इमारतीचा पाया भरतांनाच दूर-वरचा विचार केला जावा आणि म्हणून पाकिस्तानची मागणी वेळींच मान्य करण्यांत यावी असेंहि डॉ० आंबेडकर यांनीं म्हटलें आहे.* नव्या घटनेचे नकाशे काढण्यांत आणि तिचा पाया भरण्यांत उणीपुरीं पांच वर्षें गेलेलीं आहेत. या कामानिमित्त लक्षावधि रुपये खर्च झालेले आहेत, यासाठीं कित्येक कमिशनें बसलीं आहेत व तीन गोलमेज परिषदा भरल्या आहेत–हें निदान डॉ० आंबेडकरांनीं तरी विसरूं नये! इमारतीच्या नकाशापासून सर्व उद्योग पुरे होऊन आतां फक्त कळस निर्माण व्हावयाचा राहिलेला आहे. या कळसाचें बांधकामहि हळुहळू पण नेटानें पुढें रेटण्यांत येत आहे. या इमारतीचें एक भव्य दालन संस्थानिकांसाठीं मोकळें ठेवण्यांत आलेलें आहे. इतरांशीं मिळतें घेऊन या दालनांत येऊन बसावयाचें कीं नाहीं हा प्रश्न संस्थानिकांनींच सोडवावयाचा आहे.

> इतकी सर्व सिद्धता झाल्यानंतर, या इमारतीचीं चार दालनें बंडखोरी करून अलग होऊं लागलीं तर ती बंडखोरी कोण सहन करील?

डॉ० आंबेडकरहि ही बंडखोरी मनापासून सहन करीत नसले पाहिजेत असें त्यांच्या लिहिण्याच्या रोखावरून दिसतें. या बंडखोरांना वेगळें काढ-ल्यानें हिंदूंचेंच परिणामीं हित होईल अशी समजूत झाल्यामुळेंच, त्यांना ही बंडखोरी क्षम्य वाटत असावी. ही बंडखोरी सहन करणें हिंदूंच्या हिताचेंच ठरेल ही डॉ० आंबेडकरांची भावना कितपत बरोबर आहे या मुद्याचा विचार पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें करणें सोईचें होईल.

---

*Thoughts on Pakistan, p. 5.

# प्रकरण १० वें

# आंबेडकर व पाकिस्तान

## राष्ट्ररक्षण व शांततारक्षण

**मुसलमानांची** पाकिस्तानची मागणी मर्यादित स्वरूपांत मान्य केल्यास त्या मान्यतेचा हिंदुस्थानच्या—म्हणजे पाकिस्तान वगळून उरलेल्या हिंदुस्थानच्या सैनिक सामर्थ्यावर व राष्ट्ररक्षणक्षमतेवर कोणता परिणाम होईल असा प्रश्न उपस्थित करून, डॉ० आंबेडकर यांनीं आपल्या ग्रंथाचें एक स्वतंत्र प्रकरण या प्रश्नाच्या ऊहापोहांत खर्च केलें आहे. सध्यांच्या काळीं हिंदूमधील लष्करी दृष्टि अतिशय लोप पावलेली असल्यामुळें आणि लष्करी अनुभवच नव्हे तर साधी लष्कर-विषयक माहिती मिळण्याचीहि शक्यता कमी झालेली असल्यामुळें, आपल्या ग्रंथांत डॉ० आंबेडकरांनीं या विषयाला एक स्वतंत्र प्रकरण दिलें याबद्दल प्रत्येक हिंदु वाचकाला समाधानच वाटेल. लष्करखातें हें मध्यवर्ति सरकारच्या ताब्यांतलें खातें आहे आणि लष्करावर होणारा खर्च मध्यवर्ति सरकारच्या तिजोरींतून होत असतो.

> मध्यवर्ति सरकारची तिजोरी ज्या करांमुळें तुडुंब भरते त्या करांचा फार मोठा हिस्सा हिंदुप्रधान प्रांतांकडून व हिंदूंकडून दिला जातो. असें असूनहि, हिंदुस्थानचें म्हणून जें सैन्य पोसलें जातें त्यांत पंजाबमधील मुसलमान व सरहद्दीवरचे पठाण यांचा वारेमाप भरणा केला जातो, ही गोष्ट डॉ० आंबेडकर यांनीं या प्रकरणांत ठसठशीतपणें दाखविली आहे.

'मुसलमानांच्या मागण्यांचा क्रमविकास' हीं या पुस्तकाचीं तीन प्रकरणें ज्यांनीं काळजीपूर्वक वाचलीं असतील त्यांच्याहि लक्षांत सदर मुद्दा आलाच असेल. १८५७ सालच्या बंडापासून सैन्यांत मुसलमानांचा भरणा कां वाढत गेला, मुसलमानांची राजनिष्ठा या भरण्याला कशी प्रोत्साहक झाली वगैरे गोष्टी या तिन्ही प्रकरणांतून सूचित व दर्शित झालेल्या आहेत.

सैन्यासाठीं लागणारा पैसा हिंदूंनीं द्यावा, सैन्यांत भरणा मुसलमानांचा असावा आणि एखाद्या मुसलमान शत्रूशीं लढण्याचा प्रसंग आला तर, हिंदूंच्या पैशावर पोसलेल्या या मुसलमान शिपायांनीं ऐन वेळीं दगा द्यावा अगर उघड जाऊन शत्रूला मिळावें ही परिस्थिति किती चिंताजनक आहे, हें हिंदूंच्या लक्षांत येण्याच्या दृष्टीनें डॉ० आंबेडकर यांचें विवेचन फार उपकारक आहे.

हिंदुस्थानच्या अंतर्गत शांततेसाठीं जें सैन्य पोसलें जातें त्यांत युरोपियनांचा भरणा पुष्कळ असतो हें खरें; पण सैन्याच्या या विभागांत जी हिंदी सैनिकांची संख्या असते त्या संख्येंतहि मुसलमानांचा भरणाच मोठ्या प्रमाणावर केलेला असतो ही गोष्ट तर केवळ चिंताजनक नसून, अत्यंत घातक अशी आहे; कारण, मुसलमान व हिंदु या दोन समाजांच्या मनोवृत्तींचा व संवयींचा तुलनात्मक विचार करणाऱ्या कोणाहि इसमाला हें मान्य करावें लागेल कीं, कसल्याहि खऱ्याखोटया कारणामुळें प्रक्षुब्ध होऊन, शांतताभंग करण्याला प्रवृत्त होण्याची मनोरचना हिंदूपेक्षां मुसलमानांमध्येंच जास्त प्रबळ आहे. अंतर्गत शांततेचा गेल्या अठरा वीस वर्षांत वारंवार होत असलेला बिघाड, मुसलमानांविरुद्ध मुसलमान सैनिकानें शस्त्र उचलतां कामा नये या शिकवणुकीचा होत असलेला प्रचार व पुरस्कार, ब्रिटिश सत्ता नष्टप्राय झाली असें सहज समजण्याचा मुसलमान लोकांच्या मनाचा कल इत्यादि सर्व गोष्टींचा येथील सत्ताधारी सरकारनें १९२१ सालच्या मोपल्यांच्या बंडापासून तरी नीट विचार केला असता तर, ब्रिटिश सरकारपुढें व हिंदुस्थानांतील हिंदूंपुढें आज उभा असलेला बिकट प्रसंग पुष्कळशा अंशानें टळला असता. पण सरकारला ही गोष्ट सुचली नाहीं. हिंदुप्रांतांतून हवें तेवढें सैनिक-सामर्थ्य निर्माण होण्याची शक्यता असूनहि, तिचा फायदा घेण्यांत आला नाहीं. अहिंसेच्या शांतिब्रह्मांनीं या बाबतींत सरकारची व लोकांची झोंपमोड केली नाहीं. अशी झोंपमोड करणारीं जीं कांहीं थोडीशीं माणसें देशांत होतीं त्यांना सार्वजनिक जीवनांतून उठविण्यांतच पुरुषार्थ आहे, असें कित्येकांकडून मानण्यांत आलें. आणि त्यामुळें आज हिंदुस्थानांतील हिंदूंवर आणि त्या असहाय हिंदूंचे संरक्षक व 'ट्रस्टी' जे ब्रिटिश लोक त्यांच्यावर बिनतोड प्रसंग आलेला आहे!

हिंदी सैन्य, हिंदीप्रजा, हिंदी संस्थानें या सगळ्यांना गोगलगाई बनविण्यांत हिंदुस्थान सरकारची व ब्रिटिश सरकारची केवढी भयंकर चूक होत आहे हें जगाच्या भवितव्याचा दूरदर्शीपणानें विचार करणाऱ्या लोकमान्य टिळकांनीं १९०२ सालीं हेरलें होतें.

> " युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांमध्यें जी चढाओढ चाललेली
> " आहे ती ज्या वेळीं निकरास येईल तेव्हां, अशा रीतीनें मृतप्राय
> " केलेल्या हिंदुस्थानचें इंग्लंडच्या गळ्यांतील ओझें इंग्लंडास
> " असह्य नाहीं तरी अडचणीचें झाल्याखेरीज राहणार नाहीं "*

हा इषारा किती बरोबर होता हें चालू युद्धाच्या सुरुवातीपासून हिंदूंना समजलें आहे; आणि, हिंदुस्थान सरकारलाहि तें समजलें असावें असें मानलें तर तें फारसें चुकण्यासारखें नाहीं. गेल्या महायुद्धानंतर युरोपांत असंतोष फैलावला आणि व्हर्सायच्या तहांतून आज ना उद्यां नवें महायुद्ध निर्माण होणार ही शक्यता स्पष्टपणें दिसू लागली. त्या वेळींहि हिंदुस्थानच्या रक्षणाच्या प्रश्नाची चिंता ज्यांना वाटत होती अशीं मोठमोठीं माणसें देशांत होतीं. कै० मोतिलालजी नेहरू हे थोर देशभक्त अशा लोकांपैकीं एक होते. लष्करी प्रकरणांतील गुह्यांची माहिती मिळणें आणि लष्करी शिक्षणाचा देशांत फैलावा होणें या गोष्टींना ते मनानें किती महत्त्व देत होते हें कानपूरच्या राष्ट्रीय सभेच्या वेळी विषय नियामक समितींत झालेल्या चर्चेवरून स्पष्ट होत आहे. पंडितजी त्या वेळीं दिल्लीच्या ॲसेंब्लींत स्वराज्य पक्षाचे नेते होते. सरकारी समित्यांवर स्वराज्य पक्षांतील सभासदांनीं जाऊं नये असा आग्रह त्या वेळीं दृढ होता. त्या आग्रहाकडे पाठ फिरवून पंडितजींनीं स्कीन कमिटीवर काम करण्याचें ठरविलें. विषय-नियामक-समितींत पंडितजींना याबद्दल जाब द्यावा लागला. आपण स्कीन कमिटीवर कां गेलों हें सांगतांना पंडितजींनीं असा खुलासा केला कीं, लष्करी प्रकरणांचे गुप्त कागद एरवीं आम्हांला पाहावयाला मिळाले नसते, ते आम्हांला कमिटींत दाखविण्यांत येतात.

" लष्करी शिक्षणाचा अभाव हेंच आमच्या दुबळेपणाचें कारण

*लो० टिळकांचे केसरींतील लेख, राजकीय खंड २, पृ० ३१५.

"असल्यानें हा दुबळेपणा नाहींसा होणें हें 'रिफॉर्म्स ॲक्टा 'च्या "दुरुस्तीपेक्षांहि महत्त्वाचें आहे "* असें मत पंडितजींनीं निर्भीड-पणानें मांडलें.

अशा धोरणी दृष्टीचीं माणसें गांधीयुगाच्या शांतता–साम्राज्यांत गुदमरून गेलीं नसतीं तर, राष्ट्ररक्षणाचा प्रश्न हिंदूंच्या दृष्टीनें आजच्यासारखाच बिकट राहिला असता कीं काय, हा प्रश्न मोठा विचारार्ह आहे.

डॉ० आंबेडकर यांनीं हिंदुस्थानच्या संरक्षणाबद्दल लिहितांना जी माहिती वाचकांपुढें मांडली आहे ती फार बहुमोल आहे. लष्करी बाबतींत हिंदूंना सतत अन्याय कसा होत आलेला आहे हा बोध त्या माहितीपासून घेऊन हिंदु-समाज यापुढें वागेल तर ही माहिती मिळवून हिंदूंपुढें मांडण्याचा डॉ० आंबेड-करांचा उद्योग सफल ठरल्यासारखा होईल. या माहितीवरून डॉ. आंबेड-करांनीं काढलेले सिद्धांत मात्र मोठे वादग्रस्त आहेत. हिंदुस्थानच्या संर-क्षणाच्या प्रश्नाला यापुढें कोणती दिशा लागेल याविषयींचें कोणतेंहि अनुमान सध्यांच काढणें हें पत्त्यांचे बंगले बांधण्यासारखें निष्फल ठरण्याचाहि संभव आहे. चालू युद्धाच्या समाप्तीच्या वेळीं जगाची स्थिति काय राहील, युरो-पांतील प्रबळ राष्ट्रांची तौलनिक शक्ति काय ठरेल, आशिया खंडांतील रशिया जर्मनीनें धुळीस मिळविला आहे त्याचे आशियाच्या भवितव्यावर काय परिणाम होतील, जपानचें सामर्थ्य हटेल कीं वाढेल, आपल्या साम्राज्याचा

*'गेलीं पांच वर्षें' पृष्ठ ६११, न. चिं. केळकर.


दि इंडियन प्रोग्रेसिव्ह
इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
या कंपनीची एजन्सी व विमा पॉलिसी
निश्चित फायदेशीर आहे.
माहिती मागवा.

जगभर पसरलेला फापटपसारा सांवरण्याचें व आंवरण्याचें सामर्थ्य एकट्या इंग्लंडच्या मनगटांत राहील, कीं या मनगटांतील शक्ति पुरेशी ठरण्यासाठीं इंग्लंडला अमेरिकेकडे पाहावें लागेल, भूमध्य समुद्र इंग्लंडच्या पूर्वेकडील हालचालींच्या दृष्टीनें कितीसा खुला व सुरक्षित राहील, ईजिप्तपासून अफगाणिस्थानपर्यंत पसरलेल्या मुसलमानी राष्ट्रांचें संघटन होऊं देण्यांत धोका आहे हें ओळखून युरोपियन राष्ट्रें इराण, इराक वगैरे भागांत स्वतःच्या लष्करी सामर्थ्याची पाचर ठोकून ठेवतील कीं काय, इत्यादि अनंत भानगडींचे प्रश्न सुटल्याखेरीज व समजल्याखेरीज हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या प्रश्नाचें भवितव्य वर्तविणें हें एकादी अदभुतरम्य कादंबरी लिहिण्यासारखें ठरण्याचाच संभव दृढ आहे. आणि यामुळेंच, डॉ० आंबेडकर यांनीं या प्रश्नाची केलेली निष्कर्षात्मक चर्चा कांहीं अंशीं निर्जीव वाटते. हिंदूंना जागृत करण्याचें कार्य त्यांनीं केलेल्या चर्चेमुळें उत्तम प्रकारें होत आहे, हें मात्र मान्य केलें पाहिजे.

पाकिस्तान वगळून उरणाऱ्या हिंदुस्थानच्या संरक्षणाचा प्रश्न विचारांत घेतांना डॉ० आंबेडकर यांनीं पहिलाच मुद्दा असा मांडला आहे कीं, पाकिस्तान निर्माण होतांच तें हिंदुस्थानशीं युद्धाला प्रवृत्त होईल असें समजण्याचें कारण नसल्यामुळें, संरक्षणाचा प्रश्न तांतडीचा नसून सबुरीचा आहे. हें मत एकदम मान्य करण्यासारखें नाहीं.

> पाकिस्तान हिंदुस्थानपाशीं युद्ध केव्हां करील हा प्रश्न पाकिस्तानची प्रस्थापना कोणत्या परिस्थितींत होईल यावर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून राहील.

चालू लढाई सुरू असतांनाच हिंदुस्थानांतली ब्रिटिश सत्ता दुर्बल झाली असल्याचा मुसलमानांना सुगावा लागला आणि त्यामुळें जिवावर उदार होऊन पाकिस्तान प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनीं आरंभिला तर, पाकिस्तानच्या प्रस्थापनेनंतरच नव्हे, तर त्याच्या आधींपासूनच हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यामध्यें युद्ध सुरु होईल ! या संभाव्य संग्रामांत हिंदुस्थानांत असणारें ब्रिटिश सैन्य हिंदूंच्या बाजूला वळेल कीं मुसलमानांच्या बाजूला वळेल, हिंदु व मुसलमान संस्थानिक काय करतील इत्यादि प्रश्न लक्षांत घेऊनच या विषयाचें उत्तर द्यावें लागेल. ब्रिटिश सत्ता विजयी झाली आणि तिनें मुसलमानांना संतुष्ट करण्यासाठीं अगर ब्रिटिश व्यापाऱ्यांचें व कारखान-

दारांचें हित साधण्यासाठीं पाकिस्तानची मागणी मान्य केली तर, पाकिस्तान व हिंदुस्थान या दोघांच्याहि टाळक्यावर ती सत्ता राहील आणि हिंदुस्थानच्या व पाकिस्तानच्या लष्करांचा संसार कसा थाटावयाचा हें ती सत्ता आपल्या स्वतःच्या स्वार्थाच्या व स्थैर्याच्या दृष्टीनें ठरवील. हिंदुस्थानांत मनुष्यबळ भरपूर असेल; त्या मनुष्यसमूहांत सुप्त असे सैनिक गुणहि भरपूर असतील! युद्धोपयोगी वस्तूंचे प्रचंड कारखाने चालविण्याला अवश्य असणाऱ्या वस्तुजाताची वाणहि या भागांत नसेल—हें सर्व अगदीं खरें असलें तरी, हिंदुस्थानच्या डोक्यावर ब्रिटिशांची सत्ता असे तोंपर्यंत याचा योग्य तो उपयोग होईलच, असें कसें मानावें? सध्यां एवढा घनघोर संग्राम चालू आहे, हिंदुस्थानला संतुष्ट राखल्यास हवें तेवढें मनुष्यबळ उपलब्ध होईल अशा सूचना अमेरिकेंतूनहि अधूनमधून दिल्या जात आहेत, तरी प्रत्यक्ष सृष्टींत काय घडत आहे? ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका हे हिंदुस्थानच्या दोन हातांकडे असणारे साम्राज्याचे भाग जितके महत्त्वाचे ठरत आहेत तितकें महत्त्व हिंदुस्थानला नाहीं असेंच स्पष्टपणें दर्शविण्यांत येत आहे. लष्करांतील मोक्याच्या जागा ऑस्ट्रेलियनांना दिल्या जात आहेत आणि युद्धपरिस्थितीचा फायदा घेऊन देशांतील कारखानदारी वाढवावी म्हणून तळमळत असणाऱ्या शेठ वालचंद हिराचंद यांच्यासारख्यांच्या तोंडाला पानें पुसलीं जात आहेत! युरोपांत एक सोडून शंभर 'डंकर्क' झालीं तरी, हिंदुस्थानशीं वागण्याचा ताठा सोडण्याचें ब्रिटिश लोकांना कारण पडत नाहीं. तोंपर्यंत हिंदुस्थानच्या भवितव्याचीं कल्पनाचित्रें रेखाटीत बसण्यांत काय तात्पर्य? मुसलमानांना

**V म्हणजेच विजय**

**रक्तशुद्धिसुधा वापरून**

रक्तावर विजय मिळवा. सर्व औषधांचा कॅटलॉग आजच मागवा.

**आयुर्वेदीय औषधी भांडार, तुळशीबागेजवळ, पुणें २.**

पाकिस्तान मिळावयाचें कीं नाहीं हा प्रश्न एकटयादुकटया कारणाचा अगर घटनेचा विचार करून सुटण्यासारखा नाहीं ! तो कोणीहि व कसाहि सोडवूं पाहील तर, आपल्या इच्छाशक्तीचा जबरदस्त अडसर घालून, हिंदु कांहीं प्रतिकार करूं शकतील कीं काय एवढयाच प्रश्नाचा विचार करणें हिंदूंच्या हातचें आहे.

हिंदुस्थान आजच्या परिस्थितींत आहे तसाच अखंड राहिला तर त्याला सुरक्षित सरहद्दीचा नैसर्गिक फायदा पुढेंहि मिळूं शकेल. हिंदूंनीं पाकिस्तान मान्य केलें आणि सध्यांची सरहद्द पाकिस्तानवाल्यांच्या हातांत गेली तरी फारसें बिघडत नाहीं, असें मत डॉ० आंबेडकर यांनीं प्रतिपादिलें आहे. हें मत अत्यंत धाडसाचें आहे. आज सरहद्दीपलीकडे नुसत्या पठाणांच्या टोळ्या आहेत तर त्या टोळ्यांचा त्रस्त समंध शांत राहावा म्हणून सरकारला केवढा खटाटोप व केवढा खर्च करावा लागत आहे ! हे टोळीवाळे पठाण आणि सिंध, पंजाबमधील मुसलमान सगळे एक झाले तर त्या बाजूनें हिंदुस्थानवर केवढें संकट येईल आणि हें संकट हिंदुस्थानला एकसारखें भेडसावीत कसें राहील याची कल्पना डॉ० आंबेडकरांना झाली नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे ! नव्या हिंदुस्थानची सरहद्द थेट गुजराथपासून संयुक्तप्रांत काश्मीरपर्यंत पसरलेली राहील. इराण, अफ़गाणिस्थान या वाटेनें या घातक सरहद्दीपर्यंत हवें तेवढें लढाऊ मनुष्यबळ व युद्धसाहित्य येऊं शकेल. पूर्वेच्या बाजूला बंगालमध्यें जें मुसलमानी राज्य निर्माण होईल त्या राज्यांत समुद्रमार्गानें व ब्रह्मदेशच्या मार्गानें हव्या तेवढ्या उपद्रवी वस्तु आणि हवीं तेवढीं उपद्रवीं माणसें येऊं शकतील. मध्यप्रांत, मुंबई इलाखा, मद्रास इलाखा व ओरिसा प्रांत यांना स्पर्श करणारें हैद्राबाद संस्थान किती तापदायक ठरेल हेंहि कल्पनेला समजण्यासारखें आहे. पाकिस्तान मान्य केल्यानें नुसती नैसर्गिक सुरक्षित सरहद्द सुटते इतकेंच नसून, अनेक सरहद्दी व आजच्याहून व्यापक अशा सरहद्दी धोक्याच्या बनतात. आणि खुद्द हिंदुस्थानच्या काळजांत एक विषारी कांटा रुतून राहतो ! अशा परिस्थितींत, निसर्गानें दिलेली व आज शतकानुशतकें सिद्ध झालेली नैसर्गिक सरहद्द हिंदूंनीं स्वेच्छेनें कां सोडावी हें समजणें अवघड आहे. सुरक्षित सरहद्द पाहिजे कीं विश्वासार्ह सैन्य पाहिजे असा बेमालूम प्रश्न डॉ० आंबेडकरांनीं हिंदूंना विचारला आहे. हिंदूंचें या प्रश्नाला

उत्तर असें आहे कीं, आम्हांला दोन्ही गोष्टी पाहिजे आहेत आणि धोरणीपणानें वागून त्या दोन्हीहि आम्ही मिळविणार आहोंत. ब्रिटिश सत्ता चालू युद्धांत लुली लंगडी ठरेलच असा संभव आज तरी दिसत नाहीं. आणि ती तशी ठरलीच आणि पाकिस्तान सिद्ध करण्याला तत्कालीन गोंधळांत मुसलमान प्रवृत्त झालेच तर, हिंदूहि अगदीं स्वस्थच बसतील असें तरी डॉ० आंब्रेडकर कां गृहीत धरून चालतात? पांच वर्षांपूर्वी हिंदूंमध्यें लष्करी धोरणाबावत जी दृष्टि नव्हती ती आज निश्चित निर्माण झालेली आहे. आणि चालू युद्धाच्या सुरुवातीपासून सरहद्दीच्या संरक्षणाची जी दक्षता घेण्यांत आलेली आहे तीहि उपकारक ठरत असल्याचें दिसत आहे. अशा स्थितींत हिंदूंच्या हातीं एकच गोष्ट आहे. पाकिस्तान सिद्ध होऊं न देण्याचा आपला निश्चय कृतींत उतरावा म्हणून त्यांना शक्य तितकें संघटित, सबल व प्रबल झालें पाहिजे व त्यांना तसें होतांहि येईल! आणि, कांहीं अपवादात्मक अवलिये सोडले तर, बाकीचा जाणता हिंदुसमाज या उद्योगाला लागला आहे, हेंहि निश्चित आहे. ब्रिटिश सत्ता युद्धसमाप्तीनंतर येथें टिकली तर तिनें पाकिस्तानला मान्यता देऊं नये आणि हिंदुस्थानच्या लष्कराच्या बाबतींत हिंदूंना होत असलेला अन्याय बंद व्हावा यासाठींहि हिंदूंना एकजुटीनें, नेटानें व धोरणानें वागावें लागेल.

As against the Hindus, the Muslims somehow always succeed*

(कोणत्याहि कारणानें असो, हिंदूंविरुद्ध खेळतांना फासा मुसलमानांना हवें तें दान नेमकें देतो) हें डॉ० आंबेडकरांचें इषारेवजा म्हणणें बव्हंशीं खरें आहे; पण,

> जरासंधाच्या हाडांचा फासा भीम समोर येऊन बसतांच कुचकामी ठरला ही पौराणिक गोष्टहि कांहीं कमी सूचक नाहीं. संघटित हिंदुसमाज आपली भीमशक्ति एकत्र करील आणि डॉ० आंबेडकरांच्या 'भीमपराक्रमा'चेंहि तिला पाठबळ मिळेल तर, आजवर मुसलमानांना अनुकूल दान देणारा फासा या प्रसंगीं व यापुढील सर्व प्रसंगीं मुसलमानांवर उलटलाच पाहिजे!

*Thoughts on Pakistan, p. 61.

सुंदर माहिती संग्रहीं असतांना आणि लष्करी धोरणाच्या बाबतींत हिंदूंना मनस्वी अन्याय झालेला आहे या गोष्टीची पुरी जाणीव झालेली असतांना, भारताच्या भावी संरक्षणाच्या प्रश्नाचें विवेचन करणारे डॉ० आंबेडकर भलतेच निष्कर्ष कसे काढूं शकले असा प्रश्न कोणापुढेंहि सहज उभा राहील. त्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, डॉ० आंबेडकरांनीं गृहीत धरलेली पहिलीच गोष्ट चुकीची आहे.

The Mussalmans cannot be asked to give up their right to Pakistan because it adversely affects the Hindoos in the matter of their boundaries.*

(सरहद्दीच्या बाबतींत पाकिस्तानची मागणी हिंदुहिताला बाधक ठरते म्हणून मुसलमानांनीं पाकिस्तान मागण्याचा आपला हक्क सोडावा असें म्हणतां येणार नाहीं.) असें डॉ० आंबेडकर अजून म्हणत आहेत. डॉ० आंबेडकरांच्या वृत्तींत हिंदुत्वप्रेम हळूहळू पण निश्चितपणें उमलूं व विकसूं लागलें आहे. या हिंदुत्वाच्या भूमिकेवरून डॉ० आंबेडकर जों जों विचार करूं लागतील तों तों ते अशीच भाषा बोलूं लागतील कीं, हिंदुस्थानच्या या भूमींत अहिंदूंना हिंदुबाधक असे कसलेच हक्क नाहींत.

> हिंदुकूश पासून द्वारसमुद्रापर्यंत आणि सिंधुसागरापासून (Arabian Sea) गंगासागरापर्यंत (Indian Ocean) विस्तारलेला जो विस्तृत व संपन्न भूभाग तो हिंदुस्थान—म्हणजे मुख्यतः हिंदूंचें स्थान आहे.

पारशी लोक या ठिकाणीं आश्रयासाठीं आले आणि येथील जनतेशीं समरस होऊन नांदूं लागले. आज ते लोक ऐश्वर्यांत आहेत. त्यांच्या वैभवाचा हिंदूंनीं कधीं हेवा मानला नाहीं! मुसलमान हे तर मूळचे हिंदूच! तेही या भूमींत याच वृत्तीनें नांदतील अशा समजुतीनें हिंदूंनीं आजवरचे सर्व व्यवहार केलेले आहेत. पण आतां जर त्यांना या पवित्र व प्राचीन देशाची निसर्गसिद्ध घडण मोडण्याची आणि त्या देशाचीं छकलें करण्याची दुर्बुद्धि सुचूं—स्फुरूं लागली असेल आणि त्या दुर्बद्धीला जर 'पाकिस्तानची मागणी करण्याचा आमचा अधिकार' असें ते म्हणत असतील तर त्यांना डॉ० आंबेडकरांनींहि

*Thoughts on Pakistan, p. 61.

एकच उत्तर दिलें पाहिजे. आपलें धार्मिक वैशिष्ट्य टिकविण्यापुरतें स्वातंत्र्य घेऊन येथें राहण्याची तुमची इच्छा असेल तर तेवढें स्वातंत्र्य मागण्यापुरताच तुम्हांला अधिकार आहे; यापलीकडे तुमचा कोणताहि अधिकार येथें मान्य होणार नाहीं; हिंदुस्थानची हिंदुसत्ता तुम्हाला सहन होत नसेल तर हा देश सोडून अरबस्थानांत, साहारा वाळवंटांत अगर तुमचे लाड करणाऱ्या इंग्रजांच्या इंग्लंडांत जाऊन राहण्याचा अधिकार तुम्हाला आहे; आणि तो तुम्ही जितक्या लवकर गाजवाल तितकें श्रेयस्कर ठरणार आहे—हें एकच उत्तर मुसलमानांची समजूत पडण्याला पुरेसें आणि प्रभावी ठरणार आहे. या दृष्टीनें भोंवतालच्या सृष्टीकडे पाहूं लागल्यावर, डॉ० आंबेडकर यांना संरक्षणाबावतचे आपले निष्कर्ष बदलण्याची बुद्धि झाल्याविना राहणार नाहीं, असें मानण्याला हरकत नाहीं.

पंजाबमधील कांहीं जिल्हे निर्हिन्दु बनवून आणि बंगालमध्येंहि तोच प्रकार घडवून आणून डॉ० आंबेडकरांनीं जें पाकिस्तान बनविण्य चा सकल्प केला आहे त्या पाकिस्तानच्या सिद्धीमुळें एक कटकट कायमची मिटेल अशी डॉ० आंबेडकरांची समजूत आहे. आज हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांतांत हिंदु व मुसलमान यांची संमिश्र वस्ती असल्यामुळें आणि उभ्या हिंदुस्थानांत एकंदर लोकसंख्येपैकीं चौथा हिस्सा लोकवस्ती मुसलमानांची असल्यामुळें, प्रांतिक सरकारें व मध्यवर्ति सरकार या सगळ्यांचीच घडण संमिश्र बनते आणि उठल्याबसल्या मुसलमानांच्या प्रश्नाचें भेडसावणारें भूत मानगुटीस बसतें, तें शक्य तोंवर थांबावें असें डॉ० आंबेडकरांना मनापासून, प्रामाणिकपणानें वाटत आहे. त्यांनीं संकल्पिलेलें मर्यादित स्वरूपाचें पाकिस्तान सिद्ध झालें तर, आज हरघडी होणारे जातीय बखेडे थांबतील असाहि डॉ० आंबेडकरांचा समज आहे. आणि या महत्त्वाच्या गोष्टी हातीं पडण्यासाठीं, सिंध, वायव्यसीमाप्रांत, बलुचिस्थान व पंजाबचे कांहीं जिल्हे यांचें मिळून एक मुस्लीम राज्य आणि पूर्वबंगालचे कांहीं जिल्हे आणि सिल्हेट हा आसाममधील जिल्हा यांचें मिळून दुसरें मुस्लिमराज्य स्थापन होण्याला हरकत नसावी, अशी डॉ० आंबेडकरांची विचारसरणी आहे. अशीं मुस्लिम राज्यें स्थापल्यानें हिंदुस्थानांतल्या हिंदूंच्या मागची मुसलमानांची कटकट खरोखरच थांबणार आहे कीं काय, या प्रश्नाचें नकारार्थी उत्तर देणारा मि० रहमतअल्ली यांच्या

लेखांतील उतारा डॉ० आंबेडकर यांनींच आपल्या पुस्तकाच्या पृष्ठ ११०–१११ वर उद्‌धृत केलेला आहे. साऱ्या हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें आहेत असें बुजगावणें उभें करून हिंदूंना भेडसावणाऱ्या मुसलमानांची पाकिस्तानची मागणी डॉ० आंबेडकर म्हणतात त्या मर्यादित स्वरूपांतहि मान्य झाली तर पुढें काय होईल हें या उताऱ्यावरून अनुमानितां येईल.

> शांतता पदरांत पाडून घेण्याच्या सद्‌बुद्धीनें हिंदूंनीं एकदां पाकिस्तानच्या मशिदींत प्रवेश केला कीं, ती मशीद त्यांच्या गळ्यांत लोढण्यासारखी बसलीच म्हणून समजावें !

हिंदुस्थानांत उरलेले दोन कोट मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्रच आहेत, ही कबुली पाकिस्तान-मान्यतेच्या पोटांत दडून बसलेली आहे. या कबुलीच्या शिडीनें चढत चढत जाऊन, मुसलमान सैन्यासकट प्रत्येक ठिकाणीं निम्मेनिम जागा मागण्याला चुकणार नाहींत, याविषयीं कोणाहि हिंदूनें पूर्ण खात्री बाळगावी. म्हणजे अर्थ असा कीं, डॉ० आंबेडकर म्हणतात त्या अर्थानें पाकिस्तानची मागणी मान्य केल्यावर, ‘बापापरी बाप गेला, नि बोंबलतांना ओंठ गेला’ हेंच म्हणण्याचा हिंदूंवर प्रसंग येईल ! आणि, हिंदुस्थानची अंतर्गत शांतता तरी या पद्धतीनें कितीशी टिकणार आहे ? पाकिस्तान प्रस्थापनेनंतर पाकिस्तानमधील मुसलमान आणि हिंदुस्थानांत उरलेले मुसलमान यांचे संबंध अजिबात बंद पडणार आहेत असा अर्थ मुळींच नाहीं. पाकिस्तानमधील मुसलमान आपलीं स्वतंत्र मुस्लिमराज्यें हीं आपल्या राष्ट्राचे बालेकिल्ले समजणार आणि तेथें बसून–तेथें आपले इस्लामी पाय पक्के रोंवून–हिंदुस्थानांतल्या मुसलमानांच्या हितसंवर्धनाकडे ते डोळ्यांत तेल घालून लक्ष देणार ! त्यांच्या जोडीला त्यांच्या कार्यांतील सहकारी म्हणून हैद्राबादच्या निजामचें स्वतंत्र मुस्लिम-राज्य हिंदुस्थानच्या काळजाला भिडल्यासारखें शिल्लकच राहणार ! अशा परिस्थितींत, हिंदुस्थानच्या हिंदूंनीं अंतर्गत शांतता टिकण्याची आशा धरावयाची आहे ! ही आशा मृगजळाप्रमाणें फसवीच ठरेल हें सांगण्याला एकादा चाणक्य हवा, असें मुळींच नाहीं. मुसलमान लोक सुडेटेन जर्मनांचें उदाहरण देण्याची पोपटपंची वारंवार करीत असतात; त्यावरूनच, हिंदुस्थानांत अंतर्गत शांतता टिकण्याची शक्यता कितपत आहे हें कोणाहि हिंदूला सहज समजूं शकेल.

आणि समजा, पाकिस्तान प्रस्थापनेनंतर रातोरात आणि हातोहात मुसलमान पार बदलले आणि ते अगदीं देव माणूस झाले तरी, कटकटी टाळण्यासाठीं हिंदूंनीं पाकिस्तान मान्य करावें हें म्हणणेंच बुद्धीला आकलन होण्यासारखें नाहीं !

> कटकट टळावी हीच सर्वश्रेष्ठ इच्छा हिंदूंच्या मनांत नांदत असेल तर, त्यांनीं पिंडाएवढा भात खाऊन प्रेताप्रमाणें पडून राहण्याला तयार व्हावें, म्हणजे झालें ! मनाची ही तयारी झाली कीं सगळ्या कटकटींचें मूळच संपलें !

पण, हिंदु हे ज्या अर्थी इंग्रजांपासून स्वराज्य मिळविण्याला निघाले आहेत आणि तें स्वराज्य टिकविण्याची व चालविण्याची हिंमत ते मनांत बाळगीत आहेत त्या अर्थी त्यांना कटकटींचा कंटाळा आला असेल, असें दिसत नाहीं. कारण, स्वराज्य मिळविणें हें जसें कटकटीचें काम आहे तसेंच मिळालेलें स्वराज्य टिकविणें हेंहि कटकटीचेंच काम आहे. केवळ देशांतील शांततारक्षणाचें काम करणाऱ्या व त्या कामासाठीं प्रांतांकडून ओझ्यावारी पैसे कराच्या रूपानें घेणाऱ्या मध्यवर्ति सरकारची आवश्यकता तरी काय आहे, असें हिंदुहिंदुस्थानांतील कांहीं प्रांत आज ना उद्यां म्हणूं लागतील असें भेसूर भविष्य डॉ० आंबेडकरांनीं वर्तविलें आहे.* डॉ० आंबेडकरांचे हें भविष्य केवळ कल्पनानिर्मित नसेल, त्याला कांहीं आधार असेल तर स्पष्टपणें असें म्हणावें लागेल कीं, स्वराज्याची शाब्दिक मागणी करणाऱ्या हिंदूंना स्वराज्याचा व्यावहारिक अर्थच समजलेला नाहीं. 'पोट आणि अवयव' या जुन्या गोष्टींतला मतलब न ओळखून, हिंदु यापुढेंहि खंबीर मध्यवर्ति सरकार आणि राष्ट्ररक्षणाला समर्थ असें खंबीर, चतुरंग, अद्ययावत् लष्करी सामर्थ्य यांच्याकडे दुर्लक्ष करणार असतील तर, स्वराज्याची सारी चळवळ समुद्राच्या खाऱ्या पाण्यांत विरून जाईल, यांत शंकाच नाहीं.

> स्वराज्य म्हणजे सैन्यसामर्थ्य; आणि, तें सैन्यसामर्थ्य टिकविण्यासाठीं आणि वाढविण्यासाठीं राष्ट्राच्या सर्व अवयवांनीं सिद्ध असणें हेंच जबाबदारीचें स्वराज्य !

---

*Thoughts on Pakistan, p. 7.

हें सैन्यसामर्थ्य सिद्ध करतांना, परकी सरकारकडून आज होत असलेली उधळमाधळ होतां कामा नये, हें खरें आहे. पण, ही उधळमाधळ टाळण्याचें धोरण सांभाळिल्यानंतर, सैन्याप्रीत्यर्थ जो खर्च होईल तो दुसऱ्या रूपानें सर्व प्रांतांना परत मिळेल, ही विचारसरणीच यापुढें वाढवीत राहिलें पाहिजे. पांच पांच कोटी लोकसंख्येचीं चिमुकलीं राष्ट्रें सध्यां सालोसाल परार्धावधि पौंड सैनिक-सज्जतेवर खर्च करीत असतात. एका हातानें होत असलेला हा खर्च दुसऱ्या हातानें परत मिळत असतो, यामुळेंच या गोष्टी युरोप, जपान व अमेरिकेमध्यें घडतात. सैनिक-सिद्धतेमुळें पायदळ, घोडदळ, नाविकदळ, विमानदळ इत्यादि नानाप्रकारच्या दळांतून हजारों माणसांना कामें करावीं लागतात आणि या माणसांना मिळणाऱ्या वेतनावर अशा हजारों माणसांच्या कुटुंबांतील लक्षावधि लोकांचा योगक्षेम चालतो. सैनिक-सिद्धतेसाठीं देशांत शस्त्रनिर्मितीचे, विमाननिर्मितीचे, मोटार-निर्मितीचे असे हजारों कारखाने चालतात आणि या कारखान्यांत कामगारांना जें वेतन मिळतें तेंहि देशांतील लक्षावधि लोकांच्या उपजीविकेला उपयोगी पडतें. अशा दृष्टीनें विचार केल्यास, राष्ट्रीय व राष्ट्रहितदक्ष सरकारकडून केली जाणारी लष्करी सामर्थ्याची सिद्धता ही देशाच्या योगक्षेमालाच कारणीभूत होत असते. अशा सैनिक-सिद्धतेसाठीं करभार देणें हें नागरिकांचें कर्तव्यच आहे.

**प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् ।**
**सहस्रगुणमुत्स्रष्टुं आदत्ते हि रसो रविः ॥**

या वचनांत सूचित केल्याप्रमाणें, सूर्य जसा पृथ्वीवर पर्जन्यवर्षाव करण्यासाठींच जलाचें शोषण करीत असतो तद्वतच, राष्ट्रीय सरकारहि सर्व देशावर समृद्धीचा व सुबत्तेचा वर्षाव करण्यासाठींच कराच्या पैशांचें शोषण करीत असतें. नुसतें राष्ट्ररक्षणाचें खर्चिक काम करणाऱ्या व राष्ट्रहितकारी उद्योगांत (Nation-building activities) प्रत्यक्ष न पडणाऱ्या मध्यवर्ति सरकारबद्दल कांहीं प्रांतांतून कांहीं गैरसमज असतील तर, त्या गैरसमजाचीं कोळिष्टकें काढून टाकलीं पाहिजेत! डॉ० आंबेडकर त्या कोळिष्टकांना अप्रत्यक्षपणें थोमाळतात कसे, याचें आश्चर्य वाटतें!

कटकटी टाळण्याचें डॉ० आंबेडकरांचें शास्त्र कांहीं अजब आहे! हिंदु

लोकांना जर कांहीं शिकवावयाचें असेल तर तें 'कटकटी टाळा' हें नसून, कटकटी निर्माण करा हें आहे.

> घरांत घुसूं पाहणाऱ्या संकटांची कटकट नको म्हणून घरांत दडून राहण्याची आणि घराच्या काळोख्या कोंपऱ्यांत छपून बसण्याची घातघेणी वृत्ति हिंदूंत बळावली म्हणून तर हिंदु आज अनर्थपरंपरा सोशीत आहेत. कटकटी टाळण्याचेंच तत्त्वज्ञान त्यांच्यापुढें मांडून भागेल कसें ?

घरांत घुसूं पाहणारें संकट घराबाहेर आहे तोंच त्याच्याशीं कटकट कशी सुरू करावी आणि त्या संकटासमोर मूर्तिमंत संकट म्हणून उभें कसें राहावें, हेंच हिंदूंना ऐहिक व्यवहारांत शिकावयाचें आहे. कटकट टाळूं पाहणारा समाज कटकट टाळूं शकत नाहीं ! उलट, नसत्या कटकटी हात धुऊन त्याच्यामागें लागतात, हा स्वतःच्या इतिहासाचा व जगाच्या इतिहासाचा बोध हिंदूंनीं दृष्टिआड करण्यासारखा नाहीं ! आज जीं राष्ट्रें स्वराज्योपभोग आणि स्वातंत्र्योपभोग घेत आहेत ती राष्ट्रेंहि कटकटींना कंटाळलेलीं नाहींत; उलट, कटकटी निर्माण करण्याकडेच त्यांची वाढती प्रवृत्ति आहे ! हिंदुसमाज कटकटींना कंटाळला तरी भोंवतालचे समाज जोंपर्यंत तसे कंटाळलेले नाहींत, तोंपर्यंत एकटया हिंदुसमाजाला कटकटींचा कंटाळा येऊन भागणार नाहीं. दुसरे आपल्या कटकटी तुमच्या घरांत घुसवितील आणि त्या कटकटींमुळें तुमचा जीव हैराण होईल !

हिंदुस्थानांत—म्हणजे पाकिस्तान वगळून उरलेल्या हिंदुस्थानांत—स्वराज्य सिद्ध झालें, इंग्रज आपली बाडबिछायत उचलून कायमचे विलायतेस गेले तरीहि या मर्यादित हिंदुस्थानला कटकटी टाळण्याचें तत्त्वज्ञान स्वीकारतां येणार नाहीं ! या मर्यादित हिंदुस्थानांत जे दोन को ी मुसलमान आहेत त्यांचे उद्योग कोणत्या प्रकारचे चालतात, त्यांचीं संधानें कोणाशीं चालू आहेत, त्यांचीं वळणें कोठें कोठें आहेत, हैद्राबादचा निजाम कोणतीं पाताळयंत्री कारस्थानें खेळत आहे, त्रावणकोर-कोचीन भागांतील ख्रिस्त्यांचा जमाव आपलीं पावलें कोणत्या दिशेनें टाकीत आहे आणि या सर्व प्रकारामुळें उद्भवणाऱ्या कटकटींना पुरून उरण्याइतकें खंबिरीचें सामर्थ्य आपल्या जवळ आहे कीं नाहीं, याचा विचार हिंदुस्थानांतील हिंदूंना अहर्निश करावाच लागेल.

पाकिस्तान मान्य केल्यानें 'परक्यांचें प्रवेश-द्वार' म्हणून प्रसिद्ध असलेला वायव्य सरहद्दीचा निमुळता दरवाजा सताड उघडा पडत असल्यामुळें,

त्या दरवाज्यांतून कोणकोण आंत घुसत आहेत, या लोकांचीं पाकिस्तानमधील मुसलमानांशीं कांहीं खलबतें चाललीं आहेत कीं काय, पूर्व सरहद्दीवरील मुस्लीमराज्यांतले मुसलमान बंगालच्या उपसागरांतून हिंदूंच्या कोणा शत्रूला आंत घेत आहेत कीं काय, इत्यादि गोष्टींकडे डोळ्यांत तेल घालून पाहण्याची कटकट हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्तीनंतरहि टाळतां येणार नाहीं. अंतर्गत शांततेचे प्रश्न, भोंवतालच्या मुस्लिम-राज्यांमुळें उद्‌भवणारे प्रश्न, त्यांतून निघणारे संभाव्य धोके, या सर्वांना पुरून उरण्याइतकें सामर्थ्य हिंदुस्थानला एकवटावयाचें असेल तर, तें कटकटी टाळल्यानें साधण्यासारखें नाहीं. याशिवाय, जगाच्या चावडीवर काय चाललें आहे तिकडेहि हिंदुस्थानला जागरूकपणें लक्ष पुरवावें लागेल. ऑस्ट्रेलियांतील इंग्रज वसाहतवाले काय करीत आहेत, ब्रह्मदेशावर कोणकोणत्या पापी ग्रहांची नजर आहे, सीलोनला कोणकोणते भुंगे पोंखरीत आहेत, जपानचे मनसुबे काय चालले आहेत, चीनच्या राजकारणाचा रंग कसकसा बदलत आहे या सर्व लगतच्या गोष्टी साक्षात् समजाव्या म्हणन या सर्व भागांत हिंदुस्थानला वकिलाति थाटाव्या लागतील, गुप्तहेरांचीं जाळीं पसरावीं लागतील, व्यापारधंद्यांच्या मिषानें माणसें पेरावीं लागतील, तत्त्वज्ञानी व धर्मोपदेशक म्हणून माणसें हिंडवावीं लागतील—अशा एक ना दोन, शंभर उलाढाली आणि खटपटी कराव्या लागतील ! आणि हें सारें कल्पनाचित्र फक्त हिंदुस्थानच्या एका बाजूच्या विभागापुरतें मर्यादित आहे. हिंदुस्थान हा जगाचा मध्यबिंदु आहे. त्याचें सौंदर्य, समृद्धि, त्याची संपन्नता इत्यादि गुणांमुळें त्याच्याकडे हजारों लोकांची पापी दृष्टि सतत वळलेली राहावयाची ! या पापी दृष्टीची बाधा होऊन, आपला हिंदुस्थान फिरून पारतंत्र्याच्या गर्तेत पडूं नये, यासाठीं हिंदुस्थानांतल्या हिंदूंना उत्तर-दक्षिण अमेरिकेंत, मध्ययुरोपांत, मध्यआशियांत, आफ्रिकेंत, अशा सर्व ठिकाणीं नाना मिषांनीं नानातऱ्हेचे उद्योग करावे लागतील. हे उद्योग करावयाचे म्हटलें म्हणजे कटकटी आल्याच ! इत्यर्थ असा कीं, कटकटी टाळण्याचें तत्त्वज्ञान पाकिस्तान वगळून उरलेल्या हिंदुस्थानचेंहि स्वातंत्र्य

मिळविण्याला व टिकविण्याला पुरेसें पडावयाचें नाहीं. आणि म्हणून, हिंदूंनीं यापुढें कटकटी करण्याचेंच तत्त्वज्ञान आत्मसात् करणें सर्व दृष्टींनीं अपरिहार्य व श्रेयस्कर आहे. हें जर खरें तर, कटकटी टळाव्या म्हणून, मुसलमानांना भिऊन पाकिस्तानचा मुलूख तरी सोडण्याला हिंदूंनीं कां तयार व्हावें ?

> कटकटी टळत नाहींत; त्या टाळतांच येत नाहींत; आजच नव्हे, त्या केव्हांहि टाळतां येत नाहींत; हें एकदां निर्विवाद सिद्ध झालें कीं, हिंदुस्थानचें अखंडत्व कायम टेवणें आणि त्या अखंड हिंदुस्थानवर भक्कम अशी लोकायत्त मध्यवर्ति राज्यसंस्था निर्माण करणें या हेतूसाठींच कटकटी सुरू करणें, हेंच श्रेयस्कर ठरतें !

---

महायुद्ध दाराशीं आलें
तरीहि
स्वस्त व खात्रीशीर औषधें कोठें खरीदाल ?
स्टार मेडिको
डिस्पेन्सिग केमिस्टस्, ड्रगिस्ट्स्,
व
जनरल मर्चन्टस्
—बेलबाग चौक, बुधवार पेठ, पुणें.

## प्रकरण ११ वें

# मुसलमानांच्या हृदयपालटाची जरुरी

**स्वातंत्र्यासाठीं** अधीर झालेले हिंदु मुसलमानांच्या आग्रहीपणामुळें अस्वस्थ होतील, ते त्यांच्याशीं तडजोडीची भाषा बोलूं लागतील आणि अशा तडजोडीच्या भाषेंतून नेमकें पाकिस्तानच निर्माण झालें नाहीं तरी, सत्ता विभागणींत ५० टक्क्यांची मागणी तरी पदरांत पाडून घेतां येईल, अशा भ्रमांत लीगवाले मुसलमान असतील तर शेवटीं त्यांना पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी येईल ! त्यांच्याशीं वाटाघाटी करण्याला नेहमीं उत्सुक असणारे काँग्रेसमधील हिंदु या दिशेनें कांहीं करतील अगर करूं शकतील असें मुसलमानांनीं मानूं नये. काँग्रेस व लीग यांच्या दरम्यान जी मतभेदांची खोल गर्ता निर्माण झालेली आहे ती भरून निघण्यासारखी नाहीं, असें गांधीजींनीं २५–४–१९४१ रोजीं काढलेल्या पत्रकांत स्पष्टपणें म्हटलेलें आहे,

(I admit that there is unfortunately an unbridgable gulf between the Congress and the Muslim League) हें जीना व त्यांचे अनुयायी यांनीं विसरूं नये. गांधीजींचे हे उद्‌गार स्वतः गांधीजीच विसरूं लागले अगर काँग्रेसमधील कांहीं हिंदु पुढाऱ्यांना गांधीजींच्या या उद्वेगाचें विस्मरण झालें तरी, तेवढ्यानेंहि भागण्यासारखें नाहीं हें लीगनें विसरूं नये. कारण, चालू युद्धाची पर्वणी आली असतां आणि त्या पर्वणीचा भरपूर फायदा घेण्याची शक्यता असतां, लीगच्या आडमुठेपणामुळें राष्ट्ररक्षणाच्या व राष्ट्रस्वातंत्र्याच्या प्रश्नाचा कसा चुथडा झाला, हें सप्रूंसारखे नेमस्ताग्रणी, सावरकरांसारखे हिंदुराष्ट्रनेते व आंबेडकरांसारखे पूर्वास्पृष्टांचे नेते विसरतील असा संभव नाहीं. लीगनें गेल्या वीस वर्षांत जें जातिस्वार्थाचें आंधळें धोरण पत्करलें त्यावर लीगच्या या अवसानघातकीपणामुळें कळसच चढलेला आहे, ही भावना लोकनायक अणे यांच्यासारख्या सर्वमान्य हिंदु पुढाऱ्याच्या मनालाच त्रास देत नसून, ख्रिस्ती पुढारी, पारशी पुढारी, शीख पुढारी, अशा सर्वांच्याच

चित्ताला लीगच्या या अवसानघातकीपणामुळें जबरदस्त धक्का बसलेला आहे. तेव्हां,

> कोणी हिंदु पुढारी आपल्यापाशीं वाटाघाटी करावयाला येतील आणि आपण आपला कार्यभाग साधून घेऊं अशा भ्रमांत लीगमधील मुसलमानांनीं व लीगच्या बाहेरील मुसलमानांनीं यापुढें राहूं नये.

बार्डोलीच्या जप्त जमिनी आपल्या पायानें चालत स्वगृहीं येतील असे विश्वास-जनक उद्‌गार सरदार वल्लभभाई पटेल हे बार्डोलीच्या खेडुतांपाशीं काढीत असत.

> हिंदुस्थानचें स्वराज्य आपल्या पायानें चालत आमच्याकडे येईल असे विश्वासगर्भ उद्‌गार हिंदुलोक आतां काढूं लागले असल्यामुळें, आपल्या अडेलतट्टूपणाला बाजारभाव येईल या समजुतीच्या धुक्यांतून बाहेर पडण्यांतच भारतीय मुसलमानांचें कल्याण आहे.

देवाण-घवाणीच्या तत्त्वावर केलेला लखनौ-करार मोडून मुसलमानांनीं गेल्या पाव शतकांत जे स्वार्थीपणाचे मुद्दे पदरांत पाडून घेतलेले आहेत त्या सर्वांवर पाणी सोडण्याची मुसलमान तयारी दाखवितील तरच यापुढें हिंदु त्यांच्यावर थोडाफार विश्वास टेवण्याला प्रवृत्त होतील. हिंदुस्थानांतील परस्परविरोधी जमातींमध्यें व हितसंबंधांमध्यें सलोखा घडून येत नाहीं म्हणून ब्रिटिश मुत्सद्दी गळे काढकाढून रडत असतात. या कांगावखोर मुत्सद्यांना हिंदुसमाज यापुढें हेंच उत्तर देईल कीं,

> आमच्यांत झालेली एकी तुम्ही बिघडविलेली आहे; आणि, आमच्यांत एकी व्हावी अशी तुमची प्रामाणिक इच्छा असेल तर तुम्हीं त्या एकींत जो बिब्बा भरलात तो तरी तुम्हीं बऱ्याबोलानें काढून घेतला पाहिजे. ब्रिटिश मुत्सद्दी जोंपर्यंत ही गोष्ट करणार नाहींत, जातिनिर्णयांतील प्रांतरचना व मतदारसंघांची रचना या सर्व गोष्टी रद्द करून, लखनौ करारानें निर्मिलेली परिस्थिति पुन: निर्माण करण्याचा प्रामाणिकपणा ते जोंवर दाखविणार नाहींत तोंवर त्यांच्या कांगावखोरपणाला उद्देशून हिंदुसमाज म्हणत राहील :

स्वयं चक्षुराकुलीकृत्य अश्रुकारणं पृच्छति ।

ब्रिटिश मुत्सद्दी कांहींहि म्हणत राहिले, त्यांच्या कृपाप्रसादानें मिळणारें नामधारी स्वराज्य कितीहि लांबणीवर पडलें, तरी हिंदुसमाज यापुढें अधीर होऊन आपल्याशीं तडजोडीची व वाटाघाटीची भाषा बोलूं लागणार नाहीं हें मुसलमान समाजानें पुरें ओळखून राहावें. लखनौ करारापर्यंत पुष्कळसे मुसलमान We are Indian first and Mussalmans afterwards असें म्हणत असत. या त्यांच्या म्हणण्याचा आशय असा असे कीं, मुसलमान म्हणून आमच्या भावना कांहींहि असल्या आणि मुसलमान म्हणून आमचे हितसंबंध कांहींहि असले तरी, हिंदुस्थानच्या हिताचा प्रश्न निघतांच आम्ही त्या भावना आणि ते हितसंबंध यांना दुय्यम स्थान दिल्याशिवाय राहणार नाहीं. ख्रिस्ती, पारशी वगैरे पुढारीहि त्या वेळीं अशाच अर्थाची भाषा बोलत असत. आणि, अनुकरणप्रियतेमुळें अर्थशून्य शब्दप्रयोग करण्याची खोड हिंदूंच्या हाडींमाशीं खिळलेली असल्यामुळें, कांहीं हिंदूहि त्यावेळीं उगीचच म्हणत : We are Indians first and Hindus afterwards.

> We are "Indians" first (आम्हीं सर्वांआधीं हिंदी अगर भारतीय आहोंत) हा वाक्प्रचार हिंदूंच्या तोंडीं न शोभण्यासारखा आहे. कारण, भारतीयत्व आणि हिंदुत्व या गोष्टींचा विरोध असंभवनीयच असून, त्या दोन गोष्टींची व्याप्ती सर्वांशीं सारखी आहे. मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू अशा लोकांनीं हा वाक्प्रचार वापरावा हें बरोबर आहे. कारण, या सर्व जमातींतले लोक हिंदुस्थानच्या बाहेरहि असल्यामुळें, त्या बाहेरच्या लोकांशीं संगनमत करून भारतीय हितावर निखारे ठेवण्याला आम्हीं प्रवृत्त होणार नाहीं, अशी हमी (Guarantee) त्या वाक्प्रचारांत अभिप्रेत आहे.

लखनौ-कराराच्या मागें मुसलमानांनीं दिलेली ही हमी मूर्तिमंत उभी आहे. त्यानंतरच्या २५ वर्षांत मुसलमानांनीं ही हमी पदोपदीं मोडली असून, सध्यां तर मुसलमान हिंदुस्थानची चीरफाड करण्याशिवाय दुसरी भाषाच बोलण्याला तयार नाहींसे झाले आहेत. जगांत हिंदूंचा जर एका गोष्टीबद्दल विशेष लौकिक

असेल तर ती गोष्ट त्यांची वचनानिष्ठा हीच आहे. स्वत: वचननिष्ठेला महत्त्व देणारा हिंदुसमाज इतरांकडूनहि त्या निष्ठेची अपेक्षा करतो आणि वचनभंग करणाऱ्या लोकांशीं समानतेच्या भूमिकेवरून कसल्याहि वाटाघाटी करणें हें मानहानिकारक आहे, असें हिंदुसमाज मानतो.

> आपल्याला या वचनभंगाबद्दल पश्चात्ताप झालेला आहे– झालेल्या वचनभंगाबद्दल भरपाई करण्याची आपली तयारी आहे आणि या तयारीमागें आपल्या वृत्तींत झालेला पालट मूर्तिमंत उभा आहे, अशी मुसलमान समाज हिंदूंची खात्री पटवून देईल तरच आणि तेव्हांच हिंदु त्यांच्याशीं वाटाघाटी करण्याला प्रवृत्त होतील हें मुसलमानांनीं नीट लक्षांत ठेवावें.

लखनौ कराराच्या वेळची स्थिति निर्माण करणें याचा अर्थ सिंधप्रांत मुंबई इलाख्याला फिरून जोडणें हा तर आहेच; शिवाय, पंजाब व बंगाल प्रांतांत हिंदूंना त्या करारानें जें थोडेंसें अधिक प्रतिनिधित्व मिळालें होतें त्याला मान्यता देणें हाहि अर्थ त्यांत अभिप्रेत आहे. एवढ्यानें वायव्य सरहद्द प्रांताचा प्रश्न मिटणार नाहीं. कारण लखनौ कराराच्या वेळीं या प्रांताला स्वतंत्र प्रांताचा दर्जाच मिळालेला नव्हता. या प्रांतांतील हिंदु व शीख यांचें संयुक्त संख्याबलहि अत्यल्प आहे. हा प्रांत आर्थिक दृष्ट्या अगर अन्य दृष्ट्याहि स्वतंत्र होऊन नांदण्यासारखा नाहीं; म्हणून तो प्रांत पंजाबला जोडण्याला तूर्तची तडजोड म्हणून मुसलमानांनीं तयार झालें पाहिजे. पंजाब व सरहद्द प्रांत मिळून सर्व मुलुखाचा राज्यकारभार एकत्र चालविण्याचें ठरल्यावर, त्या मुलुखांतील हिंदु व शीख या संयुक्त लोकसमूहाला मुसलमानांनीं भरपूर संरक्षण कायदेशीरपणानें दिलें पाहिजे. मुंबई, मद्रास प्रभृति प्रांतांतून हिंदूंनीं मुसलमानांना जें संरक्षण लखनौ-करारान्वयें दिलेलें आहे तें देण्याची नैतिक जबाबदारी हिंदूंवर नव्हती आणि नाहीं.

> हिंदूंच्या नसांतून पिढ्यानुपिढ्या वाहात राहिलेलें सहिष्णु रक्त हेंच अहिंदूंचें खरें संरक्षण आहे; इतर कसल्याहि प्रकारचें संरक्षण मागण्याचें धाष्टर्य अहिंदूंनीं करणें म्हणजे हिंदूंच्या उज्वल परंपरेचा उपमर्द करणें होय, असें लखनौ-कराराच्या वेळीं हिंदूंना म्हणतां आलें असतें.

तसें त्यांनीं म्हटलें नाहीं हें त्यांचें औदार्य होय. हें औदार्य मुसलमानांनीं मान्य केलें पाहिजे. संख्यादैन्यामुळें संरक्षणार्हच जर कोणी असतील तर ते अहिंदु नसून हिंदूच आहेत; कारण, अहिंदूंचीच वृत्ति आक्रमणशील आहे. ही इतिहाससिद्ध गोष्ट मान्य करून, वायव्य सरहद्दीनजीकच्या मुसलमानांनीं तेथील हिंदु व शीख यांच्या संयुक्त समूहाला भरपूर संरक्षण देण्याची तयारी दाखविली पाहिजे.

सध्यांच्या प्रांतरचनेच्या दृष्टीनें प्रांतांपुरता हा प्रश्न सुटल्यानंतर, मुसलमानांनीं आपल्यांतील हृदय-पालटाचें आणखी एक चिन्ह म्हणून असें कबूल केलें पाहिजे कीं, मध्यवर्ति-सत्तेच्या उपभोगाच्या वेळीं संरक्षण देण्याघेण्याचा प्रश्न शिल्लकच उरत नाहीं. धार्मिक आचारस्वातंत्र्य वगैरे गोष्टींसाठीं संरक्षण इष्ट व अवश्य असेल तर, तें संरक्षण प्रांतांच्या कक्षेपुरतेंच मर्यादित आहे. मध्यवर्ति कारभाराशीं या प्रश्नांचा अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं ही गोष्ट प्रांजलपणें मान्य करून,

> मध्यवर्ति विधिमंडळाच्या निवडणुकीपासून प्रत्येक बाबतींत मुसलमानांनीं व इतर अहिंदूंनीं हिंदूंशीं संयुक्त रीत्या व्यवहार करण्याला तयार झालें पाहिजे.

हृदयपालट झाल्याचें लक्षण म्हणून मुसलमान या गोष्टी करतील तर, ब्रिटिश हिंदुस्थानपुरता प्रश्न पुष्कळच लौकर सुटेल आणि तो सुटण्याच्या मार्गाला लागला कीं, संस्थानिक, त्यांची प्रजा व त्या उभयतांचे भारतीय सरकारशीं संबंध हेहि प्रश्न सहज सुटतील.

हृदयपालट झाल्याची एक खूण म्हणून मुसलमानांनीं ही गोष्ट तर केलीच पाहिजे. पण, एवढीच गोष्ट केल्यानें हिंदूंच्या साशंकवृत्तीचें पूर्ण समाधान होणार नाहीं. १९२१च्या मलबारमधील मोपल्यांच्या बंडापासून अगदीं ताज्या असलेल्या डाक्का वगैरे ठिकाणच्या अस्वस्थतेपर्यंत जे हिंदुविघातक प्रकार सतत घडत आलेले आहेत त्या प्रकारांचा मुसलमानांनीं साधा शाब्दिक निषेधहि केलेला नाहीं. आपल्या चित्तवृत्तींत दिसूं लागलेला पालट संधिसाधुपणाचा नसून तो मनाच्या तळमळींतून निघालेला आहे हें हिंदूंना पटवून देण्यासाठीं

मुसलमान समाजानें ठिकठिकाणीं सभा करून, घडलेल्या या सर्व प्रकारांबद्दल दिलगिरी व्यक्त केली पाहिजे आणि या प्रकारांचें उत्तरदायित्व ज्यांच्यावर आहे त्या सर्वांचा त्यांनीं प्रकटपणें निषेध केला पाहिजे.

हृदयपालटाचीं हीं प्राथमिक चिन्हें दिग्दर्शित केल्यावर मुसलमानांनीं इतर कांहीं मुद्यांकडे वळलें पाहिजे. मुसलमानांच्या प्रार्थनेच्या वेळा आणि हिंदूंच्या धार्मिक रूढींचा संकोच यांचें समीकरण गेल्या वीस पंचवीस वर्षांत अत्यंत दृढ झालेलें आहे. आणि त्यामुळें हिंदूंना आपले धार्मिक व सामाजिक व्यवहार करतांना उगीचच चोरटेपणानें वागावें लागत आहे. यापुढें हिंदूंना या बाबतींत कोणताहि त्रास होणार नाहीं,

अस्तित्वांत असलेल्या आमच्या मशिदी कोठेंहि असल्या आणि त्या मशिदींत केव्हांहि प्रार्थना चालत असल्या तरी त्यांचा उपसर्ग भोंवतालच्या लोकसमूहाच्या जीवनाला लवमात्रहि पोंचणार नाहीं अशी जाहीर व कायदेशीर हमी मुसलमानांनीं दिली पाहिजे.

घडलेल्या वृत्ति-पालटाचें आणखी एक गमक म्हणून मुसलमानांनीं Caste Disabilities Removal Act सारखे कायदे रद्द करून टाकण्याला संमति दिली पाहिजे. या निमित्तानें मुसलमानांना धर्मांतराची सर्वच बाब डोळसपणानें आणि प्रांजलपणानें हातीं घ्यावी लागेल. एकादा प्रौढ मनुष्य जाणून बुजून, उघडया डोळ्यांनीं ख्रिस्ती अगर मुसलमान झाला तर, हिंदुसमाज त्याची कींव करील; पण तो समाज प्रायः त्याच्या आड येणार नाहीं. इतकें विचारस्वातंत्र्य हिंदु समाजाच्या अंगवळणीं पडलेलें आहे. पण,

सध्यां जीं नेणत्या माणसांचीं धर्मांतरें होतात अगर सक्तीनें धर्मांतरें केलीं जातात तीं मात्र हिंदुसमाज यापुढें सहन करणार नाहीं.

धर्मांतर ही बाब अलीकडच्या कांहीं लग्नपद्धतींप्रमाणें नोंदली जावी आणि धर्मांतर करणाऱ्या इसमाला वंशपरंपरेनें मिळणाऱ्या मिळकतीवर तरी हक्क सांगतां येऊं नये, अशी हिंदुसमाजाची या बाबतींतली किमान अपेक्षा आहे. या अपेक्षेंत अन्याय्य अगर अप्रामाणिक असें कांहींच नसल्यामुळें, मुसलमान,

ख्रिस्ती वगैरे सर्व अहिंदु समाजांनीं हिंदुसमाजाच्या या मागणीला पाठिंबा दिलाच पाहिजे. मुसलमानसमाज हा पाठिंबा न देईल तर, हिंदुसमाज त्याच्या हृदयपालटावर विश्वास ठेवणार नाहीं.

हृदयपालट झाल्याचीं कांहीं दृश्य गमकें म्हणून मुसलमान समाजानें या गोष्टी केल्या तरीहि, एक मुद्दा शिल्लक उरणारच.

> स्वामी श्रद्धानंदजींसारख्या सर्वमान्य हिंदूंची हत्या घडलेली आहे ही गोष्ट हिंदुसमाज कालत्रयींहि विसरणार नाहीं !

गुरु सांदीपनीच्या संतोषासाठीं श्रीकृष्णानें सांदीपनीचा मेलेला मुलगा पुनः जिवंत करून आणला. हिंदुसमाजाच्या संतोषासाठीं मुसलमानांनीं श्रद्धानंदजींसारख्या विभूतींना फिरून जिवंत करून आणावें असाहि हट्ट हिंदु समाजानें धरला तर तो गैर ठरणार नाहीं. पण जी गोष्ट व्यवहारानें शक्य नाहीं तिचा भलताच आग्रह हिंदुसमाजानें धरूं नये, असा सल्ला हिंदुसमाजाला देतां येईल; पण,

> श्रद्धानंदजींच्या स्वर्गस्थ आत्म्याला संतोषप्रद अशी एकादी ठसठशीत गोष्ट मुसलमानांनीं केली पाहिजे हा आग्रह मात्र हिंदुसमाजाला अवश्य धरतां येईल आणि तो त्यानें न चुकतां धरावाहि.

अशी ठसठशीत गोष्ट कोणती या प्रश्नाचें उत्तर अनेकांकडून अनेक तऱ्हांनीं दिलें जाण्याचा संभव आहे. पुष्कळांना मान्य होण्यासारखें एखादें उत्तर सुचवून ठेवणें एवढेंच तूर्त शक्य आहे. सर्व ठिकाणच्या लहानथोर हिंदूंना अत्यंत पवित्र असलेलें काशी क्षेत्रांतलें श्रीविश्वनाथाचें प्राचीन मंदिर आज मशीद या स्वरूपांत उभें असून, त्यामुळें लक्षावधि हिंदूंच्या भावना दररोज दुखावल्या जात आहेत.

> या मशिदीच्या जागीं मुसलमान समाजाच्या खर्चानें श्रीविश्वनाथाचें मंदिर पूर्ववत् उभें करण्याला मुसलमान समाज तयार होईल तर हिंदुसमाजाचें उदार मन निश्चित असें समजेल कीं, मुसलमानांच्या वृत्तींत घडून आलेला पालट टिकाऊ आहे.

हें मंदिर फिरून प्रतिष्ठेनें उभें करणें पूर्वीच्या हिंदुसत्ताधाऱ्यांना साधलें नसतें,

असें नाहीं. सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे यांनीं दिल्लीचें तख्त फोडून मुसलमानी इभ्रतीला घणांच्या घावांचा प्रसाद दिला तसाच प्रकार या ठिकाणींहि करण्याची बुद्धि मल्हारराव होळकरांना सुचली होती. मुसलमानांच्या भावना निष्कारण दुखविल्या जाऊं नयेत अशी वृत्ति भोंवतालच्य हिंदुसमाजानें धारण केल्यामुळेंच तो प्रकार घडून आला नाहीं. मुसलमानांच्या धार्मिक भावनांचा हिंदुसमाजानें आजवर यथेच्छ मान ठेविला आहे.

> मुसलमानसमाज हिंदूंच्या धार्मिक भावना मानण्याला कितीसा राजी आहे याची परीक्षा ठरण्याची वेळ आज आलेली आहे. मुसलमानसमाज काशी क्षेत्रांतील श्रीविश्वनाथाचें हें पुरातन मंदिर पूर्वीच्या वैभवांत नांदतें करून देईल तर जगाला व हिंदुसमाजाला असें सहज पटेल कीं, आपल्या धार्मिक भावनांना जिवापाड जपणारा मुसलमानसमाज हिंदूंच्या धार्मिक भावनाहि तितक्याच आस्थेनें मानण्याला तयार आहे.

मुसलमानसमाज ही गोष्ट करील तर भूतलावर स्वर्गच अवतरला कीं काय, असें हिंदुसमाजाला वाटूं लागेल. पं० मालवीयजींसारखे श्रीविश्वनाथाचे भक्त तर मुसलमानांच्या या ठसटशीत कृतीमुळें गहिंवरून येतीलच; पण, या कृतीचा परिणाम एवढ्याच मर्यादेंत अडून राहील, असें नाहीं. काशीक्षेत्र व तेथील श्रीविश्वनाथाचें मंदिर हें नेपाळपासून रामेश्वरपर्यंतच्या आणि द्वारकेपासून दार्जिलिंगपर्यंतच्या गरीब, श्रीमंत, ज्ञानी, अज्ञानी, नव्या, जुन्या अशा सर्व हिंदूंच्या अभिमानाचें स्थान आहे. त्याच्या पुनर्प्रतिष्ठेसाठीं मुसलमानसमाज आपला आग्रह क्षणमात्र दूर टेवील तर, एकंदर हिंदुजगांत मुसलमानांच्या या नव्या वृत्तीबद्दल पूर्ण विश्वास उत्पन्न होईल. अशा परस्परविश्वासाच्या पायावर हिंदु-मुसलमानांचें जें ऐक्य निर्माण होईल तेंच ऐक्य चिरकाल टिकेल व तेंच ऐक्य सगळ्या हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याला व टिकविण्याला उपकारक ठरेल.

मुसलमानांच्या अगर इतर कोणाहि अहिंदूच्या धर्मभावना डिवचाव्या असें हिंदुसमाजानें आजवर कधीं मनांत आणलें नाहीं, आजहि तो विचार हिंदुसमाजाच्या मनांत येत नाहीं आणि पुढेंहि तसला विचार हिंदुसमाजाच्या मनांत नांदेल असें म्हणवत नाहीं; पण,

आपल्या औदार्याचा जगांत दुरुपयोग होतो, आपल्या सात्त्विकपणाचा इतरांच्या तामसीपणामुळें चेंदामेंदा होतो आणि आपला चांगुलपणा शेवटीं आपल्याच हिताला बाधक ठरतो या गोष्टी जगाच्या व्यवहाराकडे डोळसपणानें पाहणाऱ्या हिंदु-समाजाला आतां पक्केपणीं कळलेल्या आहेत.

मुसलमानांशीं तडजोडीचें बोलणें करणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या हितावर पाणी सोडण्याला प्रवृत्त होण्यासारखें आहे हें शहाणपण, भारी किंमत देऊन, हिंदुसमाज आतां शिकला आहे. मुसलमानांशीं होणारा कोणताहि राजकीय व्यवहार देवाण-घेवाणीच्या स्वरूपाचा असूं शकत नाहीं, अशा व्यवहारांत आपल्याला सारीच देवाण करावी लागते, घेवाणीचा संबंधच उरत नाहीं हा रोकडा अनुभव हिंदुसमाजानें आतां आपल्या संग्रहीं बाळगला आहे. आणि म्हणून, यापुढील काळांत हिंदुसमाज मुसलमानांशीं कसलेंहि तडजोडीचें, सलोख्याचें, खेळीमेळीचें अगर देवाणघेवाणीचें बोलणेंच करण्याला तयार नाहीं ! इंग्रजांपासून मिळेल तो फायदा मिळवावा, हिंदूंच्या अधीर-पणाचा फायदा घेऊन शक्य तें जातिहित साधावें अशा वृत्तीनें वागून मुसल-मानांनीं आपली किती नागवण केली आहे हें हिंदुसमाज सहजासहजीं विसरेल, हें शक्य दिसत नाहीं.

तडजोडीची उत्सुकता आजवर हिंदुसमाज दाखवीत आला आहे. यापुढें ती उत्सुकता मुसलमानांच्या बाजूनें दाखविली गेली पाहिजे. भांडण होण्याला जसे दोन पक्ष लागतात तसे ऐक्य-साधनालाहि दोन पक्ष अवश्य असतात.

आजवरचीं बहुतेक सारीं ऐक्याचीं बोलणीं एकपक्षीय होतीं; आणि, म्हणूनच तीं अस्वाभाविकहि होतीं. आजवरचा हा अस्वाभाविकपणा व एकपक्षीयपणा फटक्यासरशीं निघून जाण्याचा एकच एक मार्ग शिल्लक राहिलेला आहे. मुसलमानांचा हृदयपालट होणें आणि त्या हृदयपालटाचीं मूर्तिमंत लक्षणें म्हणून वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी त्या समाजानें करणें, हाच तो एकमेव मार्ग होय.

डॉ० आंबेडकर यांनीं पाकिस्तानवरील आपल्या ग्रंथाच्या उपसंहारा-त्मक भागांत वादी-प्रतिवादींमधील दाव्यांत मुद्दे काढण्यांत येतात तसे

पांच मुद्दे काढले आहेत. त्या मुद्यांपैकीं कांहीं मुद्यांचा परामर्श येथें घेणें श्रेयस्कर ठरणार आहे. हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला हिंदुमुसलमान ऐक्य अवश्य आहे काय, असा डॉ० आंबेडकरांचा पहिला प्रश्न आहे. त्याचें स्पष्ट उत्तर नकारार्थी आहे हिंदुमुसलमानांच्यामध्यें द्विराष्ट्रवादाची अभिनव कल्पना नांदत असूनहि, हें ऐक्य अवश्य असेल तर, तें साधूं शकेल काय? हा पहिल्या मुद्यांतला पोटमुद्दा म्हणून त्यांनीं मांडला आहे. मुख्य मुद्याचें नकारार्थी उत्तर दिल्यामुळें, या पोटमुद्याचें उत्तर देण्याचें वस्तुत: कारणहि नाहीं. पण, ओघानें एवढें म्हणण्याला हरकत नाहीं कीं, द्विराष्ट्रवादांत अंतर्भूत असलेला मुसलमानांच्या स्वतंत्र राष्ट्राचा वाद हा शुद्ध वितंडवाद आहे आणि त्याला काडीचाहि ऐतिहासिक आधार नाहीं.

हिंदु-मुसलमान ऐक्य शक्य असेल तर तें देवाण-घेवाण पद्धतीच्या मार्गानें व्हावें कीं आराधनेच्या (Appeasement) पद्धतीनें व्हावें असा डॉ० आंबेडकरांचा दुसरा प्रश्न आहे. हिंदुमुसलमानांचें ऐक्य अवश्य नसलें तरी, तें शक्य कोटींतलें आहे. मुसलमानांची परंपरासिद्ध वृत्ति आहे तशीच राहिली तर हिंदूंनीं त्यांच्याशीं केलेली देवाण–घेवाणीच्या स्वरूपाची तडजोड देखील आराधनेसारखी किंवा शरणागतीसारखी ठरणार आहे. सबब, अशी तडजोड इष्टहि नाहीं आणि शक्यहि नाहीं.

> ज्यांच्यामध्यें तडजोड घडावयाची त्या दोघाहि पक्षांमध्यें समंजसपणा असावा लागतो. आजवर समंजसपणाचा सर्व मक्ता हिंदूंनीं घेतला होता आणि त्यामुळेंच मुसलमान समाजांतील असमंजसपणा वाढत गेला.

हिंदुसमाज सामूहिक दृष्टीनें असहिष्णु बनेल ही भीति जशी निराधार आहे तद्वतच तो समाज असमंजस बनेल ही भीतीहि निराधारच आहे. समंजसपणाच्या वृत्तीची वाढ मुसलमानांच्या ठिकाणीं झाली पाहिजे. समंजसपणाचें बीजारोपण आपण आपल्या मनोभूमींत करीत आहों हें हिंदुसमाजाला पटवून देण्याची जबाबदारी मुसलमान समाजावर ओघानेंच येऊन पडत आहे. आपला हृदयपालट झाला असल्याची खात्री हिंदुसमाजाला पटावी म्हणून, मुसलमानसमाजाकडून यापूर्वीं सूचित केलेला वर्तनक्रम आचरिला जाण्याची अत्यंत जरुरी आहे. परिस्थिति अशा प्रकारची असल्यामुळें, हिंदूंनीं मुसल-

मानांना नव्या सवलती देण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. डॉ० आंबेडकरांचा तिसरा प्रश्न अशा रीतीनें आपोआपच निकालांत निघतो. पाकिस्तान कबूल करावयाचें कीं सत्ताविभागणींत मुसलमानांना ५० टक्के जागा देऊन त्यांना संतुष्ट राखावयाचें, असे दोनच प्रश्न हिंदुसमाजापुढें आ वासून उभे आहेत आणि त्यांतल्या कोणत्या तरी एकाचा स्वीकार करण्याशिवाय हिंदु-समाजाला गत्यंतर नाहीं, अशी डॉ० आंबेडकरांच्या चौथ्या मुद्यांतील गर्भित सूचना आहे. ही सूचनाच बरोबर नाहीं. हिंदुसमाज या दोहोंपैकीं कोणत्याच गोष्टीला मान्यता देणार नाहीं.

> हिंदु समाजाच्या जबरदस्त विरोधाला अव्हेरून इंग्रज सरकार मुसलमानांना यांतलें कांहींहि देऊं लागेल तर, संघटनेनें सबल झालेला हिंदुसमाज 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायानें, स्वतःचा स्वाभिमान सिद्ध करण्यासाठीं, काय करावयाचें तें अवश्यमेव ठरवील !


बर्वे टेलरिंग फर्मनें

गेल्या १२ वर्षांत उत्तम तऱ्हेनें केलेली

पुणंकरांची सोय

उत्तम, मोहक
उत्कृष्ट, सुंदर } टेलरिंग

निरनिराळ्या डिझाइनचा, वुलन, कॉटन, रेशमी वगैरे सर्व प्रकारचा कापड माल मिळण्याचें विश्वसनीय ठिकाण

उत्तम क्लॉथ स्टोअर्स

प्रो. के. एल्. बर्वे, अप्पा बळवंत चौक, पुणें २.

# प्रकरण १२ वें

# काँग्रेसच्या राजकारणाची इतिश्री

**बंगालचे** दिवंगत देशभक्त बाबू बिपिनचंद्र पाल यांनीं आपल्या The Soul of India या पुस्तकांत एका साधूची एक गमतीदार गोष्ट सांगितली आहे. हा साधु कलकत्त्यानजीक कालिघाट येथें राहात असे. राहण्याच्या जागेनजीक त्यानें बागबगीचा केला होता व त्यांत त्यानें फुलझाडें व फळझाडें लाविलीं होतीं. एके दिवशीं एक बैल त्या बागेंत शिरला. त्याबरोबर बैलाला हांकलण्याच्या बुद्धीनें साधुमहाराज धांवत सुटले. ते बैलाजवळ आले; पण, तो बैल ज्या समाधानानें बागेंतील वस्तूंचा फन्ना उडवीत होता तें समाधान पाहून ते साधुमहाराज निःशब्द व निश्चल अशा स्थितींत उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रूंचा प्रवाह सुरू झाला. बागेंतील झाडांचीं कोंवळीं पानें व कोंब नाहींसे होत आहेत हें त्यांना दिसत होतें व त्या झाडांच्या दुःखानें साधुमहाराजांचें मन दुःखित होत होतें. पण, या दुःखाबरोबरच त्यांच्या मनांत दुसराहि एक विचार उद्भवला होता. या बैलाच्या समाधानाचा भंग मी कसा करूं, अशा विचारानें ते गोंधळांत पडले होते. शेवटीं त्यांचें मन अस्वस्थ झालें आणि जगांत अशीं द्वंद्वें निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या हेतूंचें ते चिंतन करूं लागले !

वरील गोष्टींतील साधु आणि काँग्रेसचीं सूत्रें हातीं घट्ट धरून ठेवणारे गांधीजी यांच्यामध्यें पुष्कळ साम्य आहे. त्यांना हिंदूंच्या हलाखीबद्दल आणि हालांबद्दल अजिबात कांहीं वाटतच नसेल, असें म्हणणें कठिण आहे. पण, हिंदूंच्या हालांबद्दल आपण कांहीं म्हटलें तर मुसलमानांचें समाधान भग्न केल्याचा दोष आपल्याला लागेल अशी भीति त्यांना वाटत असली पाहिजे. गेलीं वीस वर्षें गांधीजी हिंदुस्थानांतील सर्व लोकांना अहिंसेची शिकवण देत आलेले आहेत. ही शिकवण मुसलमानांना मानवण्यासारखी नव्हती; आणि आजच्या मुसलमानसमाजाच्या वर्तनाचें व प्रवृत्तीचें निरीक्षण केलें तर, असें स्पष्ट दिसतें कीं, यापुढें तर तो समाज अहिंसावादाच्या

थाऱ्यालाहि उभा राहणार नाहीं. हिंदुसमाजानें गांधीजींवर श्रद्धा ठेविली व त्या समाजाला गांधीजींच्या म्हणण्याचा जो अर्थ कळला त्याप्रमाणें त्यानें हें अहिंसातत्त्व आचरणांतहि आणलें. पण, हिंदूंनीं जें कांहीं केलें तें गांधीजींच्या मनाला रुचलें नसावें, असें दिसतें. गेल्या एप्रिल-मे महिन्यांत डाक्का, अहमदाबाद इ० शहरांत जे भीषण दंगे झाले त्यांच्याबद्दलचें आपलें म्हणणें ता. ४ मे १९४१ रोजीं काढिलेल्या पत्रकाच्या द्वारा गांधीजींनीं लोकांपुढें मांडलें होतें. या पत्रकांतील पुढील भाग विचारार्ह आहे :

From accounts received, it seems that Muslim fanatics in Dacca and Ahmedabad did their worst in inflicting damage on Hindu property by looting and burning with a deliberation that showed pre-meditation. Hindus, instead of boldly standing up and facing the mischief-makers fled in their thousands from the danger-zone; and, where they did not, they were as barbarous as the assailants. These were all untouched by the Congress non-violence; and yet, these are the men who form the bulk of the Congress meetings. If the Congress has no control over the masses on such occasions, there is not much value in Congress non-violence, as a positive force.

(हातीं आलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, डाक्का व अहमदाबाद येथील मुसलमान माथेफिरूंनीं हिंदूंची मालमत्ता लुटून व जाळून तिचा नाश करण्याची परमावधि केली. या करण्यांत जो पद्धतशीरपणा दिसला त्यावरून त्याच्यामागें पूर्वसंकल्प असला पाहिजे, असें दिसतें. या माथेफिरूंना धैर्यानें तोंड देण्याऐवजीं व त्यांच्या नजरेला नजर भिडविण्याऐवजीं हजारों हिंदु संकटग्रस्त भागांतून पळून गेले. ज्यांनीं असें केलें नाहीं त्यांनीं हल्ला करणाऱ्या माथेफिरूंइतकाच रानटीपणा दाखविला; काँग्रेसच्या अहिंसातत्त्वाचा यापैकीं कोणालाच संपर्क झाला नव्हता. आणि मौज अशी कीं, काँग्रेसच्या सभांना गर्दी असते ती अशाच लोकांची! अशा प्रसंगीं लोकसमूहावर काँग्रेसची हुकमत चालत नसेल तर, काँग्रेसच्या अहिंसेला एक विधायक शक्ति म्हणून फारशी किंमत नाहीं, असें म्हणावें लागेल.)

काँग्रेसच्या सभांना हजर राहणाऱ्या हजारों लोकांनीं अहिंसातत्त्वाचा

गांधीप्रणीत अर्थ मान्य केला पाहिजे, काँग्रेसला मतें देणाऱ्या लक्षावधि मतदारांनीं गांधीप्रणीत अहिंसावाद स्वीकारून त्याचें आचरण दंग्याधोप्याच्या प्रसंगीं केलें पाहिजे वगैरे अपेक्षा मनुष्यस्वभावाला धरूनच नसल्यामुळें, त्या फसल्या यांत कांहींच आश्चर्य नाहीं! काँग्रेसचे सत्याग्रही म्हणून गांधीजींच्या मान्यतेचा शिक्का मिळालेल्या लोकांनीं तुरुंगांत मांसाहार करावा हेंहि मनुष्यस्वभावाला धरून आहे; पण, तें गांधीजींच्या अहिंसामीमांसेशीं विसंगत आहे! अहिंसेचा कांहीं तरी एकांतिक अर्थ लावून त्याचा उपदेश सामूहिक पद्धतीनें केल्यानंतर, पदरीं पश्चात्ताप पडला तर त्यांत नवल मुळींच नाहीं! कै० कविश्रेष्ठ टागोर यांनीं लिहिलेलें वाक्यच या प्रकरणीं खरें मार्गदर्शन करूं शकतें! In the harmony of two contradictory forces, everything rests (परस्परविरोधीं अशा दोन शक्तींच्या समन्वयावरच प्रत्येक गोष्ट उभारलेली आहे), हा नियमच हिंसा-अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला लागू पडतो व समाजांची व राष्ट्रांची ऐहिक प्रगति तरी या दोन शक्तींच्या समन्वयावरच अवलंबून आहे!

काँग्रेस ही संस्था अहिंसाव्रतावर श्रद्धा ठेवूनच चालली पाहिजे असा गांधीजींचा आग्रह आहे, हेंहि त्यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेल्या कांहीं वक्तव्यांच्या आधारें सिद्ध करतां येईल. वर ज्या पत्रकाचा उल्लेख केला त्यानंतर लौकरच गांधीजींचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत ते लिहितात:

I prophesy that, without *pervasive non-violence of the brave*, when the question of real transfer of power comes, it would not be the Congress which will have the privilege and the responsibility of delivering the goods. *The power will descend to those who are able to make effective use of violence.*

(**शूरांना साध्य होणारी अंतर्बाह्य अहिंसानिष्ठा** काँग्रेसमध्यें नसेल तर, खरी सत्ता मिळण्याची वेळ येईल तेव्हां, सत्तारूढ होण्याचा मान व त्या मानाबरोबर येणारी जबाबदारी या गोष्टी काँग्रेसला साध्य होणार नाहींत, असें भविष्य मी वर्तवून ठेवितों. **ज्यांना हिंसेचा उपयोग प्रभावशालीपणानें करतां येईल, त्यांच्या हातीं ती सत्ता पडेल.**)

सत्ता सुटणार आहे इंग्रजांच्या हातून व ती कोणाच्या हातीं पडणार, असा आहे प्रश्न ! ब्रह्मज्ञानानें अंतर्बाह्य विनटलेल्या ज्ञानिश्रेष्ठांप्रमाणें, अहिंसा-व्रतावरील श्रद्धेनें अंतर्बाह्य विनटलेल्या लोकांनीं काँग्रेस गजबजून जाईल, श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें या लोकांच्या अहिंसाविषयक श्रद्धेचा परिमळ, केळींत तयार होऊन राहिलेल्या कापुराच्या परिमळाप्रमाणें, आपोआप चौफेर पसरूं लागेल, अगर या लोकांच्या अहिंसेवरील प्रेमाचें तेज तावदानांत ठेवलेल्या दिव्याच्या प्रकाशाप्रमाणें आपोआप बाहेर ओसंडूं लागेल तर आणि तेव्हांच इंग्रजांच्या हातून सुटणारी सत्ता काँग्रेसच्या हातीं पडूं शकेल व काँग्रेसला त्या सत्तेचा वापर जबाबदारीनें करतां येईल, असा गांधीजींच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

सध्यांच्या काँग्रेसच्या बाबतींत गांधीजींना ही शक्यता दिसत नाहीं हेंहि गांधीजींच्याच उद्गारांवरून स्पष्ट दिसत आहे. गांधीजी म्हणतात :

I do not mind Congressmen changing their creed, in spite of many leaders being in jail or openly leaving the Congress. *I can see my way to rebuilding the Congress with fine true men with whom there is neither Hindu nor Muslim nor any other.*

(पुष्कळ काँग्रेस पुढारी तुरुंगांत असले तरीहि काँग्रेसजनांनीं खुशाल आपलें क्रीड (श्रद्धा) बदलावें अगर उघडपणें काँग्रेसमधून निघून जावें ! ज्यांच्या मनांत हिंदु, मुसलमान वगैरे विचार येत नाहींत अशा उमद्या, खणखणीत माणसांचा मेळावा मिळवून मला काँग्रेसची घडी फिरून बसवितां येईल, हें मला स्पष्टपणें दिसत आहे.)

सध्यां काँग्रेसमध्यें असलेलीं पुष्कळशीं प्रमुख माणसें अहिंसा-पालनाच्या बाबतींत खणखणीत नाहींत असें गांधीजींचें स्पष्ट मत आहे व या लोकांनीं काँग्रेसमधून निघून जावें अशी नोटीसच गांधीजींनीं त्यांना दिली आहे ! या लोकांची अडगळ काँग्रेसच्या बाहेर गेली म्हणजे आपल्या पसंतीचे शेलके 'अहिंसा-ऋषि' मिळवून, काँग्रेसची पुनर्घटना करण्याचा प्रयोग गांधीजी करणार आहेत, हेंहि वरील उताऱ्यावरून उघड दिसत आहे.

मुंबईचे श्री० कन्हय्यालालजी मुनशी हे काँग्रेसमधून बाहेर पडले व गांधीजींनीं

त्यांना आशीर्वादपूर्वक बाहेर जाऊं दिलें या घटनेमागें मनाचे किती गुप्त पडदे असतील, याची कल्पना आतां सहज होऊं शकेल! सध्यां काँग्रेसमध्यें असलेले पुष्कळसे थोर हिंदु गांधींना हवे असलेले 'अहिंसा-ऋषि' नाहींत हें उघड आहे. ते मुनशींचें अनुकरण करतात, गांधीतत्त्वज्ञानाचें उच्चाटन करून काँग्रेस आपल्या हातीं घेतात कीं, फिरून गांधींना शरण जाऊन आत्मप्रतारणा व हिंदुराष्ट्रप्रतारणा करतात, हें लौकरच दिसेल!

ज्या नमुनेदार अहिंसानिष्ठ संघटनेच्या हातीं इंग्रजांनीं सोडलेली सत्ता पडावी असें गांधीजींना वाटतें तशी संघटना म्हणजे सध्यांची काँग्रेस नव्हे, हें गांधीजींच्याच शब्दांतून सूचित होत आहे. नवे 'अहिंसा-ऋषि' मिळवून गांधीजी काँग्रेसला नमुनेदार रूप आणतील त्याला अद्याप अवधि आहे! त्या अवधींत सत्तासंक्रमण होण्याचा समय प्राप्त झाला तर ती सत्ता कोणाच्या हातीं जाईल याबद्दलचा गांधीजींचा खुलासा मोठा सूचक आहे :

The power will descend to those who are able to make effective use of *viol nce.* (ज्यांना हिंसाधर्माचा उपयोग प्रभावीपणानें करतां येईल त्यांच्या हातीं ही सत्ता पडेल) असा इषाराच गांधीजींनीं दिला आहे, असें म्हणावयाला हरकत नाहीं! हिंसाधर्माचा उपयोग प्रभावीपणानें करून, इंग्रजांच्या हातून सुटणारी सत्ता काबीज करण्याची संधि कोण साधील हें गांधीजींनीं या लेखांत सांगितलेलें नाहीं, हें खरें; पण, या प्रश्नाचें उत्तर गांधीजींनीं कधींच दिलेलें नाहीं, असा मात्र त्याचा अर्थ नव्हे. १९४०च्या ऑक्टोबर महिन्यांत 'हैदराबाद' या शीर्षकाखालीं लिहिलेला गांधीजींचा एक लेख 'हरिजन' मध्यें प्रसिद्ध झालेला होता.

त्या लेखाचें सार असें होतें कीं,चालू लढाईंत बिकट परिस्थिति उत्पन्न झाली व प्रचलित राजसत्ता दुबळी बनल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं तर, निजामचें लष्करी सामर्थ्य व सरहद्दीवरच्या पठाणांच्या टोळ्या यांचें संगनमत होऊन भारतांतली राजसत्ता निजामाच्या हातीं जाईल! निजामाची राजसत्ता ही देशी राजसत्ता असल्यामुळें, त्या सत्तेला 'होमरूल' असें नांव देण्याची गांधीजींची तयारी आहे, हा भाग निराळा!

> गांधीजींच्या या सर्व लिहिण्याचा सूचितार्थ असा आहे कीं, त्यांच्या मतें सध्यांच्या परिस्थितींत तरी, सध्यांच्या काँग्रेसच्या राजकारणाची इतिश्रीच झालेली आहे !

**नवे** अहिंसामुनी मिळवून गांधी नवी सृष्टि कशी काय निर्माण करणार हा **प्रश्न** आजचा नसून, असलाच तर तो उद्यांचा प्रश्न आहे ! जे 'अहिंसा-मुनी' **मिळवून** गांधीजी नव्या तऱ्हेनें काँग्रेसची घडी बसविणार ते मुनिश्रेष्ठ **काय** रंगारूपाचे असतील याचीहि कल्पना गांधीजींनीं देऊन ठेविली आहे.

> या मुनिश्रेष्ठांचीं मनें हिंदु-मुसलमान-ख्रिस्ती-पारशी अशा पार्थिव विचारापासून सर्वस्वीं अलिप्त असलीं पाहिजेत ! इतकें पराकोटीचें रंगरूपराहित्य प्रथम दिसणार नाहीं मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या ठिकाणीं ! काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून अधिकृत भाषण करतांना ज्या मौलानांना मुस्लीमधर्म व मुस्लीम संस्कृति यांचा अभिमान विसरणें शक्य झालें नाहीं त्या मौलानांना या मुनिश्रेष्ठांच्या मालिकेंत स्थान कसें मिळेल !

**सरदार** पटेल, श्री० राजगोपालाचारियर, श्री० सत्यमूर्ति, श्री० **भुलाभाई देसाई**, इत्यादींनाहि या संघटनेंत स्थान मिळेल, असें दिसत नाहीं ! **मात्र**, **ही** नवी सृष्टि प्रामाणिकपणाच्या पायावर उभारली गेली पाहिजे !

गांधीजींच्या अहिंसाप्रेमामुळें काँग्रेसच्या राजकारणाची इतिश्री झाल्या**सारखी** दिसते. त्या प्रमाणेंच, काँग्रेसच्या मुसलमान–विषयक धोरणामुळेंहि **ती संस्था** राजकारण करण्याला असमर्थ झाल्यासारखी दिसते. हिंदुस्थानांतील जातिजातींत असलेल्या भेदांचें महत्त्व अवास्तव फुगवून सांगण्याचें व्रत ब्रिटिश राज्यकर्ते चालवीत होते तें त्यांच्या स्वार्थी दृष्टीनें ठीकच होतें. **पण**, **याच** व्रताची नक्कल करून काँग्रेसचे नेते गांधीजी हेहि १९२० सालापासून असें म्हणूं लागले कीं, हिंदु-मुसलमान ऐक्याशिवाय स्वराज्यप्राप्ति अशक्य आहे ! स्वराज्याच्या लढ्यांत मुसलमान स्वातंत्र्यप्रेमामुळें सामील झाले तर त्यांचें सहकार्य सर्वांना हवेंच आहे.

> हिंदुमहासभेचे अध्यक्ष बॅ० सावरकर " याल तर तुमच्यासह " असें म्हणतात त्याचाहि अर्थ हाच कीं, स्वराज्यप्राप्तीच्या लढ्यांत मुसलमान बिनतक्रार, बिनबोभाट व बिनशर्त सामील होतील

> तर ती गोष्ट इष्टच आहे. पण, ही इष्टता मान्य करणें वेगळें आणि स्वराज्यप्राप्ति जातीय ऐक्याविना शक्य नाहीं असें वारं-वार, उघडउघड व ठाकूनठोकून म्हणणें वेगळें !

सध्यां इंग्रज मुत्सद्दी अधिकारदानाच्या बाबतींत कोलदांडा घालतांना हिंदुस्थानांतल्या मतभेदांचा बाऊ उभा करीत असतात आणि 'एकी दाखवा व स्वराज्य घ्या' असें म्हणत असतात. त्यांच्या या म्हणण्यांत आय०सी०एस० मधील गोरे लोक, युरोपियन व्यापारी वर्ग, संस्थानिक व मुसलमान अशा सर्वांचा अंतर्भाव होत असतो. मुसलमानांखेरीज इतरांच्या बाबतींतली कॉंग्रेसची जबाबदारी लक्षांत घेण्याचें येथें कारण नाहीं. पण, एवढें स्पष्ट म्हणणें प्राप्त आहे कीं, हिंदु–मुसलमान ऐक्याची महती नाहीं त्या मर्यादेपर्यंत पोंचविणाऱ्या कॉंग्रेसवर, तिच्याच शब्दांचा आधार घेऊन, ब्रिटिश राज्यकर्ते आज डाव उलटवीत आहेत !

हिंदु-मुसलमान प्रश्नाबाबतचें कॉंग्रेसचें सगळेंच धोरण १९२० सालापासून चुकत आलेलें आहे. खिलाफतीच्या प्रश्नामुळें असंतुष्ट झालेल्या मुसलमानांना 'नक्रः स्वस्थानमाश्रित्य गजेन्द्रमपि कर्षति' या न्यायानें न वागविण्यांत गांधीजींची कशी चूक झाली, हें मागें एका ठिकाणीं सांगण्यांत आलेलें आहे. मॉंटफर्ड सुधारणांमुळें मिळालेली अल्पस्वल्प सत्ता खंबीर माणसांच्या हातीं लागूं न देतां, ती सत्ता मेणचट, स्वार्थी अशा माणसांच्या हातीं लागूं देण्यांत कॉंग्रेसनें चूकच केली, असें म्हटलें पाहिजे. १९३६ सालीं कॉंग्रेसनें निवडणुकीचा जाहीरनामा काढला त्यांतील कांहीं भागांचें नीट अवलोकन केलें तर या चुकीची अप्रत्यक्ष कबुलीच तेथें देण्यांत आली आहे कीं काय असें भासूं लागतें ! एका अर्थानें पहातां, मॉंटफर्ड-सुधारणांतील सत्ता हातीं घेऊन तिचा वापर करीत असतांनाच ती विकसित करण्याची जबाबदारी कॉंग्रेसवर होती, असेंहि म्हणतां येईल. कारण, लखनौचा करार हा एका पक्षीं कॉंग्रेस व दुसऱ्या पक्षीं मुस्लीमलीग यांच्या दरम्यान झालेला होता. या दोन संस्थांनीं मिळालेली सत्ता सहकार्यानें व न्यायानें वापरावी आणि सत्ताविकासाचा पुढचा टप्पा लौकर गांठावा ही गोष्ट त्या करारांत अभिप्रेतहि होती. सत्ता वापरीत राहून, मध्यंतरींच्या काळांत घडलेल्या गोष्टी कॉंग्रेसनें घडवून आणल्या असत्या तर, हिंदुमुसलमान जमातींमधील

परस्पर संबध आजच्या इतके बहुधा चिघळलेहि नसते आणि राजपुत्राच्या आगमनप्रसंगीं देशभर पडलेल्या बहिष्कारासारख्या गोष्टींचा पुरा फायदा घेऊन, सत्ताविकासहि अधिक लवकर आणि अधिक निश्चितपणें साधतां आला असता. पण,

> त्या वेळीं काँग्रेसवर असलेली ही गर्भित जबाबदारी अंगाबाहेर टाकण्यांत आली; आणि, ज्या वेळीं ही जबाबदारी काँग्रेसनें उचलूं नये अशी परिस्थिति सरकारनें निर्माण केली त्यावेळीं काँग्रेसनें सदर जबाबदारी नेमकी स्वशिरावर घेतली!

१९३७ सालच्या निवडणुकीनंतर काँग्रेसचें सात प्रांतांत निर्विवाद बहुमत झालें. १९३७च्या जुलैमहिन्यांत काँग्रेसनें मंत्रिमंडळें बनविलीं. या मंत्रिमंडळांत मुसलमान मंत्र्यांचा समावेश करण्याचें धोरण काँग्रेसनें स्वीकारलें. तें अनेक दृष्टींनीं सदोष आहे. काँग्रेस ही सर्व जाती, सर्व धर्म इत्यादींचें हितसंगोपन करूं शकते ही काँग्रेसची बढाई या धोरणामुळें सार्थ ठरली नाहीं. कारण, टोपी बदलून काँग्रेसमध्यें घुसलेल्या मुसलमानांच्या डोक्यावर तिनें मंत्रिपणाचे मुकुट चढविले! मुसलमान मंत्रि मंत्रिमंडळांत घेण्याचा आग्रह प्रांतोप्रांतींच्या गव्हर्नरांनीं धरलाच असता तर, त्या गोष्टीचा मागाहून विचार करतां आला असता. गव्हर्नरांनीं बहुधा असा आग्रह धरला नसता. एका प्रांताच्या पंतप्रधानाचें त्या प्रांताच्या गव्हर्नराशीं मंत्रिमंडळ बनविण्याचे वेळीं या बाबतींत काय बोलणें झालें तें प्रसिद्ध होणें शक्य नव्हतें; पण, तें आतां सांगण्याला कांहींच हरकत नाहीं. 'मंत्रिमंडळांत मुसलमान घेण्याबाबत तुमचें काय ठरलें आहे' असा प्रश्न गव्हर्नरनें या पंतप्रधानाला विचारला. तेव्हां त्यानें ठसकेबाजपणानें असें उत्तर दिलें म्हणतात कीं,

> शतकानुशतकें मुसलमानांच्या शेजारीं आम्हीं राहात असल्यामुळें, मुसलमानांचें हितरक्षण कसें करावें हें आम्हीं चांगलें जाणतों. सहा हजार कोसांवरून येथें येऊन तुम्ही त्या बाबतींत आम्हांला कांहीं सांगण्याचें कारण नाहीं.

या उत्तरानंतर गव्हर्नरनें कांहीं कुरकुर केली नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

पुढें कॉँग्रेसनें मंत्रिमंडळांत मुसलमान मंत्रि घेण्याचें ठरविलें.

> हें ज्या दिवशीं ठरलें त्याच दिवशीं कॉँग्रेसनें कृतीनें असें कबूल केलें कीं, कॉँग्रेस कितीहि मोठी असली तरी, ती मुसलमानांची प्रतिनिधि नाहीं आणि मुसलमानांचें हितसंरक्षण करण्याचें स्वयंभू सामर्थ्यहि तिच्यांत नाहीं !

मुसलमान मंत्रि पैदा करण्याचें व पुरविण्याचें काम मौ०अबुल कलाम अझाद यांच्याकडे देण्यांत आलें. मंत्र्यांचें संशोधन करण्याची ही रीतच फार सदोष आहे. मुसलमान मंत्रि घ्यावयाचा तो कांहीं मुसलमान म्हणूनच घ्यावयाचा नव्हता ! मंत्रिमंडळांत महत्त्वाच्या अल्पसंख्याक वर्गांचे प्रतिनिधि समाविष्ट व्हावे असें गव्हर्नरांना मिळालेल्या आदेशपत्रांत ( Instrument of Instructions ) स्पष्टपणें सांगितलेलें असल्यामुळेंच, मुंबई, मद्रास प्रभृति प्रांतांतून अहिंदु मंत्र्यांना मंत्रिमंडळांत स्थान देणें अवश्य होतें. असें जर आहे तर, मौलाना अझाद यांच्या मर्जींतल्या मुसलमानांची वर्णी मंत्रिमंडळांत कां लावण्यांत आली ?

> प्रांतिक असेंब्लीमध्यें जे अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी होते त्यांच्यावर अशी जबाबदारी टाकतां येण्यासारखी होती कीं, त्या सर्वांनीं एकत्र बसून, सर्वांचे प्रतिनिधी म्हणून, दोन, तीन काय हवे ते मंत्री निवडून द्यावे !

असें झालें असतें तर, सर्व अल्पसंख्याकांना परस्परसहकार्यानें वागण्याचें शिक्षण तरी कॉँग्रेसला देतां आलें असतें. शिवाय, हे मंत्रि आमचे प्रतिनिधी नव्हत असें फणकाऱ्यानें म्हणण्याची अल्पसंख्याकांना सोयच उरली नसती ! मौलाना अझादनीं आपल्या मर्जींतले मुसलमान मंत्री मंत्रि-मंडळांत घुसविले आणि त्यामुळें They chose men from the gutter to represent our community (आमच्या समाजाचे प्रतिनिधी म्हणून या शिष्टांनीं दीडदमडीचीं माणसें निवडून काढलीं ! ) हे उद्गार काढण्याची संधि जीनांना लाभली !

कॉँग्रेसनें असें केलें असतें तर, कॉँग्रेस ही केवळ हिंदूंची संस्था ठरली असती असा आक्षेप वरील विचारसरणीवर घेतां येण्यासारखा आहे. पण, त्या

आक्षेपाला उत्तर देणें मुळींच अवघड नाहीं. कॉंग्रेसनें जें केलें त्याचा तरी अर्थ याहून वेगळा होतो कोठें? मुंबई प्रांतांत कॉंग्रेसनें बॅ० नूरी यांच्या खेरीज जे मंत्रि निवडले ते सर्वसामान्य मतदारसंघातर्फे कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेले लोक होते.

> स्वतंत्र म्हणून निवडून आलेल्या नूरींचा मंत्रिमंडळांत समावेश करावा लागला याचाच अर्थ असा कीं, सर्वसामान्य मतदारसंघाबाहेर कॉंग्रेसला मान्यता नव्हती.

मौलाना अझाद यांनीं निवडल्यामुळें आणि मुसलमान असल्याचा जन्मजात गुण अंगीं असल्यामुळें, आदल्या दिवशीं फॅज टोपी घालून आलेले नूरी दुसऱ्या दिवशीं मंत्रि झाले आणि मग गांधी टोपी वापरूं लागले! स्वतंत्रपणें निवडून आल्यावर, स्वेच्छेनें गांधी टोपी घालूं लागलेल्या अॅ० चक्रनारायण या ख्रिश्चन गृहस्थांना मंत्रिमंडळांत घेण्यांत आलें नाहीं व या अन्यायाचें शल्य मनाला टोंचत राहिल्यामुळें, अॅ० चक्रनारायण यांनीं पुढें असेंब्लींतील कॉंग्रेसपक्षाचा राजीनामा दिला, या गोष्टी सर्वश्रुत आहेत.

अशा रीतीनें मुस्लीम मंत्रि घेऊन, कॉंग्रेसनें आपला देशप्रतिनिधित्वावरचा हक्क गमावला व आपण फक्त सर्वसामान्य मतदारसंघांत समाविष्ट झालेल्या— म्हणजेच प्रायः हिं—लोकांचें प्रतिनिधित्व करूं शकतों ही गोष्ट कॉंग्रेसनें आपल्या वर्तनानें पदरांत घेतली. एकीकडे ही कृति करणारी कॉंग्रेस इतर सर्व बाबतींत आपला जुना हेका चालवीतच राहिली. हा हेका आजपर्यंत अव्याहतपणें चालूच आहे.

> हिंदु म्हणून हिंदूंचें कांहीं हितरक्षण होणें अवश्य असेल तर तें कार्य कॉंग्रेस करूं शकणार नाहीं; तें कार्य करण्याची ठेकेदारी आपण घेतली असल्याचें हिंदुमहासभा म्हणत असते, असे उद्गार गांधीजींनीं 'हरिजन' मध्यें महायुद्धाच्या सुरुवातीनंतरच्या एका लेखांत काढिले होते.

गेल्या मे महिन्यांत सप्रू-गांधी पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला व त्यामुळें १६-२-४१ रोजीं गांधीजींनीं सर तेजबहादुर सप्रू यांना लिहिलेलें एक पत्र लोकांपुढें

आलें. आपण हिंदुसमाजाच्या वतीनें जीनांना भेटण्यासाठीं कां जाऊं शकत नाहीं हें सप्रूंना सांगतांना गांधीजींनीं पुढील अर्थपूर्ण वाक्य लिहिलें आहे :

I do not represent the Hindu community. I am not even a member of the Hindu Mahasabha.

(मी हिंदु समाजा प्रतिनिधित्व करूं शकत नाहीं. मी हिंदुमहासभेचा साधा सभासदहि नाहीं.)

गांधीजींच्या या लिहिण्यावरून पुष्कळ प्रश्न सुचण्यासारखे आहेत. प्रायः हिंदु समाजातर्फे निवडून गेलेले व स्वत:च्या वर्तनानें फक्त हिंदूंचेच प्रतिनिधि ठरलेले कॉंग्रेस मंत्रिमंडळांतील हिंदु-मंत्रि हिंदु समाजाचें प्रतिनिधित्व करूं शकत नाहींत, अशी कबुलीच गांधीनीं या वाक्यांत दिलेली आहे. कारण, हे मंत्रि हिंदुमहासभेचे सभासद नव्हते; इतकेंच नव्हे तर, मंत्र्यांपैकीं एकाद्याला हिंदुमहासभेचें सभासदत्व स्वीकारावें असें वाटलें असतें तरी, तसें करणें त्याला शक्य नव्हतें ! कॉंग्रेसच्या नियमांनींच त्याचा हा मार्ग बंद झालेला होता. हिंदुसमाजाचें प्रतिनिधित्व करणारा मनुष्य हिंदुसभेचा सभासद तरी असला पाहिजे, ही गांधीजींची अपेक्षा मात्र त्यांच्या अकरणरूप विधानांतूनहि चोरूनमारून बाहेर डोकावत आहे !

> हिंदुसमाजाला आपल्या हितरक्षणासाठीं आपले प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असतील तर, त्यानें हिंदुमहासभेच्या सभासदांनाच निवडून द्यावें ही गांधीजींकडून अप्रत्यक्षपणें मिळालेली कबुली हिंदु मतदारांना यापुढें मार्गदर्शक ठरणारी आहे !

असेंब्लींतील अल्पसंख्याक प्रतिनिधींनीं निवडून दिलेले मंत्रि मंत्रिमंडळांत समाविष्ट केले तर, मंत्रिमंडळाच्या कामांत संयुक्त जबाबदारीचें तत्त्व शिल्लकच राहाणार नाहीं असा आक्षेप वरील विवेचनावर घेतला जाण्याचा संभव आहे. अन्नमलाई विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ० सी० आर० रेड्डी यांनीं लिहिलेल्या "Congress in Office" या पुस्तकांत या आक्षेपाचें उत्तर देण्यांत आलेलें आहे.

> जोंपर्यंत जातवारीचे स्वतंत्र मतदारसंघ आहेत तोंपर्यंत प्रातिनिधिक मंत्रिमंडळ व संयुक्त जबाबदारीचें तत्त्व यांचा पूर्णांशानें मेळ घालणें निसर्गतःच कठिण आहे.

कारण, सामुदायिक जबाबदारीचें तत्त्व पाळण्यासाठीं केवळ एकपक्षीय मंत्रिमंडळ बनविलें तर त्यांत स्वतंत्र मतदारसंघांतर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधींचा अंतर्भाव होईल असें नाहीं आणि तेवढ्या अर्थानें तें मंत्रिमंडळ प्रातिनिधिक ठरूं शकणार नाहीं.

> ज्या देशांत सर्व मतदारसंघ शुद्ध नागरिकत्वाच्या पायावर निर्माण केलेले आहेत आणि जेथें स्वतंत्र मतदारसंघ अजिबात अस्तित्वांत नाहींत तेथें एकपक्षीय व प्रातिनिधिक अशा दोन्ही प्रकारचें मंत्रिमंडळ नांदूं शकतें.

जातीय निर्णयानें स्वतंत्र मतदारसंघ चालू ठेविले; एवढेंच नव्हे तर, नवे स्वतंत्र मतदारसंघहि या निर्णयानें अस्तित्वांत आणिले. संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाला इतका मध चिकटला आहे असेंच जर काँग्रेसला वाटत होतें तर तिनें १९३६च्या निवडणुकींत उडी घेण्याचेंच कारण नव्हतें!

अशा सर्व दृष्टींनीं विचार केल्यास काँग्रेसची स्थिति 'इदंच नास्ति, परं न लभ्यते' अशी झाली.

> मंत्रिमंडळांनीं आपल्या कृतीनें स्वतःला हिंदु ठरवून घेतलें; आणि,हिंदूंच्या हिताचा प्रश्न आला म्हणजे मात्र त्यांनीं विश्वामित्र-मेनकेच्या चित्रांतल्या विश्वामित्राचा आव आणण्याला आरंभ केला!

आणि, काँग्रेसच्या वागण्यांत हा जो गोंधळ सुरू झाला तो अद्यापहि थांबलेला नाहीं. मध्यंतरीं बिहार प्रांतांत दंगे झाले त्या वेळीं डॉ० राजेन्द्रप्रसाद व बॅ० सावरकर यांच्या दरम्यान बरीच वादावादी झाली. या वादांत राजेन्द्र-बाबूंनीं मोकळ्या मनानें असें कबूल केलें कीं, काँग्रेस फक्त हिंदूंनाच उपदेश करते याचें कारण काँग्रेसला फक्त हिंदूच मानतात, मुसलमान तिला मुळींच मानीत नाहींत! काँग्रेसला मानल्याबद्दल हिंदूंना बक्षिस कोणतें मिळतें तर हिंदु म्हणून हिंदूंचें हितरक्षण करावयाचें असेल तर त्या प्रश्नाशीं काँग्रेसचा काडीचाहि संबंध नाहीं, असें बेमुर्वतखोरपणाचें उत्तर बेपर्वाईनें देण्यांत येतें! एवढ्यावरून देखील एक गोष्ट सिद्ध होईल. ती अशी कीं,

> हिंदूंना हिंदुहित-रक्षणाच्या दृष्टीनें राजकारणाकडे पहावयाचें असेल तर, कॉंग्रेसच्या राजकारणाची इतिश्री झालेली आहे, हें त्यांनीं पक्केपणीं ओळखलें पाहिजे.

जातिनिर्णयाचा प्रश्न उत्पन्न झाल्यावेळेपासून 'सब कु सोनामुखी' या पद्धतीनें कॉंग्रेसवाले एक शब्दप्रयोग वापरीत आलेले आहेत. तो शब्दप्रयोग म्हणजे Constituent Assembly अर्थात् 'घटनासमिति' हा होय. कॉंग्रेस जातिनिर्णयाचा निषेध कां करीत नाहीं या प्रश्नाचें 'अशुभस्य काल हरणम्' या न्यायानें उत्तर देतांना कॉंग्रेसवाले हटकून असें सांगत कीं, घटनासमिति बोलावून आम्हीं १९३५ चा सगळा कायदाच मोडून टाकण्याचा निश्चय केलेला असल्यामुळें, त्या कायद्यांत अंतर्भूत झालेल्या जातिनिर्णयाचाहि आम्हीं त्याच वेळीं भंग करणार आहों. या घटनासमितीच्या फुग्याचें स्वरूप चर्चेच्या रूपानें हळुहळू स्पष्ट होऊं लागलेलें आहे. घटनासमिति बोलवावयाची कोणी, तिच्या निर्णयांना मान्यता मिळवून देणारी सत्ता कोणती वगैरे प्रश्न अद्यापहि गुलदस्तांतच आहेत. पण, डॉ० राजेंद्रप्रसाद प्रभृति सरळ माणसें आतां असें चक्क सांगूं लागलीं आहेत कीं,

> घटनासमितींत निवडून येणारे मुसलमान प्रतिनिधि स्वतंत्र मुसलमान मतदार संघातर्फे निवडून येतील.

हे निवडून आलेले मुसलमान प्रतिनिधि घटनासमितीचे निर्णय बहुमताच्या तत्त्वावर मानतील, असेंहि नाहीं. मौ० अबुल कलाम अझाद यांनीं गेल्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून जें भाषण केलें त्यांत या मुद्याची स्पष्ट शब्दांत फोड केलेली आहे.

> मुसलमानांचें हितरक्षण कशानें होईल हें घटना समितींतील मुसलमान प्रतिनिधि केवळ आपल्या स्वतंत्र बहुमतानें ठरविणार आहेत; त्यांनीं जें ठरविलें असेल तें बरेंवाईट म्हणण्याचा अधिकार इतरांना नाहीं, हा मौलानांचा इषारा हिंदूंनीं हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखा आहे.

घटनासमिति भरली, तिचे प्रतिनिधि म्हणून आलेल्या मुसलमानांनीं मुसलमानांच्या हितरक्षणासाठीं कांहीं मागणी केली, आणि ती मागणी हिंदु-

समाजाच्या न्याय्य हितसंबंधांच्या दृष्टीनें स्वीकार्य नाहीं असें ठरलें तर, जगाच्या चावडीवर हिंदुस्थानांतल्या लोकांमधील बेबनावाचें नमुनेदार प्रदर्शन होणार; दुसरा तर कांहीं फायदा यांत दिसत नाहीं! मुसलमानांनीं आपल्या हितरक्षणासाठीं काय अवश्य आहे हें जर स्वतंत्र रीत्या ठरवावयाचें तर,

> मुसलमानांनीं मागितलेल्या गोष्टी देणें हिंदु समाजाला परवडेल कीं काय हें हिंदु प्रतिनिधींना हिंदु या नात्यानें स्वतंत्रपणें ठरविण्याचा अधिकार ओघानेंच मिळाला पाहिजे. हा अधिकार हिंदु म्हणून गाजवावयाचा असल्यामुळें, हिंदुसभेच्या सभासदां-खेरीज इतर कोणालाहि या प्रतिनिधित्वावर हक्क सांगण्याची शक्यता उरतां कामा नये.

असे अनेक भानगडीचे प्रश्न या घटनासमितीच्या कल्पनेच्या पोटांत दडून बसलेले आहेत. त्यांचीं उत्तरें मात्र डॉ॰राजेन्द्र प्रसाद, मौलाना अझाद प्रभृति कोणीच काँग्रेसधुरीण देऊं धजत नाहींत! मुसलमानांची मागणी किती अविवेकी असूं शकेल याची कल्पना कांहीं मुसलमान पुढाऱ्यांच्या पूर्वीच्या उद्‌गारांवरून करतां येण्यासारखी आहे. अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या हिंदूंची हिंदु व मुसलमान या दोन समाजांनीं निम्मेनिम वांटणी करून घ्यावी ही धिटाईची कल्पना कोकोनाडा काँग्रेसचे अध्यक्ष पैगंबरवासी मौलाना महंमदअल्ली यांनीं भरल्या तोंडीं मांडलीच होती कीं नाहीं? जिवंत माण-सांचा समाज–त्या समाजाची इच्छा असो वा नसो–वांटून घेण्याची कल्पना बोलण्याला ज्या समाजांतील थोरामोठ्यांना मनाची काडीमात्र खंत वाटत नाहीं त्या समाजांतील प्रतिनिधि देशाची वांटणी करण्याबद्दल आग्रह धरणार नाहींत, असें तरी कां मानावयाचें?

मुसलमान समाजांतील सध्यांचा एकंदर सूर पाहिला तर असेंच मानावें लागतें कीं, देशाचीं खांडोळीं करा आणि त्यांतलीं कांहीं खांडोळीं आमच्या स्वतंत्र हुकमतीखालीं द्या अशी मागणी करण्याला तो समाज मुळींच मागें-पुढें पहाणार नाहीं; आणि, अशी मागणी पुढें आली कीं गांधीजी म्हणणार:

> यादवी टाळावयाची असेल तर ही मागणी निमूटपणें मान्य केली पाहिजे.

गांधीजींच्या या म्हणण्यांत अहिंसाप्रेम असेल; पण त्यांना जी शूरांची अहिंसा अभिप्रेत आहे तिचा मात्र यांत कुठेंच मागमूस लागत नाहीं! आणि तो मागमूस अशा उद्गारांत लागावा तरी कसा? शूरांची अहिंसा समाजांत झळकूं लागावयाची असेल तर समाज प्रथम शूर बनला पाहिजे. शौर्यच नसेल तर शूरांची अहिंसाहि संभवत नाहीं. शंभर वेळां शौर्य गाजविणारा मनुष्य, तसा प्रसंग येईल तेव्हां, शूरांची अहिंसा आचरून दाखवील; पण,ज्यानें शौर्याचा एकहि प्रसंग पाहिला नाहीं अशा माणसाकडून अगर अशा समाजाकडून शूरांच्या अहिंसेचें आचरण व्हावें कसें? औरंगजेबाच्या अमानुष छळाची कल्पना दृष्टीपुढें मूर्तिमंत नाचत असतां, त्याला बेदरकारपणें उत्तर देऊन, मरणाला मिठी मारणारे हुतात्मा श्री संभाजी महाराज शूराची अहिंसा कशी असते हें स्वतःच्या उदाहरणानें दाखवूं शकतात! स्वतःच्या लेंकरांचा चाललेला अमानुष छळ निमूटपणें साहून, अभयवृत्तीनें मरण पतकरणाऱ्या शीख गुरु-श्रेष्ठांनीं शूरांच्या अहिंसेची भाषा काढली तर ती शोभून दिसते! पुढच्या जन्मींची फांशीची शिक्षाहि आतांच देत असाल तर द्या असें म्हणून, हातांत भगवद्गीता घेऊन, हंसतमुखानें फांसावर लटकण्याला प्रवृत्त होणाऱ्या दामोदरपंत चाफेकरांच्या तोंडीं शूराची भाषा शोभेल! कानपूरच्या दंग्यांत, मृत्यु समोर दिसत असतां, बिलकूल न डगमगतां मरण पत्करणाऱ्या गणेश शंकर विद्यार्थीजींनीं शूरांच्या अहिंसेची महति सांगितली तर ती सार्थ ठरेल! पण, जो समाज शेंसव्वाशें वर्षें परकी अंमलामुळें पिचून निघाला आहे, ज्या समाजाला साधें जीवन जगण्यासाठीं हरघडी मानहानीचे प्रसंग गिळावे लागत आहेत आणि ज्या समाजाला सर्वांगीण प्रतिकाराची शिकवण नीटशी देण्यांतच आलेली नाहीं त्या समाजाकडून शूरांच्या अहिंसेचें पालन व्हावें कसें?

> अशा समाजाला शूरांच्या अहिंसेचें पालन करावयाला सांगणें म्हणजे, अहिंसेवर विश्वास न ठेवणाऱ्या लोकांच्या भक्ष्यस्थानीं त्या समाजाची योजना करणेंच होय.

तात्पर्य असें कीं, अहिंसावाद आणि हिंदु-मुसलमान यांच्या विषयींचें धोरण या दोन्ही बाबतींत कॉंग्रेसचें धोरण गेलीं २०–२१ वर्षें पार चुकत आलेलें असल्यामुळें, एक तर या दोन्ही बाबतींतलें धोरण कॉंग्रेसनें बदललें

पाहिजे; अगर आपल्या राजकारणाची इतिश्री झाली हें तरी काँग्रेसनें कबूल केलें पाहिजे! काँग्रेस यांतलें काय करील हें सांगणें वा समजणें फार दुर्घट आहे. काँग्रेसचीं सूत्रें ज्यांच्या हातीं जाऊन बसलीं आहेत त्या गांधीजींचें हृद्गत प्रगट होतें तेंच मोठ्या विलक्षण पद्धतीनें! दुष्यंत राजानें शकुंतलेविषयींच्या आपल्या भावना व्यक्त करतांना, 'न विवृतो मदनो नच संवृतः' असें म्हटलें आहे. गांधींचा प्रकारहि तसाच होतो. त्यांचें मनोगत पूर्णपणें स्पष्टहि होत नाहीं आणि तें पूर्णपणें गुप्तहि राहात नाहीं. अर्धवट व्यक्त झालेल्या गांधींच्या मनोगताची प्रत्येकानें आपल्या सोयीनुसार ओढाताण करावी असें आज कित्येक वर्षें चाललें आहे. गांधीजींच्या वक्तव्यांतले जे उतारे वर उद्धृत केले आहेत त्यांवरून असें अनुमान निघण्यासारखें आहे कीं, या ओढा-ताणीला कंटाळून, अर्धवट अहिंसाभक्तांना काँग्रेसच्या बाहेर जाण्याला गांधीजी आतां फर्मावणार आहेत! हे लोक अहिंसेच्या अतिमानुष तत्त्व-ज्ञानांतून मुक्त होऊन, हिंदुसमाजांतलीं माणसें म्हणून भोंवतालच्या जगाकडे पाहूं लागतील, तो सुदिन होय.

कारण, हिंदुसमाजांतल्या प्रत्येक जाणत्या माणसानें हिंदु म्हणून भोंवतालच्या जगाकडे पहावें अशीच वेळ आज येऊन ठेपली आहे. हिंदुस्थान सगळ्या जगाचें लक्ष्य व भक्ष्य बनला आहे. शास्त्रीय प्रगति व यांत्रिक संस्कृति यांच्या पूर्णपणें आहारीं गेलेल्या ख्रिस्ती संस्कृतीला हिंदूंचा हिंदुस्थान म्हणजे एक अफाट कुरण आहे, असें वाटतें. या ख्रिस्ती संस्कृतीशीं इस्लामी संस्कृ-तीला उठल्या बसल्या व्यवहार करावा लागतो. इस्लामी संस्कृतीचें एक केन्द्र म्हणजे तुर्कस्थान. हें राष्ट्र युरोपांत असलें तरी, तेथील लोक स्वतःला 'आशियाटिक' समजतात. भोंवतालच्या युरोपियन राष्ट्रांना भिऊनच वागणें तुर्कांना पुष्कळ वेळां भाग पडतें हें खरें; पण, भिन्न भिन्न ख्रिस्ती राष्ट्रांच्या स्पर्धेमुळें या छोट्या राष्ट्राचा कांहीं लाभही होतो; आणि, या छोट्या राष्ट्राला जगाच्या आधुनिक प्रगतीच्या शर्यतींत मोठेंसें मागें राहावें लागत नाहीं! इजिप्त, अल्बेनिया, इराक, वगैरे मुसलमानी राष्ट्रांचीहि थोड्याफार फरकानें हीच स्थिति आहे. गेल्या महायुद्धानंतर ज्या नव्या कल्पना उदय पावल्या आणि तेव्हांपासून पॅलेस्टाइन, इराक, इराण वगैरे भागांत ख्रिस्ती सत्तेचा जो वरचष्मा सुरू झाला त्यामुळें

डाक्यापासून लिस्बनपर्यंत पसरलेल्या कोटयवधि मुसलमानांना कांहीं नवे विचार सुचूं लागले. अफगाणिस्थान, इराण, अरबस्तान वगैरे ठिकाणचे मुसलमान ज्ञानदृष्ट्या, भौतिकशास्त्रदृष्ट्या व युद्धशास्त्रदृष्ट्या अद्याप असावे तितके प्रगत नाहींत; पण, या दिशेनें प्रगतीचे टप्पे झपाझपा गांठावे आणि ख्रिस्ती जग, पूर्वेकडील बौद्ध जग आणि हिंदुस्थानांतील हिंदुजग या सर्वांना चाटून जाणारें संघटित इस्लामी जग निर्माण करावें, अशी भावना या देशांतून खेळत आहेत. हिंदुस्थानांतले मुसलमान हे जगांतील एकंदर मुसलमानांच्या मानानें थोडेथोडके नाहींत. एकंदर मुसलमान लोकसंख्येच्या $\frac{१}{४}$ लोकसंख्या एकटया हिंदुस्थानांत आहे. आणि त्यामुळेंच हिंदुस्थानांतील मुसलमान कांहीं एक नव्या तऱ्हेची भाषा अलीकडे बोलूं लागलेले आहेत.

या उघड उघड दिसणाऱ्या वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून, मुसलमानांशीं एकी करण्याच्या भलत्याच कल्पनांवर आधारलेलें कोणतेंच राजकारण यापुढें पुरें पडणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, मुसलमानांच्या भावनांशीं हिंदूंनीं सतत झगडतच बसलें पाहिजे. मुसलमानांचीं व हिंदूंचीं ध्येयें व धोरणें क्वचित् प्रसंगीं एकरूपहि बनूं शकतील; आणि अशा प्रसंगीं ऐक्याची याचना करीत मुसलमान आपल्या पायानें चालत हिंदूंकडे येतील. अशा वेळीं, ऐक्य साधण्याच्या उत्सुकतेचा हिंदूंनीं अवश्य उपयोग करून घ्यावा; पण, इतर प्रसंगीं ऐक्याची हाकाटी करीत हिंदूंनीं मुसलमानांच्या मागें मुळींच लागूं नये! त्यांचीं मनोगतें काय आहेत हें ओळखून, त्या मनोगतांची बाधा हिंदुहिताला व हिंदुस्थानच्या हिताला कोणत्या प्रकारानें होणार नाहीं इकडेच हिंदूंनीं लक्ष दिलें पाहिजे.

बऱ्याच बाबतींत जगांतील मुसलमान समाज अद्याप मागासलेला आहे; तोंपर्यंतच हिंदुसमाजानें स्वतःचें संघटन व सर्वांगीण शक्तिसंवर्धन केलें पाहिजे. अशा प्रकारें संघटित झालेल्या व सर्व दृष्टींनीं शक्तिसंपन्न झालेल्या हिंदु समाजाची उद्यांच्या जागतिक कोलाहलांत कोणाला मदत लागेल, हें आजच सांगतां येणार नाहीं.

स्पेनपासून अफगाणिस्थानपर्यंतचा मुसलमान समाज संघटित झाला व प्रगत

झाला तर, युरोपमधील ख्रिस्ती सत्ताधाऱ्यांना इस्लामी जगाचा धाक वाटेल, असाहि संभव आहे. अशा वेळीं संघटित व शक्तिसंपन्न असलेलें हिंदुराष्ट्र, न्याय कोणत्या बाजूला आहे हें पाहून, त्या बाजूला वळूं शकेल ! आशियांतील बौद्ध राष्ट्रांचें आज ना उद्यां कांहीं योजनेनें एकीकरण झालें व त्या बौद्ध राष्ट्रांना इस्लामी जगाचें अगर ख्रिस्ती जगाचें भय वाटूं लागलें तर, अशा प्रसंगीं, हिंदूंचें संघटित सामर्थ्य या बौद्ध जगाच्या उपयोगीं पडूं शकेल. जगाचें भविष्यकालीन स्वरूप नेमकें अमुकच प्रकारचें बनेल असें आजच सांगणें कठीण असलें तरी, इस्लामी जगांत जें विचारांचें वारें अलीकडे खेळत आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. हिंदुस्थानांत नांदणारा मुसलमानसमाज अशा वाऱ्यांच्या व वावटळींच्या आहारीं किती झटकन जातो हें यापूर्वीच्या प्रकरणांतून जें ऐतिहासिक विवेचन केलेलें आहे त्यावरून स्पष्ट होण्यासारखें आहे. सरहद्दीनजीकच्या प्रांतांत मुसलमान लोकसंख्या विशेष आहे. तेथें तर या वावटळींची धडक उठल्याबसल्या येऊन पोंचत असते. या प्रांतांतील हालचालींकडे डोळ्यांत तेल घालून बघण्याचें धोरण यापुढें हिंदूंना अपरिहार्य म्हणून आंखलें पाहिजे आणि येथील मुसलमानांची निष्ठा कोणत्या दिशेनें झुकत आहे हें ओळखून,

> हिंदूंचें स्वतंत्र राजकारण करण्यालाच हिंदूंनीं शिकलें पाहिजे. असें राजकारण काँग्रेसच्या विचारसरणीच्या कक्षेंतच येऊं शकत नाहीं. या प्रकारचें राजकारण आतां टाळतां येत नाहीं हें ओळखून, काँग्रेसमधील हिंदूंनीं काँग्रेसचीं धोरणेंच बदललीं तर काँग्रेसलाच हिंदुमहासभेचें स्वरूप येईल; पण, काँग्रेसचीं सूत्रें ज्या दहावीस लोकांच्या हातांत आहेत त्यांच्या–आणि विशेषत: गांधीजींच्या––वयोमानाचा विचार केला तर काँग्रेसच्या धोरणांत असा इष्ट बदल होण्याची शक्यता नाहीं, असेंच म्हणावें लागतें.

कांहीं एका वयोमानानंतर माणसें आपले मार्ग बदलूं शकत नाहींत. गांधीजी ही गोष्ट ओळखीत असावे आणि म्हणूनच त्यांनीं असें स्पष्ट शब्दांत म्हटलें असावें कीं, ज्यांच्या मनांत मी हिंदू, हा मुसलमान असे विचार येतात अशा माणसांची अडगळ काँग्रेसमध्यें मला नको आहे ! हिंदूंनीं आपलें स्वतंत्र राजकारण स्वतंत्रपणेंच करावें असाच गांधीजींच्या म्हणण्याचा रोख दिसतो.

पोटांत हिंदुत्वाची भावना ठेवून, भिडेखातर काँग्रेसमध्यें राहणारीं माणसें आत्मवंचना करीत आहेत, असाच गांधीजींच्या लिहिण्याचा आशय असावा.

> हिंदूंच्या हिताच्या दृष्टीनें काँग्रेसच्या राजकारणाची इतिश्री झालेली आहे; तुम्हांला हिंदु म्हणून हिंदुसमाजाचें हित साधणें जरूर वाटत असेल तर तुम्हीं माझ्या आशीर्वादानें वेगळा संसार थाटा, असें गांधीजीच सुचवीत आहेत; पण, 'ऊर्ध्वबाहुर्विरोम्येषः नैव कश्चित् शृणोति माम्' अशी त्यांची स्थिति होत असून, मोठमोठे हिंदु पुढारी काँग्रेसमध्येंच घुटमळत राहून, हिंदु-समाजाला अन्याय करीत आहेत, हें दुर्दैव होय.

---


# Where will you buy Account Books?

We stock Ledger Books and Cash Books of English System, and we also arrange to provide the same in special forms according to requirements.

**R. P. Datar,** Paper Merchants,
889, Sadashiv Peth, Reay–Market Road
near Tulsibag.

## प्रकरण १३ वें

# हिंदुसंघटनेचा महामंत्र

**मागील प्रकरणांतून** जें अनेक मुद्यांचें विवेचन करण्यांत आलें आहे तें लक्षपूर्वक वाचणाऱ्या वाचकांच्या ध्यानांत एक गोष्ट निश्चित आली असली पाहिजे. पाकिस्तान वगैरे सर्व संकटांना तोंड देण्याचा स्वाधीनचा उपाय 'हिंदुसंघटन' हाच होय हा मुद्दा या विवेचनाच्या ओघांत वारंवार मांडण्यांत आलेला आहे. आणि भोंवतालच्या सर्व परिस्थितीचा दूर दृष्टीनें विचार केला म्हणजे फिरून एकवार असें म्हणणें भाग पडतें कीं, सध्यांच्या काळीं हिंदुसमाजाच्या किंवा हिंदुराष्ट्राच्या उद्धाराचा हिंदुसंघटन हा एकच स्वाधीनचा मार्ग होय. हिंदुसंघटन हा एक सहा अक्षरांचा मामुली शब्द दिसतो.

> पण, त्या शब्दांत जें सुप्त सामर्थ्य आहे त्याची ओळख ज्याच्या ज्याच्या मनाला पटेल तो तो हिंदु असेंच म्हणू लागेल कीं, हा एक साधा निर्जीव शब्द नसून, तो एक संजीवनी मंत्र आहे.

जुन्या पद्धतीनें जपावयाच्या मंत्रांचा अर्थ बुद्धीला न कळला तरी ती गोष्ट चालूं शकत असे. या संजीवनी मंत्राचा अर्थ बुद्धीला कळला आणि हातून त्या अर्थानुरूप कृति घडली तरच हा महामंत्र फलदायी ठरणार आहे, हा या महामंत्राचा विशेष आहे.

तीस कोटी लोकांच्या जुटीचें सामर्थ्य किती अफाट असूं शकेल याची कल्पना येण्यासाठीं प्रत्येक हिंदूनें आपली नजर क्षणमात्र सध्यांच्या युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांकडे वळवावी. एका राष्ट्राचें संघटित मनुष्यबळ म्हणे ५ कोटी आहे, दुसऱ्याचें म्हणे ७ कोटी आहे आणि अफाट दिसणाऱ्या तिसऱ्याचेंहि १५।१७ कोटींहून जास्त नाहीं. असें असूनहि, हीं राष्ट्रें एवढा जगड्व्याळ संग्राम चालवितात कसा याचा सूक्ष्म विचार प्रत्येक हिंदूनें केला पाहिजे. सात कोटींचें राष्ट्र आणि तीस कोटींचें राष्ट्र यांच्या तुलनेंत सात कोटींचें राष्ट्र श्रेष्ठ ठरत असेल तर, तें तसें कशामुळें ठरतें या प्राथमिक

प्रश्नानेंच हिंदुसंघटनेच्या प्रश्नाचा विचार सुरू करावयाला हरकत नाहीं. असा विचार सुरू केला कीं, मन जें उत्तर ताडकन् देईल तें हें कीं, सात कोटींच्या राष्ट्रांत प्रभावी मानवशक्ति (Effective Manpower) अधिक असल्यामुळेंच तें राष्ट्र तीस कोटींच्या लोकसमूहालाहि भारी ठरूं शकतें.

> हिंदु समाजांत सुमारें तीस कोटी माणसें आहेत हें सत्य केवळ शिरगणतीच्या तक्त्यापुरतें खरें आहे. प्रभावी कार्यकर्तृत्वाच्या दृष्टीनें तें सत्य असत्यरूपच आहे.

कार्यकर्तृत्वाच्या दृष्टीनें या तीस कोटींच्या समाजांतील जास्तींत जास्त माणसें सर्वांगांनीं कार्यक्षम बनविणें म्हणजेच खऱ्या अर्थानें हिंदुसंघटन करणें होय. या दृष्टीनें आजच्या हिंदुसमाजाकडे दृष्टि वळविली तर त्या समाजांत कोणतीं हृदयविदारक दृश्यें दिसतील? तीस कोटींत जो दहा अकरा कोटी तरी स्त्री समूह असेल तो स्त्रीसमूह गृहरक्षण, प्रजोत्पादन, प्रजा-संवर्धन इत्यादि दृष्टींनींहि पूर्णपणें कार्यक्षम असता तर मोठीशी फिकीर बाळगण्याचें कारण नव्हतें. पण, दुर्दैव असें कीं, या मर्यादित क्षेत्रांतहि या कोटिसंख्य स्त्री समाजाची कार्यक्षमता प्रत्यहीं कमीकमीच होत चालली आहे. हिंदु-समाजांत जीं अल्पसंख्य कुटुंबें सांपत्तिक सुस्थितींत आहेत त्यांना त्या संपत्ती-मुळें नाहीं ते चोचले सुचूं लागल्यामुळें, त्या थरांतील स्त्रीवर्गाची या बाबतींतली कार्यक्षमता ओसरूं लागली आहे; आणि अठरा विश्वे दारिद्र्याशीं दररोज झगडणारा जो बहुसंख्य हिंदु समाज त्यांतील स्त्रीवर्ग अज्ञानाच्या व दैन्याच्या झळी लागल्यामुळें या बाबतींत हळुहळू कमीकमी कार्यक्षम होत आहे. आपल्या समाजांतील दृश्यांचा हा चित्रपट सध्यां युद्ध्यमान असलेल्या राष्ट्रां-तील दृश्यांच्या समोर उभा केला म्हणजे हिंदुसमाज खरोखर कोठें उभा आहे, याची कल्पना पटूं लागते. स्त्रियांचीं स्त्रीजीवनविषयक कर्तव्यें पार पाडून जर्मनी, इंग्लंड, जपान, इटली इत्यादि देशांतील स्त्रिया पुरुषांचीं म्हणून समजलीं जाणारीं अनेक कामें चातुर्यानें व धैर्यानें करूं शकतात आणि म्हणूनच पांच कोटींचीं आणि सात कोटींचीं हीं टीचभर राष्ट्रें साऱ्या जगाच्या छातींत धडकी भरवूं शकतात.

हिंदुराष्ट्रहि असेंच भीमपराक्रमी व्हावयाचें असेल तर

> त्याला आपल्या अंतरंगांतील मानवी शक्तीचा कण नि कण कार्यक्षम बनविला पाहिजे.

आजवर आपण ज्या कल्पना उराशीं घट्ट बाळगून बसलों आहोंत त्याच कल्पनांना आपण यापुढेंहि बिलगून बसूं तर, आपल्यामधील अफाट मानवी शक्ति प्रभावशाली ठरूंच शकणार नाहीं. ही शक्ति प्रभावशाली करण्याचें पहिलें साधन म्हणजे आपल्या डोक्यांत भिनून गेलेल्या कुकल्पना साफ झाडून टाकणें हें होय.

> कुकल्पनांची चौफेर माजलेली दलदल पार नाहींशी होईल आणि स्वच्छ बुद्धि नव्या दृष्टीनें परिस्थितीचा विचार करूं लागेल त्या वेळींच हिंदुसंघटनेच्या कार्याची खरीखुरी सुरुवात होईल. ज्या बुरसटलेल्या कल्पना हिंदुसंघटनवादी हिंदूंनीं तत्काळ सोडल्या पाहिजेत त्यांतली पहिली कल्पना बाटाबाटीबद्दलची होय. हिंदु बाटूं शकत नाहीं हा त्रिकालाबाधित सिद्धांत प्रत्येकानें सदैव स्मरणांत ठेविला पाहिजे.

हिंदु बाटतो असें मानणें अगर म्हणणें हें माणुसघाणेपणाचें नसून हिंदुघाणेपणाचें लक्षण आहे, असें ओळखण्याला आपण स्वत: शिकलें पाहिजे व इतरांनाहि तें पटवून देण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. स्वेच्छेनें, जाणूनबुजून, समजूनउमजून एकाद्या हिंदूनें हिंदुसमाज सोडला आणि त्यानें परसमाजांत प्रवेश केला तरच तो हिंदुत्वाला मुकूं शकेल—तरच तो बाटेल— हें नवें सूत्र यापुढें लक्षांत बाळगिलें पाहिजे. ख्रिस्त्याच्या हातचा पावच काय, ख्रिस्त्याचा सबंध हातचा हात पोटांत गेला तरीहि हिंदु पूर्वींइतकाच शुद्ध हिंदु राहातो, हें नव्या युगांतलें आपलें नवें शास्त्र होय.

हिंदु कशानेंहि बाटूं शकत नाहीं ही सत्कल्पना मनावर कायमची कोरून ठेवणें हें जसें हिंदुसंघटनेच्या कार्याचें एक अंग आहे तसेंच,

> कोणताहि हिंदु केवळ जन्मामुळें दुसऱ्या हिंदूहून श्रेष्ठ असूं शकत नाहीं, या कल्पनेचा चौफेर पुकारा करणें हें हिंदुसंघटनेचें दुसरें प्रधान अंग होय.

आजपर्यंत हिंदु समाजांत रूढ असलेली चातुर्वर्ण्याची कल्पना व त्या कल्पनेच्या बरोबर सावलीप्रमाणें वावरणारी जन्मसिद्ध श्रेष्ठकनिष्ठपणाची

कल्पना या बरोबर होत्या कीं चूक होत्या या वितंडवादांत वेळ घालविण्याला हिंदुसंघटनवाद्यानें प्रवृत्त होऊं नये. देशकालवर्तमान पाहून या श्रेष्ठकनिष्ठ-पणाच्या कल्पनेला तिलांजलि दिली पाहिजे एवढी एकच गोष्ट त्यानें ओळखिली म्हणजे झालें. जन्मसिद्ध श्रेष्ठपणा, जन्मसिद्ध कनिष्ठपणा, मानीव कनिष्ठ-पणांतून श्रेष्ठपणाप्रत विकसित होत जाण्याची शक्याशक्यता, या संबंधींचे पांडित्यपूर्ण वाद पंडित अगर पंडितंमन्य खुशाल घालोत; हिंदुसंघटनवाद्यांनीं करमणूक म्हणूनहि तिकडे वळण्याचें कारण नाहीं. हिंदुसंघटनवाद्यानें एकच मद्दा मनांत वागविला पाहिजे व कृतींत उतरविला पाहिजे.

> परदास्यांत पिचत पडलेल्या मानवसमाजांत चातुर्वर्ण्य-व्यवस्थेचा लोप परिस्थितीमुळेंच झालेला असतो हें सत्य, सभों-वतालच्या परिस्थितीकडे सूक्ष्म नजरेनें पाहून,त्यानें स्वतः पटवून घेतलें पाहिजे व इतरांना पटवून दिलें पाहिजे.

आज हिंदुसमाजांत चातुर्वर्ण्य आहे कोठें? वेदोनारायणांनीं, शास्त्रीपंडि-तांनीं अगर आचार्यमहाचार्यांनीं खुशाल समजावें कीं, त्यांच्या ठिकाणीं ब्राह्मण्य नांदत आहे. पण; वास्तविक पाहतां ब्राह्मण्य त्यांच्या ठिकाणीं नांदत नाहीं! विद्येंत व विचारांत त्यांना केव्हांच मागें टाकून पुढें गेलेले जे परदेशस्थ पंडित आहेत, परदेशस्थ तत्त्ववेत्ते आहेत, परदेशस्थ संशोधक आहेत, पर-देशस्थ मुत्सद्दी आहेत आणि परदेशस्थ द्रष्टे आहेत ते आजच्या जगांतील खरे ब्राह्मण आहेत.

> परदास्यामुळें उभा हिंदुसमाज आज निर्ब्राह्मण, निःक्षत्रिय व निर्वैश्य बनला असून, सारा हिंदुसमाज साम्राज्याच्या भार-वाहकाचें काम करणारा शूद्र बनला आहे. चातुर्वर्ण्य शिल्लकच नाहीं तर तें जुनें चातुर्वर्ण्य टिकणार कसें आणि तें जुनें चातुर्वर्ण्य टिकविण्याची धडपड तरी कशाला?

अशा या अवनत काळींहि एक नवें चातुर्वर्ण्य निर्माण होत आहे. निःस्वार्थी-पणानें राष्ट्राच्या भवितव्याची चिंता वाहणारे जे जे राष्ट्रधुरीण या देशांत होऊन गेले आहेत व सुदैवानें आजहि हयांत आहेत ते सर्व या नव्या वर्ण-व्यवस्थेच्या दृष्टीनें ब्राह्मणच आहेत. त्यांचा जन्म कोणत्या जातींतल्या

मातापितरांच्या पोटीं झाला हें पाहात बसण्याला हिंदूंना सवडच नाहीं. दादाभाई नौरोजी पारशी मातापितरांच्या पोटीं जन्मले असतील! ते या नव्या वर्णव्यवस्थेंतील श्रेष्ठ ब्राह्मणच आहेत; आणि, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अगर डॉ० आंबेडकर हेहि या नवीन वर्णव्यवस्थेंतील श्रेष्ठ ब्राह्मणच असल्यामुळें, प्रत्येक हिंदुसंघटकानें त्यांच्यापुढें आपला माथा नम्रपणें नमविला पाहिजे.

हिंदु बाटत नाहीं, कोणताहि हिंदु जन्मानें इतर हिंदूंहून श्रेष्ठ असूं शकत नाहीं अगर कनिष्ठहि असूं शकत नाहीं वगैरे कल्पना नुसत्या बोलत राहून भागणार नाहीं; कृतिरूपानें त्या प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवून दाखविल्या पाहिजेत. त्या तशा उतरवून कशा दाखवाव्या या प्रश्नाचें चिंतन करणें म्हणजेच सामान्यांतल्या सामान्य हिंदूला दैनंदिन व्यवहारांत हिंदुसंघटनावादी बनविणें होय.

या दृष्टीनें कांहीं सूचना हिंदुसंघटनावादी कार्यकर्त्यांपुढें मांडणें आतां अवश्य झालेलें आहे. हिंदुसमाजांत श्रेष्ठकनिष्ठपणाच्या भावना पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या आहेत. त्या नाहींशा करण्याचे जाणतेपणाचे प्रयत्न कित्येक वर्षें होत राहातील तेव्हांच हिंदुसमाज पुष्कळसा एकजीव बनेल. हिंदुसमाजांत अद्याप पुष्कळसा धर्मभोळेपणा नांदत असल्यामुळें आणि ज्या समाजाला नव्या कल्पनांची दीक्षा द्यावयाची आहे त्या समाजाच्या मनावरच ह्या धर्मभोळेपणाच्या धुळीचीं पुटें बसलेलीं असल्यामुळें, ह्या दिशेनें टाकावयाचें पाऊल निश्चितपणें पण जपून टाकलें पाहिजे. संघटनेच्या घाईनें विघटनाच घडून आली असा प्रवाद हिंदुसंघटनवाद्यांवर येतां कामा नये. माणुसकी व भूतदया यांच्या आश्रयानें हिंदुसमाजाच्या अंतरंगांत शिरण्याचा प्रयत्न करणें हाच हिंदुसंघटनाचा निश्चित, फलदायी व टिकाऊ मार्ग होय.

मनुष्याचा जन्म आणि मनुष्याचा मृत्यु ह्या दोन अवस्था अशा आहेत कीं त्यांचें महत्त्व व गांभीर्य हें गरीब श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित अशा सर्वांनाच पटतें. सर्वांना सहज पटणाऱ्या प्रसंगांतूनच हिंदुसंघटनावाद्यानें आपलें कार्य चढीस लाविलें पाहिजे. मोठमोठ्या शहरांतून जन्माची व मृत्यूची नोंद करण्याची सोय असते. या नोंदीचा उपयोग हिंदुसंघटनावाद्यांनीं केला

पाहिजे. काल हिंदुसमाजांत किती बालकें जन्माला आलीं हें जर हिंदुसंघटनावाद्यांना आज कळण्यासारखें आहे, तर या सहज मिळणाऱ्या माहितीचा त्यांनीं हिंदुसंघटनेच्या दृष्टीनें उपयोग कां करूं नये ? काल जन्मलेल्या बालकांच्या घरांचे पत्ते नगरपालिकेंतून मिळवून, त्या घरांचा तपास काढीत, हिंदुसंघटनावादी लोक फिरूं लागतील तर त्यांना हिंदुसमाजाशीं जिव्हाळ्याचा संबंध जोडतां येणार नाहीं काय ? काल जन्मलेलीं जीं हिंदु बालकें सुस्थितींत असतील त्यांची व त्यांच्या मातांची हिंदु म्हणून हिंदूंकडून नुसती पूसतपास होऊं लागली तरीहि, त्यांच्या कुटुंबांतील इतर माणसांच्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें होईल. हिंदुसंघटनावादी माणसें अशा कार्यासाठीं हिंडूं लागलीं तर त्यांना सर्वत्र सुस्थितीहि दिसणार नाहीं.

> काल जन्मलेलें मूल आणि त्याला जन्म देणारी त्याची माता या दोघांनाहि अंगभर वस्त्र मिळालेलें नाहीं आणि घांसभर अन्न मिळालेलें नाहीं अशीं हृदयविदारक दृश्यें त्यांच्या दृष्टीस कितीतरी पडतील !

हिंदुसंघटनावादी लोक आणि हिंदुसंघटनावादी संस्था अशा अर्भकांना आणि त्यांच्या मातांना अल्पस्वल्प मदत कर्तव्य म्हणून करतील तर, हिंदु समाजाचा कायापालट हां हां म्हणतां होऊं लागेल, यांत संशय नाहीं.

मृत्यूच्या नोंदींचाहि उपयोग अशाच दृष्टीनें करतां येण्यासारखा आहे. मृत्यु हा प्रसंगच असा असतो कीं, त्या प्रसंगानंतर मृताच्या आप्तेष्टांना मायेचा एक शब्दहि लाख मोलाचा वाटत असतो. अशा प्रसंगांत सांपडलेल्या हिंदूंची हिंदु म्हणून विचारपूस होऊं लागली तर, समाजांतला अडाण्यांतला अडाणी व गरिबांतला गरीब हिंदूहि 'मी हिंदु आहे' असें अभिमानानें म्हणूं लागेल.

> आज स्थिति अशी आहे कीं, 'तीस कोटी हिंदु' ही भाषा कांहीं थोडे लोक अभिमानानें उच्चारतात; पण इतर कोटचवधि हिंदूंना त्या भाषेंतील रहस्यच समजत नाहीं.

ही स्थिति पालटणार नाहीं तोंपर्यंत तीस कोटि हिंदु आणि तीस कोटी हिंदूंचें राष्ट्र हे शब्दप्रयोग पोकळ व निरर्थक ठरतील. नेणत्या हिंदूंच्या

भावनांनजीक भूतदयेच्या मार्गानें येऊन पोंचल्यावर हिंदुसंघटनवाद्यानें त्यांचा स्वाभिमान जागृत कसा करावयाचा या विषयाकडे वळलें पाहिजे.

श्रेष्ठकनिष्ठपणाच्या, शिवाशिवीच्या, सोंवळेओंवळेपणाच्या परंपरागत कल्पना हिंदु समाजांत ठाण मांडून बसलेल्या असल्यामुळें, आज हजारों हिंदूंचा स्वाभिमान रोज पायातळीं तुडविला जात आहे.

मिष्टान्नांच्या पंक्तीवर पंक्ति लग्नकार्यांतून उठत असतात आणि माजोरीपणानें पानांत टाकून देण्यांत आलेलें उष्टें अन्न दीनवाण्या हिंदूंच्या पोटांतली आग शमावी म्हणून त्यांच्या पदरांत टाकलें जात असतें ! तीस कोटि हिंदूंचें स्वाभिमानी राष्ट्र निर्माण व्हावयाचें असेल तर हे घातकी प्रघात तावडतोब थांबले पाहिजेत.

असे प्रकार घडत असतील त्या घरीं हिंदुसंघटनवाद्यांनीं अन्नग्रहणहि केलें नाहीं, तर तें शोभण्यासारखें आहे.

सार्वजनिक देवालयांचे उत्सव होतात आणि त्या उत्सवांची व्यवस्था नीटपणीं व्हावी म्हणून ब्राह्मणांपासून अंत्यजापर्यंतचे सर्व हिंदु खपत असतात. पण, या उत्सवांचा प्रसाद ग्रहण करण्याची वेळ आली म्हणजे मात्र ‘ हे आधीं, ते मग ’ असे प्रकार सुरू होतात. अशा प्रकारांमुळें, स्वाभिमानी वृत्तीचा कसा चेंदामेंदा होतो हें इतरांना कळलें नाहीं तरी, हिंदुसंघटनवाद्यांना तें कळलें पाहिजे; आणि, असे प्रकार थांबविण्याचा अट्टाहास त्यांनीं धरला पाहिजे.

सार्वजनिक म्हणून जे उत्सव हिंदुसमाजातर्फे साजरे केले जातात तेहि या दृष्टीनें अधिक संघटित झाले पाहिजेत. ठराविक वस्तींत राहाणाऱ्या आणि वीट येईपर्यंत गाणें-बजावणें लुटणाऱ्या हिंदूंच्या मेळाव्यांतूनच मेळ्यांच्या व गाण्यांच्या कार्यक्रमांची लयलूट व्हावी, यांत स्वारस्य कोणतें आहे ? ज्यांना हिंदुत्वाची नीटशी ओळखहि झालेली नाहीं, काबाडकष्ट करीत, कण्हतकुंथत जगावें लागत असल्यामुळें ज्यांना करमणूक म्हणजे काय असते हें कळतहि नाहीं,

अशा हिंदुवस्तीच्या भागांत या सार्वजनिक उत्सवांचे फड रंगू लागले तर हिंदुत्वाची जागृति व करमणुकीच्या साधनांची

> समप्रमाण वांटणी या दोन्ही दृष्टींनीं तो थारेपालट अधिक श्रेयस्कर व अधिक फलदायी ठरणार नाहीं काय ?

आज हे उत्सव ज्या तऱ्हेनें साजरे होतात व या उत्सवांमुळें ज्यांचें मनोरंजन होतें त्या तऱ्हेचा व त्या लोकांचा विचार केला म्हणजे,

> **तृषार्ता भागल्या जीवा। मिळेना थेंबभर पाणी ॥**
> **जयांची वासना-पूर्ति। तयांसी अमृतीं न्हाणी ॥**

या कविवचनाचें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं.

हिंदु समाजांत जी विषमता नांदत आहे त्या विषमतेचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. उत्सव हें त्यांतलें एक साधें उदाहरण होय. ही विषमता चौफेर पसरलेली आहे आणि ती नष्ट करण्याचे उद्योग सतत व जाणतेपणानें झाले तरच खरें हिंदुसंघटन घडूं शकेल. ही विषमता नष्ट करण्याचीं जुनीं साधनें समाजांतून नाहींशीं होत चाललीं आहेत. आणि त्यांच्या जागीं नवीं साधनें निर्माण करण्याची तत्परता दाखविली गेलेली नाहीं. द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, ज्ञानयज्ञ, शक्तियज्ञ इत्यादि यज्ञद्वारा समाजांतील विषमता नाहींशी करण्याचे जुने मार्ग बुजून गेले आहेत. पूर्वीच्या काळीं बऱ्या स्थितींतल्या कुटुंबांतून अशी रीत आढळे कीं, चातुर्मास्यांत बाळभूक म्हणून गरीब कुटुंबांतल्या एकाद्या अर्भकाला नेमानें थोडेंफार दूध द्यावयाचें.

> ज्याच्याजवळ अधिक आहे त्यानें गरजवंताला त्यांतलें थोडेंफार दिलें पाहिजे, या सिद्धांताची अंमलबजावणी अशा रीतीनें पूर्वी होत असे.

आपल्या समाजांत रूढ असलेल्या कहाण्या, व्रतेंवैकल्यें व रिवाज यां यामागील उद्देशांचा या दृष्टीनें कोणी तपास केला तर हिंदुसमाजांत समता प्रस्थापन करूं पहाणाऱ्यांना तो उद्योग फार मार्गदर्शक ठरेल. सुस्थितींतल्या कुटुंबानें गरीब कुटुंबांतल्या एका अर्भकाला दूध पुरवावें अशी रीत पूर्वीच्या काळीं असे. आज त्या रीतीला वेगळें वळण लावून हिंदुसंघटनवाद्यांना तोच उद्देश साध्य करावा लागेल.

> ज्या तीन वर्षांच्या खालील मुलांना दुधाचा टांकहि मिळूं शकत नाहीं अशीं मुलें शहरांत व खेड्यांत हजारों आहेत.

ज्यांच्या ठिकाणीं दातृत्वबुद्धि आहे व ज्यांना परिस्थितीची अनुकूलता आहे असे हिंदूहि शहरांतून व खेड्यांतून हजारों नसले तरी शेंकडों आहेत. या दोघांची हिंदुत्वाच्या भूमिकेवर सांधेजोड घडवून आणणें हें हिंदुसंघटनवादी कार्यकर्त्यांचें काम आहे.

> या सर्व प्रकाराचें सूत्रमय वर्णन असें करतां येईल कीं, हिंदुसंघटनवाद्यानें दररोज लक्ष्मी-नारायणाचें दर्शन घेतलें पाहिजे. एका दरिद्रीनारायणाच्या घरांत जाऊन त्याच्याशीं समरस होणें आणि त्याच्या दैन्याचा थोडाफार परिहार करूं शकेल अशा लक्ष्मीवंताशीं त्याचा संयोग घडवून आणणें हें हिंदुसंघटनवाद्याच्या नित्य क्रमांतलें एक कार्य होऊन बसलें पाहिजे.

हिंदुसंघटनवादी या वृत्तीनें पाहूं लागतील व वागूं लागतील तरच स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं सुचविलेल्या वर्गसमन्वयाच्या पायावर हिंदु समाजाची उभारणी करतां येईल. वर्गविग्रह निर्माण करणारे लोक हे स्वतःच्या कर्तबगारीनें हिंदुसमाजाला प्रिय होत आहेत, अशांतला भाग नाहीं.

> दैन्यामुळें टेकीस आलेल्या गरीबगुरीब हिंदूंना या वैदूंचेंच तेवढें दर्शन होतें; चांगल्या वैद्यांचें त्यांना दर्शनच घडत नाहीं; आणि म्हणून या वैदूंना उभे राहाण्याला आधार तरी सांपडतो !

वर्गसमन्वयाचें तत्त्व न्यायाच्या भूमिकेवरून अमलांत आणण्याचा निश्चय केलेले हिंदुसंघटनावादी कार्यकर्ते समाजांत चौफेर फिरूं लागतील तर मालक व मजूर, जमीनदार व शेतकरी अशा प्रकारच्या सर्व वर्गांच्या गैरसमजुतीचें निवारण करूं शकतील. मालक, 'मालक' असला म्हणून त्यानें आपण मनुष्य आहों हें विसरून चालणार नाहीं आणि तो जर माणुसकीला जागेल तर हिंदु मजूरहि सहसा वर्दळीवर येणार नाहींत. वर्दळीवर येऊं नये ही जी हिंदूंची उपजत प्रवृत्ति ती हिंदुमजुरांतहि असतेच असते. प्रसंग निकरावरच आला म्हणजे हिंदु मजूर या प्रवृत्तीला पारखा बनतो.

> मालकांना माणुसकीच्या बंधनांत ठेवणें आणि वर्दळीवर येण्याच्या प्रसंगांपासून मजुरांची मुक्तता करणें हीं कामें हिंदुसंघटनवाद्यांना हातीं घ्यावीं लागतील.

जमिनीच्या मालकाचा मालकी हक्क म्हणून योग्य हिस्सा त्याला मिळणें हें जितकें श्रेयस्कर आहे तितकेंच, श्रम करणाऱ्या कृषीवलाला त्याच्या श्रमाच्या मानानें कांहीं तरी उरणें हेंहि आवश्यक आहे.

> भूमाता ही गोमातेसारखी आहे. गोमाता दूध देते ती मुख्यत: वात्सल्यामुळें देते. जमीन सस्यशाली होते तीहि वात्सल्यामुळेंच होते. ज्या वत्सामुळें हें वात्सल्य संभवतें त्या वत्सालाच उपाशीं मारून चालणार नाहीं !

गाईची धार काढतांना एक सड जसा वासरासाठीं म्हणून सोडून देण्यांत येतो तसाच जमिनीच्या उत्पन्नांतला कांहीं एक किमान हिस्सा जमिनीच्या वत्सासाठीं म्हणजेच कष्टाळू शेतकऱ्यासाठीं प्रथम वेगळा काढून ठेवला पाहिजे.

> हिंदु मनोभूमींतून निष्पन्न होणारें व हिंदु मनोभूमिकेला पूर्णांशानें पटणारें हें तत्त्वज्ञान हिंदुध्वजावर कोरून हिंदुसंघटनवादी लोक खेड्यापाड्यांतून फिरूं लागतील तर 'भाकरीवाद' आणि 'भाईवाद' यांची भंबेरी उडाल्याशिवाय राहणार नाहीं.

हिंदुसंघटनेच्या कार्याला या भूमिकेवरून सुरुवात करण्याखेरीज गत्यंतर तर नाहींच; पण, ही भूमिका निर्माण करणें वाटतें तितकें सोपें नाहीं. आणि म्हणूनच, हिंदुसंघटनेचें कार्य हातीं घेऊं पहाणाऱ्या माणसांची निरखून-पारखून निवड झाली पाहिजे. मनाचा मोठेपणा व हिंदुसंघटनेच्या कार्यावर धार्मिक स्वरूपाची श्रद्धा हे दोन गुण अंगीं असतील तरच मनुष्याच्या हातून हिंदुसंघटनेचें कार्य योग्य वृत्तीनें व योग्य प्रकारानें होऊं शकेल. माझ्या हातीं आहे तें–अगर हातीं लागलें आहे तें––सर्वच्या सर्व जसेंच्या तसें टिकलेंहि पाहिजे आणि हिंदुसमाज संघटितहि झाला पाहिजे या दोन अपेक्षा नुसत्या परस्परविसंगतच नसून त्या परस्परविरोधीहि आहेत. You cannot eat a cake and also have it, हाच न्याय या बाबतींत खरा ठरणारा आहे. मला प्राप्त झालेली भलीबुरी प्रतिष्ठा, मला लाभलेलें वेडेंवांकडें स्वास्थ्य, माझ्या तिजोरींत सांठलेली संपदा, माझ्या अंगांत खेळणारें बळ या सर्व वस्तूंना रेंसभर विकृति होतां कामा नये आणि हिंदु-संघटन मात्र झालें पाहिजे अशी अपेक्षा करणारांना हिंदुसंघटन हा शब्द तेवढा

कळला; त्या शब्दाचा अर्थ त्यांना अद्याप कळावयाचा आहे, असें म्हणावें लागेल. हिंदुसमाज हें एक स्वतंत्र विश्व आहे आणि विश्वात्मक देवाचा संतोष व्हावा म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं स्वत:चें मन जसें मोठें व मऊ बनविलें होतें तसेंच प्रत्येक हिंदुसंघटनवाद्याचें मन मोठें व मऊ बनलें पाहिजे. राज्यवैभव भोगूं लागलेल्या आपल्या पराक्रमी पुत्रांची विनंति अव्हेरून कुंतीमाता धृतराष्ट्रासह तपश्चर्येला निघाली; तेव्हां तिनें पांडवांना जो बहुमोल उपदेश केला तो व्यासमहिर्षींनीं श्लोकार्धांतच सांगितला आहे; पण तो उपदेश सगळ्या महाभारताच्या तात्पर्यासारखा आहे, असें भारताचार्य कै. नानासाहेब वैद्य यांनीं म्हटलें आहे.

> "**धर्मे वो धीयतां बुद्धिः मनो वो महदस्तु च**" (तुमची बुद्धि धर्माच्या ठिकाणीं स्थिर होवो आणि तुमचीं मनें विशाल होवोत) हाच उपदेश आपल्यालाहि लागू आहे, असें प्रत्येक हिंदुसंघटनवाद्यानें मानलें पाहिजे.

असे हिंदुसंघटनवादी अद्यापि भरपूर निर्माण झालेले नसल्यामुळें, हिंदु समाजांतील असंख्य लोकांना हिंदुसंघटन म्हणजे कांहींतरी पोकळ बडबड आहे असें वाटतें. हिंदुसमाजांतील कोटचवधि माणसें अज्ञान, दैन्य, निराशा, जुलूम यांच्याशीं दररोज झगडत असतांना, हिंदुसंघटनवादी त्यांच्या सन्निध येऊन मायेचा शब्दहि अद्याप बोलूं शकत नसल्यामुळेंच, त्यांच्या तोंडून हिंदु-संघटनाबद्दल परकेपणा सुचविणारे शब्द बाहेर पडतात.

> **" जनांच्या कोरडया गप्पा, असे सारे जगद्बंधु**
> **हमामा गर्जनेचा हो, न नेत्रीं एकही बिन्दु "**

या काव्यपंक्तींत कै० कविश्रेष्ठ तांबे यांनीं ज्या सहानुभूतिशून्य वृत्तीचें वर्णन केलें आहे तीच वृत्ति समाज आपल्या विषयींहि धारण करतो असेंच हताश बनलेल्या हजारों हिंदूंना आज तरी वाटत आहे ! अशा हजारों हिंदूंचीं सारीं दु:खें नष्ट करण्याला जी विविध प्रकारची ऐपत हिंदुसंघटनवादी व्यक्तींना व संस्थांना असणें अवश्य आहे ती ऐपत त्यांना अजून यावयाची आहे, हें खरें आहे. पण,

> ही ऐपत येईपर्यंत, समाजांतल्या दलितांबद्दल व दुःखितांबद्दल मायेचे शब्द तरी बोलूं लागण्याची संवय हिंदुसंघटनवाद्यांनीं स्वत:ला लावून घेतली पाहिजे. कारण 'जिवाच्या अखिल रोगांना उतारा एक मायेचा' हा कवीनें मांडिलेला सिद्धांत शब्दश: खरा आहे.

तीस कोटी समाजांतल्या दलितांबद्दल व दुःखितांबद्दल ममता उत्पन्न होणें ही गोष्ट मन मोठें झाल्याशिवाय साधण्यासारखी नाहीं. आणि, आज भोंवतालीं घडणाऱ्या अनेक घटनांकडे पाहिलें तर, दुर्दैवानें हें मान्य करावें लागतें कीं, मोठ्या मनाचीं माणसें समाजांत फार थोडीं आहेत. अशा मोठ्या मनाच्या माणसांची वाण असल्यामुळेंच, समाजांत नाहीं नाहीं ते संघर्ष उद्‌भवतात व वाढीस लागतात. ज्या प्रश्नावर महाराष्ट्राचें सारें समाजकारण आणि राजकारण एकसारखें आदळत व आपटत असतें तो ब्राह्मणेतरांचाच प्रश्न घ्या. समाजांत मोठ्या मनाचीं पुरेशीं माणसें असतील तर, ब्राह्मणेतरांचा प्रश्न चिघळण्याचें कांहींच कारण नाहीं. ब्राह्मणेतरांचा प्रश्न म्हणजेच महाराष्ट्रांतल्या कोटयवधि लोकांचा प्रश्न.

> ब्राह्मणेतर स्वतंत्रपणें बोलूं लागले, स्वतंत्र जागृति दर्शवूं लागले, स्वतंत्र महत्त्वाकांक्षा बाळगूं लागले, स्वतंत्र ध्येयें ठरवूं लागले यांत भिण्यासारखें काय आहे? आणि याबद्दल भीति बाळगावयाची कोणी तर ब्राह्मणांनीं! 'ब्राह्मणा: सन्तु निर्भया:' असा आशीर्वादात्मक घोष समाजांतून उठत राहावा आणि निर्भयवृत्तीनें नांदणें ब्राह्मणांना शक्य व्हावें, हें हिंदुसमाजाच्या खऱ्या आरोग्याचें लक्षण आहे. पण आज विपरीत प्रकार असा दिसतो कीं, ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांची भीति वाटते! याही पेक्षां विपरीत प्रकार असा कीं, ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांचें भय वाटतें.

ब्राह्मण आपल्याला फसवितात, ब्राह्मण आपल्याला टांग मारतात, ब्राह्मण स्वत:च्याच पोळीवर तूप ओढून घेतात अशी भावना ब्राह्मणेतर समाजांत निर्माण झाली व वाढली कीं, ब्राह्मणांनींच दृष्टि अंतर्मुख केली पाहिजे व आपल्या पायाशीं खरोखरच कांहीं जळत आहे कीं काय, याचा तपास त्यांनीं केला पाहिजे. नुसता जन्मानें नव्हे तर वृत्तीनेंहि जो ब्राह्मण असेल तो ब्राह्मणेतरांच्या संघटनेचें आणि ब्राह्मणेतरांमधील जागृतीचें मोकळ्या

मनानें स्वागतच करील. भोंवतालच्या सृष्टींत पक्ष्यांची किलबिल सुरू झाली आणि इतर प्राणिमात्रांची हालचाल सुरू झाली कीं, आरोग्यसंपन्न माणसाला प्रभातकाळ जवळ आला म्हणून आनंद वाटतो. तद्वतच, ब्राह्मणेतरांमधील जागृति पाहून निरोगी मनाच्या ब्राह्मणांना आनंदच वाटला पाहिजे. आज हा आनंद अभावानें तळपत आहे. आणि याचें कारण असें आहे कीं, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या दोन्ही समाजांत खरीं मोठ्या मनाचीं माणसें थोडीं आहेत. "मनो वो महदस्तु च" या वचनाचें स्मरण व्हावें तितक्या तीव्रतेनें दोघांनाहि होत नाहीं.

मनाचा मोठेपणा समाजांत दिसत नाहीं हें केवळ सामाजिक प्रश्नांच्या चिघळलेल्या स्वरूपावरूनहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. समाजांतील कानीन संततीचा प्रश्न हा जणूं कांहीं बेवारशी प्रश्न आहे असें आज मानलें जात आहे; आणि, कानीन संततीकडे पहाण्याच्या समाजभर पसरलेल्या अनुदार वृत्तीमुळें, कितीतरी भ्रूणहत्या रोज गल्लोगल्लीं घडत आहेत. 'भ्रूणहत्यां वा एते घ्नन्ति' अशीं वचनें नित्यपाठांत ठेवणाऱ्या हिंदूंना या भ्रूणहत्यांचें महत्त्व आकलन करतां येत नाहीं; इतकेंच नव्हे तर, या भ्रूणहत्या ज्या दुर्दैवी स्त्रियांच्या हातून होतात, त्या स्त्रियांना कुलटा, पतिता वगैरे शेलकीं विशेषणें लावतांनाहि समाजाचें मन अद्याप खिन्न होत नाहीं.

> या पतितांना पतित कोणी केलें या प्रश्नाचा विचार समाज कधीं करतो काय ? आणि या दुर्दैवी भगिनी पतिता आहेत असेंहि क्षणभर मानलें तरी, त्यांची हिंदु संतति पतित नाहीं ना ?

अशा संततीलाहि पतित म्हणण्याइतके शुचिर्भूत लोक हिंदु समाजांत असतील तर त्यांना ख्रिस्ताच्या चरित्रांतील एक प्रसिद्ध गोष्ट सांगितली पाहिजे. एका उन्मार्गगामी स्त्रीच्या मागें समाजकंटक हात धुवून लागत आहेत असें दिसल्यावर ख्रिस्त त्या समाजकंटकांकडे वळला आणि म्हणाला, "स्वतःचें चारित्र्य धुतल्या तांदळासारखें आहे असें ज्याचा अंतरींचा ईश्वर म्हणत असेल त्यानें या भगिनीवर खुशाल दगड भिरकवावा." ख्रिस्ताचे शब्द ऐकतांच सारे समाजकंटक निःशब्द बनले. कारण, ज्यांचीं चारित्र्यें धुतल्या तांदळासारखीं असतात ते समाजांतील सत्पुरुष अभागिनी स्त्रियांचा छळ करण्याला प्रवृत्तच होत नाहींत.

पतितत्व, पापीपणा इत्यादि परंपराप्राप्त कल्पना उराशीं बाळगून ठेवून आपण हिंदुसमाजाचें केवढें अकल्याण करीत आहोंत हें हिंदुसमाजांतील मोठमोठ्या माणसांनाहि अजून पटावयाचें आहे. कर्ण हा कुंतीचा कानीन पुत्र होता. जनलज्जेच्या भीतीमुळें कुंतीनें त्याचा त्याग कसा केला हें 'गंगे गोदे यमुने' या प्रसिद्ध आर्येमुळें तरी सर्वांना अवगत आहे.

> कानीन संततीबद्दलची समाजांतली कोती भावना कुंतीच्या पुत्रांना बाधक ठरली ! पांच पांडवांच्या बरोबर सहावा म्हणून जो कर्ण सत्पक्ष घेऊन लढला असता तो कर्ण दुर्दैवानें असत्पक्षांतील रणशूर ठरला !

हें महाभारतांतील उदाहरण सदैव डोळ्यांपुढें असूनहि, हिंदु समाजानें अद्याप जागृत होऊं नये काय ? या कानीन संततीची हिंदु म्हणून जोपासना होऊं लागली, या कानीन संततीच्या योगक्षेमाचा भार हिंदुसमाजानें सामाजिक जबाबदारी म्हणून उचलिला तर, या कानीन संततींतून हजारों रणशूर 'कर्ण' निर्माण होणार नाहींत का ? परकी राजसत्तेमुळें हिंदु समाजांतील क्षात्रवृत्तीचा लोप झाला असें आपण उठल्याबसल्या म्हणतों आणि ती आपली तक्रार रास्तहि आहे.

> शस्त्र केव्हां ना केव्हां तरी हातीं धरण्याची संधि मिळाल्याविना क्षात्रवृत्तीचें पोषण होऊं शकत नाहीं हें सत्य असल्यामुळेंच, स्वातंत्र्यवीर सावरकर, वाईटपणा पत्करूनहि, 'सैन्यांत शिरा' असा उपदेश हिंदूंना करीत आहेत.

ज्यांच्यामागें प्रतिष्ठेचें, पोराबाळांचें, अगर जबाबदारीचें लटांबर आहे अशीं माणसेंहि क्षात्रतेज प्रकट करूं शकतात; पण,

> माणूस जितका पाशशून्य तितका क्षात्रवृत्तीच्या जोपासनेला तो अधिक लायक ठरण्यासारखा असतो. या दृष्टीनें, या कानीन संततीचें संगोपन करण्याचें महत्त्व हिंदुसमाजानें वेळींच ओळखावयाला नको काय ?

तीस कोटी हिंदु समाजाची जूट घडवून आणून त्या समाजाला पारतंत्र्यमुक्त करणें हें हिंदुसंघटनेचें ध्येय आहे. या ध्येयासाठीं काय झालें पाहिजे

हें महर्षि व सेनापति या दोन्ही पदव्यांना पात्र ठरलेले सेनापति बापट यांनीं निःसंदिग्धपणें सांगितलें आहे.

हजारोंचा तनु-त्याग जुटाया देश हा व्हावा ।
हजारोंचा तनु-त्याग सुटाया देश हा व्हावा ॥

असें सेनापति बजावून सांगत आहेत. हजारोंच्या तनुत्यागांत फांसावर आनंदानें चढणाऱ्या क्रांतिवीरांचा अंतर्भाव सेनापतींनीं केला असेल, हें त्यांच्या चरित्राच्या व चारित्र्याच्या अवलोकनावरून पटण्यासारखें आहे. पण, हा तनुत्याग एवढ्या मर्यादित अर्थानेंच सांगितलेला आहे, असें समजण्याचें कारण नाहीं.

हिंदु समाजांतील दैन्य, दारिद्र्य, भोळेपणा, निराशा यांची हकालपट्टी व्हावयाची असेल तर त्या कार्यांत अहर्निश झिजणारे आणि अशा रीतीनें झिजून तनुत्याग करणारे हजारों मिशनरी पुढें आले पाहिजेत,

असाहि सेनापतींच्या म्हणण्याचा आशय असू शकेल. योग्य मनोवृत्ति ज्यांच्या ठिकाणीं बाणली आहे, अशा तरुणांनीं आयुष्याचीं उमेदीचीं कांहीं वर्षें तरी या हिंदुसंघटनाच्या उदात्त कार्यासाठीं दिलीं नाहींत तर हिंदुराष्ट्र उद्धरेल हा संभव फार कमी आहे. मानव्याचा उद्धार आणि हिंदु राष्ट्राचा उद्धार या गोष्टी परस्परांपासून फारशा भिन्न नाहींत. हें ओळखून तरी, हिंदु तरुणांनीं संघटनानुकूल वृत्ति जोपासिली पाहिजे.

सध्यांच्या तरुणांत वाढत चाललेली विलासी वृत्ति पाहून सेनापतींचें अंतःकरण कसें कळवळतें याची जाणीव हिंदुतरुणांना होणें अवश्य आहे. "जुटे कैसा, सुटे कैसा, विलासी नीति जों वाढे" असा हृदयाला पीळ पाडणारा प्रश्न हिंदु तरुणांना विचारून, सेनापतींनीं विलासी नीतीचा त्याग करण्याचा आदेशच त्यांना दिलेला आहे.

हिंदुसंघटनाचें कार्य अशा उंच पातळीवरून होऊं लागलें तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य असे सर्व प्रश्न एका पिढींत पार सुटून जातील.

ब्राह्मणांत दामाजीपंत निर्माण झाले कीं त्याच्या संकटकालीं धाव घेणारे विठू महार अस्पृश्य समाजांत निर्माण होतातच!

वरचा हिंदुसमाज कांहींसा बदलला अगर बावरला असला तरी खालचा समाज अद्यापि बदलला नाहीं हें सत्य आहे; आणि, हिंदुसंघटनेचें कार्य यशस्वी होईल हें भविष्य आशावादीपणानें वर्तविण्याला जे आधार आहेत त्यांत बहुसंख्य हिंदुसमाजांत अद्यापहि टिकून असलेलें हिंदुत्वप्रेम हा एक महत्त्वाचा आधार होय! योग्य वृत्तीनें प्रेरित झालेले हिंदुसंघटनवादी कार्यकर्ते समाजसंघटनेचें कार्य करूं लागतील तर, हिंदुमहासभा ही ब्राह्मणांची सभा आहे हा खराखोटा आक्षेप सांदीकोपऱ्यांत दडून बसेल. हिंदुमहासभा ब्राह्मणांची कां असावी? तिला शिंपी पाहिजेत, तिला चांभार पाहिजेत, तिला कुंभार पाहिजेत, तिला अठरा पगड हिंदु जात सगळीच्या सगळी पाहिजेच आहे! रुद्रसूक्त रचणाऱ्या द्रष्टया ऋषीनें समाजाचें विश्वात्मक स्वरूप नजरेसमोर ठेविलें आहे आणि कसलाहि सानथोर व्यवसाय करणारा मनुष्य हा ईश्वरस्वरूपीच आहे असें मानून, त्यानें प्रत्येक व्यवसायांत गढून गेलेल्या माणसाला नम्रपणानें नमस्कार केलेला आहे. 'नम इषुकृद्भ्यो धन्वकृद्भ्यश्च वो नमो नमः' असें म्हणणाऱ्या या ऋषिश्रेष्ठानें कुलाल, कर्मार, चर्मकार, श्वपति अशा सर्वांना सारख्याच भक्तिभावानें नमस्कार केलेला आहे. अशाच भक्तिभावानें हिंदुसंघटनावादी कार्यकर्ते कामाला लागतील तर, उद्यांच्या हिंदु सभेंत नामदेवासारखे शिंपी, गोरोबासारखे कुंभार, सेना न्हाव्यासारखे कारागीर, रोहिदासासारखे चांभार असे सर्व एकमेळानें नांदूं लागतील. अशा सगळ्यांचीच हिंदुमहासभेला आणि हिंदुसंघटनेच्या कार्याला सदैव गरज राहील.


# शिवणकला शिक्षक

(लेखक—आर्. एन्. पराडकर, लंडन डिप्लोमा–होल्डर)

शिवणकलेचें, सर्व तऱ्हेच्या कपडयांचें संपूर्ण माहितीचें ५०० पृष्ठांचें व ५०० आकृत्यांचें पुस्तक भाग १–२–३. एकत्र किंमत ६ रु. व्ही. पी.नें ६–८–० अगदीं नवीन शिकणारापासून तों तज्ज्ञ शिप्यापर्यंत उपयुक्त आहे.

**पराडकर टेलरिंग ॲकॅडेमी,** ६७२ सदाशिव, पुणें २.

दैन्यामुळें व दारिद्र्यामुळें हिंदुसमाजाला रकटीं पांघरावीं लागतात.
त्यामुळें त्याचे बारीक सारीकहि दोष मिस् मेयोसारख्या ' गटारइन्स्पेक्ट्रेस '

कडून भडक रंगांत जगाच्या चावडीवर मांडले जातात. हिंदु-
समाजाच्या अंगावर आज जीं रकटीं आहेत तीं नामदेव महा-
राजांसारख्या शिंप्यांकडून व्यवस्थितपणें शिवलीं गेलीं तर
हिंदुसमाजांतील दोषांचें हें ओंगळ प्रदर्शन टळणार नाहीं का ?

मोठी संघटना म्हटली म्हणजे त्या संघटनेंत कच्चींपक्कीं मडकीं एकमेळानें
नांदावयाचीच ! कच्च्या मडक्यांचा आवाज नेमका लोकांच्या कानावर
घालून त्यांना त्यांचें योग्य स्थान दाखविण्यासाठीं गोरोबा कुंभारांचीहि हिंदु-
संघटन कार्याला जरुरी आहे. हिंदुसंघटनावादी कार्यकर्त्यांनीं आपलीं मनें
कितीहि निर्मळ बनविलीं तरी, कित्येकांच्या डोक्यांतला कुकल्पनांचा मळ
एकदमच निघून जाईल असें नाहीं. हा मळ काढून टाकण्यासाठीं सेनोबा-
सारख्या कारागिरांची आवश्यकता हिंदुसंघटनाकार्यांत आहेच आहे. हिंदु-
संघटनेचें अवाढव्य कार्य करतांना ज्यांना आपल्या शरीरावरच्या कातड्याचे
जोडे फाडावे लागतील त्यांचे क्लेश कांहीं अंशीं तरी कमी व्हावे म्हणून, त्यांना
पादत्राणें पुरविण्यासाठीं —आणि हिंदुसंघटनेच्या कार्यावर कुत्सितपणानें आक्षेप
घेणारांना मोजून पैजारा मारण्यासाठीं—रोहिदास बाबांचीहि गरज आहेच
आहे. हे सर्व थर हिंदुसंघटनाकार्यांत अवश्य सामील होतील आणि एकसंध
झालेला प्रचंड हिंदु समाज कोटिकोटि कंठांतून धन्योद्गार काढूं लागेल, असें
मनोहर दृश्य एखाद्या हिंदूनें आजच कल्पनेनें पाहिलें तर तें खास चुकीचें
ठरणार नाहीं !

कारण, हिंदुसंघटनेच्या कार्याच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल विश्वास
बाळगण्याला अत्यंत अनुकूल असा कोणता काल असेल तर तो सध्यांचाच
काल आहे. चालू युद्धानंतर जगाचें रंगरूप कसें व किती पालटतें हें ठरविण्याचें
मोठेंसें सामर्थ्य सध्यां आपल्या ठिकाणीं नाहीं. आपल्या राज्यकर्त्यांनीं
आपल्या ठिकाणीं हें सामर्थ्य निर्माण करून ठेविलें असतें तर, ब्रिटिश साम्रा-
ज्यावर ओढवलेल्या सध्यांच्या प्रसंगांत आपण केवढी तरी कामगिरी करून
दाखविली असती व ' मारितां मारितां घ्यावें,राज्य आपुलें ' हा श्रीसमर्थांचा

उपदेश, ब्रिटनच्या शत्रूंशीं लढतां लढतां स्वराज्यसंपादन करून आपण खरा करून दाखविला असता !

> " बलाढ्य राष्ट्रांमध्यें जी चढाओढ चाललेली आहे ती ज्या वेळीं निकरास येईल तेव्हां, अशा रीतीनें मृतप्राय केलेल्या हिंदुस्थानचें इंग्लंडच्या गळ्यांतील ओझें इंग्लंडास असह्य नाहीं तरी अडचणीचें झाल्याखेरीज राहणार नाहीं " हें भविष्य लोकमान्य टिळकांना १९०२ सालींच दिसलें होतें

अदूरदर्शी ब्रिटिश मुत्सद्यांना टिळकांचें द्रष्टेपण लाभलें नव्हतें म्हणून म्हणा, त्यांच्या दृष्टीवर साम्राज्याच्या वैभवाची धुंदी आली होती म्हणून म्हणा अगर हे मुत्सद्दी मुसलमानांच्या राजनिष्ठेवर फाजील विश्वास ठेवून राहिल्यामुळें म्हणा, त्यांचें हिंदु लोकांविषयींचें धोरण चुकत गेलें, यांत संशय नाहीं. गेल्या महायुद्धाच्या अखेरीपासून चालू महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत जो वीस वर्षांचा काळ लोटला त्या काळांत ब्रिटिश मुत्सद्यांना असा इषारा देणारा, लोकमान्यांच्या इतका लोकप्रिय, पुढारी हिंदु समाजांत नव्हता ! अहिंसावादाचे निष्ठावंत उपासक गांधीजी या दिशेनें विचार करतील हें शक्यच नव्हतें ! पं० जवाहरलालजी नेहरू हे गांधीजींच्या लोकविलक्षण विचारसरणीच्या भोंवऱ्यांत भ्रमूं लागले नसते आणि आंतरराष्ट्रीयवादाचा त्यांच्या मनावरील पगडा पुष्कळसा कमी असता तर, त्यांच्या हातून बहुधा या बाबतींत योग्य धोरण आंखलें गेलें असतें !

पण, स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीहून निर्बंधमुक्त होईपर्यंत या गोष्टी घडल्या नाहींत, हें खरें ! गांधीवादांत अंतर्भूत झालेले अहिंसावाद व विश्वप्रेमवाद १९२० सालीं हिंदी राजकारणांत घुसले ! १९२० सालापासून १९४१ सालापर्यंत जे जे हिंदु देशभक्त गांधीवादाजवळ जाऊन तेथून परत फिरले त्या सर्वांच्या मनोवृत्तीचें पृथक्करण विस्तारानें करणें या ठिकाणीं शक्य नाहीं. हिंदुसमाजाच्या उशापायथ्याशीं नांदणारा मुसलमान समाज अहिंसावादाचें वैय्यर्थ्य आपल्या वर्तनानें हिंदूंना रोज पटवून देत होता आणि १९२९–३० सालापासून युरोपियन राष्ट्रें व जपान यांनीं जो उपक्रम आस्ते आस्ते सुरू केला त्यामुळें अहिंसावाद व विश्वप्रेमवाद या दोहोंमधील दोष लोकांच्या निदर्शनास येत होते. गांधीवाद कितीहि गोजिरवाणा असला

अगर भासला तरी, त्यांत गंभीर स्वरूपाचीं कांहीं तरी वैगुण्यें आहेत हें अनेकांना दिसूं लागलें होतें. गांधीवादाची अपूर्णता ज्यांनीं पहिल्या दिवसापासूनच ओळखली असे कै० दादासाहेब खापर्डे, कै० बिपिनचंद्र पाल, कै० डॉ० ॲनी बेझंट, कै० सर सी० वाय्० चिंतामणी हे देशभक्त दिवंगत झाले. तपस्वी बाबासाहेब परांजपे, भालाकार भाऊसाहेब भोपटकर यांच्यासारखे कित्येक देशभक्त अद्याप सुदैवानें आपल्यामध्यें आहेत. गांधीवादावर आसक्त होऊन काँग्रेसच्या अध्यक्षपदापर्यंत पोंचलेले व शेवटीं गांधीवादाचे टीकाकार बनलेले कै० श्रीनिवास अय्यंगार आणि I Follow the Mahatma हें पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर वर्षसहा महिन्यांच्या आंतच गांधीवादाला रामराम टोकून मोकळे झालेले श्री० मुनशी यांचीं नांवेंहि, या बाबतींतलीं ठळक नांवें म्हणून, एकाद्याला सहज आठवण्यासारखीं आहेत. अणे-केळकर, मुंजे-खरे, दासबाबू-सुभाषबाबू, विठ्ठलभाई-जम्नादासजी लालाजी-भाई-परमानंद

> अशा थोर थोर देशभक्तांची मालिका चित्तचक्षूंपुढें आली आणि गांधीवादाची जवळून परीक्षा केल्यावर या देशभक्तांनीं गांधीवादाचा मार्ग शेवटीं सोडून दिला हें सत्य लक्षांत ठेविलें म्हणजे, गांधीवादांत निसर्गतःच कांहीं तरी न्यून आहे, हें आपोआप पटतें !

'पुणें-ठराव' पास होण्याच्या वेळीं गांधीजींचे व्याही श्री० राजगोपाळाचारियर, मौ० अबुल कलाम अझाद, सरदार पटेल वगैरेंनीं गांधीवादाची खरड कमी काढली, असें नाहीं ! आणि, आतां यापुढील काँग्रेसच्या राजकारणांत ही त्रयी पुणें येथील वृत्तीची व कृतीची पुनरावृत्ति काढणार नाहीं, असें तरी कशावरून ?

बॅ० सावरकरांचें वैशिष्ट्य हें कीं गांधीवादांतलें वैगुण्य त्यांनीं दुरूनच बुद्धीनें ओळखलें आणि गांधीवादाच्या दिशेला एक पाऊलहि टाकण्याला त्यांनीं स्पष्ट नकार दिला ! गांधीवादी काँग्रेसच्या भोंवतीं घुटमळत राहण्याचें व ती काँग्रेस सुधारेल या आशेंत शक्तिक्षय व कालक्षय करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें व 'एष पन्था, एतत्कर्म' असें म्हणून त्यांनीं आपला उद्योग धडाडीनें सुरू केला. सावरकरांच्या विचारौघाच्या लाटा देशाच्या कोनाकोंपऱ्यापर्यंत जाऊन पोंचूं लागल्या आणि आजवर नेमकें चुकत काय होतें तें लोकांना कळूं लागलें. यंत्राची गुलामगिरी वाईट असली तरी यंत्रद्वेष करून निभाव

लागण्याचें युग शिल्लक राहिलेलें नाहीं; स्वावलंबन हें राष्ट्रविमोचनाचें एक साधन असलें तरी, परदेशी प्रचाराला परावलंबन मानण्याचें कारण नाहीं; असहकारयोगानें संन्यासधर्माची छाटी गुंडाळली तरी शेवटीं असहकार-योगांतला संन्यास हा त्रिदंडी संन्यासच आहे; अहिंसावाद कितीहि मोहक दिसला तरी त्याचें आत्यंतिक व एकांतिक स्वरूप समाजधारणेशीं व राज-धर्माशीं विसंगतच आहे; राष्ट्ररक्षणाचा उपाय म्हणून सैनिकसिद्धता अवश्य असल्यामुळें, ही सिद्धता साधेल त्या उपायांनीं साध्य करून घेतली पाहिजे; हिंदुस्थान देश म्हणजे अहिंदूंची उतारपेठ किंवा धर्मशाळा नसून, स्वतःचें एकमेव निवासस्थान म्हणून हिंदूंनीं हिंदुस्थानकडे पाहिलें पाहिजे व या निवासस्थानाच्या सुरक्षिततेसाठीं हिंदूंनीं झटलें व झगडलें पाहिजे, इत्यादि विचार सावरकरांच्या अद्वितीय वाणींतून प्रकट होऊं लागतांच, 'हरपलें श्रेय' सांपडल्याची प्रतीति हिंदु मनाला पटूं लागली !

> अहमदाबादच्या हिंदुमहासभेचें अध्यक्षस्थान सावरकरांनीं मंडित केलें तेव्हां परमानंद-मुंजे या जोडीला असें वाटलें कीं, आपण जतन करून ठेवलेला ठेवा सांभाळण्याला समर्थ असा सिद्धपुरुष आज आपल्याला भेटला !

आणि, तेव्हांपासून आजपर्यंत सावरकरांचें कार्य अविरतपणानें चाललेलेंच आहे. महाराष्ट्रांतला शिक्षित वर्ग गांधीवादाच्या पूर्णपणें आहारीं कधींच गेला नसल्यामुळें, सावरकरांचें हिंदुसंघटणेचें तत्त्वज्ञान महाराष्ट्रांत प्रथम फोफावूं लागलें, हें स्वाभाविक आहे. टिळकांच्या वेळेपासून महाराष्ट्रीय राजकारणाशीं समरस होण्यांत मोठेपणा मानणारा बंगालप्रांतहि आज प्रायः हिंदुसंघटनवादी बनला आहे. नागपूरपासून रत्नागिरीपर्यंतचा व बडोद्यापासून बेळगांव-पर्यंतचा मराठी मुलख आणि बंगाल एवढा भाग आतां प्रायः हिंदुसंघटनवादी बनला आहे.

> सावरकरांच्या ओजस्वी संदेशानें लोण हिंदु संस्थानांपर्यंत जाऊन पोंचलें आहे व त्यामुळें ग्वालेर, इंदूर, बडोदें, कोल्हापूर, वगैरे मराठे-शाही संस्थानें आणि त्रावणकोरसारखीं कांहीं इतर संस्थानें हींहि जगाकडे एका नव्या दृष्टीनें पाहूं लागलीं आहेत.

हिंदुवंश व हिंदुजाति यांना उज्ज्वल भूतकाल आहे व या उज्ज्वल भूतकालाचें

स्मरण जागृत असल्यामुळें, हिंदुराष्ट्राचें भवितव्यहि उदात्त व उज्ज्वल ठरल्याशिवाय राहणार नाहीं, असा आत्मविश्वास रावापासून रंकापर्यंत व खाशापासून खंकापर्यंत सर्वांना वाढत्या प्रमाणांत वाटूं लागला आहे.

या आत्मविश्वासाचा फायदा घेऊन हिंदुसंघटनेचें कार्य संघटित स्वरूपांत मांडणें व चालविणें हा प्रश्न तांतडीचा प्रश्न म्हणून प्रत्येक हिंदु तरुणानें हातीं घेतला पाहिजे. हें कार्य स्वरूपतः किती व्यापक आहे व त्या कार्याच्या सिद्धीसाठीं केवढ्या विशाल मनाची अपेक्षा आहे याचें त्रोटक विवेचन यापूर्वीं केलें तें अशासाटीं कीं, मानव्याची सेवा करण्याचें विशाल ध्येय पटून तरी, हिंदु तरुणांनीं या कार्याकडे वळावें ! आजवर आपण भूतदया आणि विश्वबंधुत्व या अतिविशाल कल्पना उराशीं बाळगल्या व या कल्पनांच्या नादीं लागून आपण तीस कोटी हिंदूंच्या प्रपंचाची स्थिति काय आहे या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलें ! 'प्रपंच सोडून परमार्थ कराल, तेणें तुम्ही कष्टी व्हाल' हा रोकडा अनुभव आपल्या पदरांत पडला ! यजनयाजनप्रसंगीं मक्षिकापिपीलिकेचीहि हत्या आपल्या हातून घडूं नये इतकी आपली भूतदया अतिरेकाला पोंचली ! पण, तीस कोटी हिंदुसमाजांतले आपले कोट्यवधि बंधु रोज मृत्यूशीं झगडत आहेत या सत्यस्थितीचें स्मरणहि आपल्याला राहिलें नाहीं ! 'First things must come first' (सर्वोत्तम महत्त्वाच्या गोष्टींकडे सर्वांआधीं लक्ष पुरविलें पाहिजे) ही जगांतली रीति व नीति यापुढें तरी आपण विसरतां कामा नये.

> तीस कोटी हिंदू हें एक विश्वच आहे आणि या हिंदूंबद्दल भ्रातृभावना बाळगणें हेंच विश्वबंधुतेचें खरें लक्षण आहे ही गोष्ट आपण सर्वांना पटवून दिली पाहिजे. भूतदयेच्या भाबड्या कल्पना झुगारून द्या, तीस कोटी हिंदुसमाजांत जे कोट्यवधि दयार्ह स्त्रीपुरुष व लेंकरें आहेत त्यांच्याविषयींची दया बाळगा, म्हणजेच खऱ्या भूतदयेचें पुण्य पदरीं पडेल हें जाणत्या हिंदूंना पटवून देण्याची तांतडी केली पाहिजे.

तुफान दर्या हेंच ज्या वर्गाचें ऐसपैस शेत असा कोळीसमाज, दऱ्याखोऱ्यांतून राहणारा व वन्य वस्तूंवर उदरनिर्वाह करणारा कातकरी समाज—अशा समाजांत हिंदुत्वाची जागृति करणें व त्या समाजांवर हिंदुत्वाचे संस्कार

उमटविणें हें, प्रत्येक कार्यारंभीं श्रीगणेशपूजन करणाऱ्या हिंदूंना अवघड वाटतां कामा नये. श्रीगजानन हा देव 'व्रातपति' या नांवानें ओळखला जातो. इतस्ततः भटकत फिरणाऱ्या वन्य जमातींचें नेतृत्व संपादून व त्या जमातींना आपल्या संस्कृतींत समाविष्ट करून मान्यता पावलेल्या

> गजाननाची पूजा सार्थ व्हावयाची असेल तर, अशा अनेक जमातींच्या उद्धाराकडे लक्ष पुरविल्याशिवाय हिंदुसंघटन कार्य करणारांना गत्यंतरच नाहीं.

अशीं कार्यें तांतडीनें पार पाडून व हिंदुस्थानांतल्या कोटिसंख्य हिंदुसमाजांत समान संस्कृति, समान आचार, समान विचार यांची संस्थापना करून हिंदुसंघटनवादी कार्यकर्त्यांना आफ्रिका, अमेरिका, वगैरे खंडांकडे वळावयाचें आहे. कोणत्याच संस्कृतींत समाविष्ट न झालेले कोटचवधि लोक या दोन खंडांत आहेत व या पोरक्या लोकांना इस्लामी व खिस्ती संस्कृतींत खेंचून आणण्याचें कार्य यापूर्वींच सुरू झालेलें आहे. या दोन्ही संस्कृतींना पायबंद घालण्याची उमेद हिंदुसंस्कृतीच्या अभिमान्यांनीं धरिली पाहिजे.

हें कार्य मोठें आहे व त्याच्या सिद्धीसाठीं मिशनरीवृत्तीच्या पराक्रमी हिंदूंची परंपरा निर्माण झाली पाहिजे. अशी परंपरा निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न श्रीसमर्थ रामदासांनीं पूर्वीं केला. भोळ्या भक्तिभावाचें कोडकौतुक करणारा वारकरीसंप्रदाय आजतागायत टिकून राहिला आहे; पण, क्रियावादावर भर देणारा रामदासीसंप्रदाय केव्हांच नामशेष होऊन गेला आहे! या वस्तुस्थितीपासून बोध घेऊनच, या मिशनरीकार्याचें स्वरूप

**अनासपुरे अँड सन्स्**

देशी व विलायती

**भाजीपाल्याच्या बियांचे व्यापारी**

**७६९, सदाशिव पेठ, पुणें २**

ठरवावें लागेल हें खरें; पण, अशा मिशनरी कार्यावांचून समाजसंघटना व राष्ट्रसंघटना निर्माण होणार नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे ! श्री शिवछत्रपतींच्या काळीं समर्थांची संघटना जिवंत होती; बाजीरावसाहेबांच्या काळीं ही संघटना नामशेष होऊन, सावसावकारीच्या उपद्व्यापांत लडबडलेला ब्रह्मेंद्रस्वामी प्रतिष्ठितपणानें नांदत होता. या तफावतीचे मराठी साम्राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीनें कांहीं परिणाम झाले कीं काय हेंहि तपासून पाहिलें पाहिजे.

हिंदुसंघटनेचें राजकारणी कार्य व हिंदुसंघटनेचें मिशनरी कार्य-हिंदुसंघटनेचे छत्रपति व हिंदुसंघटनेचे समर्थ-यांचे परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचे असावे याचाहि विचार दूरदर्शीपणानें झाला पाहिजे.

हे सर्व विचार करून, वेळ वांया न दवडितां कार्याला लागलें पाहिजे; कारण, मराठी मुलूख, बंगाल वगैरे कांहीं भाग वगळले तर इतर भागांत अद्याप हिंदुसंघटनेच्या कार्याचा ओनामाच गिरविला जात आहे. महाराष्ट्रीय हिंदु तरुणांनीं तर हें कार्य म्हणजे आपली मिरासदारीच आहे, असें समजलें पाहिजे.

सह्याद्रीच्या शिखरांवर वसलेल्या किल्ल्यांतून समोरच्या समुद्राची टेहेळणी करीत रहावें, शस्त्रधारी उजवा हात उत्तरेपर्यंत पोंचवून अटकेपर्यंतच्या इस्लामी संकटाचा प्रतिकार करावा व उरलेल्या हातानें दक्षिण भारतांतल्या हिंदूंना अभय द्यावें-हें महाराष्ट्रीय हिंदु तरुणांचें कुलव्रत आहे.

खानदेशच्या कांहीं भागांतले कित्येक लोक उजव्या हाताला 'जेवण्याहात' म्हणूं लागले आहेत ! इतकें या कुलव्रताचें विस्मरण आपल्याला होऊं लागलें आहे ! महाराष्ट्रालाच आपल्या पूर्वपरंपरेचें विस्मरण झालें कीं सगळा ग्रंथ आटोपलाच !

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें
मराठ्याविना राष्ट्र-गाडा न चाले

हा सेनापति बापटांनीं दिलेला इषारा चित्तांत वागवून, महाराष्ट्रीय हिंदु

तरुणांनीं सुचेल त्या पद्धतीनें व जमेल त्या ठिकाणीं हिंदुसंघटनेच्या कार्याला प्रारंभ केला पाहिजे !

> हिंदुसमाजाचा थर नि थर जागृत व डोळस करणारें संघटनात्मक कार्य, हिंदु म्हणून राजकारण करण्याची उमेद व आधुनिक शास्त्रसंपन्नता व शस्त्रसंपन्नता यांच्याविषयींची आस्था इतक्या गुणांनी प्रबळ बनलेला हिंदुसमाज, उद्यांच्या जगाची घडी कशीहि बसली तरी,आपल्या स्वतंत्र तेजानें तळपल्याशिवाय राहणार नाहीं.

चालू लढाईनंतर इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत यथापूर्व राहिली तर इंग्रजांना यापूर्वींचीं हिंदुविषयक धोरणें तशींच पुढें चालवितां येणार नाहींत ! मुसलमानांना चढवून ठेव याचें धोरण भारतीय राजकारणापुरतें इंग्रजांनीं आजवर खेळविलें हें खरें; पण, याचा अर्थ असा नव्हे कीं, इंग्रज व युरोपियन मुत्सद्दी मुसलमानांचें सत्यस्वरूप ओळखीत नाहींत ! बर्कपासूनच्या अनेक ब्रिटिश मुत्सद्यांनीं तुर्की मुसलमानांबद्दलचा तिरस्कार असंदिग्ध शब्दांत व्यक्त करून ठेविलेला आहे. "तुर्की लोक रानटी आहेत आणि कोणाहि सुसंस्कृत ख्रिस्ती राष्ट्रानें त्यांच्याशीं मित्रभाव ठेवूं नये" असा इषारा बर्कनें देऊन ठेविला होता. यच्चयावत् सर्व तुर्कांनीं बाडबिछायत घेऊन युरोपमधून निघून जावें, असा सल्ला देण्याला ग्लॅडस्टननें कमी केलें नव्हतें ! तुर्की मुसलमानांच्या विध्वंसक प्रवृत्तीचा निषेध ब्राइससारख्या ब्रिटिश मुत्सद्यानें जितक्या कडक भाषेंत केला आहे तितक्याच कठोर शब्दांत ट्रीट्स्के या जर्मन विचारवीरानें-हि तुर्कांच्या या प्रवृत्तीवर कोरडे ओढले आहेत !

> भारतीय सैन्यांतले मुसलमान मुसलमानांविरुद्ध लढाईला पाठविण्यांत येऊं नयेत हा चालू युद्धाच्या आरंभीं जीनांनीं धरिलेला आग्रह ब्रिटिश मुत्सद्यांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालणारा आहे.

इस्लामी जग संघटित करण्याची मुसलमानांची मनीषा व जीनांच्या तोंडून निघालेली भारतीय मुसलमानांच्या मनांतली ही मळमळ यांचा दूरदर्शीपणानें विचार करून व ब्रिटिश मुत्सद्यांना यापुढें आपलीं धोरणें आंखावीं लागतील ! चालू युद्धानंतरच्या काळांत ब्रिटिश मुत्सद्दी आत्मघातकी-

पणाचीं धोरणें आंखण्याची चूक करणार नसतील तर, हिंदूंना विश्वासांत घेऊन, हिंदूंच्या ठिकाणीं असलेल्या उदात्त गुणांना मान्यता देऊनच त्यांना वागावें लागेल.

> अमेरिका व इंग्लंड यांना यापुढें जगांतलें आपलें संयुक्त स्थान मानानें टिकवावयाचें असेल तर, हिंदूंना समान दर्जा देऊन व हिंदूंच्या सर्वांगीण वाढीला अवसर देऊन वागण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नाहीं !

परिस्थितीचा फांसा हिंदूंना अनुकूल दान देणार अशीं लक्षणें दिसत आहेत; आपण मात्र हिंदु म्हणूनच जगण्याचा व हिंदु म्हणूनच मरण्याचा निर्धार केला पाहिजे ! पाकिस्तानचें संकट पार उलथून टाकण्याचें बुद्धिबळ व बाहुबळ आपल्याला जर कशामुळें लाभणार असेल तर तें या निर्धारामुळेंच लाभेल !

चालू युद्ध सुरू होण्यापूर्वीं कित्येक वर्षांपासून, जर्मनी, जपान रशियाप्रभृति देश हिंदुस्थानचें आपसांत वाटप कसें करून घ्यावयाचें याबद्दलच्या योजना आंखण्यांत रमून गेले होते व या वाटपाच्या योजना आज तयारहि आहेत, असें वृत्त मध्यंतरीं प्रसिद्ध झालें होतें. हिंदूंना इंग्रजांचें दास्य नको आहे त्याप्रमाणेंच इतर कोणाचेंहि दास्य हिंदूंना नको आहे.

> हिंदुस्थानचें वाटप करण्याचे संकल्प सिद्ध होऊं लागले तर, स्वतःजवळ असेल नसेल तें सगळें बळ एकवटून हिंदूंना लढावें लागेल ! आणि असा प्रसंग दुर्दैवानें आलाच तर, आजवर ज्या इंग्रजांनीं हिंदूंबद्दल अविश्वास बाळगिला ते इंग्रजच हिंदूंनीं सुरू केलेल्या या संग्रामांत हिंदूंना शक्य ती मदत करतील !

अशा गोष्टी घडल्याचे दाखले इतिहासांत नमूद आहेत. हिंदुस्थानांत आपली सत्ता प्रस्थापित होत नाहीं असें १८ व्या शतकाच्या शेवटीं फरेंच मुत्सद्यांना कळून चुकलें ! जें आपल्या हातीं लागलें नाहीं तें निदान इंग्रजांच्या तरी हातीं लागूं नये या हेतूनें त्या काळांतील फरेंच मुत्सद्दी, इंग्रजांविरुद्ध लढणाऱ्या भारतीय सत्ताधाऱ्यांना शक्य ती मदत करीत असत. हिंदुस्थान आपल्या हातचें गेलें तर तें निदान इतर कोणाच्या हातीं जाऊं नये या स्वार्थीच

हेतूनें प्रेरित होऊन, इंग्रज व अमेरिकन लोक आपला पाठपुरावा करणारच नाहींत, असें तरी कां समजावें !

तात्पर्य असें कीं, बदलत्या परिस्थितीचा फायदा हरएक प्रकारें घेण्याची वृत्ति हिंदुराष्ट्रांत जागृत झाली तर, भोंवतालच्या घडामोडींचा फायदा मिळून स्वतंत्र हिंदुराष्ट्र अखंड हिंदुस्थानचें स्वामित्व मिळवूं व टिकवूं शकेल. मात्र हें घडण्यासाठीं, संघटित हिंदु राष्ट्रानें कांहीं सिद्धांत पक्केपणीं आत्मसात् केले पाहिजेत ! 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' हा सिद्धांत स्वार्थी-पणाचा असला व व्यक्तीच्या व्यवहारांत या सिद्धांताला अपवादभूत अशीं कांहीं उदाहरणें आढळत असलीं तरी, राष्ट्रांचे व्यवहार याच सिद्धांतानुरूप ठरत व चालत असतात हें हिंदुराष्ट्रानें विसरून चालणार नाहीं ! चालू युद्धांत जर्मनी व रशिया यांच्या परस्परसंबंधांत जे नाटकी बदल झाले त्यांचा अन्वयार्थ लावण्याला हें एकच सूत्र उपयोगी पडणारें आहे ! राजकारणी व्यवहार हा झगडे निर्माण करण्याचा व झगडे निस्तरण्याचाच व्यवहार आहे. ज्यांना झगडे नको असतील अशा शांतिब्रह्मांनीं 'गीतारहस्य' म्हणून,

**यदि मामप्रतीकारं अशस्त्रं शस्त्रपाणयः**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत्**

या श्लोकाचा खुशाल निदिध्यास घ्यावा व देवघरांत जाऊन बसावें ! अशा शांतिब्रह्मांना देवघरांत खऱ्या अर्थानें पूज्य मानावयाला हरकत नाहीं; इतरत्र मात्र त्यांना निराळ्या अर्थानें पूज्य मानलें पाहिजे ! हे व असे सिद्धांत सदैव स्मरणांत बाळगून हिंदुराष्ट्रांतल्या प्रत्येक लहानथोर व्यक्तीनें

**अहं हिंदुः अहं हिंदुः, अहं हिंदुः प्रतापवान्**
**मम देशो ममैवायं स्वातंत्र्यं मम दैवतम् ॥**

या हिंदुसंघटनेच्या महामंत्राचा घोष करावा ! हिंदुराष्ट्रांत ही वृत्ति मुरली तर पाकिस्तानची कल्पना कबरस्थानांत गाडली गेलीच पाहिजे !

# रुबाबसे चलो!



आपका रुबाब
और दिमाख.
आपने पहने हुवे
सूटसे मालूम
होता है.

★

**पी.**
**एम्.**
ॲन्ड
**को.**

★

इसी कंपनीका
सूट पहनो.
एकदम
अप-टु-डेट
स्टाइल.

पी. एम्. अँड को.

टेलर अँड क्लॉथ मर्चंट्स्, पूना २.